**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८४१/२००८**
**अपील क्रमांक ८४२/२००८**
**अपील क्रमांक ८४३/२००८**

**१) श्री मनोज सुखदेव खोब्रागडे(पोलीस हवालदार)**
**बेलेवाडी, चंद्रपूर (गुन्हे अन्वेषण विभाग, पथक),**
**चंद्रपूर. ता.जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**परिमंडळ क्रं.१, नागपूर शहर.** **उत्तरवादी**
**३) जा माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**सिताबर्डी विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपील क्रमांक ८४१/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२०८ रोजी मा. उच्च न्यायालयात जे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे ते प्रतिज्ञापत्र कोणत्या कागदपत्रांच्या आधारे दाखल केले आहे व त्यातील प्रत्येक परिच्छेद निहाय एकुण १३ मुद्यांमध्ये कागदपत्रांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जी माहिती उपलब्ध झाली त्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.११.२००८ रोजी देण्यात येवून अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, प्रतिज्ञापत्रातील प्रत्येक परिच्छेदातील विधानाच्या संदर्भामध्ये त्यांना कागदपत्रे यापुर्वीच उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी यांनी आयोगापूढे सांगितले. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्राच्या संदर्भात जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या प्रश्नांच्या संदर्भात

कोणत्याही प्रकारच्या विश्लेषणाची आवश्यकता नाही असे अपीलकर्ता यांना दिनांक २९.९.२००८ रोजी पोस्टोन माहिती पाठविली, ती अपीलकर्ता यांना दिनांक ११.१०.२००८ रोजी प्राप्त झाली असे अपीलकर्ता यांनी सांगितले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य असल्याने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ८४२/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २१.९.२००८ रोजी प्रश्न उत्तराच्या माध्यमातून महिला पोलीस उपनिरीक्षक निरी एस. मेश्राम यांनी नयना गवई ऊर्फ नयाना मोटघरे यांनी दिलेल्या तक्रार अर्जाची चौकशी करुन पो.स्टे. सिताबर्डी अप.नं. १७६/०७, कलम ४९८, ४१७, ४२०, ३४ भा.द.वि.गुन्हा जो दाखल केला त्या संबंधाने माहिती मागितलेली दिसून येते. माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे

५. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.१०.२००८ रोजी पोस्टाद्वारे माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु, उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.११.२००८ रोजी देण्यात येवून अपीलकर्ता यांना पोस्टाने दिनांक २३.११.२००८ रोजी माहिती देण्यात आली आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना तपास अधिका-याची आठवडी डायरीची कागदपत्रे उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तपास अधिका-याची आठवडी डायरी ही एक वर्षाच्या कालावधी करीता जतन केली जाते. व त्यामुळे उपलब्ध असल्यास कागदपत्रे पुरविण्यात येईल व नसल्यास पुरविता येणार नाही व तसे अपीलकर्ता यांना कळविण्यास हरकत नाही असे त्यांनी आयोगास सांगितले.

७. अपीलकर्ता यांनी जी माहिती या अपीलात मागितली आहे त्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, स्वत: अर्जदार हे पोलीस खात्यातील असल्याने त्यांनी सर्व कागदपत्रे व नस्ती यांचे अवलोकन केलेले आहे. त्यांना ती माहिती सुध्दा पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

८. अपील क्रमांक ८४३/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी भा.द.वि.४९८(अे) गुन्हा दाखल करण्यापुर्वी पोलीस स्टेशनचे गैरप्रणालीबाबत माहिती

मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक २४.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्याचप्रमाणे दिनांक १९.९.२००८ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलामध्ये माहिती अधिका-यांचा निर्णय हा कायम केलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, याबाबतही अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८४१/२००८ व ८४३/२००८ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक ८४२/२००८ मध्ये तपासी अधिका-यांची आठवडी डायरी उपलब्ध असल्यास संबंधीत गुन्हयाच्या तपासाच्या संदर्भातील नोंदीच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

३) अपलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग ाागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४९०/०८**

**१) श्री  शामराव रामाजी झाडे,**
**मु.पो.विरुर(स्टे.), ता.राजूरा, जि. चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**लघु सिंचाई उपविभाग, जि.प. राजूरा,**
**ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जा माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,**
**लघु सिंचाई उपविभाग, जि.प. राजूरा,**
**ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक २४.४.२००९ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपीलकर्ता हजर होते व त्यांनी निवेदेन दाखल केलेले आहे. आज दिनांक ९.६.२००९ रोजीच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००८ रोजी शाखा अभियंता, जिल्हा परिषद  लघु सिंचाई उपविभाग, राजूरा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"दि. ७.३.०८ ला म.ग्रा.रो.ह.यो.अंतर्गत कविठपेठ येथील नवीन गांव तलावाचा कामाचे पगार न झाल्यामुळे उशिरा पगारासंदर्भात भरपाई भत्ता व कामाचे ठिकाण ५ किमी च्या वर असल्यामुळे त्याचा प्रवास भत्ता म्हणून अतिरिक्त १० टक्के वतन देण्यासंदर्भात पत्र दिले. त्या पत्रावर काय कार्यवाही झाली त्या कार्यवाहीची टिपणीसह झेरॉक्स प्रत दयावी. (२) म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत कविठपेठ येथीन नवीन गांव तलावाचे काम ०८/०२/०८ ते १४/०२/०८ पर्यंतचा कामाचा हजेरीपटाची झेरॉक्स प्रत व मोजमाप पुस्तीकेची झेरॉक्स प्रत देण्यात यावी तसेच या कामाचे जॅाबकार्डवर अजून पर्यंत नोंद कां करुन देण्यात आली नाही. (३) शाखा अभियंता यांची १.०२.०८ पासून ते आतापर्यंत दैनंदिनी दौरानिहाय डायरीची झेरॉक्स प्रत दयावी. (४) उपविभागीय अधिकारी सिंचाई उपविभाग, राजूरा यांची दिनांक १.२.२००८ पासून दौरानिहाय डायरीची झेरॉक्स प्रत दयावी."

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार व दारिद्रय रेषेखालील आहे असे नमूद केले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही याला कारण अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले नव्हते असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलात दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडावे असे आदेश दिले व त्यानंतर दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडले असे अपीलकर्ता यांनी त्यांचे निवेदनात म्हटलेले आहे. याचा अर्थ अपीलकर्ता यांनी सुध्दा माहितीच्या अर्जासोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले नव्हते. दारिद्रये रेषेखालील प्रमाणपत्र जोडल्यानंतर अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली होती त्या माहिती करीता शाखा अभियंता श्री चिमुरकर यांचेकडे दिनांक ५.५.२००८, २१.५.२००८, १७.६.२००८, ३१.३.२००९ व ९.४.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्रे दिलेली होती. परंतु श्री आर.एम. चिमुरकर, शाखा अभियंता यांचेकडून माहितीचा तपशिल प्राप्त न झाल्यामुळे अर्जदारास माहिती पुरविता आली नाही असा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे व त्यासंदर्भात श्री चिमुरकर यांना दिलेल्या पत्रांच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही.

यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास श्री आर.एम. चिमुरकर, शाखा अभियंता यांचे सहय्य घेतलेले दिसून येते व त्यामुळे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचे सहाय्य घेतल्यास त्यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येते व या प्रकरणात शाखा अभियंता श्री आर.एम.चिमुरकर यांना माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांनी संबंधीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २८.३.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२)	श्री आर.एम.चिमुरकर, शाखा अभियंता यांचेकडून माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सहाय्य घेतलेले असल्यामुळे व त्यांनी सदरची माहिती अनेक स्मरणपत्रे देवून सुध्दा दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी म्हणून कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- (पाच हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्ती ही जन माहिती अधिकारी म्हणून शाखा अभियंता श्री चिमुरकर यांचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती  लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". मध्ये जमा करण्यात यावी.

३)	सदरची कारवाई करण्याकरीता निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक  ९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५६३/२००८**

**१) श्री सतीश भैयालाल पांडे,**
**मु.झालीया (पोवारी टोला) पो.कावरा बांध,**
**ता. सालेकसा, जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**डब्ल्यू.के.जी.बँक, जूना वरोरा नाका,**
**सिव्हील लाईन मुल रोड, चंद्रपूर. ता.जि.चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा रिजनल मॅनेजर,**
**डब्ल्यू.के.जी.बँक, भंडारा, ता.जि. भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक ३०.४.२००९ रोजी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता हजर होते परंतु आज दिनांक ९.६.२००९ रोजी सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी म्हणून श्रीमती निशा शुक्ला या हजर आहेत.

२. श्रीमती निशा शुक्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल करताना त्यांच्या बँकेचे काम वैनगंगा ग्रामीण ही केंद्रिय पुरस्कृत ग्रामीण बँक असल्याने बँकेचे नियंत्रण हे केंद्रिय शासनातर्फे केले जात असल्याने माहिती अधिकारी हे केंद्रिय माहिती आयोगाचे अधिकार कक्षेत येईल अशी धारणा असल्याचा खुलासा दाखल केला आहे. व त्यामुळे केंद्रिय माहिती आयोगाकडे सदरचे अपील दाखल करणे आवश्यक होते, असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी वैनगंगा ग्रामीण बँक ही केंद्र पुरस्कृत ग्रामीण बँक असल्याने बँकेचे नियंत्रण केंद्र शासनाचे येत असल्यामुळे सदरचे अपील हे केंद्रिय माहिती आयोगाकडे दाखल करण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५९१/२००८**

**१) श्री ताराचंद सागरमल चौबे,**
**मारवाडी मोहल्ला, सराफा लाईन,**
**वर्धा-४४२००१. ता.जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, वर्धा, ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जा माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
**नगर परिषद, वर्धा, ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००८ रोजी एकुण ७ मुद्यांमध्ये जन माहिती अधिकारी, नगर परिषद वर्धा यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णय हा दिनांक १८.६.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच अभिलेख्यांची तपासणी सुध्दा विना मुल्य करुन देण्यात यावी, असे आदेश देण्यात आलेले दिसून येतात. परंतु तरी सुध्दा अपीलार्थी कडून रुपये ८/- हे माहितीच्या खर्चाकरीता भरुन घेण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येतात.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.३.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांच्या विरुध्द शास्ती लादण्यात यावी असे अपीलकर्ता यांनी सांगितले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिल्या नंतर सुध्दा अपीलकर्ता यांना दिनांक ११.६.२००८ रोजीच्या अर्जानुसार शुल्क रुपये ८/- भरुन घेण्यात आलेले दिसून

येतात. सर्व माहिती अपीलकर्ता यांना विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे (पृष्ठ १ ते ११७). परंतु माहिती विलंबाने कां उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे विचारले असता श्री गांधी यांनी मुळात बांधकाम प्रकरण मंजूरीचा अर्ज दिनांक २५.३.२००८ रोजी म्हणजे अपीलकर्ता यांचे अर्जाचे नंतर सादर केला असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.३.२०८ च्या अर्जानुसार श्री गांधी यांनी अर्ज केला असल्यास तसे त्यांना कळविणे आवश्यक होते. परंतु तसेही त्यांना कळविलेले नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात. व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक होते. व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द रुपये १,०००/-(रुपये एक हजार फक्त) शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीच्या रकमेची वसुली जन माहिती अधिकारी यांच्या दरमहिन्याचे पगारातून वसुल करुन ती लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". मध्ये जमा करण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४९२/२००८**

**१) श्री वासुदेव सदाशिवराव चन्ने,**
**मानस मंदीराजवळ, वर्धा वार्ड नं.८,**
**ता.जि. वर्धा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**वर्धा, ता.जि. वर्धा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**वर्धा, ता.जि. वर्धा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी यांचेकडे जागेचा ७/१२ नक्कल मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी २००७. अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदार श्री वा.स. चन्ने यांचे वर्धा (पालकवाडी) येथे वार्ड नं.८ मध्ये वडीलोपार्जित राहाते घर असून अर्जदार यांनी राहत्या जागेचा ७/१२ चा उतारा लोकशाही दिनामध्ये तक्रार अर्ज देवून मागितला होता. तलाठी मौजा पालकवाडी यांनी दिनांक ५.२.२००७ च्या अहवालाद्वारे उत्तर देण्यात आले होते. अर्जदार यांनी सादर केलेला विक्रीचा लेख सदोष असून जूना स.नं.३४/१ च्या नगर रचनाकार यांनी मंजूर केलेल्या लेआऊटच्या नकाशामध्ये अर्जदार यांचा भूखंड आढळून येत नाही व तलाठी रेकार्डला अर्जदार यांनी मागीतलेला ७/१२ उतारा उपलब्ध नसल्याबाबत विहित मुदतीत कळविण्यात आलेले असल्यामुळे सदर अर्ज खारीज करण्यात यावा ही नम्र विनंती असा खुलासा केलेला आहे.

//२//

वास्तविक अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे तहसिलदार यांनी तलाठी पिंपरी(मेघे) यांना दिनांक २२.१०.२००७ रोजी माहितीची मागणी केलेली दिसून येते. त्याप्रमाणे तलाठयाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक २६.१०.२००७ रोजी त्यांना कळविण्यात आले आहे.तलाठी यांचे दिनांक २५.१०.२००७ चे उत्तर खालीलप्रमाणे आहे.

"वरील विषयानुसार त.सा.क्रं.२१ पिपरी कडून अहवाल देण्यात येते की, मौजा पालकवाडी/वर्धा येथील प्लॉटचे फेर फाराबाबत श्री वासुदेव सदाशिव चन्ने, रा. वर्धा यांनी विक्रीपत्र सादर केलेले होते. सदर विक्रीपत्रामध्ये खालील कागदपत्रांची पुर्तता करण्यात आलेली नाही.

सदर भूखंड श्री अर्जूनलाल मोहनलाल साई यांनी श्री नथ्थोबा रामाजी कुश्रेवार, रा. वर्धा विक्री करुन दिले व श्री नथ्थोबा रामाजी कुश्रेवार यांनी श्री वासुदेव सदाशिव चन्ने यांना विक्री केल्याचे विक्री पत्रावरुन दिसून येते. परंतु सदर विक्री पत्रात सर्व्हे नंबर ३४/१ व नझुल शिट नं. ४६ मधील चालू भूखंड नं.४ व जूने प्लॅाट नंबर १० व ११ याची वाटणी करुन विक्री केल्याचे दर्शथ्वले आहे. परंतु भूखंड क्रमांक १० चे क्षेत्र व भू.क्रं.११ चे किती विकले याचा विक्रीपत्रात उल्लेख केलेला नाही.

त्यामुळे त्यांना अर्जूनलाल साई ते कुचेवार यांचे विक्रीपत्र वाटणीपत्राचा लेख मागविण्यात आले व त्यानुसार त्यांचे फेर फार करुन ७/१२ देण्यात येईल असे सांगितले.

परंतु सदर कागदपत्रे त्यांनी सादर केलेली नाही. करीता माहितीस्तव सविनय अहवाल सादर."

अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रथम अपील हे उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचे कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे तहसिलदार वर्धा यांचेकडे वळते करण्यात आले होते, असा खुलासा केलेला आहे. व आता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अर्थात अपीलकर्ता यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या तरतुदीप्रमाणे नियमानुसार असल्यास कार्यवाही करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी तहसिलदार यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या तरतुदी प्रमाणे योग्य ती पूर्तता करावी व तशी पुर्तता केल्यानंतर योग्य तो निर्णय घेवून जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४९७/२००८**

**१) श्री रविंद्र रतनलाल जोहरापूरकर,**
**१०, स्वावलंबी नगर, नागपूर-२२. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनिबंधक,**
**अमरावती विभाग, अमरावती. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.जिल्हा निबंधक वर्ग-१,**
**अमरावती, मांगीलाल प्लॉट, कॅम्प, अमरावती. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, मुद्रांक शुल्क विभाग यांचेकडे मौजा अंजनगांव खेल कोकाट या शेतात अनधिकृत प्लॉट ताबा पावती नुसार विकून तेथे पक्के घरे बांधली आहेत. सरकारी स्टॅम्प डयुटी वसूल झाली नाही. सरकारचे नुकसान झाले आहे. ती स्टॅाम्प डयुटी विक्री करणारे (ताबा पावतीनुसार) धर्मराज जयकुमार जोहरापुरकर यांचे कडून वसुल केले काय किंवा करणार काय. धर्मराज जोहरापुरकर यांनी ताबा पावती नुसार किती प्लॅाटची विक्री केली आहे. अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००८ रोजी प्रथम अपील हे नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. जिल्हा निबंधक वर्ग-१ यांनी अपीलकर्ता यांना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते.

"ज्या दस्ताची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयात झालेली आहे किंवा जे कार्यालयीन अभिलेख आहे त्या बाबतची माहिती विषयांकित अधिनियमांतर्गत आपणांस देता येईल. आपण विचारणा केलेली बाबत कार्यालयीन अभिलेख नाही. त्यामुळे आपला माहितीचा अधिकार अधिनियम खालील अर्ज नस्ती करण्यात येत आहे.

तथापि, आपण दिलैल्या माहितीचे अनुशंगाने आपण या कार्यालयास अर्जात नमुद केलेप्रमाणे ताबा पावतीचे दस्तऐवज(स्टॅम्प डयुटी बुडविलेले दस्तऐवज)च्या झेरॉक्स प्रती या कार्यालयास सादर केल्यास व त्यामध्ये जर शासनाचा महसुल बुढाला असेल तर तो निश्चितच वसुल केला जाईल."

प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा कायम करण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांना दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती मागितलेली नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील - अधिनियम**

**अपील क्रमांक ८१४/२००८**

**१) श्री घनशाम विठोबाजी गौरकार,**
**गौरकार निवास, माकडे नगर,**
**तुमसर-४४१९१२, जि. भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**भंडारा, ता.जि. भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, पवनी, ता. पवनी, जि. भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांचेकडे सन २००५ ते २००८ या कालावधीतील अतिक्रमण हटविण्याबाबत एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.८.२००८ रोजी देण्यात आला असून सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १८.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु, मुद्या क्रमांक ५ व ६ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ज्या अतिक्रमणाच्या संदर्भात माहिती मागितली आहे त्या संदर्भात तसेच अतिक्रमण अतिक्रमण हटविण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची माहिती ही त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. व मा. जिल्हाधिकारी भंडारा यांच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तसेच

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, जिल्हाधिका-यांनी दिनांक १०.९.२००७ रोजी अतिक्रमणाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी मोजणी फी भरावी व मोजणी झाल्यानंतरच अतिक्रमण काढून टाकण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची जागा ही पांदन रस्त्याची आहे व त्यातून शासकिय जमीन असल्यामुळे खाजगी व्यक्तींनी मोजणी फी भरणे हे योग्य नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, अतिक्रमण करुन वहिवाटीचा रस्ता अडलेला असल्यास दोन मार्ग आहेत व त्याकरीता एकतर जिल्हाधिका-यांकडून महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ प्रमाणे अपीलकर्ता यांनी न्यायालयात जावून न्याय मिळवून घेणे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती मिळू शकते. मात्र कोणत्याही प्रकारची कार्यवाही ही करता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपेक्षित अतिक्रमण काढून टाकावयाचे असल्यास तशी कार्यवाही राज्य माहिती आयोगास करता येणार नाही. व त्यामुळे अपीलीय अधिकारी यांनी जो दिनांक १०.९.२००७ रोजी निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१५/२००८**

**१) श्री दिलीपकुमार हरिदास फुले,**
**मु. देवमुंडरी, पो. खात, ता.मौदा, जि. नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी विभाग, कामठी,**
**ता. कामठी, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,**
**पोलीस स्टेशन मौदा, ता. मौदा, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांचेकडे सहपत्रात तरतुद केल्याप्रमाणे वर्तमान पत्र क्रमांक ४०८ पो.स्टेशन मौदा क्रं.१ सहपत्रात दर्शविल्याप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे. सहपत्रामध्ये पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मौदा यांनी दिनांक २.९.२००८ रोजी जे पत्र अपीलकर्ता यांना दिलेले आहे त्या पत्रातील ६ मुद्यांच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी माहिती मागितलेली आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.९.२००८ रोजी उत्तर दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे समाधान करण्यात आले असाही खुलासा दिलेला आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

// २ //

४. वास्तविक अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २३९५/२००७ चा निर्णय दिनांक १५.१.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले आहे. सदरच्या अपीलामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी विभाग, कामठी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. या संपूर्ण प्रकरणामध्ये गट ग्राम पंचायत कार्यालय, मोरगांव तालुका मौदा यांनी ठाणेदार, पोलीस स्टेशन मौदा यांना खालीलप्रमाणे पत्र पाठविलेले दिसून येते.

"वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, श्री दिलीपकुमार फुले, रा. देवमुंढरी याना ग्रां.प. कडून पैसे भरुन नळ कनेक्शन दिलेले होते ते नळ कनेक्शन सौ. शिलाबाई कांबळे रा. देवमुंढरी यांचे जागेतून पाईप घेवून नळ कनेक्शन सुरु केले होते. परंतु त्यांचा आपसात वाद निर्माण झाल्यामुळे सौ. शिलाबाई कांबळे हे त्यांच्या जागेतून श्री दिलीपकुमार फुले यांना नळ कनेक्शन घेवू देण्यास तयार नाही.

सदर आपले पत्रानुसार पोलीस शिपाई श्री हरिश व ग्रां.प.कमेटी सहित सदर जागेवर नळ कनेक्शन देणेकरीता दिनांक ८.११.२००८ ला गेले परंतु श्री दिलीप कुमार फुले यांनी सर्वप्रथम ज्या ठिकाणाहून मी नळ कनेक्शन नेले होते त्याच ठिकाणाहून मला नळ कनेक्शन देण्यात यावे असे म्हटले त्यावर सौ. कांबळे यांना विचारणा केली असता मी माझ्या मालकीच्या जागेतून नळ कनेक्शन देण्यास तयार नाही असे म्हटले. सदर नळ कनेक्शन ग्रां.पं. हे श्री दिलीपकुमार फुले यांना देण्यास तयार आहे. सदर नळ कनेक्शन बाबत श्री दिलीपकुमार फुले यांनी सदन नळ कनेक्शनची जागा निश्चित करुन देण्यात यावी जेणेकरुन ग्रां.प.ला नळ कनेक्शन देता येईल व श्री दिलीपकुमार फुले यांना ग्रां.प.कडून नळ कनेक्शन देण्यासाठी ग्रां.प.ची कोणतीही हरकत नाही.

यापूर्वी श्री दिलीपकुमार फुले यांनी नळ कनेक्शन घेतले आहे. ते कोणत्या ठिकाणाहून घ्यायचे याबाबत ग्रां.प.ने जागा निश्चित करुन दिलेली नव्हती. तरी श्री दिलीपकुमार फुले यांनी सदर जागा निश्चित करुन देण्यात यावी व नळ कनेक्शन घेण्यात यावे.

यावर ग्रां.प.ची कोणत्याही प्रकारची हरकत नाही तसे लेखी स्वरुपात ग्राम पंचायतला जागा निश्चित केल्याबाबत कळविण्यात यावे."

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यांचे स्वत:चे हिताकरीता ते सर्वांना वेठीस धरत आहे असा निर्णय हा अपील क्रमांक २३९५/२००७ मध्ये दिलेला आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१३/२००८**

**१) श्री आर.एन. वावरकर,**
**साई मंदिराजवळ, ताकिया वार्ड, भंडारा,**
**ता.जि. भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, भंडारा, ता.जि. भंडारा. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (बांध.),**
**नगर परिषद भंडारा, ता.जि. भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२००८ रोजी श्री वावरकर ते बुंदेले यांच्या कार्यकाळात झालेल्या सिमेंट रोडची माहिती एकुण ३ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.८.२००८ रोजी माहितीच्या खर्चाकरीता रुपये ४/- नझुल लिपिक यांचेकडे भरणा करुन माहिती घेवून जावी असे साध्या टपालाने कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे त्यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.१०.२००८ रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपील प्रकरणी माहितीच्या अधिकारा अंतर्गत विचारलेली फी जमा न केल्याने माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. परंतु माहिती अधिका-यांनी उशिरा कां होईना विना मुल्य माहिती अपीलकर्त्यास दिलेली आहे. तसेच अपीलकर्ता हे तारखेवर उपस्थित न झाल्याने दिलेली माहिती अपूरी व दिशाभूल करणारी आहे हे सिध्द होऊ शकत नाही. त्याअर्थी अपीलकर्ता यांनी अपीलामध्ये दिलेले मुद्ये या आदेशाद्वारे फेटाळण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

//२//

३.	अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.७.२००८ च्या अर्जाप्रमाणे दिनांक १.८.२००८ रोजीचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगास सांगितले. तसेच त्यांचे द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा त्यांनी म्हटलेले आहे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडून सदरचे पत्र पाठविल्याची जावक नोंद वहीमधील नोंद तपासण्यात आली. त्याप्रमाणे सदरचे पत्र पाठविल्याचा क्रमांक दिलेला आहे व त्यामुळे सदरचे पत्र पाठविले आहे व पत्र परत आले नाही याचा अर्थ अपीलकर्ता यांना ते पत्र मिळालेले आहे, असा निष्कर्ष काढावा लागतो.

असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती ही उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माहिती ही अपूरी व दिशाभूल करणारी आहे. परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा त्यांनी केलेला नाही. अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोमधील विनंती अशी की, मंजूर सिमेंट रोडच्या रुंदीमध्ये अनधिकृत (अवैध) बांधकाम असलेले अशोक भूरे यांचे कम्पाऊंड वॉल श्री कुंभारे, श्री बुंन्दे, श्री भाऊराव जोगेकर यांचे अंशत: असलेले घराच बांधकाम रोड बांधकामाच्या नियमानुसार न पाडता त्या लोकांना माहिती भूरे व अपीलीय अधिकारी यांनी अभय दिलेले आहे. त्या सिमेंट रोडच्या लेआऊटप्रमाणे अचूक रुंदीची माहिती देण्याविषयी माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी, नं.प. भंडारा यांना निर्देश देण्यात यावे, ही विनंती. असे असल्यामुळे सदरचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना लेआऊटप्रमाणे सिमेंट रोडच्या अचूक रुंदीची माहिती देण्यात यावी.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८२०/२००८**

**१) श्री डॉ. इरशादअली अकबरअली शिवजी,**
**शिशु हॅास्पीटल जटपूरा गेट, फहीम गेस्ट हाऊस जवळ,**
**चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,**
**सामान्य रुग्णालय, चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १८.२.२००० ते ४.४.२००१ कालावधीत वैद्यकिय अधिकारी (गट-अ) वर्ग-२ चे पदावर हजर राहून नियमितरित्या रुग्णालयाचे कामकाज केलेले आहे. सदर कालावधीत हजर असल्याबाबत रुग्णालयाचे हजेरी पटावर स्वाक्षरी केलेली आहे. परंतु वरील कर्तव्य कालावधीचे वेतन वेळोवेळी विनंती करुन सुध्दा आजतागायत मिळालेले नाही, अशी माहिती नोंदणीकृत टपालाने मिळावी अशी विनंती केलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.८.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला असून अपीलकर्ता यांना वैद्यकिय अधिकारी, गट-, वर्ग-२ या पदावर नियुक्ती देण्यात आली होती. आदेशाचा कालावधी दिनांक १७.२.२००० रोजी संपुष्टात आला असल्याने पुढील अस्थाई नियुक्ती कालावधी दिनांक १८.२.२००० ते पासूनचा प्रस्ताव सादर केला असून सदरहू प्रस्तावाला मंजूरी प्राप्त झाली असल्याचे निदर्शनास येत नाही. करीता आपणास कळविण्यात

येत आहे की, आपली वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ या पदावर दिनांक १८.२.२००० पासून अस्थाई स्वरुपाची नियुक्ती करण्याबाबत आदेश आपणास प्राप्त झाल्यास या कार्यालयास सादर करावे जेणे करुन पुढील कार्यवाही करणे शक्य होईल, असे पत्र तयार केलेले दिसून येते. परंतु त्या पत्राच्या संदर्भामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांनी दिनांक २० मे २००९ रोजी श्री ए.व्ही. देशपांडे वरिष्ठ लिपिक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांना पत्र दिलेले असून त्यामध्ये प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भात महत्वाचे कायदेविषयक बाबीवर दुर्लक्ष केल्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रशासकिय कारवाई प्रस्तावित आहे व शिस्तभंगाची कारवाई कां करण्यात येवू नये याबाबतचे स्पष्टीकरण मागविण्याकरीता कारणे दाखवा नोटीस दिलेली दिसून येते. व दिनांक ५.६.२००९ च्या आदेशाप्रमाणे श्री ए.व्ही. देशपांडे यांची एक वर्षाची वार्षिक वेतन वाढ थांबविण्याचे आदेश दिलेले दिसून येतात. व असे असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा सदरच्या अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रथम अपीलाची सुनावणी अपीलकर्ता व माहिती अधिकारी यांचे उपस्थितीत घेवून योग्य तो निर्णय घेवून अपीलकर्ता यांना कळवावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१८/२००८**

**१) श्री गौतम भिकाजी वासनिक,**
**मु.पो.बुधवारी पेठ, वार्ड क्रं.३,**
**ता. उमरेड, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकरी,**
**नगर परिषद, उमरेड, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता**
**(बांधकाम विभाग) नगर परिषद, उमरेड,**
**ता. उमरेड, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद उमरेड यांचेकडे निविदा सूचना क्रमांक ३४/२००८ ची माहिती मिळण्याबाबत, सहपत्रामधील संपूर्ण माहिती देण्यात यावी अशी विनंती करुन माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.३.२००८ रोजी रुपये ३१२/- चा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी भरणा केलेला आहे असे सांगितले. परंतु त्यांना माहिती १५ प्रश्नांचीच उपलब्ध करुन देण्यात आली. त्याबाबत दिनांक १.८.२००८ रोजी पुन्हा माहिती अधिकारी, बांधकाम विभाग यांनी निविदा पत्रासोबत जोडलेले प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरता ३८/- रुपये नगर परिषद निधीत जमा करावे. नगर परिषदेने प्रमाणित दस्तावेज देण्याकरिता प्रती पृष्ठ रुपये ५०/- दर विशेषस सभा ठराव क्रमांक ११, दिनांक २२.१०.२००७ अन्वये ठरविलेले आहे. त्यानुसार आपणास सभेच्या ठरावाच्या ६ प्रती पुरविण्यात आलेल्या आहेत व उर्वरित प्रती करीता माहितीचा अधिकारा अंतर्गत नमूद असलेल्या दरानुसार शुल्क घेण्यात आलेले आहे, असे कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे समाधान न

झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००८ रोजी जास्तीच्या शुल्काची मागणी केल्याच्या कारणास्तव प्रथम अपील दाखल केलेले आहे.

४. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.९.२००८ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी जास्तीच्या रकमेबध्दल आक्षेप घेतलेला असल्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ नुसार माहितीचा अधिकार याचा अर्थ दस्तऐवज किंवा अभिलेखे, टिपणी, उतारे इ.च्या प्रमाणित प्रती घेणे हा आहे. प्रमाणित प्रत द्यावयाची झाल्यास त्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क आकारण्याची मुभा आहे असा निर्णय देवून अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. तसेच दिनांक ६.१०.२००८ रोजी आपणास निविदा सूचना क्रमांक ३४/२००८ चे अनुषंगाने उपलब्ध असलेली संपूर्ण दस्तऐवजाच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत. मुळ नस्तीला संदर्भिय पत्राद्वारे मागणी केलेला दस्तऐवज उपलब्ध नसल्यामुळे देणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्यात प्रती पृष्ठ रुपये ५०/- घेतल्याबाबत आक्षेप घेतलेला आहे.

५. अपीलकर्ता यांनी घेतलेला आक्षेप व मुख्याध्याधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय याचा विचार केल्यास नगर परिषद हे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे नगर परिषदेस किंवा सार्वजनिक प्राधिकरणास स्वतंत्रपणे कोणत्याही प्रकारची फी आकारण्याकरीता नियम करण्याचे अधिकार हे अधिनियमात नाही. अधिनियमाचे कलम २८ प्रमाणे नियम करण्यास सक्षम प्राधिकरणाचे अधिकार दिलेले आहे व त्यामध्ये पोटकलम (२) प्रमाणे अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी सक्षम प्राधिकरणास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येईल अशी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु सक्षम प्राधिकरणाच्या व्याख्येत नगर परिषद येत नाही. सक्षम प्राधिकरण याची व्याख्या अधिनियमाचे कलम २ (ड.) यामध्ये केलेली आहे. त्यामध्ये "लोकसभा, राज्यसभा याचे अध्यक्ष व सभापती तसेच सर्वोच्च न्यायालयाचे बाबतीत भारताचे मुख्य न्यायमुर्ती, राज्य विधान मंडळाचे अध्यक्ष/सभापती, राज्य न्यायालयाचे बाबतीत राज्य न्यायालयाचे न्यायमुर्ती किंवा संविधानाद्वारे किंवा संविधानान्वये किंवा गठीत करण्यात आलेल्या अन्य प्राधिकरणाच्या बाबत यथास्थिती राज्य किंवा राज्यातील आणि संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये नियुक्त करण्यात आलेले प्रशासक" असा आहे. त्यामध्ये नगर परिषदेचा समावेश नाही. व त्यामुळे नगरपरिषदेला स्वतंत्रपणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या

तरतुदीच्या करीता फी आकारणी करण्याचे अधिकार नाहीत. व त्यामुळे नगर परिषदेचा जर ठराव केलेला असेल तर तो ठराव हा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. अधिनियमाचे कलम २७ मध्ये समूचित शासनाचे नियम करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे शासनाने अधिनियमाचे कलम २७(१)(२)(ख) व (ग) प्रमाणे फी चे नियम महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ प्रमाणे दिनांक ११.१०.२००५ रोजी नियम केलेले आहेत. व त्या नियमाप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी खर्च येणार असेल तर प्रती पृष्ठ रुपये २/- किंवा ज्या सार्वजनिक प्राधिकणाने पुर्वी नियम केलेले असतील तर त्या नियमाप्रमाणे माहिती तयार करुन द्यावयाची असल्यास फी आकारता येईल अशी तरतूद आहे. व ते नियम हे नगर परिषदेस सुध्दा लागू आहे. व त्यामुळे नगर परिषदेला सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे फी आकारणी करावी लागेल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीचे जे पृष्ठ पुरविलेले आहेत त्या प्रती पृष्ठांस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे जी माहिती तयार आहे त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे आकारणी करण्यात यावी व जी पृष्ठे पुरविण्यात आलेली असतील त्यापेक्षा जास्तीची रक्कम घेतलेली असल्यास ती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना परत करण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी सुध्दा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेकडे स्वत: व्यक्तीश: संपर्क साधून जास्तीची घेतलेली रक्कम परत घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिांक १०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८३६/२००८**

**१) श्री सौ.बबीता ईश्वर रामटेके,**
**द्वारा सौ. शिला लक्ष्मण जीवणे यांचे घरी किरायाने,**
**घर नं.३२६६/F/९ जीन्नाथ किराणा स्टोअर्सजवळ,**
**रामराव ढावरे यांचे घराजवळ, न्यू कैलास नगर,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**म.रा.विद्युत मंडळ, नागपूर शहर प्रविभाग,**
**गडडीगुडाम, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**
**म.रा.विद्युत वि.मंडळ, तुकडोजी चौक, मानेवाडा रोड,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचेकडे श्री लक्ष्मण पी. जीवने हयांनी मीटर घेण्यासाठी कोणती कागदपत्रे जोडली. त्यावर त्यांना मीटर देण्यात आले. कोणत्या वर्षी कोणाच्या नावाची ज्या कालावधीमध्ये जीवने यांना मीटर देण्यात आले त्यांनी कोणत्या रजिस्टरवर व कुणाच्या नावाचे कागदपत्रे जोडली त्याची माहिती मिळण्याबाबत. माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे. दारिद्रय रेषेखालील यापुढे होय असे लिहिलेले आहे परंतु प्रमाणपत्र जोडलेले दिसून येत नाही.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.९.२००८ रोजी कनेक्शन सुमारे १४ वर्षापुर्वीचे असल्याने त्याच्या संदर्भात कागदपत्रे भगवाननगर विज वितरण केंद्र कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती कागदपत्रे आपणास देवू शकत नाही. सदरचे कनेक्शन आपणास सन १९९३-९४ मध्ये देण्यात आले आहे, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.११.२००८ रोजी देण्यात आला असून कागदपत्रे उपलब्ध

झाले आहेत. ती १९ पानांची असून त्याकरीता आपण या कार्यालयात एकुण ३८/-रुपयाचा भरणा करुन पावती सादर करुन या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.८.२००८ च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध होत नाही तरीही मात्र खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. विज वितरण कंपनीमध्ये जन माहिती अधिकारी हे अभियंता आहेत. व अभियंता यांना कायदा कळणे आवश्यक आहे. परंतु त्याबाबतची माहिती कोणीही अभियंता यांनी घेतलेली आहे असे दिसून येत नाही. माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन दिली नसल्यास ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी लागते अशी अधिनियमात तरतुद आहे. सदरच्या प्रकरणात ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे विनामुल्य माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजि.पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिाांक १०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८३१/२००८**

**१) श्री पी.एन. बहात्रे(विभागीय लेखापाल)**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्रं.२,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२,**
**औरंगाबाद विभाग, लातूर, ता.जि. लातूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.२,**
**औरंगाबाद विभाग, लातूर, ता.जि.लातूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

२. सदरचे अपीलाचे सुनावणी संबंधाने अपीलकर्ता यांना तामील केलेल्या सुनावणी नोटीसचे संदर्भात अपीलकर्ता यांनी आयोगास त्यांचे पत्र दिनांक १४.५.२००९ अन्वये लेखी सादर केले आहे की, "मला प्रमाणपत्र मिळाले आहे. संबंधीत बैठक रद्द केल्यास सर्व काही व्यवस्थित राहीन. बैठक रद्द झाल्याची माहिती त्वरीत मला लातूर येथे कळवावी, ही विनंती." त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८३३/२००८**

**१) श्री महेश चैतराम पाली,**
**प्लॉट नं.३६६, धरमपेठ टाँगा स्टँड,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ क्रं.२, नागपूर शहर, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**सदर विभाग, नागपूर शहर, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. सदरचे अपीलाचे सुनावणी संबंधाने अपीलकर्ता यांना तामील केलेल्या सुनावणी नोटीसचे संदर्भात अपीलकर्ता यांनी आयोगास त्यांचे पत्र दिनांक ११.६.२००९ अन्वये लेखी सादर केले आहे की, "माझे समाधान झाले म्हणून मी आपला अर्ज परत घेत आहो" त्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ११.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३८८/२००८**

**१) श्री विश्वास आत्मारामजी क्षिरसागर,**
**७३-अ+ब, सन्मार्ग नगर क्रं.२,**
**हुडकेश्वर रोड, नागपूर** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**अमरावती, ता.जि. अमरावती.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**(बडनेरा सर्कल), अमरावती. ता.जि.अमरावती.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अपीलाच्या सुनावणीच्या अनुषंगाने दिनांक १२.६.२००९ रोजी हैदराबाद येथे डॉक्टरकडे चेक अप करीत वेळ निश्चित केल्यामुळे प्रकरणात बाजू मांडण्याकरीता दूस-या तारखेची मागणी केली होती. परंतु, जन माहिती अधिकारी हे हजर आहे. व जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या खुलाशाचे अवलोकन केल्यावर अपीलकर्ता यांना पुढील मुदत देण्याची आवश्यकता आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडून संपूर्ण प्रकरणाची माहिती ऐकुण घेतली.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, अमरावती यांचेकडे मौजा पारडी सर्व्हे नं./गट नं.१८४-५८/२ या शेताचे फेर फार बाबतीत सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे. माहितीचा कालावधी २४.८.२००४ ते २५.९.२००६ पर्यंत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सोबत अपीलकर्ता यांनी ६ मुद्ये उपस्थित केलेले आहेत व त्यामध्ये सर्व प्रश्न विचारलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ७.६.२००८ रोजी देण्यात आला असून नायब तहसिलदार तथा शासकिय माहिती अधिकारी, अमरावती यांचा युक्तीवाद ऐकुण त्यांच्या मुळ

दस्तऐवजाचा अभ्यास केला. अपीलार्थीकडून मागितलेली मुद्येनिहाय माहिती नायब तहसिलदार तथा माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला देण्याची संधी दिली. सदरची माहिती आदेश प्राप्त झाल्यापासून ३ दिवसांचे आंत परस्पर द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते व त्यात माहिती उपलब्ध झाली नाही असे कारण दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

"(१) प्रकरणात अर्जदार यांचा अर्ज दिनांक २८.३.२००८ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला अर्जातील नमुद माहितीपैकी अर्जदार यांनी फेर फार क्रमांक ५० व फेर फार क्रमांक ८९ ची प्रत अर्ज करण्यापुर्वीच दिनांक १३.३.२००८ रोजी प्राप्त करुन घेतली होती. त्यावर अर्जदार यांची सही आहे. तसेच अर्जदार यांनी या कोर्टात दिनांक १९.३.२००८ रोजी फेर फार करणेबाबत प्रकरण या कोर्टात दाखल केले. सदर प्रकरण कोर्टात सुरु असताना अर्जदार यांनी माहिती मिळणेकरीता माहितीच्या अधिकारात अर्ज दाखल केला.

(२) प्रकरणात अर्जदार यांचा अर्ज दिनांक ११.४.२००८ रोजी संबंधीत माहिती अधिकारी तथा तलाठी पार्डी यांच्याकडे निकालात काढण्याकरीता पाठविण्यात आला. त्यावर तलाठी पार्डी यांच्याकडून दिनांक २५.४.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली. सदर माहिती अर्जदार यांना त्याच रोजी पुरविण्यात आली. परंतु घाईगडबडीने त्यांची पोच घ्यायची राहून गेली. त्यावर अपीलार्थी यांनी माहिती मिळाली नाही म्हणून अपील दाखल केली.

(३) त्यावर अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अमरावती यांनी दिनांक ७.६.२००८ रोजी आदेश पारित करुन अपीलार्थी यांना ३ दिवसात माहिती पुरविण्याबाबत आदेश पारीत केला. त्यानुसार अपीलार्थी यांना दिनांक ११.६.२००८ रोजी माहिती तयार असून ती प्राप्त करुन घ्यावी असे या कार्यालयामार्फत पत्र पाठविण्यात आले. परंतु अपीलार्थी यांनी या कार्यालयास संपर्क साधला नाही. त्यामुळे माहिती पुरविणे शक्य झाले नाही.

(४) अपीलार्थी श्री विश्वास आत्माराम क्षिरसागर रा. नागपूर यांनी माहिती अधिकारामध्ये मागितलेली माहिती अपीलार्थी यांच्याकडे उपलब्ध होतीच त्यांनी फेर फार क्रमांक ५० व ८९ च्या प्रती दिनांक १९.३.२००९ रोजी मिळाल्या म्हणून केलेल्या सहीवरुन दिसून येते. तसेच अपीलार्थी व त्यांचे भाऊ पांडुरंग आत्माराम क्षिरसागर यांचे फेर फार बाबतचे प्रकरण या कोर्टात दिनांक १९.३.२००८ पासून सुरु होते व त्यामध्ये दिनांक २५.६.२००८ रोजी अपीलार्थी यांच्या बाजूने आदेश होऊन प्रकरण निकालात काढण्यात आले होते.

//३//

(५) प्रकरण तलाठी पार्डी यांनी दिनांक २५.३.२००८ रोजी अर्जदार यांना त्यांच्या नमूद मुद्यांची व इतर मागणी केलेल्या कागदपत्राची परिपुर्ण माहिती अर्जदार यांना पुरविली होती.

(६) प्रकरणात अपीलार्थी यांना अर्जातील नमुद मुद्याबाबत दिनांक ५.६.२००८ रोजी माहिती तयार असून रक्कम भरुन प्राप्त करुन घेण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यावर अर्जदार यांची दिनांक १६.७.२००८ रोजी स्वाक्षरी केलेली आहे.

**प्रार्थना-**

प्रकरणात अर्जदार यांच्या अर्जातील नमुद मुद्यांचा विचार केला तर अर्जदार यांनी प्रकरणातील कागदपत्रातील दस्ताऐवज न मागता प्रश्नार्थक स्वरुपात म्हणजे का? व कसे? त्याबाबत माहिती अधिकारी यांनी लेखी स्वरुपात माहिती द्यावी अशी अर्जदार यांची मागणी होती. परंतु अर्जदार यांना लेखी स्वरुपात प्रश्नाचे उत्तर देणे माहिती अधिकार कायदया अंतर्गत अपेक्षित नाही. त्यामुळे अर्जदार यांनी मागितलेली माहिती पुरविणे शक्य नाही. अपीलार्थी यांनी प्रकरण दाखल दस्ताऐवजाच्या प्रती वेळोवेळी पुरविण्यात आल्या आहेत. परंतु अर्जदार यांनी माहिती मिळाल्यानंतर स्वाक्षरी केली नाही. अर्जदार यांचे फेर फार बाबतचे प्रकरण निकालात निघाल्यानंतरही अर्जदार यांनी जाणिवपुर्वक त्रास होईल या उद्येशाने प्रयत्न चालु ठेवले. अर्जदार यांचेकडील कागदपत्रांची पडताळणी केली असता अर्जदार यांचेकडे प्रकरणातील सर्व दस्ताऐवजाच्या प्रतीच्या छायांकित प्रती निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे अर्जदार यांच्याकडे जे उपलब्ध दस्ताऐवज आहेत ते या कार्यालयामार्फतच पुरविण्यात आले आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी माहिती मिळाली नाही हे म्हणणे पुर्णपणे निराधार आहे.

त्यामुळे प्रकरणात अपीलार्थी यांचा अर्ज फेटाळण्यात यावा, अशी विनंती या खुलाशाद्वारे करण्यात येत आहे."

सदरच्या खुलाशाचे अवलोकन केले असता तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेली मुद्येनिहाय माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना कागदपत्रापेक्षा प्रश्नांच्या माध्यमातून उत्तरे हवी आहेत असे दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(च) अन्वये सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेखे, टिपण्या इ.च्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध आहे त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकरणातील कारणे किंवा निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे मत हे विचारता येत नाही. कारण निर्णय ज्या वेळेस घेतले

असतात त्या वेळेस संबंधीत जन माहिती अधिकारी हे निर्णय प्रक्रियेत असेलच असे नाही व त्यामुळे फक्त कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याची अधिनियमात तरतुद करण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, त्यांनी स्वत: अपीलकर्ता यांच्या प्रकरणात गुणवत्तेवर दिनांक २५.६.२००८ रोजी आरटीएस अपील ६४/पारडी/९/०७-०८ मध्ये निर्णय दिलेला असून त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली फेर फार हे रद्य करण्यात आले आहे व त्यानंतर अपीलकर्ता यांनी सदरची जमीन विकुन सुध्दा टाकलेली आहे असे आयोगास सांगितले. व तसेच सर्वात महत्वाचे मुद्ये सांगितले ते असे की, अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज करण्यापुर्वी फेर फार क्रमांक ५० व ८९ ची प्रत प्राप्त करुन घेतली होती. त्यावर अर्जदार यांची सही आहे. व त्यामुळे त्यांनी कोर्टात दिनांक १९.३.२००८ रोजी फेर फार करण्याबाबत प्रकरण दाखल केलेले होते. व प्रकरण कोर्टात सुरु असताना अर्जदार यांनी माहिती मिळण्याकरीता माहितीचा अर्ज दाखल केलेला होता. तसेच त्यांना जी माहिती दिलेली होती त्याबध्दलची मात्र पोच घेण्याचे राहून गेले होते.

यावरुन अपीलकर्ता यांचा संपूर्ण हेतू सिध्द झालेला आहे असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना पुन्हा संधी देण्याची आवश्यकता होती असे वाटत नाही. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८५१/२००८**

**१) श्री जगन्नथ बळवंतराव दलदले,**
**प्लॉट क्रं.१२, गल्ली क्रं.३, अयोध्यानगर,**
**नवीन सुभेदार रोड, नागपूर-४४००२४. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, मौदा,**
**ता. मौदा, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता रहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय मौदा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती साध्या टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

"कमाल जमीन धारणा कायदा कोणत्या वर्षी अस्तीत्वात आला याबाबतची माहिती द्यावी. (२) कमाल जमीन धारणा कायदयाअंतर्गत अतिरिक्त ठरलेली स्व. श्री शंकरराव विठठलराव घुबे यांच्या मालकीच्या मौजा मोहाडी येथील भूमापन क्रं.८३ (जुना) आराजी १०.४६ एकर जमीनीपैकी ८.४२ एकर जमीन शासनातर्फे सन १९६८ मध्ये स्व.श्री पतिराम तुकाराम कंगाले, रा. मोहाडी यांना देण्यात आली ही अतिरिक्त घोषित केलेली जमीन ख.क्रं.८३ आराजी ८.४२ ज्या आदेशान्वये श्री पतिराम तुकाराम कंगाले यांना देण्यात आली त्या आदेशाची व नकाशाची प्रमाणित प्रत पुरविण्यात यावी. (३) खसरा क्रं.८३ च्या सन १९६८ च्या नमूना ७,७अ, १२ व नकाशाची प्रमाणित प्रत पुरविण्यात यावी."

३. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

//२//

४.	अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे संदर्भात त्यांनी असे सांगितले की, त्यांना आतापर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी खुलासा करताना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही १९६८ ची असल्यामुळे व तहसिल कार्यालयाची निर्मिती सन १९८१ ची असल्यामुळे त्या कार्यालयात प्रकरण सुरु नव्हते व त्यामुळे सदरची माहिती पुरविण्यात आली नाही. तसेच श्री दलदले यांनी दिनांक २५.३.२००९ ला या कार्यालयास पुन्हा अर्ज सादर करुन १५ मुद्यांवर माहिती मागितली आहे. शेत सव्हे क्रमांक ११८ मौजा मारोडी, प.ह.नंबर ७५ येथे आजूबाजुच्या शेतक-यांनी अतिक्रमण केले आहे. त्यांनी सक्षम न्यायालयात जावून न्याय मागणे आवश्यक होते. परंतु तसे न करता माहितीच्या अधिकारा अंतर्गत विभागाशी संबंधीत नसलेली माहिती विचारतात. तसेच या वृत्तीला आळा घालणे आवश्यक आहे. तसेच पुन्हा अर्जदारास माहिती घेवून जाण्याबाबत पत्र दिनांक २९.४.२००९ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु ते माहिती घेवून गेले नाही. तरी सुध्दा अर्जदारास माहिती पाठविण्यात आली होती ती अर्जदारास मिळालेली आहे. प्रथम अपीलात अर्जदार हे पेशीवर हजर झाले नसल्यामुळे निर्णय देण्यात आलेला नाही. उपविभागीय अधिकारी, रामटेक यांना तहसिलदार मौदा यांनी दिनांक २५.९.२००८ रोजी १९६८ ची ही माहिती आहे. तालुका १९८१ मध्ये अस्तित्वात आला त्यामुळे कार्यालयात शोध घेतला असता प्रकरण आढळून आले नाही असे कळविलेले दिसून येते.

५.	अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक आहे व त्याकरीता त्यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता मुद्दा क्रमांक २ व ३ मधील माहितीच्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध होतील ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.७.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मुद्दा क्रमांक २ व ३ मधील माहितीच्या संदर्भातील कागदपत्रे छायांकित प्रतीचे स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२)	सदरची कागदपत्रे ही पुर्वीच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास त्यांच्याकडून मागवून उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.७.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार दोषी आढळून येतात व त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ८५२/२००८
अपील क्रमांक ८५३/२००८

**१) श्री दिपक नारायणराव कावळे,
अभिजीत मंगल कार्यालयामागे, नवघरे किराणा स्टोअर्सजवळ,
पंचवटी काटोल, ता. काटोल, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
महादेवराव राऊत विद्यालय, उमरी (सिंधी),
पो. सिंदी ७उमरी), ता.नरखेड, जि. नागपूर-४४१३०६.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००८ व २०.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १२.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. परंतु सदरचे अपीलांचे संदर्भात अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना त्यांचे पत्र दिनांक १०.११.२००८ अन्वये मी मागीतलेली कागदपत्रे (दस्ताऐवज) मला मिळालेली आहेत. तसेच मी आपल्या कार्यालयात दाखल केलेली अपील सुध्दा मागे घेत आहो. असे लेखी दिलेले असल्यामुळे तसेच जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सुध्दा श्री डी.एन. कावळे यांनी मा. शिक्षणाधिकारी यांचे समक्ष अपील प्रकरण मागे घेतल्याचे लेखी निवेदन दिल्यामुळे आपल्याकडील अपील खारीज करुन नस्तीबध्द करण्याबाबत (अपील क्रं. ८५३ व अपील क्रं. ८५२). याबाबत भविषात त्यांची काही तक्रार असल्यास आम्ही जबाबदार राहू, असे आयोगास लेखी दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८५२/२००८ व अपील क्रं.८५३/२००८ खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर
दिनांक १२.६.२००९**

**(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८५०/२००८**

**१) श्री माधव गोविंद कोटस्थाने**
**प्लॉट नं.४, जुन्या आर.टी.ओ.ऑफिसमागे,**
**प्रतापनगर, वर्धा-४४२००१.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**जिल्हा परिषद बांधकाम विभाग, वर्धा. सिव्हील लाईन, वर्धा.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, वर्धा.**
**सिव्हील लाईन्स, वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. सदरचे अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता यांनी आयोगास त्यांचे पत्र दिनांक १०.६.२००९ अन्वये "मला हवी असलेली माहिती मला दाखविण्यात आली. ती वाचून माझे समाधान झालेले आहे. तसेच जी त्रुटीपूर्ण माहिती मिळाली होती त्याचे निराकरण करण्यात आलेले आहे. माझे समाधान झाल्याने मी माझे अपील मागे घेत आहे." असे लेखी निवेदन सादर केले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८७३/२००८**

**१) श्री दादाजी रामदास जांभुळकर,**
**द्वारा- रविंद्र मानवटकर यांचे घरी,**
**प्लॉट नं., ५९८, दहा नंबर पुल ते आवळेबाबु चौक रोड,**
**नागपूर-१७. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,**
**पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण) यांचेकडे मा. पोलीस उपमहानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांनी दिनांक ३०.३.१९९३ अन्वये एकुण २२ कनिष्ठ श्रेणी लिपिकांची रिक्त पदे भरण्याकरीता एकुण २२ उमेदवारांची यादी तयार करण्यात आली होती. त्या संदर्भातील मागणी पत्राची माहिती व्यक्तीश: द्यावी किंवा टपालाद्वारे जे आधी घडत असेल त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.९.२००८ रोजी माहितीच्या खर्चाकरीता अतिरिक्त शुल्क रुपये ४/- आहे. व ते भरुन माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना तत्कालीन कार्यालय अधीक्षक यांनी कनिष्ठ श्रेणी लिपिक यांचे पद भरण्याबाबतचे पत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.१०.२००८ रोजी देण्यात आला असून महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग २ मधील नियम २६२ मधील तरतुदीअन्वये अभिलेख्यांची तपासणी बाबत जतन करण्याचा कालावधी फक्त ७ वर्ष आहे. आपण मागितलेल्या माहितीस जवळपास १५ वर्षाचा कालावधी झालेला असल्यामुळे माहिती उपलब्ध नाही असा

निर्णय दिलेला दिसून येतो. व सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती ही डी.आय.जी. कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल. अर्थात त्याकरीता अपीलकर्ता यांनी डी.आय.जी. कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक होते असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांना निश्चित माहिती दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती डी.आय.जी. कार्यालयातून उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावयास हरकत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत डी.आय.जी. कार्यालयातून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी किंवा डी.आय.जी. कार्यालयातून जे उत्तर येईल ते अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिाांक १६.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८७५/२००८**

**१) श्री सुशील पुंडलीकराव रंगारी,**
**न्यू इंग्लीश हायस्कुलच्या मागे, जटपूरा वार्ड नं.३,**
**चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,**
**नगर परिषद, चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद, चंद्रपूर यांचेकडे अविनाश संभाजी खैरे, रा.न्यू इंग्लीश हायस्कुलच्या मागे जटपूरा-२, शिट नं.९, ब्लॉक नं. ५५, प्लॅाट नं. ६०/१ यांनी मंजूर नकाशाप्रमाणे मंजूर जागेत बांधकाम केले आहे काय. वाल कंपाऊडसाठी मंजूरी घेतली आहे काय. सदर गैरअर्जदाराने त्यांना मिळालेल्या एफ.अस. आय. पेक्षा जास्त बांधकाम केले आहे असे आढळते. तरी मौका चोकशी करुन संबंधीत अधिका-याच्या अहवालाची प्रत द्यावी.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.५.२००७ रोजी माहितीच्या खर्चाकरीता एकुण अतिरिक्त शुल्क व टपाल खर्च असे मिळून रुप्ये २६/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व माहिती दिनांक १६.६.२००८ रोजी रुपये ४२/- चा भरणा नगर परिषद कार्यालयात भरुन माहती घेवून जावी असेही कळविलेले दिसून येते. व माहिती सुध्दा दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.७.२००८ रोजी देण्यात आला असून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. तसेच दिनांक १४.७.२००८ रोजी सुध्दा माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.७.२००८ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अवैध बांधकाम असेल तर केलेल्या कारवाईची माहिती न देता इतर बांधकामाच्या नकाशाची व प्रारंभ पत्राची प्रत दिलेली आहे व जोत्या नंतरच्या बांधकामास मंजूरी प्रदान करण्यात आली आहे अशी चुकीची माहिती देण्यात आली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.५.२००८ च्या अर्जाच्या दिवशी जी माहिती उपलब्ध होती ती माहिती दिलेली आहे. कारण कार्यवाही दिनांक १८.११.२००८ च्या आदेशाप्रमाणे करण्यात आली आहे. थोडक्यात अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतरच दिनांक १८.११.२००८ रोजी माहिती अधिकारी, नगर परिषद, चंद्रपूर यांनी पोलीस निरीक्षक शहर पोलीस स्टेशन यांचेकडे अवैध बांधकामाबाबत गुन्हे दाखल करण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. सक्षम प्राधिकरणाकडे जी कागदपत्रे मान्यतेसाठी दाखल केली जातात तीच उपलब्ध असतात. ज्याबाबत मान्यता घेतली नाही ती माहिती उपलब्ध नसते व त्यामुळे मंजूर नकाशाची प्रत उपलब्ध आहे. परंतु अवैध बांधकामाची माहिती ही कार्यालयात कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असणे शक्य नाही व त्यामुळे तक्रार केल्यानंतरच बांधकाम अवैध आहे किंवा वैध आहे यांची तपासणी केली जाते व दिनांक १८.११.२००८ चे पत्र हे मुळात अपीलकर्ता यांच्या अर्जाचा परिणाम आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना अर्जाच्या तारखे्स उलपब्ध असलेली माहिती दिलेली आहे. व त्याबाबत कार्यवाही झाल्यानंतरची सुध्दा माहिती त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८७८/२००८**

**१) श्री मुश्ताक अहमद व. अब्दुल जब्बार,
रा.मोमीनपुरा पोलीस चौकी जवळ, नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,
महानगर पालिका, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.संचालक,
नगर रचना, महानगर पालिका, नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२००८ रोजी सहा. संचालक(नगर रचना) यांचेकडे वार्ड क्रमांक ५२ येथील घर क्रमांक ५४ चे उत्तरेकडील पूर्व बाजूची ३ फुट रुंदीची गल्ली अतिक्रमण मुक्रर करण्याबाबत मी दिनांक ९.५.२००८ रोजी दिलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही करण्यात आली याची माहिती मिळण्याबाबत. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक ९.५.२००८ चा तक्रार अर्ज व सोबत नकाशा जोडलेला दिसून येतो. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.८.२००८ रोजी सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २६.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.९.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीला दिनांक २९.८.२००८ ला माहिती दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जी माहिती मागितलेली होती त्यापेक्षा वेगळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले

// २ //

की, घर क्रमांकाच्या उत्तरेकडील पूर्व बाजू ही बाब नकाशावरुन सुध्दा कळणे शक्य नाही. कारण नकाशामध्ये सर्व्हे नंबर दिलेला आहे. घर क्रमांक दिलेला नाही. त्यातही सदरच्या नकाशाची प्रत जन माहिती अधिकारी यांचे नस्तीला उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती झोनकडे असल्यामुळे त्यांनी झोन कार्यालय क्रमांक ६ कडून ती मागितली होती व तसे अपीलकर्ता यांना सुध्दा कळविण्यात आले होते. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या अर्जासोबत दाखल केलेल्या नकाशाप्रमाणे झोन कडून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील. त्याकरीता सदरचा अर्ज व नकाशाची प्रत ही झोनकडे देवून झोन क्रमांक ६ ने अपीलकर्ता यांना नकाशात दर्शविल्याप्रमाणे गल्लीतील अतिक्रमणाची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ३०.६.२००८ च्या अर्जासोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८७६/२००८**

**१) श्री गोपीचंद जेठी कांबळे,**
**फॉरेस्ट एम्प्लॉईज को.ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी,**
**इमारत क्रं. अे-३, प्लॉट नं.२९, सेंट्रल पाईंट स्कुलजवळ,**
**पोस्ट काटोल रोड, नागपूर-१३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**नागपूर (ग्रामीण).** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००७ रोजी तहसिलदार तथा शासकिय जन माहिती अधिकारी, नागपूर यांचेकडे एकुण ११ मुद्यांवर मौजा सालई (गोधनी) प.ह.नं.४०-अ, तालुका जिल्हा नागपूर महाराष्ट्र येथील मुळ व जूना खसरा तथा भू.क्रं.१३ ची जमीनीला नवीन पडलेला भू.क्रं. १०८ या गटाचे शेत जमीनीला उप क्रमांक १०८/१ या क्रमांकानी गट क्रमांक ८९,९७/१०९ व ११२ व ७/१२ जमाबंदीचे व नकाशाचे अनुषंगाने तलाठी रेकार्डवर नोंद घेण्यात आली. परंतु रेकार्डवर नोंद घेतांना आडनांव बदलविण्यात आले. माहितीचा कालावधी १९७१-७२ ते १९९१-९२ असा आहे. अर्जदाराला लेखी पत्राद्वारे पूर्व सूचना करुन अर्जदाराकडून प्रत्यक्षात फी आकारुन माहिती प्रत्यक्ष देण्यात यावी असे नमूद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.१०.२००७ रोजी तलाठी यांनी पाठविलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, माहिती उपलब्ध झाली परंतु मुद्या क्रमांक ३ ची माहिती ही महत्वाची असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर त्यांनी आयोगास असे सांगितले की, १९७९-१९८० मध्ये श्री 'कांबळे' ऐवजी श्री 'आकरे' हे नांव

लावण्यात आले. त्यानंतर पुन्हा ९०-९१ मध्ये कांबळे या आडनांवाचा ७/१२ घेतला. व सन २००२-०३ मध्ये मात्र श्री 'कांबळे' ऐवजी श्री 'आकरे' आंडनांव लावण्यात आले. व त्यामुळे सदरची शेत जमीन ही आकरे कुटूंबाकडे जाणे शक्य आहे व तसेच एस.डी.ओ.कडील जमीनीमध्ये सुध्दा त्यांनी त्यांचे आडनांव आकरे नसल्यामुळे जमीन ही आकरे यांची आहे अशी विचारणा करण्यात आली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दर दहा वर्षांनी ज्या वेळेस ७/१२ चे पुर्नलेखन होते ती पुर्नलेखन चुक आहे व ते महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या कलम १५५ अन्वये दुरुस्त करता येईल. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या १-२ तक्रारी एस.डी.ओ.कडील सुध्दा खारीज झालेल्या आहेत. व आता पुन्हा ते तहसिलदार यांचेकडे सुनावणीस आहे. त्यावर तहसिलदार यांनी असे सांगितले की, पुर्नलेखनाची चुक ही दरुस्त करुन देता येईल. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये मात्र अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती जशी आहे तशीच उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कमीत कमी पुर्नलेखन चुक आहे असे मान्य केले अशी माहिती अपीलकर्ता यांना दिल्यास त्यांना त्याबाबतची माहिती मिळाली असे होईल व सदरच्या प्रकरणातील सुनावणीच्या वेळेस त्यांना ती माहिती पुरावा म्हणून सादर करता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी पुर्नलेखनाची चुक आहे व ती दुरुस्त करता येईल असे, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत लेखी स्वरुपात विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना कळविण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८८०/२००८**

**१) श्री चाखोबा महादेव बेसेकर,**
**१५३, चंद्रमणीनगर (जयभीय को.ऑप.हौउसिंग सोसायटी)**
**पोस्ट पार्वती नगर, नागपूर-४४००२७. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**जि.प.ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प.नागपर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी,पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे भूखंड दान घेवून विहिर खोदण्याविषयी ३० डिसेंबर, २००५-०७ या कालावधीतील एकुण पुरवणी पत्रात दिलेली माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.८.२००८ रोजी ८ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व विहिरी बध्दल सुध्दा एकुण ४ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ६.९.२००८ व १७.९.२००८ ला अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष माहिती करीता विभागीय कार्यालयात व मोका तपासणी करीता उपविभाग नागपूर येथे उपस्थित राहाण्याविषयी कळविले व ते उपस्थित झाले होते. तसेच दिनांक १.१२.२००८ रोजी गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी उपविभागीय अभियंता यांना त्यांच्या मालकीच्या जागेवर ग्राम पंचायतने अतिक्रमण करुन विहिरीचे काम सुरु केल्याबाबत तक्रारीच्या संदर्भात चौकशी करण्याकरीता आदेश दिलेले दिसून येतात व त्याबाबतचे पत्र अपीलकर्ता व सरपंच/सचिव ग्राम पंचायत यांना दिलेले दिसून

येते. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. त्यात मौजा जुनीवाणी येथील रहिवासी देवकाबाई गोंविंदा बेसेकर हिच्या कडून शेत क्रमांक २०१ मधील भूखंडाचे दान घेवून विहिर मात्र शेत क्रं. १७४ मध्ये खोदली त्याबध्दल लिहून घेतलेल्या दानपत्राबध्दल, विहिरीबाबत, भूखंडाबाबत व योजनेबाबत माहिती मिळावी. व त्याकरीता प्रतिज्ञापत्र सुध्दा आयोगाकडे दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता व प्रतिज्ञा पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी कागदपत्र मागण्यापेक्षा अभिप्रायात्मक प्रश्न उपस्थित केलेले दिसून येते. व त्यामुळे प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. व त्यामुळेच त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्जदार यांना माहिती ही कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात अपेक्षित असते व कोणत्याही प्रकारचे अभिप्रायात्मक प्रश्नांचे उत्तर अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी ज्या पध्दतीने माहिती मागितलेली आहे त्या पध्दतीने त्यांना उत्तरे देण्यात आलेली आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी कागदपत्राच्या स्वरुपात माहिती मागितली असती तर त्यांना कागदपत्रांच्या स्वरुपात मिळाली असती व तशी ती त्यांना दिलेली आहे, असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व ती अपीलकर्ता यांनी सुध्दा जोडलेली आहे. तरी सुध्दा संपूर्ण योजनेच्या संदर्भात जी जी कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असतील त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. सदरचे कागदपत्रे उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्ता यांनी योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे तक्रार केल्यास न्याय मिळू शकेल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.७.२००८ च्या अर्जामध्ये तसेच द्वितीय अपीलामध्ये ज्या योजनेच्या संदर्भात त्यांनी माहिती विचारलेली आहे त्या योजनेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचेकडे सुरुवाती पासून तर शेवट पर्यंत जो पत्रव्यवहार किंवा कागदपत्रे उपलब्ध असतील किंवा नकाशा उपलब्ध असतील त्याच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य

रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. माहिती उपलब्ध करुन न दिल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८८२/२००८**

**१) श्री श्रीधर श्रावणजी डुंभरे,**
**मुस्लीम लायब्ररी जवळ, भंडारा-४४१९०४. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, भंडारा यांचेकडे भंडारा शहरात शिधा पत्रिकाबाबत तपशिलात माहिती मागितलेली दिसून यते. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.६.२००८ रोजी आपण मागितलेली माहिती तयार करण्याचे काम सुरु आहे. माहिती तयार होताच अविलंब कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. दिनांक ८.७.२००८ ला अपीलकर्ता स्वत: कार्यालयात उपस्थित झाले व त्यांनी माहिती मिळाली नाही असा आक्षेप घेणारे पत्र दिले व खर्च भरण्यास तयार आहे असेही लेखी दिलेले आहे. व तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २८.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे.

४. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २८.७.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे व त्यामध्ये मुद्या क्रमांक ३,४,५ व ७ मध्ये माहिती अपूर्ण दिलेली आहे असे नमुद केले आहे. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, नवीन शिधा पत्रिका देण्यात आलेल्या नाही. त्या केव्हा देण्यात येईल असे त्यांनी प्रश्न विचारलेले आहे व स्पष्टीकरण केलेले नाही, असेही आयोगापुढे सांगितले. परंतु माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणात जी कागदपत्रे, अभिलेखे, टिपण्या इ. उपलब्ध असतील त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारचे प्रश्नांची उत्तरे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती अपूर्ण मिळालेली आहे असे त्यांचा समज झालेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. व त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने कागदपत्राच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसासंचे आंत माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८८३/२००८**

**१) श्री दिलीप विनायकराव दोडके,**
**किसान विद्यालय, आष्टा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**किसान विद्यालय, चिकणी, ता. वरोरा, जि. चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता रहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक किसान विद्यालय, चिकणी यांचेकडे श्री एम.एल. बोधे यांच्या जातीच्या प्रमाणत्राच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १३.१०.२००८ रोजी श्री एम.एल. बांधे किसान विद्यालय यांना विचारणा केली होती. त्यांचे समर्पक उत्तर मिळालेले नाही. आमच्या कार्यालयात विषयाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे सुध्दा दिनांक ९.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २०.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या माहितीच्या संदर्भात दिनांक १५.१२.२००८ रोजी मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी (मा.) यांना सुनावणी पर्यंत दोनदा विचारलेली माहिती दिनांक १५.१२.२००८ ला देण्याचे कबुल केले आहे. त्यानुसार श्री दोडके यांना हवी असलेली माहिती पाठवित आहे. त्यामध्ये दिनांक ८.९.२००८ ची सेवा जेष्ठता यादी, दिनांक ७.१.२००८ चे रोस्टर, श्री एम.एल.बोधे यांचे वैध प्रमाणपत्र (भटक्या जमाती-क). त्यावर माहिती मुदती नंतर प्राप्त झाली याबाबत राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे द्वितीय अपील दाखल झाले आहे. अपील निर्णयाचे अधीन राहून अपील निर्णय स्विकारीत आहे असा आक्षेप अपीलकर्ता यांनी घेतलेला दिसून येतो. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना श्री बोधे

यांच्या संदर्भात शासनाकडून संस्थेकडे व संस्थेकडून त्यांच्याकडे माहिती उपलब्ध झालेली आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिल्यास अपीलकर्ता यांचा हेतू सिध्द होईल असे अपीलकर्ता यांनी सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य सर्वसाधारण टपालाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८८९/२००८**

**१) श्री मिलीन्द शिवाजी भगत,**
**प्लॅाट नं.४०, शिवराज नगर, रोड क्रं.६,**
**विश्वकर्मा नगर, नागपूर-२७. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक८**
**जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**माध्यमिक शिक्षण, जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे आपले कार्यालयीन पत्र क्रमांक जिपना/शि/माध्य/मंडळ/१२९१७/ दिनांक १७.१२.८९ चे पत्र अर्जासोबत जोडलेल्या पत्राचे सत्यता प्रमाणपत्र मिळण्याबाबत. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती ही शाळा स्तरावरील असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी पत्र दिनांक १४.१०.२००८ अन्वये अर्जदारास शाळेकडून माहिती मागवावी असे कळविण्यात आले. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१०.२००८ ला प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अर्जदाराच्या दिनांक ८.९.२००८ चे अवलोकन केले असता मंजूरी आदेश सत्र १९८९ च्या पत्राची प्रत मागणी केलेली आहे. अर्जात सविस्तर नेमके कोणाचे मंजूरी आदेश पाहिजे याबध्दल माहितीचा उल्लेख केलेला नाही. त्याकरीता दिनांक २४.१०.२००८ व ११.१२.२००८ ला सुनावणी आयोजित करण्यात आली. परंतु अपीलकर्ता उपस्थित झाले नाही. करीता माहिती पुरविण्यात आली नाही. अर्जदारास माहितीची गरज नाही असे गृहित धरुन अपील खारीज करण्यात आले आहे. व त्यामुळे त्यांनी निर्णयाची प्रत देण्यात आली नाही या कारणास्तव द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

// २ //

४. आज अपीलकर्ता हजर नाही. व अपीलकर्ता यांना कोणत्या पत्राची प्रत हवी आहे याबध्दलची माहिती सुस्पष्ट दिलेली नाही. त्यांनी उल्लेख केलेल्या दिनांक १७.१२.१९८९ चे पत्राची प्रत माहितीच्या अर्जासोबत जोडलेली आहे. परंतु त्याबरोबर त्यांना काय हवे आहे हे नमुद केले नाही. व त्यामुळे त्याबाबत त्यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. ती बाब त्यांनी जन माहिती अधिकारी यांना स्पष्ट केली असती तर माहिती उपलब्ध करुन दिली असती, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झालेले नसल्यामुळे व आजही खुलासा दिनांक १५.६.२००९ चा दाखल केला आहे परंतु सुनावणीस हजर झालेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नाही असे दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.१०.२००८ रोजी उत्तर दिलेले असून प्रथम अपीलाच्या सुनावणीस व द्वितीय अपीलाच्या सुनावणीस हजर झालेले नाही. माहिती कोणत्या प्रकारची हवी आहे हा खुलासा केलेला नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९३६/२००८**

**१) श्री दिलीप शैलेंद्र गोलदार,**
**कृष्णा नगर, मुल रोड, चंद्रपूर-४४२४०१.** — **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सिंचाई विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर.** — **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**सिंचाई विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर.** — **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंचाई यांचेकडे को.पा.बंधारा सिन्हाळा करारनामा क्रं.११५/ब-१/वि.कृ.का./०३-०४/२६/२/२००४ या संबंधात कामाची रक्कम एकुण १.५० लक्ष रक्कम विना वहज रोखून ठेवण्यात आली आहे व अंतिम देयक त्वरीत देण्यात कां येवू नये याबाबत माहिती पाकीटात टपालाने मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.९.२००८ रोजी तसेच दिनांक ६.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १.११.२००८ ला देण्यात आलेला असून पुर्वी त्यांना त्यांच्या करारनाम्याच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. एकुणच दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना दिनांक २०.२.२००७, ४.२.२००८ व १९.१२.२००५ रोजी या संपुर्ण त्यांच्या कामाच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येतात. व आजही पाटया लावून व त्याचे फोटो कार्यालयात सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, लघु सिंचाई, गोंडपीपरी यांनी कळवून सुध्दा आपण तसे न केल्यामुळे

// २ //

उपविभागीय अधिकारी, गोंडपीपरी यांनी आपणास मोजमाप पुस्तीका हरविलेली नाही. विभागीय कार्यालयात कार्यालयीन कामकाजाकरीता सादर करण्यात आले आहे असे सांगण्यात आले आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी हे सगळे प्रयत्न केलेले आहे. त्याची व्ही.डी.ओ.फिल्म सुध्दा आहे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तक्रार सुध्दा केलेली आहे. परंतु दखल घेत नाही. तसेच त्यांनी दाखल केलेली व्ही.डी.ओ. फिल्म कोणी बघालयला तयार नाही व देयके सुध्दा मंजूर करायला तयार नाही. त्यामुळे माहितीच्या अधिकारात जर ही माहिती मिळत नसेल तर आयोगानी उपाय सूचवावा अशी आयोगास विनंती केली आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांचेकडून संबंधीत कागदपत्रे व व्ही.डी.ओ.फिल्म ही दाखल करुन घेवून त्या आधारावर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे स्वतंत्रपणे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिाांक १७.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९३५/२००८**

**१) श्री अशोक मोहनलाल मेश्राम,**
**रा.विनोबा नगर, तुमसर, ता.तुमसर,**
**जिल्हा भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, तुमसर, ता. तुमसर, जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कर व बाजार निरीक्षक,**
**नगर परिषद तुमसर, ता. तुमसर, जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००८७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद, तुमसर यांचेकडे एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.८.२००८ रोजी रुपये ३९०/- नगर परिषद फंडात जमा करुन माहिती घेवून जावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क भरलेले नाही व दिनांक ७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.१०.२००८ रोजी देण्यात आला असून तुमसर नगर परिषद येथील कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी नाली बांधकामाबाबत प्रस्ताव तयार करुन सक्षम प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठवावा. तसेच अर्जदारास मागितलेली माहिती ७ दिवसांचे आंत माहिती अधिका-यांनी निशुल्क पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या घराचे जवळ नाली नसल्यामुळे त्यांनी अशी व्यापक प्रमाणात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी असे सांगितले की,त्यांच्या घराजवळ नाली बांधल्यास त्यांना इतर माहितीची आवश्यकता नाही

व त्यामुळे तसे आदेश झालेले आहे व नगर परिषद ठराव झालेला आहे. मात्र तरी सुध्दा अपीलकर्ता हे मान्य करण्यास तयार नाही व त्यांनी  मागितलेली माहिती निशुल्क मिळावी व आदेशाचे पालन व्हावे अशी त्यांची विनंती आहे.

अपीलकर्ता यांना माहिती देण्यासाठी दिनांक २२.१०.२००८ रोजी सुध्दा माहिती तयार होती. परंतु ते घेण्यास इंकार केलेला आहे. त्यामुळे नगर परिषदेमधील स्थायी समितीने अशा प्रकारची नाली बांधकामाबाबतचा ठराव पारित केलेला असेल तर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)	अपीलकर्ता यांचा मुळ हेतू सफल झालेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक  १७.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८८७/२००८**

**१) श्री राजकुमार बारसुजी महाकाळे,**
**द्वारा श्री एम.जे. आवळे,**
**४२, कानफाडे नगर, नागपूर-४४००१५. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**उमरेड, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**उमरेड, ता. उमरेड, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे फेर फार एकदम कसा मंजूर केला याबध्दलची संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने हवी असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ८.१०.२००८ व २८.२.२००९ ला माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.१.२००९ रोजी देण्यात आला असून वरील प्रकरण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याअंतर्गत येत नाही. कारण उपलब्ध दस्तऐवजाच्या प्रती पुरविण्यात आल्या आहेत. त्याबाबत त्यांची तक्रार नाही. त्यामुळे अपीलार्थी यांचे अपील अर्ज या स्तरावरुन नस्तीबध्द करण्यात येत आहे, असे आदेश दिलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना फेर फार रद्य करण्याच्या बाबत कार्यवाही करुन पाहिजे आहे. जे फेर फार झालेले आहे त्याबध्दलची संपूर्ण माहिती त्यांना आहे व तलाठी यांनी सुध्दा ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्राची माहिती

उपलब्ध होते. परंतु कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मिळत नाही व सदरच्या प्रकरणात अधिकार हे महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ प्रमाणे महसुल अधिका-यांकडे असल्यामुळे उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केल्यास त्याबाबतचा न्याय अपीलकर्ता यांना मिळू शकेल. त्याकरीता सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९०२/२००८**

**१) श्री हरदास किसन पाटील,**
**१३६, बजाज नगर, नागपूर-४४००१०. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**परिमंडळ क्रं.१, सिताबर्डी विभाग, नागपूर शहर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**परिमंडळ क्रं.१, नागपूर शहर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस स्टेशन सिताबर्डी गोडावून एम.आय.डी.सी.झोन-१, अशाप्रकारे माहितीचा अर्ज सादर केलेला दिसून येतो. त्यात अपघातामधील अनोळखी माणसाची माहिती तपशिलात मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.९.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.११.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे उर्वरित माहिती पोलीस स्टेशन वाडी येथील अधिका-यांनी पेशंट बाबत पोलीस स्टेशन वाडी येथील पोलीस स्टेशनचे डायरीला घेतलेल्या नोंदी बाबतची माहिती प्रमाणित करुन अपीलकर्ता यांना देण्यात यावी व अपीलकर्ता यांना हे पत्र प्राप्त होताच माहिती प्राप्त करुन घ्यावी अशा सूचना देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांना एम.आय.डी.सी.विभाग यांचेकडून माहिती प्राप्त झाली व ती अपीलकर्ता यांना दिली. तसेच पोलीस स्टेशन वाडी येथून मात्र माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध होती ती जशीच्या तशी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारे माहिती लपवून ठेवण्याचा प्रश्न नाही. माहिती विलंबाने उपलब्ध होण्याचे कारण अपीलकर्ता यांचा अर्ज पोलीस स्टेशन अंबाझरी येथे दिनांक ८.८.२००८ रोजी पाठविण्यात आला व एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन कडून ती माहिती प्राप्त करुन घेण्यात आली व त्यामुळे विलंब झाला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती जशी आहे तशी व तेवढीच उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिाांक १८.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९७/२००८**

**१) श्री कृ.के.चांदेकर,**
**५०, दत्तात्रय नगर, महाकाळकर सभागृहाजवळ,**
**नागपूर-२४. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१,**
**२८, क्वीन्स गार्डन, पुणे- ४११००१. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्र.संशोधन अधिकारी,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,**
**२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांना महत्वाचे शासकिय कामात व्यस्त असल्यामुळे हजर राहू शकत नाही, असा आयोगास विनंती अर्ज सादर केला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा महत्वाचे शासकिय कामात व्यस्त असल्याने हजर राहू शकत नाही अशी आयोगास विनंती केली आहे. याचा अर्थ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या कार्यालयातील अधिकारी हे दिनांक १८.६.२००९ रोजी महत्वाचे शासकिय कामात व्यस्त आहे असे दिसून येते. याचा दूसरा अर्थ असाही होतो की, ३६४ दिवस ते महत्वाचे शासकिय काम करीत नाही. यावरुन आयोगाची नोटीस आल्यानंतर उपस्थित राहाण्यास टाळाटाळ करण्याचा हा प्रकार आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे आयोगाचा अवमान हा दोनही अधिका-यांनी केलेला आहे. तसेच माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ सुध्दा केलेली आहे असा निष्कर्ष काढता येतो व त्यामुळे त्यांच्यावर रुपये २५,०००/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आंत करणे आवश्यक आहे. विभागीय कार्यालय, नागपूर यांचे वतीने विधी अधिकारी श्री थेटे उपस्थित आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००८ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१ यांचेकडे हलबा जमातीबाबत जोशी समितीच्या अहवालाची प्रत. (२) कोष्टी जातीचा साडेबारा जाती नमुद असतांना १९६२ पुर्वीच्या संदर्भाची प्रत. (३) हलबाकोष्टी ही कोष्टीची उपजात असल्याचा साडेबारा जातीपैकी एक उपजात असल्याचा १९६२ पुर्वीच्या पुराव्याची प्रत. अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.११.२००८ रोजी अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यात जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यापेक्षा त्या कार्यालयात जास्ती माहिती उपलब्ध नाही असा निर्णय देवून सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था या कार्यालयात एकाच दिवशी शासकिय महत्वाचे काम करीत असल्यामुळे इतर दिवशी दिनांक ९.९.२००८ च्या अर्जाचे उत्तर दिनांक ४.९.२००८ रोजी पाठविले जाते. यावरुन इतर दिवशी शासकिय महत्वाचे काम करीत नाही हे सिध्द होते. यापूर्वी सुध्दा आयोगापुढे हजर राहाण्याबध्दल आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांना समज देण्यात आली आहे. परंतु, तरीही अपीलकर्ता यांच्या सुनावणीस उपस्थित राहाण्यास टाळाटाळ केली जाते ही बाब आयुक्त, आदिवासी विकास यांचे निदर्शनास आणणे आवश्यक आहे. तसेच सचिव, आदिवासी विकास मंत्रालय, यांचे सुध्दा निदर्शनास आणणे आवश्यक आहे. मात्र, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, २८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१. आदिवसी विकास यांना स्वतंत्रपणे पोस्टाने माहितीसाठी पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९६/२००८**

**१) श्री चंद्रकांत रामभाऊ चिमोटे,**
**५२५, गुरुमाऊली, न्यू नंदनवन ले आऊट,**
**नागपूर-९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, नागपूर शहर-१,**
**१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॅाट चौक,**
**उमरेड रोड, नागपूर-९.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**फॉरेस्ट डिपार्टमेंट एम्लाईज को.ऑप.हाऊसिंग सोसायटी लि.**
**नागपूर, काटोल रोड, सेमिनरी हिल्स, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२००८ रोजी सचिव, फॉरेस्ट डिपार्टमेंट एम्लाईज को.ऑप.हाऊसिंग सोसायटी यांचेकडे संस्थेच्या भाग व त्याचे प्रमाणपत्राबाबत सन २००० ते आजपावेतो, एकुण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी प्रथम अपील हे उपनिबंधक, सहकारी संस्था नागपूर यांचेकडे दाखल केले आहे. सदरच्या अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर दिनांक १०.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी संस्थेच्या सचिवास माहिती मागितली होती. परंतु संस्थेचे सचिव हे माहिती अधिकारी नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नाही. जिल्हा उपनिबंधक यांनी असे सांगितले की, सद्या संस्थेवर प्रशासक नेमण्यात आलेला आहे व

त्यामुळे प्रशासकानी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५.७.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने संस्थेचे प्रशासक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उर्वरित माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९९/२००८**

**१) श्री तपसकुमार तारकचंद बोस,**
**प्लॉट नं. २७६, हनुमान नगर,**
**नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सचिव,**
**म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहा.सचिव,**
**म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर डिव्हीजन यांचेकडे एकुण इंग्रजी A पासून M पर्यंत मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांची मुलगी कु. तनुका तपसकुमार बोस ही नापास झालेली असल्यामुळे त्यांनी सदरची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.६.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ४.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.८.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येत नाही या कारणास्तव अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना मा. उच्च न्यायालय, कलकत्ता यांचे प्रितम रुज

विरुध्द कलकत्ता विद्यापीठ या याचिकेतील निर्णय आयोगापुढे सादर केला आहे. (A.I.R. June, २००८ Calcutta, ११८).सदरच्या निर्णयामध्ये उमेदवारास उत्तरपत्रिका पाहाण्याचे अधिकार आहे असा निर्णय दिलेला आहे. व त्या निर्णयाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांना उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. परंतु अपीलकर्ता यांनी उत्तरपत्रिकांच्या मागणी बरोबर इतर अनेक मागण्या हया परीक्षेच्या व्यवस्थेबध्दल केलेल्या आहेत. व त्याबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी विभागीय मंडळाकडून जे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे त्याप्रमाणे माहिती नाकारलेली आहे. शिक्षण मंडळाच्या नियमावली मध्ये परीक्षेच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे हे गोपनिय ठरविण्यात आल्यामुळे सदरची माहिती गोपनिय आहे असे कळविण्यात आलेले आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे सदरची माहिती नाकारण्यात आली नाही तर ती विभागीय मंडळाच्या नियमाप्रमाणे नाकारण्यात आली आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा युक्तीवाद केलेला आहे.

४. परीक्षेच्या व्यवस्थेच्या परीक्षकांच्या संदर्भात परीक्षेची माहिती उपलब्ध करुन देणे हे शक्य नाही. त्यावर उत्तरपत्रिका मिळण्यासाठी सुध्दा मागणी केलेली आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. परंतु उत्तर पत्रिकांच्या संदर्भात विद्यार्थी नापास झाला असेल तर त्यांनी एका विशिष्ट मुदतीमध्ये गुण पडताळणी पुर्नमुल्यांकनाकरीता अर्ज करणे आवश्यक असते. परंतु तसे न करता माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागितली जाते. व त्यामुळे शिक्षण मंडळाच्या नियमांचे पालन केले जात नाही. तसेच ६ महिन्याच्या कालावधी नंतर सर्व उत्तरपत्रिका हया नष्ट करण्यात येतात व त्याप्रमाणे आता हया उत्तरपत्रिका उपलब्ध असतीलच असे नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. पण कलकत्ता मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे उत्तरपत्रिका पाहाण्याचे अधिकार आहे. त्यामध्ये उत्तरपत्रिकाची प्रत उपलब्ध करुन देण्याचे आदेश नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना उत्तरपत्रिका उपलब्ध असल्यास दाखविण्यास हरकत नाही व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १०.६.२००८ च्या अर्जातील उत्तरपत्रिका मागण्याच्या संदर्भात सदरच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांनी मागणी केलेल्या उत्तरपत्रिका त्यांना किंवा त्यांच्या पाल्यांना बोलावून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विनामुल्य दाखविण्यात याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९००/२००८**

**१) श्री विजय लक्ष्मण भूरे,**
**ग्रामीण वाचनालय, अभियंता कॅालनी,**
**गणेशपूर, भंडारा-४४१९०४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, पुणे.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, नागपूर, धनवटे चेंबर्स, सिताबर्डी ,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक२९.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता यापुर्वी त्यांचे आयोगाकडील अपील क्रमांक २२२९/२००७ मध्ये याच अर्जामध्ये दिनांक ६.३.२००७ व २.१२.२००७ च्या जोडपत्र अ च्या संदर्भात निर्णय दिनांक २१.११.२००८ रोजी दिलेला असल्यामुळे पुन्हा त्याच अर्जाच्या संदर्भात निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

**नागपूर**
**दिनांक १८.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ९०१/२००८

**१) श्री दत्तू शंकर चिकाटे,**
**मु.पो.आलापल्ली, ता.अहेरी**
**एटापल्ली रोड सोसायटी गोडावूनच्या समोर,**
**आलापल्ली-४४२७०३. जि. गडचिरोली.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलगुरु,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता यापुर्वी त्यांचे आयोगाकडील अपील क्रमांक ६१३/२००८ मधील याच अर्जामध्ये दिनांक १.१.२००८ च्या संदर्भात निर्णय दिनांक ५.५.२००९ रोजी दिलेला असल्यामुळे पुन्हा त्याच अर्जाच्या संदर्भात निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक १८.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८९३/२००८**

**१) श्री कृष्णा हेमराज कनोजीया**
**बुध्द नगर, आनंद बुध्द विहाराजवळ,**
**पोस्ट आंबेडकर मार्ग, प्लॉट नं.४८६,**
**नागपूर-४४००१७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी, पं.स. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**पंचायत समिती, कार्यालय चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी सुनावणीचे सुरवातीसच आयोगास सांगितले की, अपीलाचे अनुषंगाने मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झाली असून त्यांचे समाधान झालेले आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असून त्यांचे समाधान झालेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक १८.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१०/२००८**

**१) श्री धनंजय म. चित्रीव,**
**१२, प्रोसेस कॅालोनी, स्वावलंबीनगर,**
**नागपूर-२२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय)**
**पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त(प्रशासन)**
**पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**(अंतरिम आदेश पारित दिनांक १९.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त, नागपूर यांचे कार्यालयात श्री पुरुषोत्तम गवई, अे.सी.पी. सदर नागपूर व (२) श्री अनिल बोबडे, अे.सी.पी. पाचपावली नागपूर यांचे अचल-चल संपती विषयी माहिती. माहिती संबंधीत कालावधी-नोकरीवर लागेले पासून. अशाप्रकारे ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.८.२००८ रोजी मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(२) अन्वये संबंधितांचे अभिवेदन मागविण्यात आले. त्यानुसार त्यांनी अभिवेदनामध्ये त्यांची वैयक्तिक माहिती पुरविण्यात येवु नये असा आक्षेप घेतलेला असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (घ)(त्र) मधील तरतुदीनुसार देता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.२.२००९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

//२//

४. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्ष श्री पुरुषोत्तम गवई, अे.सी.पी. व श्री अनिल बोबडे, अे.सी.पी. यांना अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे विचारणा केलेली असली तरी सुध्दा राज्य माहिती आयोगानी निर्णय देण्यापुर्वी अधिनियमाचे कलम १९(४) प्रमाणे त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकुण घेणे आयोगावर बंधनकारक असल्यामुळे त्रयस्थ पक्ष म्हणून श्री पुरुषोत्तम गवई, अे.सी.पी. व श्री अनिल बोबडे, अे.सी.पी. यांनी सदरचे अपीलाचे अनुषंगाने माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांचे म्हणणे आयोगापुढे दिनांक १३.७.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता सादर करणे आवश्यक आहे. व त्याकरीता सदरचे अंतरिम आदेशाची प्रत ही विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत त्रयस्थ पक्ष यांना अवगत करुन त्यांना आयोगापुढे हजर राहून (लेखी व तोंडी) म्हणणे मांडण्यासाठी कळविण्यात यावे. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांनी सुध्दा दिनांक १३.७.२००९ रोजी आयोगापुढे सदरचे अपीलाचे सुनावणीस हजर राहावे.

सदरच्या अंतरिम निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना त्वरीत आजच पाठविण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१३/२००८**

**१) श्री प्रकाश मुकूंदराव पंत,**
**डी-१, संजय अपार्टमेंट, २७४ धमरपेठ विस्तार,**
**शिवाजी नगर, नागपूर-४४००१०. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक(नि) कार्यालय औष्णिक विद्युत केंद्र,**
**म.रा.विद्युत नि.कं.मर्या.खापरखेडा, ता.सावनेर,जि. नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता (नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक(नि) कार्यालय औष्णिक विद्युत केंद्र,**
**म.रा.विद्युत नि.कं.मर्या.खापरखेडा, ता.सावनेर,जि. नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, मुख्य महाव्यवस्थापक (निर्मिती) कार्यालय, खापरखेडा यांचेकडे सन डिसेंबर, २००४ ते ऑक्टोबर, २००५ या कालावधीतील श्री पी.बी.बडकस, दुय्यम अवेक्षक(स्थापत्य) यांचे संदर्भामध्ये ओव्हर टाईम देण्याची शिफारस कनिष्ठ अभियंता स्थापत्य यांनी केली व कार्यालयाने पेमेन्ट केले त्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.६.२००८ रोजी एकुण रुपये ११६/- भरणा करण्यासाठी कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी सदरचे पत्राचे अनुषंगाने दिनांक २६.६.२००८ रोजी ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तरी ती विना मुल्य उपलब्ध करुन द्यावी कारण अपीलकर्ता यांना जे पत्र पाठविलेले आहे त्यानंतर ३० दिवसांचे आंत फी चे प्रदान होऊ शकत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी मनी ऑर्डरने १२.७.२००८ रोजी सदरची रक्कम पाठविली आहे. परंतु दिनांक २.७.२००८ रोजी मुदतीच्या आंत आपणास संदर्भ क्रमांक २ अन्वये दस्तऐवज व टपालाच्या खर्चापोटी रुपये ११६/- जमा करण्याबाबत सूचना करण्यात आलेली असल्यामुळे आपली विनंती मान्य करता येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी मनी ऑर्डर पाठीवला तरी त्यांना माहिती

दिनांक १४.१०.२००८ रोजी देण्यात आली. परंतु, अपीलकर्ता यांची जमा केलेली रक्कम रुपये ११६/- परत करण्यात आली आहे.

३. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली व ती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली आहे परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, श्री बडकस यांचे माहे जून, २००५ चे ओव्हर टाईमची प्रत हेतु पुरस्पर जाणून बुजून पाठविण्याचे टाळलेले आहे. व त्यामुळे श्री पी.बी. बडकस यांचे माहे जून, २००५ चे ओव्हर टाईमची शिटची प्रत पाठविण्यात यावी असा त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेताना आक्षेप दिलेला आहे व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांना विना मुल्य माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु त्यामध्ये श्री पी.बी. बडकस यांचे ओव्हर टाईम शीट नाही त्याबध्दल जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी म्हणून ही कोणत्याही प्रकारची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसते तर ती वेगवेगळया शाखेकडून मागवून उपलब्ध करुन द्यावी लागते. त्यामुळे त्या शाखेकडून किंवा विभागाकडून जशी माहिती येते तशी माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येते. व त्यामुळे स्थापत्य विभागातून जी माहिती आलेली आहे त्या माहिती मध्ये श्री पी.बी. बडकस यांचे ओव्हर टाईम शीट नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे पुन्हा एक वेळ प्रयत्न करुन जर माहिती उपलब्ध झाल्यास उपलब्ध करुन देण्यात येईल व नसल्यास तसे कळविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना श्री पी.बी. बडकस यांच्या ओव्हर टाईम शीटची छायांकित प्रत उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संबंधीत शाखेकडून उपलब्ध करुन देण्यात यावी. किंवा नसल्यास त्यांचेकडून लेखी घेवून तसे कळविण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९११/२००८**

**१) श्री सिताराम रामाजी मोहाडीकर,**
**कळमना मार्केट, रेल्वे स्टेशन रोड,**
**चिखली वस्ती, प्लॉट नं.२, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपनिगम आयुक्त-१,**
**महानगर पालिका, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक,**
**महानगर पालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर महानगरपालिका यांचेकडे घर क्रमांक ७७६, सर्व्हे नं.५/१०(जूना)१०८/६९२(नवीन) वार्ड क्रं.१४ एरिया ११७ स्के.मिटर जूनी मंगळवारी नागपूर संबंधीत घर हे नामदेव उर्फ नानाजी पंचम शेटे (उमरेडकर) हे नांव कोणत्या कागदपत्रानिशी रेकार्डवर आले. उदा विक्री पत्र, मृत्यू पत्र, वारसा हक्क यापैकी कोणते कागदपत्र आहे त्याचे वर्णन द्यावे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.११.२००८ रोजी कर निर्धारक तथा माहिती अधिकारी, नागपूर महानगरपालिका यांनी नस्ती मध्ये विक्री पत्र, मृत्यू पत्र, वारस हक्क संबंधीत कोणतेही दस्तऐवज आढळून येत नाही. त्यामुळे नामदेव उर्फ नानाजी पंचम शेटे (उमरेडकर) हे नांव कोणत्या आधारे झाले याबाबत अभिलेख उपलब्ध नाही अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे निर्णयाप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, कोणत्याही मालमत्तेवर जे नांव मालक म्हणून दर्ज होते त्याबध्दलची नोंद घेताना ते कोणत्या आधारावर प्राप्त झाले याबध्दलची माहिती किंवा कागदपत्रे उपलब्ध असणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ही बाब सत्य असली तरी आज त्या नस्तीमध्ये कोणत्याही प्रकारचे कागदपत्र उपलब्ध नाही. त्या नस्तीच्या संदर्भात पाहाणी करुन सुध्दा अपीलकर्ता यांना खात्री करुन घेता येईल असे त्यांचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक यांचेकडे संपर्क साधून संबंधीत घराच्या नस्ती संदर्भात पाहाणी करुन आवश्यक असेल ती माहिती उपलब्ध करुन घेणे योग्य राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी संबंधीत घराचे कर निर्धारक यांचेकडे असलेल्या नस्तीची पाहाणी करुन त्यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध असल्यास छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात. त्याकरीता कार्यालयीन कामाच्या दिवशीची वेळ व तारीख कर निर्धारक यांना कळवून जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यावेळेस व तारखेस उपस्थित राहून नस्तीची पाहाणी करावी व अपेक्षित ती कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन घेण्यात याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१२/२००८**

**१) श्री विठठल जानूजी निशाने,**
**टिळक नगर, वार्ड नं.४(वडसा रोड),**
**ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे मौजा बोडेगांव त.सा.क्रं.२७ मुडझा रा.नि.मंडळ गांगलवाडी तह. ब्रम्हपूरी जिल्हा चंद्रपूर येथील भूमापन क्रं.७४ आराजी ०.८९ हे.आर.चा ७/१२ दुरुस्त करण्या बाबतचे दिनांक ५.५.२००७ चे नोंदणीकृत डाकेने केलेल्या अर्जासंबंधी केलेल्या कार्यवाहीच्या संपूर्ण अहवालाची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.९.२००८ रोजी सदर प्रकरणात कागदपत्रांची खात्री करुन व प्रस्ताव तयार करुन मा.अधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे दिनांक ९.४.२००८ ला सादर करण्यात आला. कार्यवाहीच्या पत्राची नक्कल पाहिजे असल्यास नियमाप्रमाणे फी भरुन प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु सुनावणीच्या तारखेवर अपीलार्थी हजर झाले नाही त्यामुळे अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहे असे दिसून येते.

वास्तविक अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.५.२००८ च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख ब्रम्हपूरी यांनी माहिती अधिकारी म्हणून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी मात्र अपीलार्थी सुनावणीस हजर नाही या कारणास्तव अपील खारीज करणे आवश्यक नसते. कारण माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाी हे सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे कडून सदरच्या प्रकरणात माहिती घेणे आवश्यक होते व तशी ती अधीक्षक भूमी अभिलेख यांनी घेतली असती तर त्यांच्याकडे प्रकरण मान्यतेसाठी सादर केले आहे ही बाब त्यांच्या निदर्शनास आली असती व सदरचे प्रकरण त्याचवेळेस मान्य करता आले असते व निर्णय झाला असता. परंतु अपीलकर्ता हजर झाले नाही या कारणास्तव प्रथम अपील खारीज करण्याची एक प्रथाच सर्व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेमध्ये दिसून येते. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल होत असतात. प्रथम अपीलीय अधिकारी हे आपले वैयक्तिक कर्तव्य बजावत नाही व त्यामुळे त्यांना योग्य ती समज देणे आवश्यक आहे.

५. आयोगापुढे खुलासा करताना तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख ब्रम्हपूरी यांचेकडून त्रुटींची पुर्तता करुन प्रकरण या कार्यालयास दिनांक १७.६.२००९ रोजी प्राप्त झाले असून महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९९६६ चे कलम १०६ अन्वये उपविभागीय अधिकारी ब्रम्हपूरी यांना सादर करणे शिल्लक आहे असा खुलासा दिलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे तसेच अपीलकर्त्यांचे प्रकरण मार्गी लागलेले दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील खरीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असून त्यांचे अपेक्षेप्रमाणे प्रकरण मार्गी लागलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१५/२००८**

**१) श्री केवलराम शामरावजी कापगते,**
**प्लॅाट नं. २१२ शिल्पा सोसायटी, अजंठा टाईल्सजवळ,**
**रेल्वे क्रासिंग रोड, सोमलवाडा, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(नियमीतीकरण),**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२०८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे मौजा बाबुलखेडा प.ह.नं.३९, खसरा नं.६१/१ ड प्रिती को.आप हाउसिंग सोसायटीचे प्लॅाट नं. १० व ११ ची सध्यास्थिती, सोसायटीचे जागेमधून डि.पी.रोड जात आहे काय. जात असल्यास कोणकोणत्या प्लॅाटमधून जाते. डी.पी.रोड ची पुर्वीची जागा बदलण्यात आली आहे काय. असल्यास बदलाची कारणे व सर्व तपशिल, अशी माहिती शिघ्र टपालाने उपलब्ध करुन देण्यात यावी, असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २.७.२००८ रोजी उत्तर दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तरामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १५.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.८.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती त्यांना उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांना जे उत्तर देण्यात आलेले आहे ते कोणत्याही प्रकारचा विचार न करता दिलेले आहे. अपीलकर्ता यांनी प्रश्नार्थक जरी माहिती मागितली असली तरी त्या प्रश्नांच्या

माध्यमातून कागदपत्रे उपलब्ध आहे किंवा नाही असे द्यावयाचे असते व त्याप्रमाणे कागदपत्रे उपलब्ध असल्यास व त्याबाबतची कारण मिमांसा उपलब्ध असेल तर ती सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु कोणतेही काम हे गंभीरपणे न घेता करण्याची जी सवय कर्मचारी किंवा अधिकारी यांना आहे त्याप्रमाणे कोणत्याही प्रकारचा विचार न करता उत्तर देण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आदेशामध्ये कोणत्या प्रकारची माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असते हे स्पष्ट करणे आवश्यक असते. ते विवेचनात जरी दिलेले असेले तरी आदेशात नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. अपीलकर्ता यांना त्यांनी अर्जात मागितलेली माहिती ही शब्दशः मुद्येनिहाय उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते व ती दिलेली नसल्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००८ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जी जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१७/२००८**

**१) श्री दशरथ लखुजी मेश्राम,**
**द्वारा शंतनु भोयर, वकील, बॅचलर रोड,**
**धंतोली वर्धा. ता.जि. वर्धा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद हिंगणघाट, ता. हिंगणघाट,जि. वर्धा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी,**
**नगर परिषद हिंगणघाट, ता. हिंगणघाट, जि. वर्धा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक३१.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी दिनांक १ जानेवारी २००० पासून ३१ मे २००६ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले त्याच्या देयकाच्या प्रमाणित छायांकित प्रती देणेबाबत. (२) पगाराचे पे फिक्शेशन करते वेळी ७,२२५-२२५-११०५० ही वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही त्याबाबत माहिती व वरिष्ठाचा तसा आदेश असल्यास त्याची प्रमाणित छायांकित प्रत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दिनांक १.१.२००० ला पगाराचे फिक्शेशन बरोबर करण्यात आले नाही व दिनांक १.१.२००० पासून ते मे २००६ पर्यंत शिक्षक/प्राचार्य पदाची वार्षिक वाढ देखिल देण्यात आलेली नाही. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.९.२००८ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात एकुण रुपये ६८०/- भरण्यात यावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे रुपये ६८०/- चा भरणा केलेला दिसून येतो. त्यावर दिनांक १.११.२००८ रोजी अर्जान्वये माहिती घेवून जाण्याकरीता कळविले असता नंतर येवून घेवून जातो म्हणून गेले व माहिती घेण्याकरीता आले नाही असे पत्र अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते. व त्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम

अपीलाचा निर्णय दिनांक २९.१२.२००८ रोजी आदेश पारित केलेला आहे असे खुलाशात म्हटलेले आहे. परंतु सदरची प्रत दाखल केलेली दिसून येत नाही.

४. अपीलकर्ता यांना दिनांक २२.१०.२००८ रोजी सुध्दा माहितीचे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असा खुलासा केला आहे की, अपीलकर्ता हे दिनांक १८.९.२००८, ३०.१०.२००८, १४.१०.२००८ व २८.१.२००९ रोजी स्वत: हिंगणघाट येथे कार्यालयात गेले होते. परंतु अधिकारी हे न्यायालयात गेलेले आहेत व न्यायालयातूनच माहिती घ्या अशा प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते. माहिती अधिकाराचा आयोग आमचे काय करील आम्ही पाहून घेवू असेही त्यांनी खुलाशात म्हटले आहे. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी करीता पत्र पाठविण्यात आले नाही. दिनांक २९.१२.२००८ पर्यंत माहिती अधिकारी स्वत: वैद्यकिय रजेवर होते. तसेच ते कधीही कार्यालयात नसतात. अमरावतीला राहूनच कार्यालयाचे कामकाज चालवितात असा युक्तीवाद त्यांनी केला. अपीलकर्ता हे प्रत्येक वेळेस कार्यालयात गेले होते त्याबाबतचे त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता यांनी वेतनश्रेणी वगैरे देण्यात आली नाही असे म्हटलेले आहे. परंतु माहितीच्या अधिकारात अशा प्रकारची माहिती मिळत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांच्याकडून रुपये ६८०/- चा भरणा करुन घेतलेला आहे व माहिती मात्र उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे सदरचे रुपये ६८०/- हे अपीलकर्ता यांना परत करणे आवश्यक राहील. व सदरच्या माहितीचा खर्च हा जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तीगतरित्या सोसणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विना मुल्य रजिस्टर पोस्टाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती त्यांच्या दिलेल्या पत्यावर पाठविण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे तक्रार आल्यास शास्तीस पात्र राहातील यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांना रुपये ६८०/- भरणा केल्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे रुपये ६८०/- हे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना धनादेशाद्वारे परत करण्यात यावे. व उपलब्ध करुन द्यावयाच्या माहितीचा खर्च हा जन माहिती

अधिकारी यांनी स्वतः सोसावा. ही कार्यवाही करण्याची जबाबदारी मुख्यअधिकारी, नगरपरिषद यांची आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२५/२००८**
**अपील क्रमांक ९२६/२००८**

**१) श्री मारोतराव विश्वनाथराव मोते,**
**महालक्ष्मी नगर नं.१, प्लॉट नं.२१,**
**मानेवाडा रोड, नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)**
**पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**सहा.पोलीस आयुक्त (प्रशासन)**
**पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी निवेदन देवून सुनावणीस हजर राहू शकणार नाही असे कळविलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे व कागदपत्रे दाखल केलेली आहे. परंतु त्यांचेतर्फे कोणीही प्रतिनिधी हजर नाहीत.

२. अपील क्रमांक २२५/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचेकडे अपीलकर्ता यांच्या विरुध्द असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणाच्या संदर्भात टिपणीच्या परिच्छेद क्रं. ६५ ते आजपर्यंतच्या कार्यवाहीच्या सत्यप्रती. दिनांक २५.६.२००८ व २६.६.२००८ रोजी पोलीस आयुक्त यांना अर्ज सादर केला होता, त्याबाबतची कार्यवाही, ग्रॅच्युएटीचे पैसे मिळावे म्हणून दिनांक २५.६.२००८ रोजी अर्ज सादर केला त्याबाबतची कार्यवाही इ. माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.८.२००८ रोजी मुद्या क्रमांक १ ची माहिती ही अशासकिय सदरात मोडत असल्यामुळे पुरविता येत नाही. मुद्या क्रमांक २ ची माहिती पुरविण्यात आली आहे व मुद्या क्रं. ४ ची माहिती संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध

झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १०.१०.२००८ रोजी ठेवण्यात आलेली दिसून येते. परंतु निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी जे निवेदन सादर केले आहे त्या निवेदनामध्ये एकंदरीत जन माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आंत माहिती पुरविली नाही व काहीही केलेले नाही. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विलंबाने माहिती पुरविली असे निवेदन दिलेले आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा करताना अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी शुल्क भरावे असा खुलासा दिलेला आहे. परंतु सदरचे पत्र आयोगाकडे दाखल केलेले नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुनावणी घेतली आहे परंतु माहिती मात्र दिनांक २०.१.२००९ रोजी देण्यात आलेली दिसून येते.

५. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचा जो निर्णय घेण्यात आला होता तो अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे नव्हता व माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचाच प्रयत्न करण्यात आलेला दिसून येतो. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा दिनांक १६.९.२००८ रोजी दाखल करण्यात आले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय हा ३० दिवसांत व विशेष परिस्थितीमध्ये ४५ दिवसांत देणे आवश्यक असते. व त्या निर्णयाच्या विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावयाची तरतुद आहे. सदरच्या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १०.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली असे नमूद केलेले असले तरी निर्णय पारित केलेला नाही. याचा अर्थ प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे पालन केलेले नसून उल्लंघनच केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे दिसून येते.

६. प्रथम अपीलीय अधिकारी हे त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे माहिती ही त्यांच्या स्तरावर अर्जदार यांना उपलब्ध व्हावी असा अधिनियमाचा उद्येश आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी एकतर निर्णय पारीत करीत नाही किंवा तोंडी आदेश पारीत करतात. यावरुन अधिनियमाच्या तरतुदींचे त्यांना ज्ञान नाही असे दिसून येते. त्याबाबत त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे काटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. व त्यामुळे दिनांक २०.१.२००९ रोजी म्हणजेच प्रथम अपील दाखल केल्यानंतर तीन महिन्यांनी माहिती उपलब्ध

करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय पारित केला नसल्यामुळेच विलंब झालेला आहे हे निश्चित. दिनांक २०.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना सुध्दा जे कळविलेले आहे ते निव्वळ अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे कळविण्यात आलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ जन माहिती अधिकारी / प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली दिसून येते. व त्याबाबत पोलीस आयुक्त, नागपूर यांनी दखल घेणे आवश्यक आहे जेणेकरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीमध्ये जी मुदत विहित केलेली आहे त्या विहित मुदतीत अर्जाची व अपीलाची कार्यवाही होईल अशी अपेक्षा आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध

झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

७. अपील क्रमांक ९२६/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन) यांना विभागीय चौकशी सुरु असतांना प्रेसायडींग अधिका-यांनी मुदत वाढ मिळण्याकरीता आतापर्यंत पाठविलेल्या अहवालांच्या सत्यप्रती मिळण्याबाबत विनंती आहे. तसेच अहवाल पाठविला नसेल तर तसेही कळविण्याबाबत विनंती आहे. त्याचप्रमाणे इतरही ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नाही व निर्णय पारित करण्यात आलेला नाही असे दिसून येते. व त्यानतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

८. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व निर्णय दिलेला नाही त्याकरीता वरील अपील क्रमांक ९२५/२००८ मध्ये अधिनियमाच्या तरतुदींची जाणिव करुन देण्यात आलेली आहे. व यावरुन तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी हे अतिशय बेजबाबदार आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

९. आज अपीलकर्ता गैरहजर असून त्यांनी निवेदन सादर केले आहे. सदरच्या निवेदनामध्ये एकंदरीत जन माहिती अधिकारी यांनी मुदतीचे आंत माहिती पुरविली नाही त्याबाबत केलेल्या अपीलावर मुदतीच्या आंत सुनावणी घेतली नाही. त्यानंतर अपूर्ण माहिती पुरविली व उर्वरित माहिती पुरविण्याची विनंती करुनही आजपर्यंत माहिती पुरविली नाही किंवा त्यासंदर्भात काहीही कळविलेले नाही असे निवेदन केलेले आहे. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा

दाखल केला आहे. परंतु त्यांचे कोणीही प्रतिनिधी सुनावणीस हजर नाही. खुलाशामध्ये प्रथम अपीलाच्या सुनावणी बध्दल कोणत्याही प्रकारचे भाष्य केलेले `नाही व यावरुन सुनावणी घेतली नाही हे सिध्द होते. तत्कालीन प्रथम अपीलय अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतुदींची कोणत्याही प्रकारे जाणिव आहे असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने प्रथम लिपिक विभागीय चौकशी शाखा यांना पत्र पाठविल्याचे नमुद केलेले आहे. परंतु पत्राची प्रत आयोगाकडे सादर केली नाही. व त्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही याकरीता जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो खुलासा केलेला आहे त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जे कनिष्ठ कर्मचारी/अधिकारी यांचे सहाय्य घ्यावे लागल्यास त्या कनिष्ठ कर्मचाकारी किंवा अधिकारी यांना सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते व तसे लेखी पत्र दिलेले असल्यास प्रथम लिपिक, विभागीय चौकशी शाखा यांना जन माहिती अधिकारी समजण्यात यावे व त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु, तसे पत्र दिलेले नसल्यास सदरची शास्ती ही जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द लादणे आवश्यक राहील.

अपीलकर्ता यांना अद्यापही उर्वरित माहिती उपलब्ध झालेली नाही असा खुलासा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०.१.२००९ रोजी माहिती पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु काय माहिती पुरविण्यात यावी याबाबतची तपासणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यावेळेसच केलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९२५/२००८ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ९२६/२००८ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.८.२००८ च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय

अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी ज्यांचे सहाय्य घेतले असेल ते अधिकारी/कर्मचारी यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१)प्रमाणे रुपये ५,०००/- (पाच हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी तसे पत्र दिलेले नसल्यास त्यांचे विरुध्द शास्तीची वसुली करावी. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करुन ती लेखाशिर्षे "००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" मध्ये जमा करण्यात यावी.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमात नमुद केलेल्या मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय देवून माहित उपलब्ध झाली आहे असे पाहावे व त्याकरीता त्यांना समज देण्यात येत आहे. सदरची समज बध्दल त्यांचे गोपनिय अहवालात नोंद घेण्यात यावी.

५) निर्णयाची एक प्रत पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडे माहितीकरीता स्वतंत्रपणे, पोस्टाने पाठविण्यात यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९४८/२००८**

**१) श्री आनंद जगन्नथ गुल्हाने,**
**अ-२५, माइन्स रेस्क्यू स्टेशन,**
**इंदोरा कॅाम्लेक्स, डब्ल्यू.सी.एल.नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ क्रं.२, नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**परिमंडळ क्रं.२, सदर विभाग, नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त यांचेकडे एफ.आय.आर. प्रमाणे ३४०/२००७, दिनांक २४.८.२००७ रोजी सदर पोलीस स्टेशन, नागपूर या संदर्भात एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २७.९.२००८ रोजी मुद्या क्रमांक १ ते ४ व मुद्या क्रं. ७ ते ८ ची माहिती देण्यात आलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक ८.११.२००८ रोजी मुद्या क्रमांक ५ व ६ ची माहिती देण्यात आलेली दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तीच माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यांनी जी तक्रार दिलेली होती व तक्रारीसोबत जी कागदपत्रे दिलेली होती ती त्यांच्या नस्तीमध्ये नाही व

ती उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच त्यांनी नस्तीची तपासणी सुध्दा केलेली आहे. परंतु जी कागदपत्रे उपलब्ध नाही तीच कागदपत्रे ते मागत आहे. प्रथम अपीलात सुध्दा नवीन मुद्दे उपस्थित करुन माहिती मागितलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचेकडे जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्या संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच न्यायालयात सुध्दा आरोपत्रासोबत संपुर्ण कागदपत्रे दाखल केलेली आहे. तसेच त्यांना वेळोवेळी माहिती मिळाल्याबध्दल पोच घेण्यात आली आहे. परंतु रंगीत फोटो कोर्टात सादर केलेले असल्यामुळे ते अर्जदारास पुरविला आले नाही. यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध होती ती संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२१/२००८**

**१) श्री रोशनी जयप्रकाश ऊर्फ अमोल टंडन,**
**द्वारा सुभाष कपूर, मु.पो. देवळी, जि. वर्धा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**संवर्ग विकास अधिकारी, पं.स. अकोला,**
**ता.जिल्हा अकोला. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत, दही हांडा, ता.जि.अकोला — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे रतनलाल टंडन हयांचा मृत्यू केव्हा झाला. (२) कुसूमबाई रतनलाल टंडन हयांचा पण मृत्यू केव्हा झाला. हयाबाबत माहिती द्यावी. तसेच मृत्यू पत्राचा दस्तऐवज पण द्यावा, ही विनंती अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.११.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत दहीहांडा यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या अर्जाची माहिती नियमाप्रमाणे फी आकारणी करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी माहितीचा अर्ज दाखल केला होता, परंतु माहिती मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीचा अर्जच दाखल केलेला नव्हता. प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळेसच जन माहिती अधिकारी यांना कळले की अपीलकर्ता यांनी अशा प्रकारचा अर्ज दाखल केला होता. व त्यामुळे दिनांक १२.११.२००८ रोजी ग्राम पंचायतचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पत्र देवून त्यामध्ये स्पष्टपणे आपण कोणत्याही प्रकारचे अर्जात दिलेले नाही व त्यामुळे

आपण आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिलासह लेखी अर्ज करुन माहिती मागवावी असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी अर्ज सादर केला नव्हता असे दिसून येते. तसेच प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या वडीलांना ते ओळखत नाही व ते ज्यावेळेस त्यांचे कार्यालयाकडे दिसले त्यावेळेस त्यांनी ओळख दिली व विचारले व त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला परंतु ती त्यांनी घेतली नाही असे सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांच्या वडीलांनी आयोगापूढे एक पॉकीट काढले व त्यात कोणत्याही प्रकारची माहिती पाठविली नाही व कोरे कागद पाठविले असे सांगितले. त्यात अर्धवट नमुन्यांत असलेले कोरे प्रमाणपत्र फाडलेले आहे असे दाखविले. परंतु जन माहिती अधिकारी यांचे कडील नमुना व अपीलकर्ता यांनी दाखविलेला नमुना यांत फरक आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी निव्वळ कोरे प्रमाणपत्र पाठविण्यांची नवीन प्रमाणपत्राचा नमुना छापून घेणार नाही असा निष्कर्ष काढावयांस हरकत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक २४.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांचे वडीलांचे मृत्यू प्रमाणपत्र हे सही शिक्यानिशी पाठविले होते व त्यानंतर त्यांनी कोणतेही पत्र पाठविले नाही असे सांगितले. व त्यानंतर दिनांक १२.५.२००९ रोजी आणखी तसेच पत्र पाठविलेले दिसूनयेते. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे महत्वाचे असल्यामुळे सदरचे मृत्यूचे प्रमाणपत्राची जी प्रत आयोगापूढे सादर केलेली आहे ती प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १३.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९४९/२००८**

**१) श्री निरंजन जागोजी वासे,**
**२४५, कुकडे ले आऊट, नागपूर-४४००२७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.७.२००८ रोजी माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे मुळ गोपनिय अहवालांची संपूर्ण झेरॉक्स प्रत देण्यात यावी. त्यात परिशिष्ट ब (भाग-३) स्वयं मुल्यानिर्धारण अहवाल, त्यात प्रविदेवन अधिका-यांनी नोंदविलेल्या अभिप्रायाशिवाय परिशिष्ट ब (भाग-४) ज्या अनु.क्रं. १ ते १९ प्रत्येकासमोर शेरा नमूद केलेला असून त्यावर प्रतिवेदन अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. तसेच परिशिष्ट ब (भाग-५) पुर्नविलोकन अधिकारी यांनी नोंदविलेले अभिप्राय एकंदरीत परिशिष्ट ब (भाग-३) (भाग-४) व (भाग-५) आणि भाग-६ अभिप्रायासह यांच्या झेरॉक्स प्रती तातडीने देण्यात याव्यात ही विनंती, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.७.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी गोपनिय अहवाल गोपनिय दस्तऐवज असून माहिती अधिकाराअंतर्गत गोपनिय अहवाल देणे बंधनकारक नाही असे कळविले त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.१०.२००८ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना कोणत्या कारणास्तव त्यांच्या गोपनिय अहवालामध्ये प्रतिकुल शेरे देण्यात आले आहे याचे कारण समजणे आवश्यक आहे. परंतु, त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी वरिष्ठ अधिकारी यांचेकडे अपील केल्यास त्याबाबतचा निर्णय त्यांना मिळू शकेल. परंतु, त्यांचे निवेदन फेटाळलेले आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. शासकिय कर्मचा-यांच्या गोपनिय अहवालाच्या संदर्भामध्ये त्यांना प्रतिकुल शेरे किंवा अनुकूल शेरे असतील तर ते कळविले जातात. परंतु गोपनिय अहवाल प्रतिवेदन अधिकारी यांनी दिलेले अभिप्राय हे उपलब्ध करुन देणे योग्य नसल्यामुळे अपीलकर्ता यांना ते उपलब्ध करुन दिलेले नाही.

५. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारीयांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५८/२००९**

**१) श्री धर्मदाय सुर्यभान सिरसाट,**
**प्रियंका वाडी, गजानन नगर, वर्धा रोड,**
**नागपूर-१५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,**
**महानगर पालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक (स्लम)**
**महानगर पालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प संचालक (झोपडपटटी सुधार), नागपूर महानगरपालिका यांचेकडे नागपूर शहरात एकुण झोपडपटटी किती याबाबत ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २४.१०.२००८ रोजी एकुण ६ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा दिलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना स्लम विभागाकडून रितसर शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेता येईल असे जे कळविण्यात आलेले आहे ते योग्य नाही. त्यांनी दारिद्रय रेषेखालील आहे असे नमूद केले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी रेशन कार्ड जोडलेले होते. रेशन कार्ड हे प्रमाणपत्र होऊ शकत नाही. त्यामुळे

अपीलकर्ता यांनी माहिती ही शुल्क भरुनच उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे असे जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा सांगितले. कारण मागितलेली माहिती अतिशय व्यापक आहे व त्या माहितीच्या संदर्भामध्ये सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा सुध्दा प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे व त्याकरीता प्रती पृष्ठ रुपये २/- खर्च आवश्यक आहे. तसेच माहिती जी मागितलेली आहे ती व्यापक प्रमाणात असून ती एका कोणत्याही विभागात उपलब्ध नसते. तसेच माहिती प्रश्न उत्तराच्या स्वरुपात मागितलेली आहे, ती अपेक्षीत नाही व तसे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती हवी असेल तर त्यांनी स्लम विभागाकडे रितसर शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील व त्यामुळे जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६२/२००९**

**१) श्री हरिश्चंद्र चिंधुजी भगत,**
**द्वारा कोठारी कॅसेट सेंटर, मेन रोड, गोपालनगर**
**पोस्त प्रताप नगर, नागपूर-२२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**नागरी हक्क संरक्षण केंद्र, नागपूर परिक्षेत्र,**
**कोतवाल नगर, पोस्ट प्रतापनगर, नागपूर-२२. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक,**
**नागरी हक्क संरक्षण केंद्र, नागपूर परिक्षेत्र,**
**कोतवाल नगर, पोस्ट प्रतापनगर, नागपूर-२२. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक यांचेकडे माझे अर्ज दिनांक ९.२.२००८, १८.३.२००८, ३०.३.२००८, २४.४.२००८, ३.५.२००८, २६.५.२००८, ३०.५.२००८, ६.६.२००८, १८.६.२००८, ७.७.२००८, १९.७.२००८, २५.७.२००८, १६.८.२००८, ४.९.२००८, १५.९.२००८ व दिनांक ३०.९.२००८ च्या कार्यालयीन टिपणीच्या प्रमाणित झेरॉक्स प्रतीची माहिती मिळणेबाबत. (२) मा.सदस्य, अनुसूचित जाती/जमाती आयोग मुंबई/मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, म.रा. कुलाबा मुख्यालय मुंबई यांचेकडील माझा अर्ज दिनांक २३.६.२००८ आपणाकडे प्रापत झाल्यावर आपले कार्यालयाने दिनांक १९.७.२००८ पत्राद्वारे पोलीस निरीक्षक अंबाझरी नागपूर यांना कायदेशीर कारवाई करुन अहवाल सादर करण्यास आदेशित केल्याचे अनुषंगाने सदर अर्जावर आपले कार्यालयाने घेतलेल्या कार्यालयीन टिपणीची प्रमाणित प्रत मिळणेबाबत, माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.११.२००८ रोजी संपूर्ण नस्ती दाखविण्यात आली होती. त्यातील कोणतेही कागद आवश्यक नसल्याचे सांगितले व सर्व कागदपत्रे

स्वत:जवळ असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १२.११.२००८ रोजी पुन्हा उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ४.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २६.१२.२००८ रोजी आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात रुपये १४/- शासन भरणा करुन त्याची पावती देण्यात यावी. व आपले कागदपत्रे देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना नोट शिट मिळाल्या नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, टिपण्या उपलब्ध होत्या. परंतु अपीलकर्ता यांनी त्यावेळेस आवश्यकता नाही असे सांगितले. परंतु आता अपीलकर्ता यांनी आयोगापुढे टिपणीची मागणी केलेली आहे त्यामुळे पोलीस उपअधीक्षक यांनी एकत्रित केलेली आहे त्या टिपणी अपीलकर्ता यांनी पाहिली होती. टिपणी पाहिजे असल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले. असे असल्यास अपीलकर्ता यांना सदरच्या टिपणीची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना टिपणीची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६५/२००९**

**१) श्री प्रमोद निळकंठराव लोन्हारे,**
**७४, अनंत नगर, कोटोल रोड,**
**नागपूर-४४००१३. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक(सह.पत संस्था),**
**सहकारी संस्था, नागपूर, धनवटे चेंबर्स(अनेक्स),**
**सिताबर्डी, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकार सदन, हिंदुस्थान कॅालनी, अमरावती रोड,**
**नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांचेकडे उत्कर्ष नाग. जि.प.शिक्षक सह.पतसंस्थेच्या कर्मचारी(नोकरभरती) संबंधी माहिती. कर्मचारी मंजूरी आकृतीबंध व प्रत्यक्षात कार्यरत कर्मचारी सन २००६ ते सन २००८ या कालावधीतल माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे परिपत्रकाप्रमाणे शासकिय प्राधिकरणा अंतर्गत ज्या सहकारी पत संस्था व नागरी सहकारी पत संस्थांना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष देण्यात येत नसल्यामळे सदर कायदा संस्थेस लागू होत नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा विभागीय सहनिबंधक यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी दिलेला असून अर्जदार हे संस्थेचे सभासद असल्यामुळे व संस्थेच्या सदस्यांनी मागणी केलेले दस्तऐवज हे संस्थेच्या सदस्यास देण्यास हरकत नसल्याची माझी खात्री असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सादर केलेले अपील हे

मान्य करण्यात येत असून अर्जदार यांना मागणी केलेल्या माहितीच्या प्रती १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात याव्या असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरी सध्दा पत संस्थेने माहिती देण्यास नकार दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांनी खालीलप्रमाणे खुलासा या कार्यालयास सादर केलेला आहे.

"(१) अपीलार्थी श्री प्रमोद निळकंठराव लोन्हारे यांनी दिनांक ३०.९.२००८ रोजी उत्कर्ष नागपूर जि.प.प्राथ.शिक्षक सहकारी पत संस्थेच्या कर्मचारी (नोकर भरती) संबंधी माहितीची मागणी या कार्यालयास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केली होती.

(२) या कार्यालयाचे दिनांक ३.१०.२००८ च्या पत्रान्वये, अपीलार्थी यांनी मागणी केलेली वरील माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे सदर अर्ज पुढील कार्यवाही करीता संस्थेकडे पाठविण्यात आला व सदर पत्राची प्रत अपीलार्थी यांना देण्यात आली.

(३) सदर अर्जावर संस्थने दिनांक १०.११.२००८ च्या पत्रान्वये मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक दिनांक ८.२.२००६ नुसार सदर कायदा संस्थेला लागू होत नाही असे अपीलार्थी यांना कळविले आहे.

(४) अपीलार्थी श्री प्रमोद निळकंठराव लोन्हारे यांच्या दिनांक ३०.९.२००८ च्या माहितीच्या अधिकारान्वये सादर केलेल्या अर्जावर माहिती संस्थेकडून प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे दिनांक १५.११.२००८ रोजीच्या अर्जान्वये दाखल केली.

(५) मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी दिनांक ५.१२.२००८ च्या आदेशान्वये अपीलार्थी यांनी त्यांचे कार्यालयास सादर केलेले अपील मान्य केले असून, अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती संस्थेने अर्जदारास १५ दिवसांच्या आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहेत.

(६) मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचे दिनांक ५.१२.२००८ चे आदेश या कार्यालयास प्राप्त झाल्यावर, या कार्यालयाचे पत्र दिनांक २२.१२.२००८ अन्वये अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात असे संथेला

या कार्यालयाने कळविले आहे व अपीलार्थी यांना दस्तऐवजाच्या प्रती संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याबाबत सदर पत्रान्वये कळविले आहे.

(७) संस्थचे दिनांक १७.२.२००९ च्या पत्रान्वये, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांचे दिनांक ८.२.२००६ चे परिपत्रकान्वये माहितीचे अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (एच) प्रमाणे शासकिय प्राधिकरण अंतर्गत ज्या सहकारी पतसंस्था आणि नागरी बँकांना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रितीने देण्यात येत नसल्याने सदर कायदा संस्थेला लागू होत नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपूर बेंच नागपूर मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को ऑप बँक लि. अमरावती यांनी मा. राज्य माहिति आयोग, विदर्भ विभाग नागपूर यांचे विरुध्द दाखल केलेली याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये, दिनांक १३ जाने. २००९ चे आदेशान्वये मा. राज्य माहिति आयोगाचे आदेश रद्द बादल ठरवून मा.सहकार आयुक्त यांचे दिनांक ८.२.२००६ चे परिपत्रकान्वये सदर कायदा बँक व पत संस्थान लागु होत नाही असा आदेश पारित केला आहे व सदर आदेशाच्या आधारे, अपीलार्थी यांना संस्थेने माहिति उपलब्ध करुन दिली नाही व संस्थेने या कार्यालयास दिलेल्या दिनांक १७.२.२००९ च्या पत्रात नमुद केले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, गैर अपीलार्थी क्रं.२ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियमाप्रमाणे कारवाई केली आहे त्यामुळे अपीलार्थी यांनी मा. आयुक्त यांचेकडे दाखल केलेली अपील अपरिपक्व स्वरुपाची असल्याने फेटाळण्यात यावी, ही विनंती."

सदरच्या खुलाशामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपर खंडपीठ, नागपूर मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को ऑप बँक लि. अमरावती यांनी मा. राज्य माहिति आयोग, याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिनांक १३ जानेवारी, २००९ चा निर्णय आयोगाचे निदर्शनास आणला व त्यामुळे सदरचा अधिनियम हा बँकांना व सर्व संस्थांना लागू होत नाही असे आदेश पारित केलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१)	माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया ज्या सहकारी संस्थांना शासकिय मदत मिळत नाही त्यांना तो लागू नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६४/२००९**

**१) श्री संजय रामदास चामट,**
**४७, श्रीकृष्ण नगर, वाठोडा रोड,**
**नागपूर-४४०००९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, नागपूर, धनवटे चेंबर्स(अनेक्स),**
**सिताबर्डी, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक(सह.पत संस्था),,**
**सहकार सदन, हिंदुस्थान कॅालनी, अमरावती रोड,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांचेकडे उत्कर्ष नाग. जि.प.शिक्षक सह.पतसंस्थेच्या आमसभेचे व मासिक सभेचे इतिवृत्ताची माहिती व आमसभेच्या स्वागत समारंभाच्या खार्चचे देयक (व्हाऊचरसह), आमसभा/मासिक सभा इतिवृत्त (प्रोसिडींग).. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे परिपत्रकाप्रमाणे शासकिय प्राधिकरणा अंतर्गत ज्या सहकारी पत संस्था व नागरी सहकारी पत संस्थांना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष देण्यात येत नसल्यामळे सदर कायदा संस्थेस लागू होत नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा विभागीय सहनिबंधक यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी दिलेला असून अर्जदाराने मागणी केलेले दस्तऐवज हे संस्थेच्या सदस्यासाठी खुल्या स्वरुपातील दस्तऐवज असल्यामुळे सभासदार देण्यास हरकत नसल्याने अपीलार्थी यांनी या कार्यालयास

सादर केलेले अपील हे मान्य करण्यात येत असून अर्जदाराने मागणी केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती संस्थेने अर्जदारास १५ दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरी सध्दा पत संस्थेने माहिती देण्यास नकार दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांनी दिनांक २३.६.२००९ रोजी खालीलप्रमाणे खुलासा या कार्यालयास सादर केलेला आहे.

"(१) अपीलार्थी श्री संजय रामदास चामट यांनी दिनांक ३०.९.२००८ रोजी उत्कर्ष नागपूर जि.प.प्राथ.शिक्षक सहकारी पत संस्थेच्या आमसभेचे व मासिक सभेचे इतिवृत्ताची माहिती व आमसभेच्या स्वागत समारंभाच्या खार्चचे देयक (व्हाऊचरसह) माहितीची मागणी या कार्यालयास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केली होती.

(२) या कार्यालयाचे दिनांक ३.१०.२००८ च्या पत्रान्वये, अपीलार्थी यांनी मागणी केलेली वरील माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे सदर अर्ज पुढील कार्यवाही करीता संस्थेकडे पाठविण्यात आला व सदर पत्राची प्रत अपीलार्थी यांना देण्यात आली.

(३) सदर अर्जावर संस्थने दिनांक १०.११.२००८ च्या पत्रान्वये मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक दिनांक ८.२.२००६ नुसार सदर कायदा संस्थेला लागू होत नाही असे अपीलार्थी यांना कळविले आहे.

(४) अपीलार्थी श्री संजय रामदास चामट यांच्या दिनांक ३०.९.२००८ च्या माहितीच्या अधिकारान्वये सादर केलेल्या अर्जावर माहिती संस्थेकडून प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे दिनांक १५.११.२००८ रोजीच्या अर्जान्वये दाखल केली.

(५) मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी दिनांक ५.१२.२००८ च्या आदेशान्वये अपीलार्थी यांनी त्यांचे कार्यालयास सादर केलेले अपील मान्य केले असून, अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या दस्ताऐवजाच्या छायांकित प्रती संस्थेने अर्जदारास १५ दिवसांच्या आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहेत.

(६) मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचे दिनांक ५.१२.२००८ चे आदेश या कार्यालयास प्राप्त झाल्यावर, या कार्यालयाचे पत्र दिनांक २२.१२.२००८ अन्वये अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात असे संस्थेला

या कार्यालयाने कळविले आहे व अपीलार्थी यांना दस्तऐवजाच्या प्रती संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याबाबत सदर पत्रान्वये कळविले आहे.

(७) संस्थचे दिनांक १७.२.२००९ च्या पत्रान्वये, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांचे दिनांक ८.२.२००६ चे परिपत्रकान्वये माहितीचे अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (एच) प्रमाणे शासकिय प्राधिकरण अंतर्गत ज्या सहकारी पतसंस्था आणि नागरी बँकांना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रितीने देण्यात येत नसल्याने सदर कायदा संस्थेला लागू होत नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपूर बेंच नागपूर मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को ऑप बँक लि. अमरावती यांनी मा. राज्य माहिती आयोग, विदर्भ विभाग नागपूर यांचे विरुध्द दाखल केलेली याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये, दिनांक १३ जाने. २००९ चे आदेशान्वये मा. राज्य माहिती आयोगाचे आदेश रद्द बादल ठरवून मा.सहकार आयुक्त यांचे दिनांक ८.२.२००६ चे परिपत्रकान्वये सदर कायदा बँक व पत संस्थाना लागु होत नाही असा आदेश पारित केला आहे व सदर आदेशाच्या आधारे, अपीलार्थी यांना संस्थेने माहिती उपलब्ध करुन दिली नाही व संस्थेने या कार्यालयास दिलेल्या दिनांक १७.२.२००९ च्या पत्रात नमुद केले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, गैर अपीलार्थी क्रं.२ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियमाप्रमाणे कारवाई केली आहे त्यामुळे अपीलार्थी यांनी मा. आयुक्त यांचेकडे दाखल केलेली अपील अपरिपक्व स्वरुपाची असल्याने फेटाळण्यात यावी, ही विनंती."

सदरच्या खुलाशामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ, नागपूर मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को ऑप बँक लि. अमरावती यांनी मा. राज्य माहिती आयोग, याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये दिनांक १३ जानेवारी, २००९ चा निर्णय आयोगाचे निदर्शनास आणला व त्यामुळे सदरचा अधिनियम हा बँकांना व सर्व संस्थांना लागू होत नाही असे आदेश पारित केलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया ज्या सहकारी संस्थांना शासकिय मदत मिळत नाही त्यांना तो लागू नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९५३/२००८**

**१) श्री डॅा. अशोक गजानन लांजेवार,**
**एम-५, प्रिमियम प्लॅाझा, खरे टाऊन,**
**धरमपेठ, नागपूर-४४००१०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**(उद्यान विभाग) महानगर पालिका, नागपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक,**
**महानगरपालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००८ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, उद्यान विभाग, नागपूर महानगरपालिका यांचेकडे एकुण ४ मुद्यांमध्ये गांधीसागर लेकच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः प्राप्त करुन घेण्यात येईल. माहिती तयार होताच कळविण्यात यावे असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक २४.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. परंतु माहिती विलंबाने उपलब्ध झाली म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक २८.८.२००८ रोजी श्री एस.वाय. मोहिते, उद्यान निरीक्षक, म.न.पा. नागपूर यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते. परंतु सदरची माहिती मुदतीत उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उप निगम आयुक्त, महानगरपालिका यांचेकडे प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाडे प्रथम अपील केलेले आहे असा खुलासा केलेला आहे. परंतु, अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे

प्रथम अपीलाची जी प्रत दाखल केलेली आहे त्यात अपीलीय अधिकारी उद्यान विभाग असे नमूद केलेले असून उप अधीक्षक यांनी सदरचे अपील स्विकारलेले आहे अशी त्यावर नोंद केलेली दिसून येते. यावरुन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक यांनी आयोगाकडे सादर केलेला खुलासा योग्य नाही असे दिसून येते. परंतु उद्यान निरीक्षक यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने उद्यान निरीक्षक श्री एस.वाय. मोहिते यांनी जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामळे अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्याकरीता उद्यान निरीक्षक यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही सक्षम अधिकारी यांचेकडून करण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे पोस्टाने, स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९५८/२००८**

**१) श्री विजय उमराव डोंगरे ऊर्फ डोंगरवार,**
**वार्ड क्रं. ३, (पंचशिल झेंडा चौक),**
**कटंगी कला, ता.जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, गोंदिया, ता.जि. गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पंचायत समिती, गोंदिया, ता.जि. गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचेकडे त्यांच्या दिनांक २६.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली याबध्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीश/ घेणार व अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे असे प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांना दिनांक १९.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यात अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक २६.८.२००८ रोजीच्या अर्जात जी माहिती मागितलेली आहे ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता हे तीच ती माहिती वारंवार मागत असतात व त्यामुळे यापूर्वी त्यांना जावक क्रमांक ३५३, दिनांक २७.५.२००८, जावक क्रमांक ४८०, दिनांक १६.६.२००८ व जावक क्रमांक ३१२१, दिनांक २०.९.२००८ अन्वये माहिती पुरविण्यात आलेली असून संदर्भासाठी उपरोक्त पत्राची छायांकित प्रत सोबत पाठविण्यात येत आहे असे त्यांना कळविलेले आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे

की, त्यांना त्यांच्या दिनांक २६.८.२००८ च्याप्रमाणे मुंबई ग्राम पंचायत अधिनियमाचे कलम ७ प्रमाणे चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांच्या म्हणण्याप्रमाणे संबंधीत ग्राम सचिव यांना शास्ती करावी व सरपंच/उपसरपंच यांना पदावरुन काढण्यात यावे अशी अपेक्षा दिसून येते. परंतु सदरच्या अर्जाप्रमाणे चौकशी करणे आवश्यक आहे व चौकशी केल्यानंतरच निर्णय हा करावा लागतो व त्याप्रमाणे चौकशी करुन अहवाल जर सादर झालेला असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु अपीलकर्ता हे वारंवार माहिती उपलब्ध झाली असून सुध्दा तेच मुद्ये उपस्थित करतात त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या दिनांक २६.९.२००८ च्या अर्जासोबत दिनांक २६.८.२००८ चा तक्रार अर्ज जोडलेला आहे त्या तक्रार अर्जाप्रमाणे चौकशी झालेली असल्यास त्याबध्दलची माहिती मागिल कोणताही संदर्भ न देता उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. किंवा चौकशी झालेली असल्यास चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २६.८.२००८ च्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही झाली याबध्दलची माहिती त्यांच्या दिनांक २६.९.२००८ च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९६१/२००८**

**१) श्री संतोष सारंगधर कान्हेरकर,**
**म्हाळा कॅालनी द्वारा श्री प्रकाश खानोरकर,**
**एल.आय.जी.७१, हिंगणा रोड, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी, पं.स. हिंगणा,**
**ता. हिंगणा, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्राम पंचायत वानाडोंगरी, ता.हिंगणा, जि. नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी रहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी माहिती अधिकारी, ग्राम पंचायत वानाडोंगरी यांचेकडे १ जुलै, २००८ ते ३१ जुलै, २००८ पर्यंत सामान्य फंडाच्या कॅशबुक व व्हाऊचर फाईलची प्रत. (२) ग्राम पंचायत मध्ये एकुण स्थायी किती कर्मचारी आहेत. त्यांचे वेतनमान व कोणते वेतन आयोग लागू आहेत. नोकर पगार रजिस्टरची प्रत. (३) आवक जावक नोंदवहीची प्रत (दिनांक १ जुलै २००८ ते ३१ जुलै, २००८) अशी माहिती मागितलेली दिसून येते. सोबत बी.पी.एल. प्रमाणपत्र जोडलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २४.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.१०.२००८ रोजी दिलेला असून अपीलकर्ता यांना विना मुल्य तात्काळ माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर दिनांक १४.११.२००८ रोजी सचिव तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी त्यांना कोणत्याही प्रकारचा अर्ज दिलेला नाही किंवा ग्राम पंचायतीला तो प्राप्त झाला नाही. त्यामुळे कोणत्या प्रकारची माहिती आपणास हवी आहे हे लक्षात येत नाही, अशा प्रकारचे पत्राने कळविलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी यु.पी.सी.ने अर्ज पाठविला आहे. त्याबाबतचा पुरावा सादर केला आहे. असे असले तरी त्यांनी तो पोस्टात टाकलेला आहे याबाबत कोणत्याही प्रकारचे गृहित धरता येत नाही. कारण अपीलकर्ता यांना माहिती पेक्षा जन

माहिती अधिकारी यांना दंड कसा करता येईल याबाबत रस दिसून येतो. त्यांनी आयोगापुढे माहिती अधिकारी यांना दंड करण्यात यावा अशा प्रकारे वारंवार विनंती केली. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. परंतु, अपीलकर्ता यांच्या राहाणी मानावरुन असे दिसून येते की, ते दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहे याबध्दल शंका उपस्थित होऊ शकते. ज्याअर्थी सचिव तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना टपालाने अर्ज प्राप्त झालेला नाही असे कळविलेले आहे त्याअर्थी सचिव तथा माहिती अधिकारी यांचेवर सुध्दा विश्वास ठेवणे आवश्यक आहे. आज आज माहिती अधिकारी हे वैद्यकिय रजेवर असल्यामुळे हजर नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

४. असे असले तरी प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यास जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाही करणे आवश्यक आहे. व माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २०.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २०.८.२००८ च्या अर्जाची प्रत ही हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून उपलब्ध करुन घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिांक २४.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९६०/२००८**

**१) श्री शिवशंकर सखारामजी राजनकर,**
**मु.पो. वानाडोंगरी, वार्ड क्रं.२, ता. हिंगणा,**
**जिल्हा नागपूर- ४४१११०. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी, पं.स. हिंगणा,**
**ता. हिंगणा, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्राम पंचायत वानाडोंगरी, ता.हिंगणा, जि. नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी रहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००८ रोजी माहिती अधिकारी, ग्राम पंचायत वानाडोंगरी यांचेकडे विकास निधी व खाली प्लॅाटवर कर आकारण्याच्या संदर्भात सौ. वर्षा राहूल दिवे यांचेकडून विकास निधीची रक्कम घेतल्या गेली पण पावती दिली नाही वगैरे.. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.९.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना एकुण २५ पृष्ठांमध्ये माहिती पुरविलेली दिसून येते. परंतु माहितीच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये विहित मुदतीत माहिती पुरविलेली नाही हे सिध्द झालेले आहे व त्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे हे अपीलकर्ता यांनी मान्य केलेले आहे. त्यात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून ते दोषी आढळून येतात. व

त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९५९/२००८**

**१) श्री मोहन पुंडलीकराव लोहकरे,**
**मु. पारशिवनी, ता. पारशिवनी, जि. नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी, पं.स. पारिशिवनी,**
**ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्राम पंचायत कार्यालय, करंभाड, ता.पारशिवनी,**
**जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे शासनाची मंजूरी न घेता शासनाचा मालकी हक्क रद्द करण्यासाठी फेर फार रद्द करण्याच्या संदर्भात शासनाची परवानगी घेतली होती किंवा नाही, याबध्दलची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः येवून घेवून जाईल असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.७.२००८ रोजी सचिव यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.११.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर दिनांक १८.११.२००८ रोजी मागितलेली माहिती १५ ते २० दिवसांच्या अवधीत उपलब्ध करुन देता येईल असे पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १२.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना यादी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४.  अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती मागितलेली नव्हती. जी यादी त्यांना दिलेली आहे त्या यादीमधील लाभार्थ्यांच्या निवडीची फेर-फार देताना शासन जमा असल्यामुळे शासनाची परवानगी घेण्यात आली होती काय, ही माहिती विचारलेली आहे व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शासनाकडेच जमीनीचे भूखंडवाटप असल्याने व तसे शासनाचेच आदेश असल्याने पुन्हा परवानगीची आवश्यकता नसते अशी त्यांची धारणा आहे. परंतु तशी माहिती उपलब्ध असल्यास ती त्यांना मिळाली नाही त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)  अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून ग्राम पंचायतीने सदरच्या भूखंडाचे संदर्भामध्ये प्लॉट वाटप झाल्यानंतर लाभार्थ्यांचे जे फेरफार घेण्यात आले, त्याकरीता शासनाची परवानगी घेण्यात आली असल्यास त्याबध्दलच्या आदेशाची प्रत अपीलकर्ता यांना व्यक्तीशः विनामुल्य हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून व्यक्तीशः विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३)  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९५७/२००८**

**१) श्री शामराव मोतीराम दहीकर,**
**जाणी वार्ड, सराफा लाईन, मेन रोड ब्रम्हपूरी,**
**ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,**
**चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००८ रोजी दिनांक ११.६.२००८ ला माझ्या केसेस प्रथम असताना श्री अमृत दंडवते यांची मागवून सादर केलेली केस सेतूतून आपल्या कार्यालयात कशी सादर झाली. सेतू मध्ये सुरु असलेल्या भ्रष्टाचाराला आळा बसेल काय, अशी माहिती मागितलेली दिसून येते. नागरिक सुविधा केंद्र ब्रम्हपूरी टोकन नं. F.D.O. ७४५, ७४७ दिनांक २६.४.२००७ असा दिलेला आहे. परंतु सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.६.२००८ रोजी अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या प्रती विना मुल्य देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. तसेच श्री दंडवते यांची निकड जास्त असल्यामुळे उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी यांचे कार्यालयातून देण्यात आली असावी असे कळविलेले आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १५.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी पुन्हा अर्जाची प्रती पुर्ती केली नसल्यामुळे व ती करण्यास नकार दिल्यामुळे अर्ज फेटाळण्यात आलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देताना कोणत्याही प्रकारचा विचार केलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी टोकन क्रमांक सादर केला आहे व त्या टोकन क्रमांकाप्रमाणे त्यांनी अर्ज सादर केला आहे हे सिध्द होते. सदरचा अर्ज शोधून काढण्या ऐवजी अपीलकर्ता यांचे अपील खारीज केलेले आहे, हे कोणत्याही प्रकारे विचार न करता दिलेला निर्णय दिसून येतो.

वास्तविक टोकन क्रमांक दिलेला असताना त्यांचा अर्ज शोधून काढणे आवश्यक होते. व ज्या अधिका-यांनी किंवा कर्मचा-यांनी त्यांचा अर्ज गहाळ केला असेल त्यांच्या विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु त्याही बाबत जिल्हाधिकारी कार्यालयाची अकार्यक्षमता दिसून येते. अशा प्रकारची अकार्यक्षमता जिल्हाधिकारी कार्यालयाची असल्यावर निश्चितच अर्ज गहाळ होणारच. व त्यास कार्यालय प्रमुखच जबाबदार असतात. त्यामुळे अपीलकर्ता यांनी टोकन क्रमांक दिल्यामुळे नवीन कोणत्याही प्रकारचा अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे त्यांच्या टोकन क्रमांकाप्रमाणे त्यांना अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. तसेच ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज गहाळ केलेला असेल त्याबाबत चौकशी करुन दोषी विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १२.६.२००८ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या अर्जाचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचा अर्ज ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी गहाळ केलेला असेल त्या संबंधीता विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती व प्रमाणपत्र उपलब्ध करुन न दिल्यास त्यांच्या विरुध्द रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार) ची शास्ती लादण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९५६/२००८**

**१) श्री हिराजी माधवराव काळे,**
**मेन रोड, गोंडपीपरी ग्राम पंचायत जवळ,**
**ता. गोंडपीपरी, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, गोंडपीपरी, जि.चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्रं.२०,**
**तलाठी कार्यालय, हिवरा, ता.गोंडपीपरी,**
**जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचेकडे शासनाने निर्धारित केलेले प्रमाणित प्रतीचे दर विषयक जी.आर.ची सत्यप्रत. मौजा सकमूर येथील २००५ मधील नैसर्गिक आपत्ती अंतर्गत ९-अ प्रमाणे एकुण क्षेत्र, त्याप्रमाणे अनुदान, तरी त्यांचे आराजी प्रमाणे नमूना आठ अ एकुण ४० पैकी २५ नग, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याप्रमाणे तहसिलदार गोंडपीपरी यांनी दिनांक २२.८.२००८ रोजी आपण मागितलेली नमुना ८-अ उपलब्ध असलेली आपणास यापुर्वी माहिती देण्यात आलेली आहे. बाकी नमुना ८-अ या कार्यालयात उपलब्ध नाही याची नोंद घेण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, नैसर्गिक आपत्तीबाबत जे सर्व्हेक्षण झाले होते, त्या सर्व्हेक्षणामध्ये त्यांचे नांव घेतलेले नाही व यादी मिळाली नाही. परंतु जी यादी उपलब्ध

झाली आहे त्या यादी मध्ये एकाच व्यक्तीचे तीन तीन वेळा नांवे घेण्यात आलेली असून त्यांना मदत उपलब्ध झालेली आहे. यावरुन त्यांच्यावर अन्याय झालेला असल्यामुळे सदरची माहिती मागितलेली दिसून येते.

विद्यमान जन माहिती अधिकारी हे नवीन आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, जे सर्व्हेक्षण तत्कालीन तलाठी यांनी केले होते ते चुक आहे हे अपीलकर्ता यांचे म्हणणे बरोबर आहे. मात्र, त्याकरीता तत्कालीन तलाठी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करुन त्यांची एक वेतन वाढ कायमची बंद करण्यात आलेली आहे व त्यांना शिक्षा सुध्दा करण्यात आलेली आहे. परंतु जे सर्व्हेक्षण झालेले आहे त्यामध्ये अपीलकर्ता यांचे नांव नसतील तर आता त्याबाबत कोणत्याही प्रकारची चुक दुरुस्त करता येणार नाही. व ही बाब माहितीचा अधिकार अधिनियमाचे तरतुदींमध्ये येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती जशी आहे तशी उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना जशी आहे तशी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३६१/२००८**

**१) श्री महेंद्र नामदेवराव तोटावार,**
**गुरुदेव वार्ड, चिमुर, ता.चिमुर, जि. चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी, वरोरा,**
**ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**चिमुर, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी सदरचे अपीलाचे संदर्भात त्यांचे निवेदन दिनांक २५.६.२००९ आयोगास सादर केले असून त्यात संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे व त्या माहितीमुळे माझे संपूर्ण समाधान झाले आहे. तरी ही(अपील) रद्द करण्यात यावी, असे नमूद केलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक २५.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९७०/२००८**

**१) श्रीमती जतनबाई कपूरचंदजी दप्तरी,**
**श्री दर्शनरॉय कपूरचंदजी दप्तरी,**
**स्मृती धुनिवाले मंगल कार्यालयासमोर, नागपूर रोड,**
**नालवाडी, ता.जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख,वर्धा. ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख, वर्धा. ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (राजस्व) यांचेकडे मा. उपसंचालक, भूमी अभिलेख यांचे रव्हेन्यू अपील क्रमांक ८/९७-९८/१९९९ मधील दिनांक ३०.३.१९९९ च्या आदेशान्वये पुर्नमोजणीची कार्यवाही होण्याबाबत. प्रकरणात विलंब होण्याचे कारण व कोण जबाबदार, कळवावे. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.५.२००८ रोजी मागणी केलेली माहिती तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, वर्धा कार्यालयाशी संबंधीत असल्याने आपला अर्ज तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख वर्धा यांचेकडे माहिती पुरविण्यासाठी पाठविला आहे. सदर माहिती आपणास तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख वर्धा सादर करतील, असे कळविलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००८ रोजी अपर जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे प्रथम अपील केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २९.८.२००८रोजी उपविभागीय अधिकारी, वर्धा यांनी अर्जदाराचे अर्जातील संपूर्ण माहिती या कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे सदरचा अर्ज संबंधीत कार्यालयाकडे हस्तांतर करण्यात आला आहे. तसेच मुळ प्रकरण अधीक्षक, भूमी अभिलेख

// २ //

कार्यालयाला दिनांक २९.४.२००६ रोजी परत केले आहे. सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी, भूमी अभिलेख, वर्धा हे असून या अपीलाशी कार्यालयाचा संबंध नाही, असे कळविलेले दिसून येते. व प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते.

३. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.९.२००८ रोजी देण्यात आला असून त्यात संपूर्ण प्रकरणाचे विवेचन केलेले दिसून येते. व भूमी अभिलेख वर्धा यांनी अपीलकर्ता यांना सदर निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक १६.१०.२००८ रोजी अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी त्यांच्या मागणीची पुर्तता करण्यासाठी मंजूर अभिन्यासाची रिव्हाईज प्रत तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे प्रकरण निकाली काढण्यास सहकार्य करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या रेव्हेन्यू अपील क्रमांक ८/९७-९८/१९९९९ मध्ये दिनांक ३०.३.१९९९ पुर्नमोजणीचे आदेश केले होते. व त्यानंतर सुध्दा सदरचे अपीलामध्ये तारीखा दिल्या जात आहे व पुर्नमोजणी मात्र केली जात नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, पुर्नमोजणी करण्याकरीता दोनही लेआउटच्या प्रतीची गरज आहे. त्याप्रमाणे एक लेआऊटची प्रत त्यांचेकडे प्राप्त झाली आहे. परंतु अपीलकर्ता स्वतः त्यांच्या लेआऊटची प्रत मात्र जन माहिती अधिकारी यांचेकडे देत नाही व त्यामुळे सदरची मोजणी होऊ शकत नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आतापर्यंत त्यांनी दोन वेळा लेआऊटची प्रत दिलेली आहे. परंतु सदरच्या लेआऊटची प्रत ही नस्तीमध्ये उपलब्ध नाही असे अधीक्षक भूमी अभिलेख यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना अपेक्षित असे जे त्यांचे स्वतःचे प्रकरण आहे त्या प्रकरणात अंतिम निर्णय होत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. यापूढे त्यांनी सहकार्य केल्यास प्रकरण लवकर निकाली काढण्यात येईल. परंतु सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या निर्णयाची बाब माहिती अधिकारात येत नाही. त्यामुळे त्याबाबतचा विचार करता येत नाही. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली होती ती त्यांना उपलब्ध झालेली आहे व त्या माहितीवरुनच त्यांनी जबाबदार कोण आहे वगैरे बाबतची माहिती घेवून योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहील.

५. परंतु अपीलकर्ता यांच्या अर्जाचे प्रमाणे विहित मुदतीत योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकरी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २०.५.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी विहित मुदतीत योग्य माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २५.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८८/२००८**
**अपील क्रमांक ९८९/२००८**
**अपील क्रमांक ९९०/२००८**

**१) श्री विरेन्द्र चंपालाल संकलेचा,**
**रा.गणपती वार्ड, मु.पो. आर्वी,**
**ता.आर्वी, जिल्हा वर्धा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**
**निम्न वर्धा पुर्नवर्सन उपविभाग क्रं.२,**
**आर्वी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००८ व दिनांक ८.११.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये एकुण तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. परंतु, अपीलकर्ता यांनी आयोगास त्यांचे पत्र दिनांक १७.६.२००९ अन्वये उपरोक्त तीनही अपीलांची माहिती प्राप्त झाल्यामुळे अपील परत घेतो (मागे घेतो) असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे तीनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रं. **९८८/२००८, अपील क्रमांक ९८९/२००८ व अपील क्रमांक ९९०/२००८ खारीज करण्यात येत आहेत.**

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८६/२००८**

**१) श्री भरत झिंगरुजी राऊत,**
**मु.पो. पाहर्णी, ता. नागभीड, जि. चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**महा.राज्य विज वितरण कंपनी मर्या.(ग्रामीण विभाग)**
**नागभीड, ता. नागभीड, जि. चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**महा.राज्य विज वितरण कंपनी मर्या.(ग्रामीण विभाग)**
**नागभीड, ता. नागभीड, जि. चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. परंतु, अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगास त्यांचे निवेदन दिनांक ७.६.२००९ अन्वये माहिती प्राप्त झाली असल्यामुळे समाधान झाले. हयाकरीता अपील मागे घेत आहे, असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६९२/२००८**

**१) श्री शेख सलीम शेख अकबर,**
**इस्माईलपुरा, कामठी, ता. कामठी, जि.नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, कामठी. ता.कामठी, जि. नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी(शिक्षण विभाग),**
**नगर परिषद, कामठी, ता. कामठी, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००८ रोजी शासकिय जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांचेकडे एकुण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.३.२००८ रोजी एकुण १३ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.७.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (शिक्षण) यांनी विहित वेळेत माहिती पुरविली असल्यामुळे व ती बरोबर असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य नाही व दिशाभूल करणारी असून अपूर्ण आहे. त्याबाबत विचारलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरची माहिती ही प्रत्यक्षात कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असेलच असे नाही व ती नियमामध्ये उपलब्ध असल्यामुळे

नियमाची माहिती अपीलकर्ता यांनी घ्यावी हे उत्तर बरोबर आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे जिल्हाधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाल्यावरच त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खरीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२२/२००८**

**१) श्री साहेबराव शामराव फुले,**
**द्वारा प्रो.दुर्गामाता कृषि सेवा केंद्र, जलालखेडा,**
**ता. नरखेड, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.,**
**आग्याराम देवी पेट्रोल पंपजवळ, गणेशपेठ,**
**नागपूर-४४००१८.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.९.२००० रोजी जनरल मॅनेजर, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ लि. मुंबई शाखा ऑफिस, नागपूर यांचेकडे ट्रान्सफर केलेल्या मालाचे क्रेडीट मेमो व ज्याला माल ट्रान्सफर झाला त्याला MAIDC कडून दिलेल्या बिलाची झेरॉक्स कॅापी साल १९९९ ते २००१ मधील १८.१८.९० वगैरे.. खरेदी बील झेरॅाक्स कॅापी वगैरे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.१०.२००७ रोजी आपला अर्ज हा माहितीचा अधिकार हा कायदा अंमलात येण्यापुर्वी चा म्हणजे दिनांक १२.९.२००० चा आहे. सदर तारखेस हा कायदा अस्तीत्वात नव्हता, तरी कृपया नोंद घ्यावी. तसेच सदरील माहिती आपण आपणा विरुध्द असलेल्या न्यायालयीन प्रकरण क्रमांक ६०५/०४ च्या अनुषंगाने तृतीय श्रेणी न्यायाधिश यांचेकडे मागविली होती. तथापि न्यायाधिशांनी आपला अर्ज दिनांक ५.७.२००६ रोजी राखीव/नामंजूर केलेला असल्यामुळे तसेच प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सदर माहिती देता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी २२.१०.२००६ रोजी प्रथम

अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही असे आयोगास सांगितले व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, यासोबत विद्यमान न्यायालयाने दिलेल्या दिनांक ५.७.२००६ च्या निर्णयाची छायांकित प्रत जोडली आहे. सदरच्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येईल की, वरील अर्जाद्वारे मागीतलेली माहिती व त्यांनी मागविलेली माहितीचा अधिकार अंतर्गत असलेली माहिती एकच असल्यामुळे व न्यायालयाने अर्ज नामंजूर केलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी आपणाकडे सादर केलेल्या अपील अर्जाबाबत योग्य तो निर्णय द्यावा, अशी विनंती केली आहे.

४. अपीलकर्ता यांनी वरिष्ठ स्तर न्यायाधिशांकडे प्रकरण क्रमांक ६०५/०४ च्या संदर्भात दाखल केलेल्या अर्जाच्या संदर्भात पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता, It has been submitted that the bills on which this suit claim is based are already on record, व त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांनी न्यायालयातील अर्ज हा फेटाळण्यात आलेला असून सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे पुन्हा तीच माहिती मागण्याचा प्रयत्न केलेला आहे. सदरची माहिती उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी व नसल्यास तसेच कळवावे. त्याकरीता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी व नसल्यास तसे स्पष्टपणे कळविण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९९३/२००८**

**१) श्री मधुकर नारायण टिकले,**
**स्वावलंबी नगर (नगरीनाबाग) चंद्रपूर,**
**ता.जि. चंद्रपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(सा.प्र.)**
**नगर पालिका प्रशासन, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, गडचिरोली. ता.जि. गडचिरोली. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद, गडचिरोली यांचेकडे साप्ताहिक मानव संस्कृती दिनांक १६.११.९४ च्या जाहिरातीप्रमाणे फेरफारच्या कार्यवाहीच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७ मे २००७ रोजी माहिती अधिकारी, नगर परिषद, गडचिरोली यांनी श्री एस.डी. भांडेकर, प्र.कर निरीक्षक, नगर परिषद गडचिरोली यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ११.५.२००७ रोजी प्र.कर निरीक्षक यांनी माहिती अधिकारी, नगर परिषद यांना माहिती उपलब्ध करुन दिली व त्याप्रमाणे दिनांक १८.५.२००७ रोजी कार्यालयाकडून फाईल व जूनी कागदपत्रांचा शोध घेतला असता माहिती उपलब्ध नाही असे दिसून येते व त्यामुळे माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.७.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीस आवश्यक असलेले अभिलेख विनामुल्य दाखविण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात यावे. अपीलार्थी कडून अभिलेख्यांची तपासणी केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांकरीता माहिती अधिकारी नगर परिषद गडचिरोली यांचेकडे अर्ज सादर करावा व अर्ज प्राप्त झाल्यानंतर ७

दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्वसाधारण कराची पावती व त्यांना नगर परिषदेने दिनांक ५.१.९५ रोजी दिलेली कर पुर्तीची नोटीस आयोगाचे निदर्शनास आणली. व असे प्रतिपादन केले की, ज्याअर्थी ते कर भरत आहे त्याअर्थी त्यांचे नांवे फेरफार होणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले नाही व श्री यादव नारायण टिकले यांनी सहपत्र दिलेले होते, त्या सहपत्राची प्रत उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, साप्ताहिक मानव संस्कृती या वृत्तपत्रात दिनांक १६.११.९४ ला जाहिरात देण्यात आली होती. परंतु अर्जदाराने मालकी हक्क दर्शवून कोणतीही कागदपत्रे सादर केली नाही. त्यामुळे अर्जदाराचे नांवे भूखंड फेरफार करण्यात आला नाही. सदर भूखंड श्री यादव नारायण टिकले यांचे नांवे नगर परिषदेचे रेकार्डला यापुर्वीच दर्ज आहे व दोघांची नांवे आहे. तसेच अर्जदाराच्या मागणी नुसार नगर परिषदेच्या सर्व जून्या कागदपत्रांचा शोध घेतला असता अर्जदाराने मागणी केलेला स्टॅम्प पेपर आढळून आले नाही. त्यामुळे ती प्रत अर्जदारास देण्यात आली नाही. अर्जदाराचे भाऊ श्री यादव टिकले यांना विचारणा केली असता, कोणताही स्टॅाम्प पेपर संमती पत्र लिहून दिलेले नाही, असे त्यांनी सांगितले व अर्जदारास दिनांक १८ मे, २००७ ला तसे कळविण्यात आले आहे. अर्जदारानी दिनांक २६.११.२००५ च्या बयानाची प्रत पुरवावी असे नमूद केले आहे. परंतु नगर परिषद गडचिरोली कार्यालयातील रेकार्डचा शोध घेतला असता अशा प्रकारची बयानाची प्रत आढळून आली नाही. तसेच मा. उपआयुक्त, नगर पालिका प्रशासन, नागपूर यांनी दिनांक १६.७.२००७ ला प्रथम अपीलामध्ये पारित केलेल्या आदेशाप्रमाणे नगर परिषद, गडचिरोली कार्यालयातील संपूर्ण रेकार्ड अपीलकर्त्यास विनामुल्य दाखविण्यात आला व आवश्यक असेल ती कागदपत्रे अर्जदारास विनामुल्य देण्याबाबत सांगितले. त्यानुसार त्यांनी सर्व रेकार्ड पाहिला होता. नगर परिषद क्षेत्रातील प्रत्येक घरे व जमीनी यावर मालमत्ता कर घर टॅक्स आकारणी करुन वसुल केल्या जाते. त्यानुसार कर वसुल करण्यात आला. त्याचा फेर फारशी काहीही संबंध नाही, व तसे अर्जदारास कळविण्यात आलेले दिसून येते. वरील भूखंडावर श्री यादव टिकले यांनी अवैध बांधकाम केले आहे असे जे अर्जात नमुद केलेले आहे ते खोटे आहे. सदर भूखंडावर फक्त फाउंडेशनचे काम केले होते. त्यांना त्वरीत नोटीस

देण्यात आला. त्यामुळे त्यांनी बांधकाम केलेले नाही. व बांधकामास मंजूर दिलेली नाही. त्यांनी बांधकाम केलेले नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. सदर वाद स्थावर मालमत्तेसंबंधी दिवणी स्वरुपाचा असल्याने व दोघा भावामध्ये हा वाद असल्याने त्यांनी हा वाद सक्षम दिवाणी न्यायालयातून सोडवावयास पाहिजे असे अर्जदारास यापुर्वीच कळविण्यात आले आहे. यावरुन अपील खारीज करण्यासाठी मुख्याधिकारी नगर परिषद, गडचिरोली यांनी विनंती केली आहे.

४. अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता व एकुणच मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी आयोगाकडे दिलेले उत्तर याची तपासणी केली असता असे दिसून येते की, जी कागदपत्रे उपलब्ध नाही ती कागदपत्रे उपलब्ध करुन देणे हे शक्य नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. तसेच कागदपत्रे गहाळ झाल्याबध्दल अपीलकर्ता यांनी पोलस स्टेशनमध्ये तक्रार करणे योग्य राहील. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५७०/२००८**

**१) श्री मुरलीधर सुरजमल अग्रवाल,**
**मारवाडी मोहल्ला, सराफा लाईन वर्धा,**
**ता.जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)**
**जिल्हा परिषद, वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग,**
**जिल्हा परिषद, वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे १९९६-९७ या कालावधीतील इ.बी.सी. कन्सेशन बध्दल ११ मुद्यांच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २२.९.२००८ रोजी देण्यात आला आहे. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ते प्रत्येक वर्षी अनुदानाकरीता प्रस्ताव पाठवितात. परंतु अनुदान प्राप्त होत नाही त्यामुळे सदरच्या देयकाची पुर्तता करता येत नाही. आतातरी त्यांचेकडे सदरची योजना नाही व त्यामुळे सदर योजना ही सह. संचालक यांचे स्तरावर राबविण्यात येत असल्यामुळे त्यांचे सदरचे देयक शिक्षण संचालक (माध्यमिक) यांचेकडे सुध्दा पाठविण्यात आले जेणेकरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देता येईल.

यावरुन ज्यावेळेस अनुदान प्राप्त होईल त्यावेळेस अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्युाळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अनुदान प्राप्त झाल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६८८/२००८**

**१) श्री धनराज महादेव उमरेडकर,**
**३०३, जगत टॉवर्स, टिळकनगर,**
**नागपूर- ४४००१०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक(प्रादेशिक)**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१,**
**२८ क्वीन्स गार्डन, पुणे- ४११००१.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१,**
**२८ क्वीन्स गार्डन, पुणे- ४११००१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. मागील तारखेस उत्तरवादी हजर होते व त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००८ रोजी माहिती अधिकारी, विकास विभाग, मंत्रालय (विस्तार) मुंबई-३२ यांचेकडे आदिवासी विकास विभागाच्या शा.नि.क्रं.सीबीसी-१६८४(३०९) क-११ दिनांक २४ एप्रिल, १९८५ च्या सहपत्रा मधील रकाना ३ मध्ये शेवटच्या परिच्छेदामध्ये हलबा जमातीत विणकाम किंवा बुनाईकाम निशिध्द मानले जाते, असे नमूद केले आहे. ज्या शिफारशीच्या आधारे ही बाब नमुद करण्यांत आली आहे त्या शिफारस पत्राची प्रत व तशी शिफारस ज्या पुरातन दस्ताऐवजाच्या आधारे करण्यांत आलेली आहे त्या दस्ताऐवजाची प्रत अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.४.२००८ रोजी मागितलेली माहिती आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेशी संबंधीत असल्यामुळे आपला अर्ज आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २.६.२००८ रोजी सदरची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(३) अन्वये देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे

समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रं. सीबीसी-१६८४(३०९) क-११ दिनांक २४ एप्रिल, १९८५ चे सहपत्राची माहिती अपीलकर्ता यांना देण्यात आलेली असल्यामुळे सदरच्या शासन निर्णयाकरीता जो आधार घेतलेला आहे त्याबध्दलची माहिती त्यांना देण्यात आली नाही. परंतु अपीलकर्ता यांना जे सहपत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तोच सदरच्या शासन निर्णयाचा आधार आहे असे दिसून येते. असे असले तरी त्याबाबत आणखी जर आधार असेल तर तो उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्यास अधिनियमाचे कलम ८(३) ची बाधा येऊ शकत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रं. सीबीसी-१६८४(३०९) क-११ दिनांक २४ एप्रिल, १९८५ हा शासन निर्णय पारित करण्याकरीता जो आधार घेण्यात आलेला आहे त्याबाबतची उपलब्ध असलेली टिपणीची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची टिपणी मंत्रालयीन विभागाकडे असल्यास ती त्यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६९३/२००८**

**१) श्रीमती डोमनबाई रघुनाथ उके,**
**बुध्द नगर, कलमना रोड, जयभीम चौक,**
**कामठी ता. कामठी, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद कामठी, ता. कामठी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक,**
**नगर परिषद, कामठी, ता. कामठी, जि. नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कामठी यांचेकडे घर क्रं.NL/१७३/२२ वर फुलन धर्मदास उके तर्फे डोमनबाई रघुनाथ उके हीच्या घराचा टॅक्स कोणत्या वर्षी पासून लागू केला आहे. फुलन धर्मदास उके हिच्या अगोदर घर कोणाच्या नांवाने होता याची संपूर्ण माहिती व सत्यप्रती देण्यात यावी यासह पुढे आणखी ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.५.२००८ रोजी कर अधीक्षक, नगर परिषद कामठी यांनी अ.क्रं. १ ते ६ पर्यंतची माहिी उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा जन माहिती अधिकारी हजर नसल्यामुळे देण्यात आलेला दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही नगर परिषद कामठी यांचे कार्यालयात उपलब्ध नाही व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता आली नाही. त्याकरीता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाच्या सुनावणीची दिनांक

५.६.२००८ व १३.६.२००८ रोजी नोटीस काढलेली दिसून येते. व सदरची नोटीस अपीलकर्ता यांना मिळालेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी हजर न झाल्यामुळे अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही, असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी अर्ज करण्यापुर्वी सुध्दा दिनांक १२.३.२००८ रोजी कर अधीक्षक, नगर परिषद यांनी अपीलकर्त्यास पत्र क्रमांक १०७४, दिनांक ३१.१.२००८ च्या अनुषंगाने, मागणी यह श्रीमती फुलन धर्मदास उके इनके नामपर दर्ज है. आप मकान पर से नाम खारीज करके अपना नाम पर दर्ज करने के लिए उचित कागजात पेश कर अर्ज किया है. परंतु श्रीमती फुलन धर्मदास उके के संबंधित कोयी भी कागदपत्र पेश नही की है. अतः आप श्रीमती फुलन धर्मदास उके के संबंधित कागदपत्र कर विभाग मे सादर करे अन्यथा उपरोक्त मकान पर नाम दाखिल खारिज की कार्यवाही नही की जायगी, असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी सदरचा माहितीचा अर्ज केलेला दिसून येतो.

असे असले तरी जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा संपूर्ण कागदपत्रांचा शोध घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पुन्हा शोध घेवून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६५५/२००८**

**१) श्री चंद्रकांत रामभाऊ चिमोटे,**
**५२५-गुरुमाऊली, न्यू नंदनवन ले आऊट,**
**नागपूर-९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था धनवटे चेम्बर्स (अनेक्स),**
**सिताबर्डी, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था नागपूर शहर-१,**
**१८५ आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॉट चौक, उमरेड रोड,**
**नागपूर-९.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे ११ नोव्हेंबर २००१ च्या आमसभेच्या ठरावानुसार सन १९९६-९७, १९९७-९८, १९९८-९९ या आर्थिक वर्षाचे स्टॅच्यूटरी ऑडीट न करण्याबाबत व अफरातफर करण्याबाबत दिनांक ४.४.२००८ ला तक्रार केली होती त्याबाबतची माहिती अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.७.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक १५.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.८.२००८ रोजी देण्यात आला असून ज्याअर्थी, उपनिबंधक सहकारी संस्था, शहर-१ यांनी दिनांक २२.२.२००८ चे पत्रान्वये सदर संस्थेचे मागील १९९९ ते २००६ वर्षांचे अंकेक्षण करण्याबाबत विनंती केलेली आहे व त्यावर या कार्यालयाचे आदेश दिनांक ८.७.२००८ अन्वये फेरअंकेक्षणाचे आदेश झालेले असून तक्रारीवर वेगळी चौकशी करण्याची आवश्यकता नसल्यामुळे सदर तक्रारीत नमुद केलेले मुद्ये अंकेक्षण अहवालात निदर्शनास आल्यास दोषी

विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल व आपणास तसे कळविण्यात येईल, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सन १९९६-९७, १९९८-९९ या वर्षाचे संस्थेचे ऑडीट झाले नाही याबध्दलची माहिती मागितलेली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी १९९९ ची माहिती दिलेली आहे. व त्यामुळे सन १९९६-९९ या कालावधीची माहिती अप्राप्त आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सन १९९६-९९ या कालावधीसाठी सुध्दा आदेश काढण्यात आले होते. परंतु ते प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर काढण्यात आलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांना सदरच्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.६.२००८ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात सन १९९६-९९ या कालावधीतील संस्थेला ऑडीटच्या संदर्भात काढलेल्या आदेशाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४०२/२००८**

**१) सौ. वंदना रामदास पुडके,**
**श्री शिवाजी हायस्कुलच्या जवळ, श्री शिवाजी वार्ड क्रं.९,**
**राजूरा ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर -४४२९०५. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, नगर परिषद, राजूरा**
**ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी दिनांक २०.४.२००९ रोजी हजर होते व कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद, राजूरा यांचेकडे नगर परिषद आदेश क्रं. एस.एम.सी.आर./१९२७/२००७, दिनांक १८.७.२००७ नुसार बांधकाम परवानगी आदेशांत समाविष्ठ १२ अटी पैकी किती अटींचे पालन बांधकाम करतांना करण्यात आले, माहिती देण्यात यावी यासह ५ मुद्यांमध्ये श्री रामकिसन छेदीलाल वर्मा यांचे घर नियमबाहय बांधकामाबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.४.२००८ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या नोटीस मात्र वेळोवेळी काढण्यात आलेल्या दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीच्या संदर्भात मुख्याधिकारी नगर परिषद यांनी दिनांक १४.१.२००८ व दिनांक ३१.१.२००८ रोजी रामकिसन

// २ //

छेदीलाल वर्मा यांना नोटीस दिलेल्या दिसून येतात. तत्पुर्वी अपीलकर्ता यांना दिनांक १८.१.२००८ रोजी रामकिसन छेदीलाल वर्मा व त्यापुर्वीही दिनांक १६.१.२००८ रोजी सुनावणीस बोलाविण्याचे पत्र दिलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांच्या तक्रारीवर मुख्याधिकारी नगरपरिषद, राजूरा यांनी कार्यवाही केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे सदरच्या कार्यवाहीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मिळतात. परंतु कोणत्याही प्रकारची कारवाई करुन मिळत नाही. व त्यामुळे अवैध बांधकामाच्या संदर्भात कारवाई करावी याबाबत नगर परिषदेला कोणत्याही प्रकारचे आदेश देता येत नाही. वास्तविक नगर परिषदने वैधानिक कार्यवाही केली नाही व ती कार्यवाही होत नसल्यास अपीलकर्ता यांनी मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल केलेली आहेच. त्यामध्ये त्यांना नगर परिषदेकडील अपूर्ण कार्यवाही बाबत मा. न्यायालयाचे निदर्शनास आणता येईल. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 486/2008.**

श्री सतीश रामकृष्णा धाबेकर
व्हि.एच.बी. क्वार्टर क्र. 5/84
छोटा ताजबागजवळ, रघुजीनगर नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एम. कडू
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास
नागपूर
2) श्रीमती सुनिता अलोने
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक
नगर रचना विभाग
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.6.2007 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे 1995–97 या कालावधीतील ख.नं.78/1 च्या संदर्भामध्ये नागपूर सुधार प्रन्यासच्या अंतर्गत येते किंवा ना हरकत प्रमाणपत्र विक्री करीता आवश्यक आहे काय तसेच एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 30.6.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. पुन्हा दि. 27.7.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 21.8.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12.9.200 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दि. 17.9.2007 पर्यंत तीन्ही मुद्याची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 17.9.2007 रोजी तीन्ही मुद्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की मुद्या क्र. 2 मध्ये 572 किंवा 1900 अभिन्यास नियमीतीकरण योजनेअंतर्गत समाविष्ट आहे किंवा नाही याबाबतची माहिती दिलेली नाही. मुद्या क्र.3 ख.क्र.78/1 मौजा दिघोरी विशिष्ट क्र. खसरा नमुद असूनसुध्दा हा भुखंड 1995–97 ला महानगर पालिका हद्यीत होता किंवा नाही व त्याप्रमाणे नागपूर सुधार प्रन्यास ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते किंवा नाही याचा उल्लेख केला नाही. जर आवश्यक होते तर त्यावेळी भुखंडाकरीता किती अर्जदाराला ना हरकत प्रमाणपत्र दिले याचा खुलासा केला नाही असा युक्तीवाद केला व निवेदन दिले आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या दि. 4.6.2007 च्या अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता निवेदनात दिल्याप्रमाणे स्पष्ट माहिती त्यांनी त्यावेळेस मागीतली नाही व त्यामुळे मोघम माहितीचे उत्तर हे मोघमच येते याची जाणीव

अपीलकर्ता यानी ठेवणे आवश्यक आहे. प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपीलात नवीन मुद्दे उपस्थित करता येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या निवेदनाप्रमाणे अधिक स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी वरील विवेचनात नमुद केलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 496/2008.**

श्री सतीश रामकृष्णा धाबेकर

व्हि.एच.बी. क्वार्टर क्र. 5/84

छोटा ताजबागजवळ, रघुजीनगर नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अधिक्षक

भूमी अभिलेख नागपूर

2) श्री जे. एम. बेंडे

जन माहिती अधिकारी तथा

नगर भूमापन अधिकारी क्र. 2

नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.5.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी कार्यालय क्र. 2 आपल्या कार्यालयात (कार्यक्षेत्रात) नोंद असलेल्या मालमत्ते (प्रापर्टी) चे मालकाचे मृत्यु झाल्यास नामांतरण करण्यासाठीची कारवाईच्या संबंधातील परिपत्रक/आदेशाची छायांकीत प्रत. व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.10.2007 रोजी नगर भूमापन अधिकारी यांनी मालमत्ता मालकाचा मृत्यु झाल्याने भारतीय वारसा हक्क कायदा 1925, हिन्दु वारसा कायदा, मुस्लीम कायदा तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 149 अन्वये वारसाबाबत नामांतरणाची कार्यवाही केली जाते. वरील कायदयाची पुस्तके शासकीय ग्रंथागार यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध

झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 12.2.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.2.2008 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला दिसून येतो. व अधिक स्पष्टीकरण दिलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये विशिष्ट अशा धर्माच्या संदर्भामध्ये उल्लेख नसल्यामुळे त्यांना वारसा हक्काच्या संदर्भात प्रत्येक धर्माच्या संदर्भामध्ये जे कायदे उपलब्ध आहेत त्या कायदयातून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 4 मध्ये सुध्दा पोटकलम 4 मधील तरतुदीप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते. व ते योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अन्यथा जी माहिती शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेली आहे तीच पुन्हा पुन्हा मागणे व ती पुरविणे हा त्या शासकीय कार्यालयाचा कालापव्यय होईल व त्यामुळे जे अधिनियम प्रसिध्द होतात ते जनतेच्या माहितीकरीताच प्रसिध्द केले जातात व त्याचे वाचन न करता किंवा त्याची माहिती न घेता माहिती अधिका–याकडे माहिती मागणे हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. तरीही अपीलकर्ता यांनी वारसा हक्काच्या संदर्भात अधिनियमाची नावे कळविलेली आहे व त्यातून त्यांनी माहिती उपलब्ध करुन घावी हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास काढण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या दि. 18.10.2007 च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 491/2008.**

श्री रमेश बोंदीजी संतोषवार
शेन्डे प्लॉट, शिवमंदीर जवळ, रामनगर
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. डी. पेंद्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक
भूमी अभिलेख चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री गजभिये
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून अधिक्षक भूमी अभिलेख चंद्रपूर यांचे कार्यालयात एकुण 11 मुद्यांवर अर्जदाराच्या मालकीची आणि ताब्यातील शेतजमीनीच्या क्षेत्रफळात पुनर्मोजणी नंतर बदल करण्यात आल्यामुळे क्षेत्र कमी दर्शविले असल्यामुळे अर्जदाराने अभिलेख दुरुस्तीसाठी अधिक्षक भूमी अभिलेख चंद्रपूर यांचेकडे दि. 13.3.2002 रोजी अर्ज सादर केला. पुनर्मोजणी फी रु. 500/– चा भरणा केला परंतु अभिलेख दुरुस्तीचा आदेश करण्यात आला नाही. त्याबाबतची माहिती तपशिलात मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.2.2008 रोजी पत्रातील उत्तर व खुलासा हा अर्जदाराची दिशाभूल करणारा असल्यामुळे प्रथम अपील दि. 26.3.2008 रोजी दाखल करण्यात आलेले दिसून येते. सदर प्रथम अपीलावर कोणतीही कार्यवाही न करता दिनांक 20.5.2008 चे टिपणीद्वारे सुनावणी समझोत्याचे पालन केले नाही व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती परिपूर्ण दिली नाही. दिनांक 20.5.2008 चे निर्णयाचे पालन केले नाही एवढेच कारण द्वितीय अपील मेमोमध्ये दिले आहे. दि. 20.5.2008 रोजी अपीलार्थी श्री रमेश बोंदीजी संतोषवार यांचे म्हणणे एकुन घेवून त्यांना प्रस्तावातील दुरुस्ती प्रस्ताव उपसंचालक भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांचेकडे पाठविण्याचा प्रस्ताव समजावून दिले. प्रकरणातील त्यांना आवश्यक पत्रके देण्याचे मान्य केले. दुरुस्ती प्रस्ताव 1 महिन्याचे आंत व याच निर्णयाची अंमलबजावणी दिली नाही असे आयोगापुढे त्यांनी सांगीतले. अपीलकर्ता यांनी दि. 22.5.2006 रोजी अधिक्षक भूमी अभिलेख चंद्रपूर यांनी एकुण 10 मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नाही व दुरुस्ती प्रस्ताव सादर न करताच त्यांनी त्यांचेकडून फी सुध्दा भरुन घेतलेली आहे. दि. 4.12.2008 रोजी अपीलकर्ता यांनी बयाण दिलेले आहे. त्या बयाणमध्ये मौजा सावली येथील स.नं. 648/1 व 649/2 ची

एकत्रीकरण योजनेच्या नकाशामध्ये नकाशा चुकीचा दाखविलेला आहे. माझी ताबा वहीवाट व नकाशात तफावत आहे. माझे वहीवाटीप्रमाणे एकत्रीकरण नकाशात दुरुस्ती करुन मिळणेत यावे यावर माझे काहीच उजर तक्रार नाही तरी त्वरीत नकाशा दुरुस्त करुन देणेस विनंती आहे. अपीलकर्ता यांनी दि. 17.5.2007 रोजीसुध्दा माहितीचे अर्ज सादर केलेले दिसून येतात. व सदरचे अर्ज हे तालुका निरीक्षक भूमी अभिलेख या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडे हस्तांतर केलेले दिसून येतात. परंतु सदरचे अर्जाचा दि. 2.2.2008 चे अर्जाशी काहीही संबंध दिसून येत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे किंवा जे माहितीचे उत्तर दिलेले आहे ते दि. 2.2.2008 चे अर्जाशी संबंधीत नाही व त्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा त्यांनी दाखल केलेला नाही. दि. 8.4.2008 अन्वये नकाशा दुरुस्ती आदेश करण्यात आलेला आहे असा जरी खुलासा दाखल केलेला असला तरी त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे दि. 20.5.2008 रोजी दिलेल्या अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये पालन करुन अपीलकर्ता यांना दि. 2.2.2008 चे अर्जात मागितलेली मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व अपीलकर्ता यांनी जो फीचा भरणा केलेला आहे तो फी चा भरणा अपीलकर्ता यांना परत करणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि. 2.2.2008 च्या अर्जाप्रमाणे माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत तसेच दि. 20.5.2008 च्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करुन विनामुल्य उपलब्ध करुन

देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता यांचेकडून जो फी चा भरणा घेतलेला आहे तो त्यांना परत करण्यात यावा.

3) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयागाकडून आलेले नोटिस व कागदपत्रे वाचावी जेणेकरुन अपीलाच्या सुनावणीस योग्य ती माहिती आयोगाचे निदर्शनास आणता येईल.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **उपसंचालक भूमी अभिलेख नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 487/2008.**

श्री सुधाकर पांडुरंग लामपुसे

52 बाजीप्रभू नगर नागपूर 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एम. कडू

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अधिक्षक अभियंता

नागपूर सुधार प्रन्यास

नागपूर

2) श्री आर. के. पिंपळे

जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता

नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे बाजीप्रभू नगर मधिल नागरीकांच्या उपयोगासाठी ना.सु.प्र.ने सार्वजनिक उपयोगाची जागा विकसित व उपलबध करुन देणे दि. 18.4.85 रोजी ना.सु.प्र.ने उज्वल हाऊसिंग सोसायटीशी केलेल्या करारानंतर आजपर्यंत एकुण 9 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. पूर्ण माहिती विहित मुदतीत न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 27.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी

दि. 20.6.2008 रोजी झाल्या नंतर दि. 30.6.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय झालेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की दि.3.11.2007 रोजी माहिती उपलब्ध झाली परंतु ती पूर्ण माहिती दिली नाही. व त्यानंतर दि.19.7.08 रोजी 9 महिने 16 दिवस विलंबाने जी माहिती दिली ती त्यात मुद्या क्र. 1 ची माहिती दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि.3.11.2007 रोजी एकुण 9 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती वेगवेगळया विभागाची असल्यामुळे संकलीत करण्याकरीता कार्यकारी अभियंता (पश्चिम) यांचेकडे दि. 9.11.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिले. दि. 1.11.2007 रोजी स्मरणपत्र दिले. दिनांक 103.2008 रोजी सुध्दा स्मरणपत्र दिले. परंतु सदरची माहिती दि. 17.7.2008 रोजी उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 19.7.2008 रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यात मुद्या क्र. 1 च्या संदर्भात सुध्दा स्पष्टीकरण दिलेले आहे. त्या स्पष्टीकरणामध्ये या 18 भुखंडापैकी भुखंड क्र. 196 वर संस्थेने सार्वजनिक उपयोगाच्या बांधकामाबाबत त्यात प्रश्न केले होते याबाबत या कार्यालयाने अभिलेखात माहिती उपलब्ध नाही याबाबतचे स्पष्टीकरण देतांना जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सन 2002 मध्ये हया सर्व नस्त्या महानगर पालीकेकडे वर्ग करण्यात आलेले आहे व त्यामुळे त्याबाबत महानगर पालीकेनी काय कार्यवाही केली ही बाब ना.सु.प्र.चे जन माहिती अधिकारी यांना सांगता येणार नाही व त्यामुळे त्यांचे नस्तीमध्ये ती माहिती उपलब्ध नाही तसे त्यांना कळविलेले आहे. विलंबाच्या संदर्भामध्ये माहिती मागतांना अधिनियमाच्या कलम 7 प्रमाणे ज्या माहिती अधिका–याकडे जी माहिती उपलब्ध असेल तीच माहिती त्यांचेकडे मागीतल्यास ती 30 दिवसात उपलब्ध होवू शकते. परंतु एकाच अर्जात अनेक माहिती अधिका–याकडील माहिती मागीतल्यास त्यास विलंब लागण्याची शक्यता जास्त असते. व त्याबाबत अधिनियमाचे कलम 5 व 6 हे अतिशय सुस्पष्ट आहे. त्यामुळे विलंबाचा विचार करता येत नाही. मा. अपीलकर्ता यांच्या मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये अधिक स्पष्टीकरण उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. व त्याबाबतही जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांच्या नस्त्यामध्ये जी माहिती उपलब्ध नाही

त्याबाबचे अधिक स्पष्टीकरण देता येणार नाही. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नसल्यास अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होवून बाजीप्रभू नगरातील संबंधीत भुखंडाच्या संबंधात ज्या नस्त्या उपलब्ध असतील त्या नस्तीची पाहणी करुन त्यांना त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती त्यांना उपलब्ध करुन घेता येतील व त्यांचे समाधान करुन घेता येईल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी वेळ व तारीख जन माहिती अधिकारी यांना कळवून संबंधीत नस्तीचे अवलोकन करुन आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्या.

2) अपीलकर्ता यांनी तारीख व वेळ कळविल्यावर जन माहिती अधिकारी यांनी स्वतः कार्यालयीन कर्मचा–याच्या उपस्थित अपीलकर्ता यांना बाजीप्रभुनगर मधील संबंधीत भुखंडाच्या संदर्भातील विशेषतः मुद्या क्र. 1 च्या संदर्भात नस्ती पाहणीसाठी अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या व त्यातून कागदपत्रे ही त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व लेखी पोच घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 928/2008.**

श्री उज्वलकुमार वासुदेवराव बागडे
सावनेर वार्ड क्र. 17, ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कृषी उत्पन्न बाजार समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री अरविंद भाऊराव दाते
जन माहिती अधिकारी तथा
सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती सावनेर यांचेकडे 1. सन 2004, 2005, 2006, 2007 व 2008 चा अंतिम लेखा परिक्षण अहवालाची प्रत मिळणे.

2. कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाच्या मासीक व वार्षिक सभेत सतत अनुपस्थित राहणा–या संचालकाची नावे व कालावधी. सन 2004 ते 2008 या कालावधीतील माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 22.10.2008 रोजी प्रथम अपील हे पुन्हा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती सावनेर यांचेकडेच दाखल केलेले दिसून येते. त्याकरीताच अपीलकर्ता यांनी दि. 8.9.2008 रोजी अपीलकर्ता यांना अपीलीय अधिकारी यांचे नावे कळवावे असेही पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्याही पत्राची दाखल घेतलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता आज हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी कालच नोटीस मिळाली व कागदपत्रे दाखल करण्याकरीता मुदत मिळावी असा अर्ज दिलेला आहे. सचिव यांचे मुदत अर्जामध्येच नोटीस दि. 9.6.2009 रोजी दु. 3.00 वा मिळाले असे नमूद केलेले आहे. त्यावरुन त्यांना आज हजर राहण्याचा पुरेसा वेळा होता. त्यावेळेस उत्तर दाखल करता आले असते. याचा अर्थ सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती सावनेर यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाची दखल घेतलेली दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही हे सिध्द होते. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सचिव हे दोषी आढळुन येतात अशी आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे ते अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 26.7.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 26.7.2008 च्या अर्जाची दखल ही सचिव तथा माहिती अधिकारी यांनी घेतलेली नसल्यामुळे व त्यामुळे 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. त्याकरीता त्यांचे म्हणणे एकुन घेण्यात आलेले आहे. परंतु उत्तर देण्यास दोन आठवडयाची मुदत दयावी असे आयोगापुढे सांगीतले परंतु मुदत अर्ज नाकारलेला आहे. त्यांना संधी दिलेली होती हे वर विवेचनात आलेले आहे.

3) शास्तीची वसुली ही सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती सावनेर यांचे दरमहाचे वेतनातून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांनी करावयाची असून रक्कम लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 817/2008.**

श्री गौतम भिकाजी वासनिक
मु. पो. बुधवारी पेठ वार्ड क. 3
ता. उमरेड जि. नागपूर 441203 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती इंदूमती परतेकी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
2) श्री मारोतराव शा. गायधने
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
जिवन विकास विद्यालय उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.6.2008 रोजी मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांचेकडे अनुसुचित जाती/जमाती विमुक्त भटक्या जाती/जमाती विशष मागास प्रवर्ग यांच्या अनुशेषाबाबतची माहिती मिळण्याबाबत. 1 जानेवारी 1990 ते 30 मे 2008 पर्यंतची. सहपत्रातील नमुद संपुर्ण माहिती देण्यात यावी असे नमुद करुन माहिती व्यक्तिशः घेणार अशी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचा अर्ज जन

माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी वाचून घेतला पण स्विकारला नाही त्यामुळे त्यांनी रजिस्टर पोष्टाने सदरचा अर्ज पाठविलेला होता परंतु तोही परत आलेला नाही. त्यामुळे त्यांनी डब्लू सी एल शाळामधून माहिती मागण्याचा प्रयत्न केला तोही अर्ज परत आला म्हणून त्यांनी दि. 26.2.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.8.2008 रोजी देण्यात आलेला असून आपण दाखल केलेल्या अपील संबंधात माहिती मुख्याध्यापक जिवन विकास विद्यालय उमरेड यांच्या कडून या कार्यालयात प्राप्त झाली आहे. प्राप्त झालेली माहिती आपणास पुरविण्यात येत आहे. एकुण 6 प्रती कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 28.8.2008 रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांनी मुख्याध्यापक जिवन विकास विद्यालय उमरेड यांना दि. 26.8.2008 चे अपील मेमो पाठवून त्यांना विनाशुल्क माहिती 10 दिवसात उपलब्ध करुन दयावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे दि. 10.9.2008 रोजी मुख्याध्यापक जिवन विकास विद्यालय उमरेड यांना अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दि. 13.9.2008 रोजी आपल्या अर्जात व्यक्तीशः असा उल्लेख आहे तरी आपण नेली नाही करीता माहिती डाकद्वारे आपणाकडे पाठविण्यात येत आहे असे पत्र दिलेले दिसून येते. व त्यासोबत 10.9.2008 ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

3. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती स्पष्ट आहे त्यात कोणत्याही प्रकारे संभ्रम निर्माण करणारे माहिती नाही त्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी यांनी दि. 19.7.2008 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दिलेल्या पत्रामध्ये अपीलकर्ता यांनी सांगीतल्याप्रमाणेच वस्तुस्थिती ही मान्य केलेली आहे व अर्ज परत केल्याचे सुध्दा मान्य केले आहे. परंतु संभ्रम निर्माण झाल्याचे कारण दिले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे दिसून येते. विद्यमान माहिती अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांनी माहिती मागण्याचे प्रयोजन नाही अशा प्रकारचा युक्तीवाद आयोगाकडे केला यावरुन विद्यमान माहिती अधिकारी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विरुध्दच आहे असेही दिसून येते. व त्यामुळे त्यांना सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीची माहिती नाही असे दिसून येते. अर्जदारास अधिनियमाचे कलम 6 पोटकलम 2 प्रमाणे माहिती विचारण्याचे प्रयोजन विचारता येत नाही अशी स्पष्ट तरतुद आहे. असे

असले तरी अपीलकर्ता यांना माहिती शिक्षणाधिकारी यांचे माध्यमातून जी उपलब्ध झालेली आहे ती अपुर्ण व दिशाभूल करणारी आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेकडे अपुर्ण व दिशाभूल करणारी आहे याबाबचे स्पष्टीकरण करावे व स्पष्टीकरणाप्रमाणे विद्यमान माहिती अधिकारी यांनी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्या माहितीच्या संदर्भामध्ये अधिक स्पष्टीकरण हवे असल्यास त्यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः स्पष्टीकरण देवून कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य माहिती उपलबध करुन घ्यावी. अपीलकर्ता यांनी स्पष्टीकरण दिल्यानंतर 10 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या सवरुपात माहिती उपलबध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 927/2008.**

श्री विनायक सदाशिवराव बोरकर

मु. पो. नवरगाव

ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डॉ. अजित देशमुख

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

सहसंचालक (उच्च शिक्षण)

नागपूर विभाग नागपूर

जुने मॉरेस कॉलेज परिसर, सिताबर्डी नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

प्राचार्य

एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय

नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य गैरहजर. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2008 रोजी मा. प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांचेकडे शासकीय नियमानुसार शिक्षकाच्या पाल्यांना निःशुल्क शिक्षण सवलत योजने अंतर्गत शिक्षणशुल्क सवलत मिळायला पाहिजे. शिक्षण सवलतीचा फॉर्म भरलेला आहे. शिक्षणशुल्क भरलेले आहे ते परत मिळायला पाहिजे. ते मिळालेले नाही. विलंबाचे कारण कळवावे. अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावी असे कळविलेले दिसून येते.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.6.2008 रोजी प्रथम अपील सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांचे कार्यालयात दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 24.7.2008 रोजी माहिती अधिकारी व प्रशासन अधिकारी कार्यालय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांना आपण संबंधितांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे सदर पत्रात नमुद केलेले आहे. तरी सदर पत्र पाहताच संबंधितांना शासन निर्णयाप्रमाणे माहिती देण्यात यावी व प्रत या कार्यालयास सादर करावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 31.7.2008 रोजी डॉ. वंदना मानापूरे प्राचार्य यांनी श्रीयुत सहारे माहिती अधिकारी व प्रशासन अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच सहसंचालक (उच्च शिक्षण) यांनी सुध्दा वरीष्ठ लेखा परीक्षक शिक्षण विभाग नागपूर यांना दि. 1.8.2008 रोजी सदरच्या प्रकरणात आपण काय कार्यवाही केली याची विचारणा केलेली दिसून येते. त्याप्रमाणे दि. 11.9.2008 रोजी लेखा अधिकारी यांनी सहसंचालक (उच्च शिक्षण) यांना वस्तुस्थिती कळविलेली दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 18.9.2008 रोजी डॉ. देशमुख सहसंचालक (उच्च शिक्षण) यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना पत्राद्वारे आदेश दिलेला दिसून येतो. व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती ही संपूर्ण उपलब्ध झालेली असून सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतु धनादेश मिळालेला नाही. तसेच माहिती ही माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी दिली नाही तरी ती प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून मिळाली. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हे सुनावणीस हजर आहेत व त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा व कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे अपीलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरावे लागते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हया शास्तीस पात्र आहेत. अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादावयाची असल्यास परंतूकाप्रमाणे त्यांचे म्हणणे एकुन घवयाचे असते. आयोगानी दि. 19.5.2009 रोजी आज दि. 10.6.2009 रोजी सकाळी 10.00 वा. च्या सुनावणीची नोटीस काढली होती. सदरची नोटीस ही

अपीलकर्ता व सहसंचालक यांना मिळाली. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हे नागपूर येथील असल्यामुळे त्यांना मिळाली असावी असे गृहीत धरावे लागते. त्यांचे कार्यालयातून एक कर्मचारी आयोगाचे कार्यालयात आलेला होता असे सांगण्यात आले. परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे आणले नव्हते. यावरुन त्यांचे म्हणणे एकुन घेण्यास संधी देण्यात आली होती. याचा अर्थ याबाबत त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे त्या शास्तीस पात्र आहेत. व त्यांचेविरुध्द अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.4.2008 च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय नागपूर यांनी अपीलकर्ता यांना अधिनियमाच्या कलम 7(1) प्रमाणे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व तशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांचेविरुध्द रु. 1000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 10.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 929/2008.**

श्री गणेश राजाराम शेंडे
मु. पो. खराशी ता. लाखनी जि. भंडारा ..... अपिलकर्ता

विरुध्द

1) श्री डी. ए. मुंजे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती लाखनी
ता. लाखनी जि. भंडारा

2) श्री एम. एम. खंडाईत
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत कार्यालय खराशी
ता. लाखनी जि. भंडारा ..... उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक 11.6.2009 )

नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय खराशी यांचेकडे सन 2005 ते ऑगष्ट 08 या काललावधीतील एकुण नऊ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 1.9.2008 रोजी माहितीच्या खर्चाचे रु. 90/– चा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 8.9.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 15.9.2008 रोजी प्रथम अपील

दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला असून अपीलकर्ता यांना 8 मुद्यांवरील माहिती ग्रामपंचायत रेकॉर्ड तपासणीनुसार व प्रत्यक्षात चौकशीअंती दिलेली आहे. दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी नाही. ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये खोडतोड करणे व त्याला जिम्मेदार कोण त्याचावर कार्यवाही कोण करणार व केव्हा करणार हे ठरविण्याचे अधिकार मला नसल्याने मी ती माहिती दिली नाही असे आयोगापुढे सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. त्याबाबत त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती ही खोडतोड करणारी असल्यामुळे कार्यवाही करण्यात यावी परंतु अशा प्रकारची कार्यवाही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे करता येत नसल्यामुळे व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 830/2008.**

श्री मधुकर घुलारामजी घंदरे
मधुमालती 49 अध्यापक नगर
रिंगरोड ( मानेवाडा ) नागपूर 440034 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री महेश करजगावकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद नागपूर
2) श्री नेताम
जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी नागपूर यांचेकडे शासनाच्या दि. 3.11.2007, 20.7.2007 व 21.12.2006 परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करण्याकरीता आपले कार्यालयाने कोणते धोरण ठरविले. पंचायत समिती स्तरावर तसे आदेश निर्गमित केले काय केले असल्यास आदेशाची प्रत देण्यात यावी. निवडश्रेणीतील पात्र शिक्षक किती आहेत त्यांची यादी. 20 टक्के

3. सेवानिवृत्त शिक्षकांची निवड समितीकडून निवड केली काय केली नसल्यास केव्हा करणार. त्यांचे परिगणना पत्रके तयार केले काय केली नसल्यास केव्हा करणार. एकुण किती शिक्षकांना लाभ मिळेल. त्याप्रमाणे किती रकमेची तरतुद केली. तशी आर्थिक तरतुदीप्रमाणे मागणी शिक्षण संचालकाकडे केल्याचा दिनांक व रक्कम. आदि सविस्तर महिती देण्याची कृपा करावी. प्राथमिक शिक्षकांना 24 वर्षाच्या सेवेनंतर निवडश्रेणी लागू करण्याबाबतची सविस्तर माहिती मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी सन 2004 ते 2007.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 17.3.2008 रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी एकुण 4 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व सहपत्र म्हणून आदेशाच्या 9 प्रती देण्यात आलेल्या आहेत. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.5.2008 रोजी देण्यात आलेला असून प्रोसेडींगमध्ये निवडश्रेणी केलेली माहितीची नक्कल देण्यात आली असे अपीलकर्ता यांनी पोच दिलेली दिसून येते. व त्यामुळे त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जे धोरण ठरविण्यात आलेले आहे त्या धोरणास विलंब झालेला आहे व माहिती पूर्ण उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की प्रक्रिया सुरु आहे व संपूर्ण जिल्हयातील धोरण राबवायचे असल्याने निश्चित अशी माहिती नाही व अपीलकर्ता यांना निवडश्रेणी ही मिळाली नाही तसा निर्णय झालेला आहे. व त्यामुळे त्यांनी ही सर्व माहिती मागितलेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांची अपेक्षा प्रक्रियेस विलंब होत आहे व त्याबाबत न्याय मिळावा. त्याबाबत मात्र राज्य माहिती आयोगास कोणताही अधिकारीता नसल्यामुळे अपीलकर्ता यांना अर्ज करतेवेळेस जी वस्तुस्थिती आहे ती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

..3..

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 827/2008.**

श्री वल्लभदास बंशीराम देशमुख
मु. पो. कटंगी (कला) ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (सर्व शिक्षा अभियान)
जिल्हा परिषद गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
उप शिक्षणाधिकारी (सर्व शिक्षा अभियान)
जिल्हा परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.11.2008 (अपीलावर तारीख 4.10.2008) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (सर्व शिक्षा अभियान) यांचेकडे अर्जदाराचा मुलगा भुपेंद्र वल्लभदास देशमुख हा शारिरीक दृष्टया ओठ व टाळू संबंधी ग्रस्त आहे. त्याची शस्त्रक्रिया दिनांक 18.6.2008 ला करण्यात आली. त्याकरीता भोजन ज्युस दुध व रुग्णाला व रुग्णाच्या पालकाला पुरविलेल्या सर्व खर्चाची झेरॉक्स प्रती देण्यात यावी. दवाखान्याचे नाव मेघे हास्पीटल वर्धा सावंगी. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.7.2008 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.)

यांनी अपीलकर्ता यांना सर्व शिक्षा अभियान अपंग समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत कु. भुपेंद्र वल्लभदास देशमुख रा. कटंगी (कला) गोंदिया याची शस्त्रक्रिया दि. 18.6.2008 ला आचार्य विनोबा भावे सावंगी मेघे वर्धा येथे मोफत करण्यात आली. या कार्यालयांतर्गत कोणताही खर्च करण्यात आलेला नाही असे कळविण्यात आलेले आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.8.2008 रोजी अपीलीय माहिती अधिकारी शिक्षण विभाग प्राथ. यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु दिनांक 16.9.2008 रोजी प्रत्यक्ष अपीलास हजर झाले नाही परंतू उपरोक्त दिनांकाला कार्यालयात येवून अपील तारीख वाढविण्याकरीता अर्ज दिला तेव्हा त्यांना पाहिजे असलेल्या माहितीबाबत अवगत करुन संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगून प्रथम दिलेल्या पत्राची सांक्षांकीत प्रतीद्वारे स्वतः मला पाहीजे असलेली माहिती प्राप्त झाली असे लिहुन दिले. असे असुनसुध्दा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या मुलाच्या शस्त्रक्रियेच्या वेळेस भोजन ज्युस दुधाचा खर्च त्यांनी स्वतः केला आहे. रुग्णालयानी केलेला नाही व त्यामुळे त्यांनी रुग्णालयानी केला असे सांगितले असल्यामुळे त्याबाबतची देयके त्यांन मागीतली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सर्व शिक्षा अभियान मार्फत अर्जदाराच्या मुलाची शस्त्रक्रिया करण्यात आली. अपंग विद्यार्थ्याच्या शस्त्रक्रिया करतांना येणारा संपूर्ण खर्च हा सर्व शिक्षा अभियान मार्फत भागविला जातो. पालकावर कोणत्याही प्रकारचा भुर्दंड बसू दिला जात नाही. परंतु अर्जदाराच्या मुलाची शस्त्रक्रिया (दुभंगलेला टाळू) (Smile Train) उपक्रमांतर्गत दि. 18.6.2008 रोजी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयसावंगी मेघे वर्धा येथे मोफत करण्यात आली. या संस्थेद्वारे शस्त्रक्रिया ही संपूर्ण मोफत केली जाते. तसेच औषधी भोजन इत्यादी खर्च हा सदर संस्थाच उचलते. अशा शस्त्रक्रियेवर केलेल्या खर्चाशी सर्व शिक्षा अभियान कार्यालयाचा कोणताही संबंध नसतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या मुलाच्या शस्त्रक्रियेवर केलेल्या खर्चाच्या तपशिलाचे देयक

उपलब्ध करुन देता येत नाही. ही बाबही त्यांना समजावून सांगीतलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 829/2008.**

श्री नंदू नामदेव बारस्कर
चांदापूर पो. फिस्कुटी
ता. मूल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री वासुदेव वा. भांडारकर
जन माहिती अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती मूल
ता. मूल जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.4.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती मूल यांचेकडे शिक्षका विषयीची माहिती जून 2006 जून 2007 ते एप्रिल 2008 या कालावधीतील एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

..2..

परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 26.5. 2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर मात्र अपीलकर्ता यांना दि. 6.9.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तत्पूर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध का करुन दिली याबद्यल जन माहिती अधिकारी यांना विचारले असता सदरची माहिती ही शिक्षण विभागाची असल्यामुळे ती शिक्षण विभागाकडून उपलब्ध करुन घेण्याकरीता दि. 21.4.2008 रोजी गट शिक्षणाधिकारी यांना पत्र दिले होते व पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिली होती. पुन्हा दि. 31.5.2008 व 17.6.2008 ला स्मरणपत्र दिलेले आहे. प्रथम अपील मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे हस्तांतर केलेला दिसून येतो. संवर्ग विकास अधिकारी यांनी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी यांना दि. 25.7.2008 रोजी पत्र दिलेले दिसून येते. दि. 28.8.2008 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संवर्ग विकास अधिकारी यांचेकडून गट विकास अधिकारी पं. स. मुल यांचेकडून दि. 20.8.2008 रोजी प्राप्त झाली असली तरी ती दि. 6.9.2008 रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता गैरहजर आहे. परंतु अपीलकर्ता यांनी चुकीचे मार्गानी अर्ज केल्याने प्रकरण खारीज करण्यास विनंती उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्याकरीता गट शिक्षणाधिकारी हे जन माहिती अधिकारी आहेत व गट विकास अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. मात्र अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे केला व प्रथम अपील हे मुख्यकार्यपालन अधिकारी यांचेकडे केला व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. असे असले तरी गट शिक्षणाधिकारी यांना दि. 21.4.2008 रोजी माहिती अधिकारी पं.स.मुल यांनी अर्ज हस्तांतर केला होता व त्यामुळे गट शिक्षणाधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. गट शिक्षणाधिकारी यांना स्परणपत्रपण देण्यात आलेले दिसून येतात. तरीही माहिती दिनांक

20.8.2008 रोजी उपलब्ध करुन देण्यात आली व त्यानंतर दि. 6.9.2008 रोजी अपीलकर्ता यांना पत्र दिलेले दिसून येते. यावरुन प्रत्येक कार्यालयाची अकार्यक्षमता दिसून येते. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार हे गट शिक्षणाधिकारी असल्याने व त्यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून गट शिक्षणाधिकारी यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये रु. 250/– ची शास्ती लादण्यात येत आहे. जेणेकरुन विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याची जाणीव त्यांना होईल.
2) सदरच्या शास्तीची वसुली मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी करावयाची असून सदरची रक्कम लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 832/2008.**

श्री प्रभाकर निळकंठराव घाटे
एस. टी. डेपोजवळ वार्ड नं. 30
रामनगर वर्धा 442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक
भूमी अभिलेख
अमरावती प्रदेश अमरावती

2) श्री महेश म. खडतरे
जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधिक्षक
उपसंचालक
भूमी अभिलेख
अमरावती प्रदेश अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक भूमी अभिलेख यांचे कार्यालयात मौजा रेणूकापूर सर्व्हे क. 2/2 (नवीन) (105) 3 हे. 99 आराजी जमीन एकत्रीकरणामध्ये श्री अमृत पांडूरंग खोडके यांचे नावे चुकीने करण्याबाबत. दि. 8.2.2008 रोजी दिलेल्या अर्जावर झालेली कार्यवाही रजिष्टर पोष्टाने किंवा प्रत्यक्ष घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जासोबत परिशिष्ट जोडलेले असून त्यामध्ये 4 मुद्यावर कार्यवाहीची माहिती मागीतलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.9.2008

रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 3.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेला असून निर्णय हा दि. 26.9.2008 रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणात संबंधीत कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या छायांकीत प्रती अपीलार्थीस सुनावणीच्या वेळेस मोफत पुरविण्यात आल्या व त्याबाबत अपीलार्थीची रोजनाम्यावर स्वाक्षरी घेण्यात आली. अपीलदार यांची नकला बाबतची तक्रार मिटली आहे. अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत निर्णय झालेला नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्याबाबतची माहिती त्यांना उपलबध झालेली आहे असेही त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांना जी माहिती उपलबध झालेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे उपलबध झालेली आहे. ती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे व ती गुणवत्तेच्या बाबत त्यांची अपेक्षा दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात जर जमीन एकत्रिकरणाच्या संबंधामध्ये चुकीचा निर्णय झालेला असेल तर त्याबाबत संबंधित अधिनियमच्या तरतुदीप्रमाणे त्यांनी सक्षम अधिका–याकडे अपील करणे आवश्यक आहे. माहितीच्या अधिकारात कोणत्याही प्रकारची कारवाईची विनंती मान्य करता येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली आहे. मात्र त्यांची गुणवत्तेच्यावर निर्णयाची विनंती मान्य करता येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 11.6.2009

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1276–1278

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 931/2008.**

श्री निळकंठ तुकाराम नाकाडे
दत्त मंदीर वार्ड जाजू हॉस्पीटलजवळ,
वरोरा ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मनोजकुमार शहा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर

2) श्री सुभाष सालवटकर
जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद कार्यालय वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद वरोरा यांचेकडे श्री रुपेश रमेश डाखोरे यांनी केलेले अतिक्रमण काढण्याबाबत व त्यांनी केलेल्या बांधकामाची मंजुर नकाशाची प्रत मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.10.2008 रोजी माहिती शुल्क रु. 4 चा अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानुसार दि. 13.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून

येते. परंतु त्या प्रथम अपीलात माहिती उपलब्ध झाली नाही असेच त्यांनी कारण दिलेले दिसून येते. सदरच्या अपीलाच्या संदर्भात दि. 12.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद वरोरा यांनी पुन्हा श्री रुपेश रमेश डाखोरे यांनी न.प. उपलब्ध नोंदीनुसार भुखंड क्र. 680 वर बांधकाम नकाशा सादर केल्याची नोंद नाही असे पुन्हा दि. 10.11.2008 अपील अधिकारी यांचे सुनावणी झालेल्या संदर्भात कळविलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे पुन्हा द्वितीय अपील दाखल करुन दि. 10.11.2008 रोजी सार्वजनिक रस्ता खुला करण्याचा अर्ज प्राप्त झाला असून अजूनही कार्यवाही झालेली नाही आवश्यक ती माहिती पुरविली नाही असे कारण दिलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 10.9.2008 च्या तक्रारी नुसार दि. 20.9.2008 रोजी श्री रुपेश रमेश डाखोरे यांना नोटीस काढलेली आहे व त्या नोटीसीची प्रत त्यांना देण्यात आलेली आहे. परंतु यापुढील कार्यवाही मात्र त्यांना कळविलेली दिसून येत नाही ती कार्यवाही झाली असल्यास अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना श्री रुपेश रमेश डाखोरे यांना दि. 20.9.2008 रोजी दिलेल्या नोटीसीच्या नंतर पुढील कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 845/2008.**

श्री भगवतीप्रसाद प्रल्हाद तिवारी
25 कॉर्पोरेशन कॉलनी उत्तर अंबाझरी मार्ग
नागपूर 440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पु. ल. कडू
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास
नागपूर

2) श्री आर. एम. मेघराजानी
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (नियमितीकरण)
नागपूर सुधार प्रन्यास
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे ख.क्र. 269, 200, 271, 272, 273, 274 मौजा झिंगाबाई टाकळी रोठोड लेआऊटचे नासुप्र द्वारा मंजुरी चे तपशिल मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी 4 वर्ष 6 महिने अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.5.2008 रोजी अभिलेखाच्या स्वरुपात असलेली माहितीच आपण मागू

शकता यानुसार नागपूर सुधार प्रन्यास तर्फे गुन्ठेवारी अंतर्गत नियीमत करण्यात आलेल्या विषयांकित अभिन्यासाची धारिका आपल्या निरिक्षणार्थ इमारत विभाग (उत्तर) नागपूर सुधार प्रन्यास कार्यालयात उपलब्ध आहे. या अभिलेखातील जी कागदपत्रे आपणास पाहिजे आहेत ती नियमाप्रमाणे शुल्क आकारुन आपणास उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांनी दि. 1.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.8.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थी यांना माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (नियमितीकरण) यांनी आवश्यक माहिती फी चा भरणा करुन देण्याची तयारी आहे त्यामुळे प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्यात येत आहे असा निकाल दिलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयात मात्र संपूर्ण विवेचन आलेले दिसून येते. व त्यावरुनही अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती झालेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. व त्यात दि. 26.5.2008 रोजी पैसे भरण्यास संमती दिली आहे असे पत्र असले तरी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांनी आयोगापुढे दाखल केलेली नाही व प्रथम अपीलाच्या विवेचनामध्ये त्याबाबतचा उल्लेख दिसून येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 847/2008.**

श्री अजय अविरचंद शेंडे
खलाशी लाईन, राहुल लायब्ररीजवळ
मोहननगर नागपूर 440001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –2
नागपूर महानगर पालिका नागपूर
2) श्री अे. बी. पाटील
जन माहिती अधिकारी तथा
प्रवर्तन अधिक्षक
नागपूर महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक नागपूर महानगर पालिका यांचेकडे बरसात के चार महिनेमे अतिक्रमण कारवाई नही कर सकते तो आप इसकी कॉपी मुझे कृपया दी जाय और अगर नही है तो गैरअर्जदारपर तुरंत कारवाई क्यो नही कर सकते है इसका मुझे आनसर दीया जाय और यह कारवाई कीस तारीख को कर रहे है इसकी जानकारी मुझे दी जाय.
सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना प्रवर्तन अधिक्षक यांनी पावसाळयात अतिक्रमण कार्यवाही न करण्याबाबत नागपूर महानगर पालिकेचा कोणताही नियम/कायदा नाही. महाराष्ट्र शासनाने पारीत केलेल्या शासन निर्णय परिपत्रकानुसार पावसाळयात कार्यवाही करता

येते. शासनाच्या परीपत्रकाच्या प्रत करीता आवश्यक शुल्क भरल्यास प्रत देता येईल. सद्यस्थितीत मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये शहरातील शिकस्त घरे पाडण्याची मोहीम सुरु असल्यामुळे श्री बाळकृष्ण मारोती शेंडे यांचे अनधिकृत बांधकाम तोडण्याच्या कार्यवाहीला विलंब होण्याची शक्यता आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.8.2008 रोजी देण्यात आलेला असून उपस्थित केलेल्या मुद्यातबाबत विभागीय अधिकारी यांचे तर्फे अपीलार्थीस पूर्ण माहिती देण्यात आली व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे. विभागातर्फे कार्यवाही न करण्याचे कारण शासन परीपत्रकान्वये अतिक्रमण अधिक्षक यांनी सांगीतले. असे असले तरी अपीलकर्ता यांना आज सद्यस्थिती काय आहे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना आजपर्यंत झालेल्या कार्यवाहीची वस्तुस्थितीची माहिती हा निर्णय झाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 859/2008 व 860/2008.**

श्री प्रविण भाऊ सचिन व सुदारमराव मस्के
प्लॉट नं. एन 94 रेशिमबाग नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) कु. ललीता चौधरी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी
पंचायत समिती मौदा
ता. मौदा जि. नागपूर

2) श्री डी. एन. ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव
ग्रामपंचायत मौदा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांनी दोन्ही प्रकरणात आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाली असून मला काहीत म्हणणे नाही असे आयोगापुढे लिहून दिलेले असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 15.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 933/2008.**

श्री देवराव पामाजी ढारे
मु. खैरी पो. खैरी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. वा. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती कामठी
ता. कामठी जि. नागपूर

2) श्री एन. टी. रणदीवे
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय खैरी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय खैरी यांचेकडे आपण दिलेली माहिती अन. क्र. 27 वर्ष 1999–2000 श्री शंकर जंगलुजी शेंडे यांचे नावे झालेली जागा खरेदी हक्काने झाल्याची नोंद आहे. उपलब्ध नोंद ही रुजी करतांना श्री शंकर जंगलुजी शेंडे यांनी सादर केलेले अर्जापासून ते रजिस्ट्रीचे कायदेशीर पुरावे यांची प्रमाणीत प्रत देण्यात यावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17.11.2008 रोजी देण्यात आलेला असून खंड विकास अधिकारी यांनी 24 तासाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात व सदरच्या निर्णयाची प्रत अर्जदाराला दिलेली दिसून येते. त्यानंतर दि. 5.12.2008 रोजीसुध्दा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु त्याप्रमाणे दि. 19.12.2008 रोजी सचिव ग्रामपंचायत कार्यालय खैरी यांनी आपल्या अपील अर्जात घर क्र. 92 अन्वये मागितलेली माहिती दि. 15.3.2008 चे पत्रानुसार सविस्तर देण्यात आलेली आहे. देण्यात आलेली माहिती ग्रामपंचायत रेकॉर्डनुसार देण्यात आलेली आहे असे कळविले असून सदरच्या पत्राची प्रतिलिपी ही खंड विकास अधिकारी यांना दिलेली दिसून येते. मात्र त्यानंतर दि. 4.5.2009 रोजी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की दि. 11.2.2008 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे प्रथम अपील व दि. 21.8.2007 च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली होती व ती त्यांना दि. 15.3.2008 रोजी देण्यात आलेली होती. यावर अपीलकर्ता यांनी एक माहिती वेळोवेळी मागितलेली असल्यामुळे व ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 934/2008.**

श्री हगरु राघोजी कापगते
रा. पो. सेंदूरवाफा
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जे. जे. केळवदे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख
सडक अर्जुनी जि. भंडारा
2) श्री एम. पी. लांजे
जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय
सडक अर्जुनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.3.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना अर्जदाराने सन 2006 ते 2008 पर्यंत केलेल्या विचारणा नुसार मौजा मालीजुंगा तालुका सडक अर्जुनी येथील रेकॉर्ड दुरुस्तीची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 6.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील दाखल केल्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 7.4.2008 रोजी या कार्यालयात व्यक्तीशः हजर राहून शासनाचे रु. 96 फी चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर दि. 15.4.2008 रोजी

अपीलकर्ता यांनी माहिती किती पानाची व कोणत्या दराने पैशाचा भरणा मला करावा लागेल हे कळल्यानंतर मी व्यक्तीशः आपले कार्यालयात येवून माहिती घेवून जाण्यास तयार आहे असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांना तसे न कळवता दि. 11.6.2008 रोजी पुन्हा शासकीय शुल्क रु.96 चा भरणा करावा या कारणास्तव अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे त्यांना प्रतिपृष्ठाचा दर कळविणे तसेच एकुण किती पृष्ठे होतात ही माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व तसे त्यांनी पत्र दिल्यानंतर सुध्दा त्यांना ते विवरण कळविलेले नाही व म्हणून त्यांनी रु. 96 चा भरणा केलेला नाही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की अधिनियमाचे कलम 7 (3) प्रमाणे जे विवरण हे देणे आवश्यक होते व त्यामुळे अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि.24.3. 2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 869/2008.**

श्री भुषण केशवराव तिजारे
मोदी नागसेन नगर कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष
शिक्षण प्रसारक मंडळ
कामठी जि. नागपूर
के.ऑफ सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय
कामठी
ता. कामठी जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
सचिव
शिक्षण प्रसारक मंडळ
कामठी जि. नागपूर
के.ऑफ सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय
कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी शिक्षण प्रसारक मंडळ यांचेकडे श्री सुनिल तिजारे यांनी दि. 17.4.2008 रोजी केलेल्या विनंती अर्जाची प्रत व त्याबाबतची उत्तराची प्रत मागितलेली दिसून येते. तसेच ती श्री स्वामी मामीडवार व श्री रत्नाकर जोशी यांच्या संदर्भात मागितलेली दिसून येते.सदरची माहिती नोंदणीकृत टपालानेद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने संस्थेच्या अध्यक्षानी मागितलेली माहिती ही महाविद्यालयाशी संबंधित असल्याने महाविद्यालयाच्या

..2.

माहिती अधिका–याकडून प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे अध्यक्ष यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सदरची माहिती संस्थेकडे मागीतल्यास ती महाविद्यालयाकडे मागावी असे कळविले जाते व महाविद्यालयाकडे मागीतल्यास ती संस्थेकडे मागावी असे कळविले जाते. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली दिसून येते त्या संदर्भात संस्थेकडे हीच कार्यवाही करते असे दिसून येते. तसेच अनुदान संस्थेला महाविद्यालयाच्या संदर्भात व त्यामुळे सर्व नियुक्त्या वगैरे संस्थेकडून असल्यामुळे सदरची माहिती संस्थेनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्यामुळे संस्थेचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दोषी आढळून येतात व त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि.23.7. 2008 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम शैक्षणिक संस्थेस दिल्या जाणा–या अनुदानातून कमी करण्यात यावी. अन्यथा अध्यक्ष यांचेकडून वसूल करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत <u>**उपसंचालक उच्च शिक्षण नागपूर**</u> यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 868/2008.**

श्री भुषण केशवराव तिजारे
मोदी नागसेन नगर कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. अजित देशमुख
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक (उच्च शिक्षण)
नागपूर विभाग नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य
सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय
कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे एकुण 5 मुद्यांवर श्री सुनिल तिजारे यांच्याबद्यल माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी श्री सुनिल तिजारे यांनी महाविद्यालयाविरुध्द प्रकरण दाखल केलेले असल्यामुळे

न्यायप्रविष्ट असल्याने माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 26.7.2008 रोजी सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दि. 10.9.2008 रोजी पुन्हा सहसंचालक उच्च शिक्षण यांच्या आदेशाप्रमाणे वकीलाचा सल्ला घेतल्याशिवाय माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे सांगीतले. तसेच दि. 15.9. 2008 रोजी अपील फेटाळण्यात आलेले आहे. व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की मा. उच्च न्यायालयाने माहिती उपलब्ध करुन देण्यास मनाई केलेली असल्यास किंवा चौकशी सुरु असल्यास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व त्यामुळे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्रथम अपीलात याबद्यलचा विचार करणे आवश्यक होता व त्याबाबतही प्रथम अपीलात विचार झालेला नाही. माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही हे वकीलाच्या सल्ल्यावर अवलंबून नसते. त्याबाबत अधिनियमाच्या तरतुदी स्पष्ट आहेत. व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की वकीलाच्या सल्ल्याने उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही हे अपीलार्थीच्या सल्ल्याने ठरविण्यात आले होते. परंतु अपीलार्थीचे म्हणणे असे आहे की ही बाब त्यांना मान्य नाही. व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 26.7.2008 च्या अर्जातील एकुण 5 मुद्याची माहिती रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न दिल्यास जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य रु. 25000/– चे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 885/2008, 886/2008, 995/2008, 996/2008.**

श्री मुरली उर्फ अशोक रेड्डी
यु.टी.नं. 3478, अंडा बैरक,
नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक
नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर

2) श्री जे. बी. मिश्रा
जन माहिती अधिकारी तथा
नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दि. 26.3.2008 रोजी व 30.9.2008 रोजी द्वितीय अपीले अशी एकुण 4 अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे वकील श्रीयुत अनिल काळे यांनी हजर राहून युक्तीवाद केला. उत्तरवादी हजर आहेत. व त्यांचे म्हणणे एकुन घेतले.

2. अपील क्र. 886/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2008 रोजी एकुण 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या चारही मुद्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 11.10.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 30.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु माहिती प्राप्त झालेली असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे

3. अपीलकर्ता यांनी मुळात जन माहिती अधिकारी यांचेकडे जो अर्ज दिलेला आहे त्या अर्जामध्ये दि. 5.6.2008 व 26.6.2008 अशी दोन मुद्यांमध्ये तारीख दिलेली आहे. परंतु त्याच अर्जाच्या प्रतीमध्ये खोडतोड करुन राज्य माहिती आयोगाकडे दि. 5.6.2007 व 26.6.2007 याचा अर्थ 07 च्या ऐवजी 08 केलेला आहे असे आयोगाचे निदर्शनास जन माहिती अधिकारी यांनी आणले. जन माहिती अधिकारी यांनी दि. 5.6.2008 व 26.6.2008 या तारखांच्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता हे आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांच्या वकीलाच्या जवळ असलेल्या प्रतीमध्ये सुध्दा खोडतोड केलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या अर्जाच्या प्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 885/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 11.7.2008 रोजी एकुण 4 मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांनी दि. 20.8.2008 रोजीच्या अर्जानुसुध्दा मागितलेली दिसून येते. व त्यांनी दि. 16.9.2008 रोजीसुध्दा प्रथम अपीलात तीच माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 16.9.2008 रोजीच्या अर्जाप्रमाणे दि. दि. 23.9.2008 रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्याबाबतची सर्व कागदपत्रे ही अपीलकर्ता यांनीच दाखल केलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, या कारागृहातील नक्षलवादी (माओवादी) न्यायाधिन बंदी क्र. 3478 महेश उर्फ मुरली उर्फ अशोक सत्या रेड्डी यांने सन्माननिय आयोगास अपील क्र. 885/2008 दि. 17.6.2009 रोजी दाखल केले आहे.

सदर न्यायाधिन बंदी हा अत्यंत जहाल नक्षलवादी (माओवादी) संघटनेचा प्रमुख असुन त्याचेवर या कारागृहात वेगवेगळया न्यायालयातील 20 गंभीर स्वरुपाच्या केसेस प्रलंबित आहेत.

सदर बंदयाने दि. 11.7.2008 रोजीची तारीख असलेल्या सादया कागदावर

माहिती मागीतली होती. सदर अर्जावर नियमानुसार रु. 10/- कोर्ट स्टॅम्प फी लावणे आवश्यक असतांना सुध्दा सदर बंदयास उपलब्ध असलेल्या माहिती नुसार या कार्यालयाचे पत्र क्र. मा.अ.अ./7111/08 दि. 28.7.2008 अन्वये माहिती देण्यात आलेली होती.

सदर बंदयाने परत याच विषयावर अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर यांचे नावे दि. 20.8.2008 रोजी अपील अर्ज दाखल केला होता. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नियम क्र. 19 (1) ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम 7 चे पाटकलम (1) किंवा पोटकलम (3) चा खंड (क) अन्वये रु. 10/- कोर्ट फी स्टॅम्प न लावल्यामुळे सदर अर्जावर अपीलाची सुनावणी करता येत नाही असे पत्र क्र. मा.अ.अ./नामका/8159 दि. 25.8.2008 अन्वये सदर बंदयास कळविण्यात आले होते.

सदर बंदयाने परत दि. 16.9.2008 रोजी अधीक्षक तथा अपीलीय अधिकारी नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे नावे रु. 20/- कोर्ट स्टॅम्प फी लावलेला खालील मुदयावर अर्ज सादर केला होता. त्या अनुशंगाने सदर बंदयास या कार्यालयाचे पत्र क्र. मा.अ.अ./ नामका/9098/08 दि. 23.8.2008 अन्वये माहिती देण्यात आलेली आहे.

मुद्या क्र. 1 - मेरे और अन्य बंदीयो का मुलाखत के समय निगरानी के लिये किन किन लोग बैटने का प्रावधन है/प्रशासन का जी.आर. व अन्य आदेशो का पुर्ण विवरण

कारागृह नियमावली नुसार बंदी जनाची भेट सुरु असतांना भेटीच्या वेळी तुरुंगाधिकारी, सुभेदार व रक्षक मुलाखत देण्याकरीता हजर असतात (सोबत कारागृह नियमावलीची प्रत जोडली आहे)

तसेच बाहेरील बाजूला कारागृह सुरक्षीततेच्या दृष्टीने आरोपी सेल, धंतोली नागपूर शहर यांचे कडील नियंत्रन अधिकारी व महिला पोलीस रक्षक हजर असतात.

मुद्या क्र. 2 - मेडीलकर डाईट मे पेशोटो के लिये जेल मे क्या डाईट और लिक्वीड देने का प्रावधन है उसका विवरण.

सदर बाबतीत मुख्य वैद्यकीय अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र क्र. माहीती

अधिकार/8987/08 दि. 19.9.2008 अन्वये पत्र दिले असुन माहिती प्राप्त झाल्यावर माहिती देण्यात येईल असे कळविले. मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडून पत्र क्र. हॉस्पी/318/08 दि. 23.9.2008 अन्वये माहिती प्राप्त झाल्यावर सदर बंदयास या कार्यालयाचे पत्र क्र. माहीती अधिकार/9828/08 दि. 11.10.2008 अन्वये वैद्यकीय प्रमाणपत्राच्या एकूण 5 छायांकीत प्रती देण्यात आले होते.

मुद्या क्र. 3 – किचन मे बंदियो को दिये जानेवाली कच्चा रेशन की मात्रा और पकावू के बाद मात्रा का विवरण

बंदयाना देण्यात येणा–या रेशन बाबतची परीपत्रकाची छायांकीत प्रत देण्यात येत आहे.

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

6. अपील क्र. 995/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 19.12.2007 रोजी एकुण दोन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी मध्यवर्ती कारागृह यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

सदर बंदी हा अत्यंत जहाल नक्षलवादी संघटनेचा प्रमुख सदस्य असुन त्याचेवर या कारागृहात वेगवेगळया न्यायालयातील 21 विविध न्यायालयातील गंभीर स्वरुपाच्या केसेस प्रलंबित आहेत.

सदर बंदयाचे दि. 19.12.2007 रोजीची तारीख असलेला शासकीय माहिती अधिकारी व अपील अधिकारी यांचे नावे असलेला अर्ज कारागृहातील बंदयांचे विनंती पुस्तकात अधीक्षकासमोर मंजुर झाला होता. सदर अर्ज शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त होताच सदर दोन्ही अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत कोर्ट फी स्टॅम्प नसतांना सुध्दा बंदयास या कार्यालयाचे पत्र क्र. माहीती अधिकार/1683/08 दि. 18.2.2008 अन्वये मागीतलेली माहिती नियमानुसार देण्यात आली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत दिलेल्या अर्जानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली होती. व त्यामध्ये 1 ते 5 मुदयावर नक्षलवादी बंदयाने माहिती मागीतलेली होती. त्यातील मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

मुद्या क्र. 1 – जेल मॅन्युअल तथा समय समय पर किया गया ॲमेंडमेंटस्

मुद्या क्र. 2 – जेल प्रशासन और शासनद्वारा प्रतिबंदीत साहित्य सुची या दोन्ही बाबीच्या माहितीसाठी कारागृहातील सर्व बंदयांना आवश्यक तेवढी माहिती प्राप्त होण्याचे हिशेबाने बंदयासाठी तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कारागृह विभागाने गजाआडच्या जगात हे पुस्तक नक्षलवादी बंदयास कारागृहात दाखल झाल्यावर यापुर्वीच देण्यात आलेले आहे.

मुद्या क्र. 3 – सुचना अधिकार अधिनियम 2005 च्या नियमावली सदर नक्षलवादी बंदयाचे सहआरोपीचे त्यांचे नातेवाईकाच्या भेटीचे वेळी त्यांचे कुटुंबियानी आणलेले सदर नियमावलीचे पुस्तक बंदयास यापूर्वीच देण्यात आलेले आहे.

मुद्या क्र. 4 – 1985 मे मा. मुल्ला कमेटी की सिफारस मे महाराष्ट्र सरकार व जेल प्रशासन क्या अमल कर रहा है उसका विवरण.

या बाबतीत स्पष्ट करण्यात येते की, मा. मुल्ला कमेटीच्या सिफारसी अमलात आणणे शासकीय धोरण असून यावर निर्णय घेण्याचा अधिकार हा फक्त शासनास आहे. करीता या बाबत कुठलीही माहिती या कार्यालयाकडून उपलब्ध होवू शकणार नाही. सदर माहिती उपलब्ध नसल्यामुळे नक्षलवादी बंदयास देण्यात आली नाही.

मुद्या क्र. 5 – जेल मे बंदी व्यक्तीवर प्रती दिन का खर्च विवरण

सदरील माहिती ही माहितीचा अधिकार 2005 नियम क्र. 8 मधील पोटनियम क्र.1 यातील उपनियम (ज) अन्वये माहिती देता येत नाही असे बंदयास या कार्यालयाचे पत्र क्र. मा.अ./1683/08 दि. 19.2.2008 अन्वये कळविण्यात आलेले आहे.

सदरील नक्षलवादी बंदी व त्याचे इतर सह आरोपींना कारागृहाची सुरक्षा अबाधित राहणेसाठी कारागृहातील अतिसुरक्षा विभागास ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना काही काम नसल्यामुळे सदर बंदी वेगवेगळया विभागास सतत माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत कोर्ट फी स्टॅम्प न लावता वेगवेगळया विभागाची

कार्यालयीन माहिती ही विनामुल्य मागविण्याकरीता या कार्यालयास अर्ज करुन प्रशासनाचा विनाकारण वेळ वाया घालवत आहेत.

सदर बंदयाने सन्मा. आयोगाकडे दिलेल्या अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नाही. म्हणून सदर अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत बसत नाही. वरील बाबी विचारात घेता सदरील अर्ज हा निकाली काढण्यात यावा हि विनंती. यापूर्वी सदर बंदयाचे दिलेल्या अर्जाच्या व त्यास दिलेल्या पत्राच्या छायांकित प्रति सोबत सादर करण्यात येत आहे.

यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असूनसुध्दा अपीलकर्ता हे माहितीच्या अधिकारात मागत आहे असे दिसून येते. अपील क्र. 796/2008 मध्ये दि. 27.5.2009 रोजी याच मुद्यावर सुनावणी झालेली असल्यामुळे व अपीलाचा निर्णय झालेला असल्यामुळे पुन्हा त्यावर सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

7. अपील क्र. 996/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी मध्यवर्ती कारागृह यांचेकडे कोर्ट फी स्टॅम्प न लावलेले अर्ज माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाप्रमाणे खारीज करण्यात येतात. परंतु निःशुल्क सुचना प्राप्ती के मुझे अधिकार है. क्यो. की मै जेल मे हूॅ मुझे आय का कोई स्त्रोत नही है असे त्यांनी कारण नमूद केलेले दिसून येते. त्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

आपणास या द्वारे कळविण्यात येते की आपण दि. 13.8.2008 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अपीलीय माहिती अधिकारी यांना लिहलेला अर्ज दि. 26.8.08 रोजी अधिक्षकांचा फेरीचा वेळी दिला असता सदर अर्जावर माहिती अधिकारी यांचेकडून चौकशी केली असता खालील माहिती माहिती अधिका–याकडून मिळाली आहे.

आपणास या कार्यालयास दि0 30.5.2008 रोजी अपील अधिकारी धंतोली पोलीस स्टेशन नागपूर पोलीस मुख्यालय शहर नागपूर 2. मा. राज्य माहिती आयोग नविन

प्रशासन भवन 13 मंजील मंत्रालय समोर मुंबई 32 व 3. शासकीय सुचना अधिकारी उपमहानिरीक्षक कार्यालय कारागृह पूर्व विभाग वर्धा रोड नागपूर यांचे नावे माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती मिळण्याकरीता अर्ज दिला होता. सदर तीनही अर्जावर आपण नियमानुसार कोर्ट फी स्टॅम्प रु. 10/— चे लावणे आवश्क होते. परंतु कोर्ट फी स्टॅम्प लावलेले नाही. आपण बी पी एल कार्डधारक नसल्यामुळे तसेच वरील तिनही अर्ज हे कलम 6 (1) माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये नियमानुसार नसल्याने माहिती अधिका—याने या कार्यालयाचे जावक क्र. 6078/08 दि. 26.6.08 अन्वये निकाली काढण्यात आले आहे.

आपण वरील निकाला विरुध्द या कार्यालयाचे अपीलीय अधिकारी यांचे नावे नियमाप्रमाणे अर्ज करणे अत्यावश्यक असतांना आपण अपीलीय अधिकारी यांना अर्ज न करता पुन्हा शासकीय सुचना अधिकारी यांना दि. 30.6.2008 रोजी अर्ज केल्याचे दिसून येते. अर्ज नियमानुसार नसल्यामुळे माहिती अधिका—याने फाईल केले आहे.

आपण उक्त तिनही अर्जाबाबत दि. 13.8.08 रोजी अपीलीय अधिकारी यांचे नावे अर्ज लिहून दि. 26.6.08 रोजी अधीक्षकाचे साप्ताहीक फेरीच्या वेळी अर्ज दिलेला आहे. सदर अर्जावर नियम क्र. 19 (1) ज्या कोणत्याही व्यक्तीला 7 चे पोट कलम (1) किंवा पोट कलम (3) चा खंड अन्वये वीस रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प लावणे आवश्क आहे. परंतु अर्जावर वीस रुपयाचे स्टॅम्प नसल्याने सदर अर्जावर अपीलाची सुनावणी करता येत नाही

परंतु सदरच्या बाबत जन माहिती अधिकारी तथा कारागृह अधिक्षक यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जास कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नसला तरी विनामुल्य माहिती देणे संयुक्तिक राहिल. तिकिट लावलेले नाही म्हणून खारीज करण्यात येवू नये याबाबत अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 886/2008, 885/2008, 995/2008 अपील हे खारीज करण्यात येतात.

2) अपील क्र. 996/2008 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जास कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नसला तरी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. ..2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 888/2008.**

श्री नानाजी जैदास रामटेके
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. जी. सुपके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती अर्जुनी/मोर.
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया

2) श्री जे एस राऊत
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक
पंचायत समिती अर्जुनी/मोर.
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.11.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून खंड विकास अधिकारी यांचेकडे दि. 7.9.2007 ला दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 23. 7.2007 ला दिलेल्या आदेशानुसार कामावर रुजू करुन न घेतल्या प्रकरणी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.12.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या

प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.4.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती पुरविण्यात आली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी या अर्जात जी माहिती मागितलेली आहे तीच माहिती अपील क्र. 642/08 माहिती श्री पी. आर. चौधरी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रा.पं. जानवा यांचेकडे मागितलेली होती. व प्रथम अपीलीय अधिकारी खंड विकास अधिकारी होते. सदरची माहिती त्यांना पूर्वीच दि. 23.7.2007 ला प्राप्त झालेली आहे. व त्याबाबत अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले होते. त्यामध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले होते. यावरुन अपीलकर्ता यांना एकच माहिती दि. 23.7.2007 व 2.4.2008 रोजी उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 937/2008.**

श्री नानाजी जैदास रामटेके
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक गोंदिया

2) श्री संदीप पालवे
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
देवरी ता. देवरी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.11.2008 रोजी पोलीस आयुक्त यांचेकडे द्वितीय अपील दाखल केले. व सदरचे द्वितीय अपील हे माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांनी दि. 28.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे हस्तांतर केले. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2008 रोजी माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी यांचेकडे दि. 8.11.2005 व 21.5.2006 रोजी दाखल केलेल्या रिपोर्ट नुसार माहिती न मिळाल्याने मला अपील करावे लागले. अशी माहिती शिघ्रगती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.7.2008 रोजी ठाणेदार अर्जुनी मोर यांना पत्र पाठवून अर्जदारानी मागितलेली माहिती संकलीत करुन अर्जदारास माहिती घेवून जाण्याबाबत इत्तला देवून बोलविण्यात आले होते परंतु अर्जदार हे हजर झाले नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी दि. 27.7.2008 रोजी

अपील दाखल केले. दि. 15.9.2008 रोजी निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये अपील मंजूर करण्यात आले असून पोलीस स्टेशन अर्जुनी मोर येथे दिनांक 21.5.2007 रोजी चौकशीत घेतलेल्या जबाबाच्या प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. 27.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्याची पोच घेतलेली आहे असे दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले असून द्वितीय अपील मेमोमध्ये दि. 27.8.2008 च्या अर्जानुसार दि. 21.5.2006 चे गैरअर्जदाराचे पाच बयाण मिळाले व माझा बयाण मिळाला नाही. दि. 8.11.2005 ला चौकशी दरम्यान तोंडी रिपोर्ट पोलीस भगत यांनी लिहीला आहे व गैरअर्जदार यांना पोलीस स्टेशनला मागविले होते त्याचे बयाणाचे रिपोर्टचे नकला मागीतले असता अजुनही मिळाले नाही ते मिळण्यात यावे असे नमूद केलेले दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा आयोगाकडे केलेला आहे.

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्राचे अनुषंगाने अर्जदार श्री नानाजी जैदास रामटेके रा. जानवा यांचे अपील अर्जाचे सुनावनी संबंधाने पूढील प्रमाणे खुलासा सविनय सादर आहे.

1. अर्जदाराने दि. 18.3.08, 24.4.08 रोजी ठाणेदार अर्जुनी मोर यांना अर्ज दिला होता. (त्यांमध्ये त्यांनी दि. 8.11.2005 16.5.2006 व 21.5.2006 रोजी पो.स्टे. अर्जुनी मोर येथे दिलेल्या रिपोर्टमधील बयान व रिपोर्टची नकल प्रत या बाबतची माहिती मागीतली होती)

2. अर्जदाराने सदरचा अर्ज आम्हाला प्रषीत न करता सरळ ठाणेदारांना सादर केला होता. त्याप्रमाणे ठाणेदारांनी त्यास मागितलेली माहिती कालबाहय झाल्या बाबत कळविण्यात आले. त्यावर त्यांनी तिच माहिती मिळण्याबाबत पुन्हा ठाणेदार यांना अर्ज सादर केला.

3. अर्जदाराचे ठाणेदारांनी दिलेल्या माहितीवर समाधान न झाल्याने मा.पोलीस अधीक्षक गोंदिया तथा प्रथम अपीलीय माहिती अधिकारी यांना अपील अर्ज दि. 27.5.08 रोजी सादर केले.

4. मा. पोलीस अधीक्षक गोंदिया यांचेकडून अर्जदाराचे अपीलीय अर्ज आम्हास दिनांक 2.6.08 रोजी प्राप्त होताच आम्ही ठाणेदार अर्जुनी मोर यांना अर्जदारास तात्काळ माहिती पुरविण्याबाबत कार्या.जा.क्र.863/08 दि. 16.6.08 अन्वये पत्र पाठविले.

5. ठाणेदार अर्जुनी मोर यांनी अर्जदारास दि.25.6.08 रोजी माहिती पुरविली. त्यात 1. दि. 8.11.08 रोजी दिलेल्या रिपोर्टची नोंद पो.स्टे.रेकॉर्डवर नसल्याचे 2. दि. 16.5.06 आणि 21.5.06 रोजी दिलेल्या रिपोर्टची नोंद असून त्याची झेरॉक्स प्रत सोबत जोडली असल्याचे व 3. मारोती गोमाजी मेश्राम, किसन कवळू ब्राम्हणकर, नानाजी जैदास रामटेके, किसन कवळू ब्राम्हणकर यांचे बयाण रेकॉर्डवर उपलब्ध असल्याने पुरविण्यात येत असल्याचे अर्जदारास कळविण्यात आले.

6. अर्जदार यांनी उक्त प्रमाणे माहिती मिळण्याकरीता आम्हास दि. 30.6.08 रोजी अर्ज सादर केले असता आम्ही ठाणेदार अर्जुनी मोर यांना कार्या.जा.क्र.1100/08 दि.18.7.08 अन्वये पत्र पाठवून अर्जदारानी मागितलेली माहिती संकलीत करुन अर्जदारास त्यांनी माहिती घेवून जाण्याबाबत दि. 29.7.08 रोजी इत्तला देवून बोलविण्यात आले होते परंतु अर्जदार हे हजर झाले नाही.

7. दरम्यानच्या काळात अर्जदार याने मा.पोलीस अधीक्षक गोंदिया तथा प्रथम अपीलीय माहिती अधिकारी यांचेकडे अपील दाखल केली. सदर अपीलावर मा. अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांची अपील ही अंशतः मंजूर करुन अपीलकर्ता यांना पो.स्टे. अर्जुनी मोर येथे दि. 21.5.06 रोजी चोकशीत घेतलेल्या जबाबाच्या प्रती विनामुल्य पुरविणे बाबत दि. 15.9.08 रोजी निर्णय दिला.

8. सदर निर्णयाची प्रत आम्हास दि. 17.10.08 रोजी प्राप्त झाली. त्यावरुन ठाणेदार अर्जुनी मोर यांना आमचे कार्या.जा.क्र.2034/08 दि.22.10.08 अन्वये पत्र दिले.

9. सदर पत्रावर ठाणेदार अर्जुनी मोर यांनी अर्जदारानी मागितलेली माहिती दि.27.10.08 रोजी पुरविली त्याची पोच व सविस्तर अहवाल पो.स्टे. जा.क्र.1749/08 दि.3.11.08 अन्वये पुर्तता अहवाल सादर केला.

कागदपत्राची तारखेवर यादी :–

1. अर्जदार ठाणेदार अर्जुनी मोर यांना सादर केलेले अर्ज दि. 18.3.08 चे
2. ठाणेदार अर्जुनी मोर यांनी अर्जदारास पुरविलेली माहितीपत्र दि. 28.3.08 चे
3. अर्जदार यांनी ठाणेदार अर्जुनी मोर यांना सादर केलेले अर्ज दि.24.3.08 चे
4. उक्त दि.24.3.08 चे अर्जाप्रमाणे ठाणेदार अर्जुनी मोर यांनी आम्हास मागीतलेले मार्गदर्शन संबंधाने त्यांचे पत्र क्र.717/08 दि.13.5.08 प्रमाणे आमचे मार्गदर्शन कार्या. पत्र क्र.650/08 दि. 17.5.08 चे
5. मा.पोलीस अधीक्षक गोंदिया कडून प्राप्त अर्जदाराचे अपीलीय अर्ज दि.27.5.08 चे
6. अर्जदाराने मागितलेली माहिती अर्जदारास तात्काळ पुरविण्याबाबत ठाणेदार अर्जुनी मोर यांना पाठविलेले कार्या. पत्र क्र.863/08 दि. 16.6.08 चे
7. अर्जदारास माहिती पुरविण्यात आले बाबदचे ठाणेदार अर्जुनी मोर यांचे पत्र क्र. 978/08 दि. 26.6.08 चे व अर्जदारास माहिती मिळाल्याबाबद पत्र दि.25.6.08 चे
8. अर्जदार यांनी माहिती मिळण्याकरीता आम्हास सादर केलेले अर्ज दि.30.6.08 चे
9. अर्जदाराने मागितलेली माहिती संकलीत करणे कामी ठाणेदार अर्जुनी मोर यांना दिलेले पत्र जा.क्र.1100/08 दि.18.7.08 चे
10. अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती दि. 30.7.08 रोजी घेवून जाण्याबाबत दिलेले बिनतारी संदेश दि.28.7.08 चे व दि. 29.7.08 रोजी इत्तला तामिल प्रत.
11. मा.पोलीस अधीक्षक गोंदिया तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि.15.9.08 चे निर्णय प्रत
12. ठाणेदार अर्जुनी मोर यांना अर्जदारास माहिती पुरविणेबाबतचे का.जा.क्र.2034/08 दि. 22.10.08 अन्वये पत्र

13. ठाणेदार अर्जुनी मोर यांनी अर्जदारानी मागितलेली माहिती दि.27.10.08 रोजी पुरविली त्याची पोच व पो.स्टे.जा.क्र.1749/08 दि. 3.11.08 अन्वये पुर्तता अहवाल.

3. अपीलीय अर्ज प्राप्त झाल्यापासून मुदतीत माहिती देण्याबदल अर्जदाराशी केलेला संपूर्ण पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती सलग्न केल्या आहेत

4. अपीलीय अर्जाची छायांकीत प्रत

5. मागणी केलेली माहिती ठाणेदार मार्फत अर्जदारास मुदतीचे आत दिलेली आहे.

सदरचे खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना आतापर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. स्वतःच्या बयाणाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की अर्जदाराची तक्रार म्हणजेच बयाण असते व त्यामुळे स्वतंत्रपणे बयाण घेण्याची आवश्यकता नसते व त्याची द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केल्याप्रमाणे तोंडी चौकशी झाली असली तरी त्या बयाणाच्या प्रती उपलबध होवू शकणार नाही असे जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले. सदरच्या प्रकरणात कागदपत्राच्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे किंवा पोलीस स्टेशनमध्ये जी जी माहिती उपलब्ध आहे ती संकलीत करुन अपीलकर्ता यांना देण्याचा प्रयत्न केला होता ही बाबा अपीलकर्ता यांनी मान्य केली. परंतु अपीलकर्ता हे जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित झाले नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व ही बाबा अपीलकर्ता यांनीसुध्दा मान्य केली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी यांचेकडे स्वतः प्रत्यक्ष जावून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी यांचेकडे प्रत्यक्ष संपर्क साधून उर्वरीत माहिती उपलब्ध करुन घ्यावी. किंवा त्याबाबत योग्य ते निर्णय करुन माहिती समजून घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 891/2008.**

श्री डॉ. अरुणकुमार शंकरराव फालके
मु. पो. माढेळी ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वैद्यकीय अधिकारी
प्राथमिक स्वास्थ केंद्र नागरी
ता. वरोरा जि. चंद्रपूर

2) डॉ. हुमणे
जन माहिती अधिकारी तथा
वैद्यकीय अधिकारी
प्राथमिक स्वास्थ केंद्र नागरी
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राथमिक स्वास्थ केंद्र नागरी पं. स. वरोरा यांचेकडे एक जाने. ते 7 एप्रिल 2008 या कालावधीतील प्राथमिक स्वास्थ केंद्र नागरी येथील माहिती एकुण 5 मुद्यात मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. निरंक प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांना माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. परंतु माहिती घेण्यास ते आलेले नसल्यामुळे त्यांना दि. 28.5.2008 रोजी माहिती उपलब्ध आहे घेवून जावी असे कळविलेले असून सुध्दा ते माहिती घेण्यास आले नाही. प्रथम अपीलाच्या नंतरसुध्दा माहिती घेवून जाण्यास आलेले नाही परंतु माहिती तयार आहे. आजही अपीलकर्ता हे गैरहजर आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यास कोणतेही स्वारस्य नाही असे दिसून येत असल्यामुळे सदरचे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 892/2008.**

श्री दत्तात्रय व्यंकटेश क्षिरसागर
क्वार्टर नं. डी 35, यमुना इमारत, वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मनोज सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

2) श्री मुन
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे जानेवारी 1992 ते ऑगष्ट 2008 पावेतो पदोन्नतीपासुन वंचित ठेवण्यात येत असल्याने शासनाच्या विषयांकित स्थायी आदेशाच्या तथा शिस्त वर्तणुक अपिल नियमातील कलमामधील तरतूदी जाणुन घेणेबाबत.

माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 30.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल

केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या दि. 21.8.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करतांना अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असून विभागाने प्रकाशित केलेली माहिती मागीतलेली आहे. यामध्ये स्थायी आदेशाच्या तरतुदी व नियमाच्या तरतुदीबाबत माहिती मागीतलेली आहे. दि. 3.2.2009 रोजी देण्यात आलेली माहिती प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त महसूल नागपूर यांचे कलम 19 (1) खालील अपील मधील आदेश दि. 15.12.2008 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे त्यांना वर्ष 1992 ते 2008 चे डि पी सी च्या कार्यवृत्ताच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या. अपीलकर्ता अर्जदाराचा अर्ज मोघम असल्याने अपीलात निर्णय देण्यात आलेला नाही अपीलार्थी हे जिल्हाधिकारी वर्धा यांचे अधिनस्थ कार्यरत आहेत. याच प्रकारे त्यांनी सादर केलेल्या मोघम अर्जावर त्यांना कार्यालयाचे पत्र दिनांक 1.1.2008 अन्वये चर्चेसाठी उपस्थित राहण्यास लेखी कळविण्यात आले आहे तसेच त्यांना डि पी सी च्या कार्यवृत्ताच्या प्रती देण्यात आल्या आहे. तथापी अर्जदार यांनी दि. 13.1.04 ला मा. आयुक्तांकडे पदोन्नतीच्या संदर्भात अर्ज केला होता. मा. आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचे आदेश दि. 18.3.05 अन्वये अर्जदार यांना दि.5.9.92 च्या निवड समितीने गोपनिय अहवाल प्रतिकूल स्वरुपाचे असल्याने अव्वल कारकून पदोन्नतीस अपात्र ठरविले. तसेच दि. 28.10.94 वेळेस पात्र ठरविले होते. परंतु सागवान लाकूड अवैध खरेदी व वाहतून करणे प्रकरणी न्यायालयात फौजदारी प्रकरणे सुरु असल्याने अव्वल कारकून पदोन्नतीचे आदेशात समावेश करण्यात आला नाही. नंतर दि. 18.1.96 ला पदोन्नती देण्यात आली. तसेच त्यांनी विहीत अर्हता प्राप्त केल नसल्यामुळे व 15.8.97 ला सूट प्राप्त केल्यामुळे त्यांना अव्वल कारकून संवर्गात पदोन्नती सन 92 पासून मानीव दिनांक म्हणून देता येणार नाही कळविले आहे.

पन्हा अर्जदार यांनी 18.2.09 अर्जान्वये सन 96 ऐवजी सन 92 पासून पदोन्नती देण्याचे आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात नगर पालिका प्रशासन शाखेत अव्वल कारकून म्हणून कार्यरत असतांना त्यांचे दप्तर मधील रिट पिटीशन क्र.1595/2006 मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर यांचे आदेश दि. 12.4.06 होते. सदर आदेशानुसार कार्यवाही कली नसल्यामुळे अवमान याचिका झाली होती. या प्रकरणी त्यांना निलंबित करुन विभागीय चौकशी करण्यात आली होती. त्याबाबतचे सर्व कागदपत्र अर्जदाराकडे आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 940/2008.**

श्री रामसागर पुंडलीक पिलेवान
83 हिंदुस्थान कॉलनी वर्धा रोड
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वा. स. मानकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक
भूमी अभिलेख भंडारा
ता. जि. भंडारा

2) श्री आर. बी. फडतरे
जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख पवनी
ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे मौजा पवनी येथील न.भू.क्र.2382 पिलेवान व इतर यांनी खरेदीदार दिपकभाई पटेल यांना पोट हिस्सा विकल्या प्रकरणी तसेच प्रमिलाबाई गजभिये यांना विकल्या प्रकरणी तसेच दयाराम व्यंकटी पिलेवान यांनी पोट हिस्सा जसे आहे त्या स्थितीत विकल्यामुळे खरेदीदारानी आपल्या कार्यालयातर्फे अधिकृत पोट हिस्सा मोजणी केली असल्यास अथवा खरेदीदाराच्या नावे फेरफार

झाल्यानंतर आपले तर्फे पोटहिस्सा मोजणी केली असल्यास संबंधीत दस्तऐवजाची पूर्तता करण्यात यावी अथवा तशी माहिती देण्यात यावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.10.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी दि. 6.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. माहिती उपलब्ध झाल्यानंतर दि. 17.10.2008 रोजी अपीलकर्ता यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना विसंगत माहिती दिली असे पत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या बाबतीत सुध्दा अधिक्षक भूमी अभिलेख यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आदेश दिलेले आहे असे कळविलेले होते. पुन्हा दि. 23.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना पोटहिस्सा मोजणी व मिळकत पत्रीकेच्या नकला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दिसून येतात. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माहिती उपलब्ध झाली परंतु ती त्यांनी मागीतलेली माहितीप्रमाणे नाही. त्यांनी खरेदीदारानी मोजणी केली असल्यास त्याबद्यलची माहिती द्यावी अशी मागणी केली होती. परंतु अर्जदार यांनी स्वतः केलेल्या मोजणीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे सदरची माहितीची त्यांना आवश्यकता नाही व ती विसंगत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की खरेदीदारानी मोजणी करुन घेतली नाही व त्यामुळे शेवटची मोजणी होती त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी खरेदीदारानी मोजणी केली असल्यास किंवा विभागाने केलेली असल्यास त्याबद्यलची माहिती आहे असे पुन्हा सांगीतल्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 28.7.2008 च्या अर्जात मागीतल्याप्रमाणे खरेदीदारानी मोजणी केली असल्यास किंवा विभागाने केलेली असल्यास त्याबद्यलची माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. माहिती न दिल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 939/2008.**

श्री जावेद अली जुल्फेकार अली
नातीक चौक, सर्कल नं. 1, भालदारपुरा
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुनिल वारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
नागपूर विभाग नागपूर

2) श्री डॉ. पी. वाय थोटे
जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य
पुरुषोत्तम थोटे समाज कार्य महाविद्यालय
नरसाळा रोड नागपूर 34 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य पुरुषोत्तम थोटे समाज कार्य महाविद्यालय उमरेड रोड नरसाळा नागपूर यांचेकडे कॉलेज मे मेरे बाबत संपूर्ण रेकॉर्ड 1993 से आगे. मस्टर कॉपी, पे रोल कॉपी, एल ई सी कि रिपोर्ट रजा अर्ज, कॉलेज ट्रॉफी कॉपी. सदरची माहिती नोंदणीकृत टपाला द्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 11.9.2008 रोजी आपले प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे याबाबतची संपूर्ण माहिती मा. न्यायालयासमोर पाठविण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रकरणाचा निपटारा होईपर्यंत आपल्याला अशाप्रकारची कोणतीही माहिती पुरविणे गैरकायदेशीर होईल. आपण मागीतलेली

संपूर्ण माहिती आपण मा. न्यायालयातून उपलब्ध करुन घेतलेलीच आहे. परंतू तीच माहिती आपणास महाविद्यालयाकडून पाहीजे असल्यास त्याच्या प्रतीकरीता रु. 325/– चा डी डी संस्थेच्या नावाने नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावा. आपल्याला माहितीची पूर्तता करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी रु. 325/– चा डी डी चा भरणा केलेला दिसून येतो. परंतु दि. 3.12.2008 रोजी मागितलेली माहिती 14 वर्ष अगोदरची आहे एवढया कालांतराची माहिती संस्थेकडे ठेवणे शक्य नसल्यामुळे व उपलब्ध नसल्यामुळे माहिती पुरविणे शक्य नाही. आपल्या मागणीनुसार कॉलेज ट्रान्सफर डीड सोबत पाठविण्यात येत आहे. यावरुन अपीलकर्ता यांना एकच प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.12.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थी यांना माहिती 8 दिवसात उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेतले. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांचेकडून एकुण रु. 325/– चा भरणा करुन घेतला असून एकच पृष्ठ माहिती पाठविलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी व प्राचार्य हे दोघेही मिळून माहिती देत नाहीत व त्यांना फिरवितात असे त्यांनी आयोगास सांगीतले. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी असे सांगितले की सर्व माहिती उपलब्ध आहे परंतु त्यांनी अर्ज केल्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल. जन माहिती अधिकारी यांचे युक्तीवादात व दि. 11.9.2008 च्या तसेच 3.12.2008 च्या पत्रात विसंगती दिसून येते. 3.12.2008 च्या पत्रात 14 वर्षा पूर्वीची माहिती ठेवणे शक्य नाही असे त्यांचे म्हणणे आहे व आयोगापुढे माहिती सर्व उपलब्ध आहे ती देता येईल असे त्यांनी सांगीतले. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे संगनमताने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या संबंधी माहिती सुध्दा त्यांचेकडे उपलब्ध आहे. यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयात अपीलकर्ता यांनी जी

माहिती मागितलेली आहे ती उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष छाननी करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष छाननी करुन हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांचे समक्ष अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घेवून विनामुल्य द्यावी.

2) अपीलकर्ता यांनी रु. 325/– चा भरणा केलेला आहे तो त्यांना परत करण्यात यावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दि. 18.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 938/2008.**

श्री जावेद अली जुल्फेकार अली
नातीक चौक, सर्कल नं. 1, भालदारपुरा
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मोहन शेटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी
नागपूर विभाग नागपूर

2) श्री सुनिल वारे
जन माहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
प्रशासकीय इमारत सिव्हील लाईन्स नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालयात समाज कल्याण मे हमारे बाबत संपूर्ण रेकॉर्ड पत्र क्र. 2063 दि. 24.7.97 पत्र क्र. वाय टेंड दि. 11.7.2006 पत्र क्र. वाय टेंड दि. 10.4. 2008 व पत्र क्र. वाय टेंड दि. 1.9.2008 संपुर्ण कारवाई कागदपत्र नोंदणीकृत टपालाद्वारघेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 14.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र हे सहसंचालक (शिक्षण) यांनी विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत केलेले दिसते. प्रथम अपीलाच्या संनावणीच्या नोटिसेस

काढण्यात आलेल्या दिसतात. तसेच प्राचार्य यांना स्पष्टीकरण मागीतलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे समाधानपूर्वक माहिती मिळालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 8.9.08 च्या अर्जाच्या संदर्भामध्ये सदर माहितीचा अर्ज आवक जावक विभागाकडून नजरचुकीने संबंधीत शाखेकडे हस्तांतरीत न झाल्यामुळे सदर माहितीच्या अर्जावर कार्यवाही होवू शकली नाही. मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांना दोन पत्राच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये दि. 24.7.97 अन्वये रेकॉर्डचे या कार्यालयात शोध घेतला असता तो उपलब्ध झालेला नसुन सदरचा रेकॉर्ड आपणास उपलब्ध करवून देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचे कार्यालयामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेल्या दोन पत्राचा उल्लेख आढळून येत नाही. पत्र क्र. 2063 दि. 24.7.97 व पत्र क्र. 2063 दि. 10.4.08 ची नोंद जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचेकडून घेवून सदरचे पत्रावर झालेली कार्यवाही अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना पत्र क्र. 2063 दि. 24.7.97 व पत्र क्र. 2063 दि. 10.4.08 या संदर्भामध्ये झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता यांचा दि. 8.9.2008 चा अर्ज जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे नुसार त्यांचेकडे सादर झालेले नसल्यास संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येवून शास्ती करण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 61/2009.**

श्री लक्ष्मण सदाशिवराव कारवटकर
भू. क. 3 रेल्वे चौकीजवळ मनीषनगर
सोमलवाडा वर्धा रोड नागपूर 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एच. सुज्जेकवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर

2) श्री ए. एस. देशभ्रतार
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे मौजा परडी ख.क.50/1 भू.मा.क.5,6,7 सुधारीत भू.मा.क. 33 बाबत सन 1994 ते 2006 या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.12.2008 रोजी देण्यात आलेला असून मुद्दा क. 1 बाबतचा दस्तऐवज त्यांचे कार्यालयास शोध घेवून उपलब्ध असल्यास पुरविण्यात यावी. न्यायालयीन प्रकरण

प्राप्त करावे व पुरविण्यात यावे. भ्रष्टाचार चौकशी विभागाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी व मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती दि. 10.1.2009 पर्यंत द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे दि. 14.10.2008 रोजी कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी तीन्ही मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान झालेले नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी 1994 मध्ये नासुप्रकडे बॅकेच्या पावती प्रती जोडलेल्या आहेत व त्याबाबतचा पुरावा सादर केलेला आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी मागितलेल्या पावत्या हया नस्तीमध्ये नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ज्या सर्व नस्ती असतील त्या एकत्रित करुन त्यातील माहिती जुनी असल्यामुळे पाहणी करुन जर ती माहिती उपलब्ध असेल तर त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून प्रत्यक्ष नस्तीची पाहणी करुन त्या आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत वेळ व तारीख कळविल्यास अपीलकर्ता यांना त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 816 / 2008.**

श्री अमृत धरमदास नारनवरे
मु. पो. शहापूर ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
चेअरमन
आय.सी.एम.सी.एच. रिजनल सेंटर
मातृसेवा संघ सिताबर्डी नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
रजिस्ट्रार
आय.सी.एम.सी.एच. रिजनल सेंटर
मातृसेवा संघ सिताबर्डी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता दि. 10.6.2008 रोजी हजर होते. परंतु उत्तरवादी यांनी मुदत मागीतलेली होती. व त्यामुळे आज उत्तरवादीनी त्यांचा खुलासा दाखल केलेला आहे. परंतु अपीलकर्ता आज हजर राहीलेले नाही. उत्तरवादी तर्फे ॲड. श्री घोडेस्वार यांनी युक्तीवाद केला.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून डॉ. सौ. रेखा जयस्वाल रजिस्ट्रार आय.सी.एम.सी.एच. यांचेकडे डॉ. रेखा जे. रामटेके यांची कोणत्या वर्षी प्रवेश व कोणत्यावर्षी हया कोर्स पुर्ण करणार वगैरे 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दि. 27.6.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी दि. 23.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल

केलेले होते. अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु दि. 6.7.2008 रोजी अपीलकर्ता यांना पत्र दिले असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांनी जोउलेली नाही व त्यात त्यांना योग्य माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस उत्तरवादी तर्फे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

डॉ. सी.एस.डॉन, इंडियन कॉलेज ऑफ मॅटर्नल ॲण्ड चाईल्ड हेल्थ ऑफ इंडिया (आय.सी.एम.सी.एच.) ही एक नॅशनल असोसिएन फॉर रिप्रोडक्टीव्ह ॲण्ड चाईल्ड हेल्थ ऑफ इंडिया कलकत्ता पंश्चिम बंगाल च्या संस्थेची अभ्यासागत शाखा आहे. हया आय. सी.एम.सी.एच. तर्फे वैदयकीय विदयार्थ्यांना प्रसुती शास्त्र स्त्री रोग हया विषयात व्यवहार्य पध्दतीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. उत्तरवादीची संस्था कोणत्याही प्रकारे शासनाच्या निधीवर अवलंबून नसुन त्यास शासन वा इतर प्रशासनातर्फे कोणतीही आर्थक मदत उपलब्ध होत नाही. उत्तरवादी संस्थाचा खर्च हा पूर्णतः विदयार्थ्याकडून जमा केलेल्या फी वर चालतो. त्यामुळे उत्तरवादी संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (एच) प्रमाणे Public Authority ठरत नाही. म्हणून हया प्राथमीक जवाबाद्वारे प्रथम अपीलकर्त्यांनी उत्तरवादी संस्था ही Public Authority आहे किंवा नाही हयाबद्यल सबळ पुरावा सादर करणे जरुरीचे आहे. उत्तरवादी आय.सी.एम.सी.एच. संस्थेचे क्षेत्रीय केंद्र असून त्यांच्या विदयार्थ्यांना व्यवहार्य प्रशिक्षणासाठी मान्यताप्राप्त वैदयकीय दवाखानामध्ये पाठवितात त्याकरीता उत्तरवादी संस्था ही शासनाच्या कोणत्याही निधीचा वार करीत नाही. तसेच उत्तरवादी संस्था ही पूर्णतः स्वयंचलीत असुन त्यास Public Authority म्हणून संबोधले जावू शकत नाही. म्हणून अर्जदाराची हया आदरणिय आयोगासमोर केलेली अपील प्रथमदर्शनी योग्य ठरु शकत नाही.

अर्जदार अपीलकर्ता हे एक संस्थेच्या मार्फत शिकत असलेल्या महीला विदयार्थीनी विषयी वारंवार चौकशी करण्याकरीता संस्थेच्या कार्यालयात येवून संस्थेच्या

पदाधिकारींना त्रास देतात व त्यांच्याशी वाद घालतात. त्यामुळे महीला विदयार्थी व संस्थेस बराच त्रास सहन करावा लागत आहे. ही अपील अशाच कृत्यातून उद्‌भवलेली असून त्यामध्ये उत्तरवादी संस्थेचा काहीच दोष नसून अपीलकर्ता हा जाणूनबुजून त्रास देण्याच्या दृष्टीने आयोगासमोर अर्ज करीत आहे.

त्यामुळे हया आदरणिय आयोगास उत्तरवादी संस्था असे कळवित आहे की आदरणिय उच्च न्यायालयाच्या डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को.ऑपरेटिव्ह बॅक अमरावती विरुध्द राज्य माहिती आयुक्त नागपूर 2009 (3) एम.एच.एल.जे. 364 निर्णयानुसार उत्तरवादी संस्था Public Authority ठरत नसल्यामुळे सदर अपील खारीज करण्यात यावी. सदरच्या खुलाशावरुन आय.सी.एम.सी.एच. ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (एच) मध्ये सार्वजनिक प्राधिकरण म्हणून समावेश होत नाही असे दिसून येते व सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) उत्तरवादी ही संस्था माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (एच) मध्ये सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 72/2009.**

श्री केशव महादेव नितनवरे तर्फे सतिश केशव नितनवरे
बुध्दनगर 1227 युनिट 2 अशोक चौक
चंभार नाला कामठी रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी नागपूर

2) श्री अशोक फेंडरकर
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार
नागपूर ग्रामीण नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे सांगितल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 23.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 923/2008.**

श्री योगीराज मांगोजी मेश्राम
रा. फुलचुर पेठ पो. फुलचुर
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद गोंदिया

2) जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असून त्यांचे समाधान झालेले आहे असे आयोगापुढे लिहुन दिले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 20.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 922/2008.**

श्री उत्तम ईश्वर उमक
जुना दिघोरी नवनाथ आय टी आय रोड
वैभव नगर प्लॉट नं. 165 नागपूर ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

1) श्री एस. एन. आंबाडेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक
म.रा.परिवहन महामंडळ
नागपूर विभाग नागपूर

2) श्री आर. ए. बीरे
जन माहिती अधिकारी तथा
म.रा.परिवहन महामंडळ
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असून त्यांचे समाधान झालेले आहे त्यामुळे प्रकरण पुढे चालवायचे नाही असे आयोगापुढे लिहुन दिले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 20.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 924 / 2008.**

श्री योगीराज मांगोजी मेश्राम
रा. फुलचुर पेठ पो. फुलचुर
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद गोंदिया

2) जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असून त्यांचे समाधान झालेले आहे असे आयोगापुढे लिहुन दिले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 20.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 66/2009.**

श्री शरद बळीरामजी ढगे
नवि शुक्रवारी फवारा चौक
हनुमान मंदीरा समोर नागपूर ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त -1
महानगर पालिका नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
वार्ड अधिकारी
झोन क्र. 4 धंतोली
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा वार्ड अधिकारी झोन क्र. 4 यांचेकडे मनपा घर क्र. 551 दक्षिणेकडील श्री माणिक कोठे आणि श्री ढगे यांचे घरादरम्यान मोकळी जागा (गल्लीत) अतिक्रमण करुन केलेले नविन बांधकामाबाबत तक्रार दि. 17.7.2008 ची त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 24.10.2008 रोजी गैरअर्जदाराचे बांधकामाचे शहानिशा करण्याकरीता जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे व बांधकामाच्या मंजूर नकाशाची प्रत सादर करणेबाबत गैरअर्जदाराला दि. 6.9.2008 ला पत्र देण्यात आले व पुढील कार्यवाही सुरु आहे असे सांगण्यात आलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे

अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.10.2008 रोजी देण्यात आलेला असून विभागाने अपीलार्थीस 8 दिवसात माहिती द्यावी व अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळेही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या तक्रार अर्जाची चौकशी केली नाही व त्याबद्यलची माहिती त्यांनी मागीतलेली होती परंतु सदरच्या तक्रारीची चौकशीसाठी गैरअर्जदाराला दि. 6.9.2008 रोजी पत्र देण्यात आले आहे याचा अर्थ त्यांच्या तक्रारीवर कार्यवाही सुरु आहे असा होतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना कार्यवाहीची माहिती उपलब्ध झाली असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. परंतु आता सदरच्या तक्रारीवरील कार्यवाही पूर्ण झालेली असल्यास अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 5.8.2008 च्या अर्जा नुसार विचारलेल्या माहिती बद्यल वस्तुस्थिती त्यांना कळविण्यात आलेली असली तरी आज चौकशी पुर्ण झालेली असल्यास त्याप्रमाणे त्यांना निर्णय कळविण्यात यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 951/2008.**

श्री प्रमोद मारोतराव पांडे (उपाध्यक्ष जनमंच नागपूर)
एम 5 प्रिमियम प्लाझा खरे टाऊन
धरमपेठ नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एम. सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.8.2008 रोजी श्री दिपक करंडे नायब तहसिलदार (सध्या वर्धा येथे कार्यरत) यांचेवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील माहिती नोंदणीकृत पोष्टाने जन माहिती अधिकारी कार्यालय यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 27.11.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तत्पूर्वी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही..

म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 20.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे प्रथम अपीलावरती निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील करतांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली व त्यांचेविरुध्द शास्ती लादण्यात यावी अशा प्रकारची विनंती आयोगाकडे केली आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना माहिती जी मागीतली होती त्यापैकी मुद्या क्र. 1 ची माहिती त्यांना उपलब्ध झाली परंतु ती विलंबाने उपलब्ध झाली. मुद्या क्र. 2 ची माहितीच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती त्यांचे कार्यालयात नसून पोलीस कार्यालयात असते व त्यामुळे ती त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही तसे त्यांना कळविण्यात आलेले आहे. विलंबाच्या बाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की कार्यालयात कर्मचारी कमी असल्यामुळे तसेच संबंधित लिपीकानी अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर केले नसल्यामुळे उपलब्ध करुन देता आली नाही असे दिसून येते. परंतु एक बाब स्पष्ट आहे की 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली नाही. व ही जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या खाली माहिती 30 दिवसात द्यावी लागते व ती न दिल्यास शास्तीची तरतुद आहे व त्यामुळे माहिती मागण्याच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी स्वतः सतर्क असणे आवश्यक आहे तसेच स्वतंत्र आवक नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु कोणत्याही कार्यालयात स्वतंत्र आवक जावक नोंदवही ठेवली नसल्यामुळे माहितीच्या अर्जाची दखल संबंधीत लिपीक घेत नाही असे दिसते व याबाबत कार्यालय प्रमुखाची अकार्यक्षमता आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे सदरच्या प्रकरणी विलंबाने माहिती दिली असल्यामुळे शास्ती लादणे आवश्यक आहे. आज तत्कालीन जन माहिती अधिकारी आयोगापुढे हजर नाही व त्यामुळे त्यांना अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादावयाची झाल्यास त्यांचे म्हणणे कलम 20 (1) च्या परंतुकाप्रमाणे एकुन घेणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे अर्ज संबंधीत लिपीकानी सादर केले नसल्यामुळे विलंब झाला परंतु

त्याबाबतचा पुरावा आयोगापुढे सादर केला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा संबंधीत लिपीक यापैकी जे जबाबदार असतील त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही शिफारस करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 27.8.2008 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी किंवा संबंधीत लिपीक यापैकी जे जबाबदार असतील त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी यांनी 3 महिन्यात आयोगाकडे सादर करावा

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हाधिकारी वर्धा** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 954 / 2008.**

श्री लिलाधर काशीनाथ गजभिये
मु. करंभाड पो. ता. पारशिवनी
जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एन. एल. भोयर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषी अधिकारी
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) श्री एम. जी. निमजे
जन माहिती अधिकारी तथा
कृषी अधिकारी
तालुका कृषी अधिकारी कार्यालय
पारशिवनी ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी यांचेकडे एकुण तीन मुद्यांवर सन 2003 ते 2007 या कालावधीत तालुका कृषी

विभाग पारशिवनी अधिनस्त सेवानिवृत्त झालेल्याची सविस्तर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 16.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी रामटेक यांनी सदरची माहिती तालुका कृषी अधिकारी पारशिवनी यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे दि. 12.6.2008 नुसार माहिती अधिकारी कार्या. ताकृअ पारशिवनी व प्रत संबंधीत अर्जदारास देवून अपीलात मत मांडण्याची संधी देण्यात आली. परंतु अर्जदार उपस्थित झाले नाही. परंतु माहिती अधिकारी कार्या. ताकृअ पारशिवनी हे माहितीस व दस्तऐवजासह उपस्थित झाले नसल्यामुळे निर्णय देण्यात आला नाही असा खुलासा केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबद्यल खुलासा करतांना असे सांगीतले की कार्यालयात कर्मचारी नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन घेणे शक्य झाले नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्याबाबत कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित दिसून येत नाही. कमीत कमी पाच वर्षाच्या कालावधीतील सेवानिवृत्त झालेल्याची अधिकारी व कर्मचा–याची संपूर्ण माहिती तसेच प्रत्येक अधिकारी सेवानिवृत्त होताना केलेल्या कार्यक्रमाची माहिती मागितलेली दिसून येते. याबाबत कोणत्याही प्रकारचे जनहित दिसून येत नाही. त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यात कोणत्याही प्रकारचे जनहित दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी वर्तमानपत्रात कृषी अधिकारी कार्यालयाने केली माहिती अधिकाराची थट्टा असे छापून आणलेले आहे. परंतु वर्तमानपत्रात सुध्दा माहिती काय मागीतलेली आहे याची शहानिशा केल्या शिवाय अशा प्रकारची बातमी छापणे याबाबत विश्वासार्हता राखणे आवश्यक आहे. सदरची बातमी त्रास देण्याच्या उद्येशाने छापली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 955/2008.**

श्री अश्वनीकुमार बागडे
श्रीनगर वार्ड संत रविदास पुतळयाजवळ
श्रीनगर गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) कु. ममता झा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद गोंदिया
2) श्री आर. डी. मुंगघाटे
जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.22.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी शिक्षण विभाग शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे श्री डोंगरे ऑल इंडिया एज्युकेशन एन्टीकरप्शन गोंदिया जिल्हयाच्या बाबतीत खालीलप्रमाणे माहिती पुरविण्याबाबत.

संघटनेला आपल्या विभागातील नोंदणीचे प्रमाणपत्र नियमावली इत्यादी माहिती

मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता हे स्वतः अध्यक्ष नागपूर विभाग टिचर्स वेलफेअर ऑर्गनायझेशन आहे असे दिसते. सदरच्या अर्जावर अनेक पदाधिका–यांच्या सहया दिसून येतात. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 3.5.2008 रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी श्री बी.एन.डोंगरे यांना त्यांच्या संबंधीत माहिती मागीतलेली असल्यामुळे परस्पर माहिती पुरविण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही पुन्हा श्री डोंगरे यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा करतांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संघटनेचे पदाधिकारी म्हणून मागीतलेली आहे. तशी तरतुद अधिनियमात नाही. व माहिती सुध्दा अध्यक्ष ऑल इंडिया एज्युकेशन एन्टीकरप्शन ऑर्गनायझेशन गोंदिया जिल्हा अशी मागीतलेली आहे. अशा प्रकारची कोणतीही संघटना शिक्षणाधिका–याकडे नोंदणीकृत नाही. त्यामुळेच सदरची माहिती श्री डोंगरे यांनीच द्यावी म्हणून त्यांना पत्र दिलेले होते. सदरची माहिती ही दोन संघटनातील भांडण आहे. व त्याबाबत शासकीय अधिका–यांना वेठीस धरण्यात येत आहे असे आयोगापुढे सांगितले. यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणती माहिती मागता येते याबद्यलची काहीही माहिती अध्यक्ष

टिचर्स वेलफेअर यांना दिसून येत नाही व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 70/2009.**

श्री केशव महादेव नितनवरे तर्फे सतिश केशव नितनवरे
बुध्दनगर 1227 युनिट 2 अशोक चौक
चंभार नाला कामठी रोड नागपूर
(पोष्ट डॉ.आंबेडकर मार्ग इंदोरा) ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी/सक्षम प्राधिकारी
नागरी जमीन कमाल धारणा नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय परीसर नागपूर
2) श्री पी. पी. सोनारे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. नगर रचनाकार
नागरी जमीन कमाल धारणा नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय परीसर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी यांना एकुण 23 मुद्यांवर त्यांनी दि. 15.10.2007 रोजी दिलेल्या अर्जाप्रमाणे तसेच केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये प्रश्नोत्तराच्या माध्यमातून माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 21.2.2008 रोजी आपण मागणी केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने फाईल क्र. 36 टी.डी. 38 दि. 1.11.94 व यु.एल.सी.मामला क्र. 21/93 हे मुळ प्रकरण कार्यालयात उपलब्ध आहे. यास्तव आपण त्वरीत या कार्यालयात येवून प्रत्यक्ष मुळ प्रकरणाची पाहणी करावी व आवश्यक असलेली कागदपत्रे स्वखर्चाने अथवा उक्त कागदपत्रांच्या छायांकीत प्रती डाक नोंदीने डाक नोंदीचा व छायांकीत प्रतीचा खर्च चालानीद्वारे शासनाकडे जमा करुन आवश्यक असलेले कागदपत्रे आपणास उपलब्ध करुन देता येतील. उपलब्ध झालेल्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 9.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.5.2008 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी अर्जदाराचे विनंतीनुसार त्यांना अभिलेखातील उपलब्ध अभिलेखानुसार मुद्येनिहाय माहिती सात दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी. अर्जदारास प्रमाणीत प्रतीची आवश्यकता असल्यास त्यांनी नक्कल विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथे अर्ज सादर करुन प्रमाणीत प्रतीची मागणी करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. 15.5.2008 रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की मुद्या क्र. 4 मधील शासन निर्णय 1,2,3 हे त्यांना उपलब्ध झाले नाही. त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन द्याव्या. लोकशाही दिनांत दि. 1.4.2004 च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये अहवाल मागितलेला होता परंतु तो उपलब्ध झाला नाही. त्यामुळे त्यांना माहिती ही अपुर्ण मिळाली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांनी

जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये ज्या ज्या नस्त्या आहे त्या त्या नस्त्यामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध आहे असे दिसून येते. व जी उपलब्ध आहे ती त्यांना दिलेली आहे. परंतु तरी सुध्दा शासन निर्णय हे त्यांना शासनाकडून मागवून उपलब्ध करुन दिले जाते असे नमुद केले व त्यांच्या दि.1.4.02 च्या तक्रारीवरील अहवालसुध्दा उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन दिला जाईल त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत दि. 8.2.2008 मधील मुद्या क्र. 4 मध्ये नमुद केलेले शासन निर्णयाच्या प्रती व दि. 1.4.2004 च्या तक्रारीवरील अहवाल हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
**दि. 23.6.2009**

**( विलास पाटील )**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**राज्य माहिती आयोग,**<br>
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 71/2009.**

श्री केशव महादेव नितनवरे तर्फे सतिश केशव नितनवरे
बुध्दनगर 1227 युनिट 2 अशोक चौक
चंभार नाला कामठी रोड नागपूर
(पोष्ट डॉ.आंबेडकर मार्ग इंदोरा) ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मामेवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
विभागीय कार्यालय विभाग क्र.2
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या.
सिव्हील लाईन आकाशवाणी चौक
इव्हेजलीकल लुधरन चर्च मागे नागपूर 1.

2) श्री एस. वानखेडे
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. विभाग क्र.1 (ग्रामीण)
खरे टावून धरमपेठ नागपूर (पश्चिम) नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.2.2008 रोजी सहाय्यक अभियंता तथा जन माहिती अधिकारी श्री आर.के.गुप्ता यांचेकडे मौजा लाव्हा नागपूर (ग्रामीण) येथील प.ह.नं. 4 खसरा नं. 50 आजाजी 10.01 हेक्टर (एकुण 23 एकर) शेत जमीनीवर महादेव नगर या नावाने ले आऊट विकसीत असून त्यावर सहाय्यक अभियंता यांच्या मंजूरीने प्रस्तावीत सदर ले आऊट मध्ये विजेचे लोखंडी खांब आणि डी पी याची व्यवस्था करण्यात आली

आहे. विजेचे लोखंडी खांब आणि डी पी लावण्याकरीता कोणत्या व्यक्ती,अधिकारी, जनप्रतिनिधीने शिफारस केले होते ? अशाप्रकारे एकुण सहा मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.3.2008 रोजी एकुण चार मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 9.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 14.5.2008 रोजी देण्यात आलेला असून माहिती उपविभाग क्र.1यांचेशी संबंधीत असल्याने सहाय्यक अभियंता नागपूर यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे महादेव नगर येथील ले आऊटच्या विद्युतीकरणाकरीता श्री मनोहर भट गांधीनगर यांनी सादर केले आहे. त्याची छायांकीत प्रत अर्जदारास 8 दिवसाचे आंत सादर करतील असे आदेश कळविण्यात आलेले दिसते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती अपुर्ण व दिशाभूल करणारी आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिप्रायसुध्दा मागितलेले आहे. जे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे अपेक्षित नाही. जी कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते ती कागदपत्रे न्यायालयात सादर झालेली होती. परंतु ती आता प्राप्त झाली असून उपलब्ध करुन देता येईल असेही त्यांनी सांगितले. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेली कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय हे अपेक्षित नाही त्यामुळे प्रश्न वगळून ज्यातून कागदपत्रे उपलब्ध होतील अशी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. कोणतीही माहिती तयार करुन देणे सुध्दा अपेक्षित नाही. व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देतांना योग्य अशी माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपील व द्वितीय अपील सादर करावे लागले. प्रथम अपीलात सुध्दा चौकशी करुन निर्णय देणे आवश्यक असते. परंतु

जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न विचारता माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिले जातात व त्यामुळे अपीलकर्ता यांना द्वितीय अपील करावे लागते. व त्यामुळेच तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अपूर्ण माहिती दिल्यामुळे दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे विनामुल्य रजिस्टर पोष्टाने किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावे. व पोच घ्यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत योग्य ती माहिती दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी **मुख्य अभियंता विभागीय कार्यालय क्र. 2 महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या.नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 941/2008.**

श्री मोतीराम भदुजी ढेंगळे
बवणे ले आऊट वरोरा पो.
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा परिषद कार्यालय चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे 75 टक्के भत्ता मिळावा अशी माहिती

मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना आपण मागितलेली माहिती माहितीच्या अधिकारात मोडत नाही त्यामुळे मागितलेली माहिती पुरवता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्यास पत्र दिलेले दिसून येतात. परंतु अपीलकर्ता हे उपस्थित झालेले नसल्यामुळे निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी दि. 16.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपीलात नविन मुद्दे उपस्थित केलेले दिसून येते. परंतु नविन मुद्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. अपीलकर्ता हे नंतर हजर झाले व त्यांनी सांगीतले की त्यांना कोणत्याही प्रकारचे उत्तर किंवा पत्र मिळालेले नाही परंतु प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 6.12.2008 रोजी नोटीस व दि. 27.12.2008 ची नोटीस प्राप्त झाल्याची त्यांची सही दिसून येते परंतु त्याबाबतही त्यांनी आयोगापुढे कोणत्याही प्रकारे खुलासा सादर केला नाही. मात्र दि. 8.10.2008 चे पत्रानुसार अपीलकर्ता यांना जे उत्तर दिले आहे ते योग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करुन मिळत नाही तर कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध होते. अपीलकर्ता यांची मागणी ही 75 टक्के उदरनिर्वाह भत्ता मिळावा अशी आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करतांना श्री मो. भं. ढेंगळे हे पं. स. वरोरा येथे मिस्त्री ग्रेड 1 हे हया पदावर कार्यरत असतांना 1748 पोती सिमेंट गैरव्यवहाराबाबत दोषी आढळून आल्याने त्यांना निलंबित करण्यात आले. सध्याचे स्थितीत हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. श्री मो.भं.ढेंगळे यांना देय असलेल्या निर्वाह भत्याच्या दरात 50 टक्के दराने वाढ करण्यात आली असून त्यांना थकबाकी देण्याची कार्यवाही पं.स.भद्रावती कडून सुरु आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे अपीलकर्ता यांना फेब्रुवारी 2009 मध्ये 75

3

टक्के उदरनिर्वाह भत्ता मंजुर झाला आहे असे सांगीतले. खुलासा व तोंडी युक्तीवादामध्ये विसंगती दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या अर्जात मागीतलेली माहीती ही अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसली तरी त्यांना योग्य ती माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या निर्वाह भत्याच्या संदर्भामध्ये झालेल्या निर्यायाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिति आयुक्त,**
**राज्य माहिति आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 903/2008.**

श्री राजेंद्र भोजराज मेश्राम
मु. सेलोटपार
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) कु. ममता झा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद गोंदिया
2) श्री शिवशंकर बिसेन
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
सुभाष विद्यालय मुंडीकोटा
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे प्रोसींडींग बुकची सत्यप्रत (1978 पासुन) व रोस्टरची सत्यप्रत अप्रुव्हल प्रत लेखा परिक्षण करणा—या अधिका—याचे स्वाक्षरीनिशी सत्यप्रत व शाळेची ग्रॅन्ट व खाते कोणत्या बॅकेत आहेत त्याची छायांकित प्रत.

सदरची माहिती व्यक्तिशः टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राची प्रत जोडललेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीला सोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जे दाखल केलेले आहे ते संशयास्पद आहे. त्यावर सिल नाही तसेच ते सरपंचाने दिलेले आहे. व त्यामुळे ते ग्राहय धरण्याची आवश्यकता नाही. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा दि. 4.9.2009 चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झालेला नाही. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे तसेच आयोगापुढे सदरचा अर्ज त्यांनी दिला होता योबद्यलचा पुरावा सादर केलेला नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरावे लागते. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे सुनावणीस हजर झाल्यानंतर अर्जाची प्रत प्राप्त झाली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र अपीलकर्ता हा सुनावणीस उपस्थित राहात नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. व अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नाही असा निर्णय घेवून प्रथम अपील खारीज करण्यात आले असे सांगितले. जन माहिती अधिकारीयांनी असेही सांगितले की मागितलेली माहिती ही मोघम आहे. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. त्याबाबतही अपीलकर्ता यांनी कोणतेही स्पष्टपणे स्पष्टीकरण द्वितीय अपीलात दिलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 907/2008.**

श्री ताराचंद सागरमल चौबे
मारवाडी मोहल्ला सराफा लाईन
वर्धा 442001
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी वर्धा
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
2) श्री मुन
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.8.2008 रोजी दि. 1.11.2007 ते 31.8.2008 या कालावधीत नगर परिषद ॲडमिनीस्ट्रेशन व अधिक्षक भूमि अभिलेख यांच्या कार्यालय संदर्भात दिलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता हे दि. 26.9.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन घेण्यास गेले होते व त्याबाबतचा पुरावा त्यांनी दिलेला

आहे. त्यानुसार त्यांना दि. 30.9.2008 रोजी मागितलेली माहिती संकलीत करण्याचे काम सुरु असून संबंधिताकडून माहिती मिळताच आपणास तात्काळ पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरची माहिती दि. 24.10.2008 रोजी तयार असल्याबाबत व ते घेवून जाण्यास कळविण्यात आले. अपीलकर्ता यांना दि. 27.10.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खुलासा करतांना सदर शाखेत एकच लिपीक असून अर्जदाराने मागितलेली माहिती ही वेगवेगळया प्रकरणाशी संबंधित असल्याने व एकुण 91 प्रकरणाची माहिती असल्याने माहिती संकलीत करण्यास विलंब झाला असा खुलासा केला आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये त्यांनी स्वतः लोकशाही दिनात दिलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती दिलेली नाही. यावरुन माहिती अपुर्ण दिलेली आहे असे सिध्द होते. अपीलकर्ता यांचा अर्ज हा दि. 22.8.2008 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी स्मरणपत्र दिल्यानंतर भूमी अभिलेख वर्धा प्रभारी अधिकारी विशेष भूसंपादन वर्धा मुख्याधिकारी नगर परिषद देवळी पुलगाव आर्वी हिंगणघाट यांना दि. 30. 9.2008 रोजी पत्र दिलेले दिसून येते. याचा अर्थ अर्ज स्विकारला नाही. 30 दिवसाच्यापर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही त्या अर्जावर करण्यात आलेली दिसून येत नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती निश्चितपणे व्यापक स्वरुपाची व इतर प्राधिकरणाकडून संकलीत करण्याची आहे. व त्यामुळेसदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब होणार हे निश्चित. परंतु अर्जाची दखल 30 दिवसात घेतलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द तसेच संबंधीत सहाय्य करणारे अधिकारी यांना शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 22.8.2008 च्या अर्जाची दखल संबंधीत लिपीक, अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

2) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **जिल्हाधिकारी वर्धा** यांनी जबाबदारी निश्चित करुन करावयाची आहे.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हाधिकारी वर्धा** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 908/2008.**

श्री शरद गोविंदा बोरकर
क्वार्टर नं.4, एम्प्रेस मिल क्वार्टर
प्लॉट नं. 150 बी वार्ड नं. 20 बेझनबाग
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त -1
महानगर पालिका नागपूर
2) श्री आर. व्ही. वारके
जन माहिती अधिकारी तथा
विकास अभियंता
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता यांचेकडे श्री चाणाक्ष गोंविंदा बोरकर यांनी प्लॉट नं. 150 बी चा नकाशा मंजूर करण्याकरीता आपल्या कार्यालयामध्ये जमा केलेला आहे त्याबाबतची फाईल बघावयाची आहे. सदर फाईलचे संपूर्ण कागदपत्राचे इन्स्पेक्शन करावयाचे आहे. फाईलमध्ये जी नोटशीट लागलेली आहे आणि इतर कागदपत्र लागलेले आहे त्याची झेरॉक्स प्रत खर्च देण्यास तयार आहे अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.9.2009 रोजी अपीलकर्ता यांना आपण मागणी केल्याप्रमाणे वरील नस्तीची तपासणी आपण विकास अभियंता यांच्या कार्यालयात जावून करावी व आवश्यक त्या दस्तऐवजाची मागणी करावी. नियमानुसार शुल्क भरल्यानंतर आपणास दस्तऐवजाच्या प्रती प्राप्त करता येतील. नियमानुसार शुल्क दि. 24.10.2008 रोजी भरण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तराप्रमाणे आतापर्यंत माहिती मिळालेली नाही त्याकरीता अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.10.2008 रोजी देण्यात आलेला असून विभागातर्फे अपीलार्थीस नस्तीची पडताळणी करुन कोणते कागदपत्र पाहीजे याची यादी देण्यासंबंधी सुचीत करण्यात आले. अपीलार्थीनुसुध्दा नस्ती पडताळुन कागदपत्र मागणी करण्याचे नमुद केले. व अपिल हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना दि. 26.2.2008 रोजी विकास अभियंता महानगर पालिका यांनी नस्तीची पाहणी करण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. परंतु खुलासा करतांना मात्र फोन करुन बोलविण्यात आले असा खुलासा केलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा दि. 16.9.2008 च्या पत्राचा उललेख नाही. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळालेले आहे असे अपीलकर्ता यांनीच आयोगाचे निदर्शनास आणले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून नस्तीची पाहणी करणे आवश्यक होते.

3

परंतु त्यांनी तसे न करता प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर मात्र अतिरिक्त खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे. प्रथम अपीलातसुध्दा त्यांनी दिनांक 26.9.2008 चे पत्र मिळाल्याचा उल्लेख नाही व माहिती उपलब्ध झालेली असूनसुध्दा माहिती पंजीबध्द डाकेने किंवा व्यक्तीशः पाठविल्यास माहिती गहाळ होणार नाही व ती योग्य व्यक्तीला मिळेल असा पध्दतीने पाठवावी. टपाल खर्च देण्यास तयार आहे असे नमूद केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना स्वतः काय म्हणावयाचे आहे याबद्यल त्यांचे स्वतःचे मनात स्पष्टता दिसून येत नाही व त्यामुळे त्यांच्या प्रथम अपीलात, द्वितीय अपीलात विसंगती आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु त्या विलंबास ते स्वतः कारणीभूत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 906/2008.**

श्री सुनिल विठठलराव कुंभारे
8 वा मैल, रामाजी आंबेडकर नगर
देवलामेटी, अमरावती रोड,
नागपूर 440023 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस आयुक्त कार्यालय (प्रशासन)
नागपूर शहर
2) श्री ए. ए. पठाण
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय
नागपूर शहर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त कार्यालय यांचेकडे श्री निरंजन समिरसंग ठाकूर मोटर परिवहन विभागात

ड्रायव्हर आहेत. त्यांचे सेवापुस्तकाचेक प्रथम पानाची प्रमाणित झेरॉक्स प्रत तसेच पोलीस खात्यात कोणत्या प्रवर्गात भरती झाले आहेत याबद्यलची माहिती रजिस्टर पोष्टाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही अधिनियमाच्या कलम 8 (त्र) मधील तरतुदीनुसार देता येत नाही असे अपीलकर्ता यांना दि. 9.9.2008 रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.2.2009 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना असे सांगितले की माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 8 (त्र) नुसार ती नाकारण्यात आलेली आहे. परंतु त्रयस्थ पक्षाची माहिती मागितल्यावर अधिनियमाच्या कलम 11 प्रमाणे प्रक्रिया करणे आवश्यक असते व त्या प्रत्येक प्रक्रियेची प्रत ही अपीलकर्ता अर्जदार यांना देणे आवश्यक असते व तसे झालेल्या प्रक्रियेवर स्पष्टपणे निर्णय कळविणे आवश्यक असते. अधिनियमाच्या कलम 8 (त्र) प्रमाणे देता येणार नाही असे जरी कळविले असले तरी कलम 11 प्रमाणे केलेल्या प्रक्रियेची माहिती अपीलकर्ता यांना दिलेली नसल्यामुळे त्यांना प्रथम अपील तसेच द्वितीय अपील दाखल करावे लागले. जे अर्जदार माहिती मागतात त्यांच्या अर्जाबद्यलच्या संपूर्ण प्रक्रियेची माहिती त्यांना कळविणे आवश्यक असते. आयोगाकडे किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे खुलासा करणे आवश्यक असले तरी अपीलकर्ता अर्जदार यांना ते तपशिलात कळविले असले पाहिजे. श्री निरंजन समिरसंग ठाकूर यांनी माहिती उपलब्ध करुन देवू नये असा आक्षेप घेतलेला असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सेवे विषयीची माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही. त्यांच्या सेवापुस्तकाची माहिती देता येणार नाही परंतु नियुक्तीच्या संदर्भातील सर्व माहिती ही सार्वजनिक माहिती आहे व त्यामुळे ते उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची गोपनियता असण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे

अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 7.8.2008 च्या अर्जात मुद्या क्र. 2 मध्ये मागितलेली माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 7.8.2008 च्या अर्जातील मुद्या क्र. 2 ची माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 969/2008.**

श्री सुधिर सितारामजी सोनटक्के
मु. पंचायत समिती क्वार्टर हिंगणा
ता. पो. हिंगणा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय
नरसाळा रोड नागपूर 34
2) डॉ. पी. वाय. थोटे
जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य
पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय
नरसाळा रोड नागपूर 34 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.9.2008 रोजी संचालक तथा प्राचार्य पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून लोकल इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट सन 1994 ते 1998 स्पष्टीकरण सत्यप्रत तसेच कमिटीला सादर केलेली कर्मचा–यांची यादी अशी एकुण आठ मुद्यांवर सन 1994 ते 2008 या कालावधीतील मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 4.9.2008 रोजी उत्तर देण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांना माहिती करीता रु. 325 चा खर्च मागितलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रु. 325 चा डी डी चा भरणा केलेला आहे परंतु त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु दि. 3.12.2008 रोजी जी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यात सर्व माहिती नाकारलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती अर्जानंतर उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपीलाच्या नंतर सुध्दा उपलब्ध करुन दिली नाही. परंतु जन माहिती अधिकारी प्राचार्य हे आज आयोगापुढे सांगत आहे की सर्व माहिती त्यांचेकडे उपलब्ध आहे. असे जर असेल तर अपीलकर्ता यांच्या अर्जानंतर 30 दिवसात सर्व माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु तशी ती करुन देण्यात आलेली नाही. व त्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांच्याकडून रु. 325 चा जो भरणा करुन घेतलेला आहे ते पैसे परत करणे संयुक्तिक राहिल. व अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती मुद्येनिहाय कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 968/2008.**

श्री प्रभाकर दिनानाथ हेडावू
गांधी वार्ड मोहाडी
ता. मोहाडी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एस. मुरकुटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय वाशिम
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर वाशिम
2) श्री जी. एस. दवने
जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख वाशिम
ता. जि. वाशिम ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.7.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे मौजे कसबे वाशिम नगर परिषद व नझुल कोणत्याही हस्तांतरण व्यवहारानंतर आपल्या कार्यालयाद्वारे घेण्यात आलेल्या फेरफार बाबतच्या

नोंदीच्या बाबत व इतर माहिती एकुण 5 मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदरची माहिती दि. 1.1.1984 ते 15.4.2008 च्या कालावधीतील असून नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सोबत दारिद्र रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 21.7.2008 रोजी वाशिम शहर येथील नगर भूमापन जागेच्या खरेदी विक्रीबाबत प्रश्नावलीचे रुपात माहिती मागितलेली आहे. परंतु सदर कायदयान्वये माहिती ही दस्तऐवजाच्या स्वरुपात देण्यात येते. त्यामुळे सदरचा अर्ज याद्वारे निकाली काढण्यात येत आहे. आपणास ज्या दस्तऐवजाच्या नकला पाहीजे असतील त्याबाबत मागणी करावी म्हणजे आपणास त्या नकला पुरविण्यात येतील. अपली काही शंका असल्यास अधीक्षक भूमि अभिलेख वाशिम यांचेकडे अर्ज सादर करावा असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांनी दि. 13.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.9.2008 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
**दि. 25.6.2009**

**( विलास पाटील )**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**राज्य माहिती आयोग,**<br>
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 971/2008.**

श्री चंपालाल सुंदरलाल भुतडा
साई मंदिर रोड वर्धा 442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती सुनंदा धावरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा
2) श्री सुधीर जयकुमार फरसोले
जन माहिती अधिकारी तथा
नगर अभियंता (बांधकाम विभाग)
वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद वर्धा यांचेकडे 1992 पासूनची From how many plot and Layout holders any land holder building land develop charges was collected prior to 10th August 1992. Kindly provided list alongwith payment in franction in respect such owner with plot and ward no. & collection receipt.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 23.10.2008 रोजी अपीलकर्ता यांना आपण माहितीच्या अधिकारात 10 ऑगष्ट 1992 पासून बांधकाम परवानगीबाबत विकास शुल्काबाबत माहिती मागितल्याप्रमाणे आपण नगर परिषद वर्धा यांचे कार्यालयीन वेळात नगर रचनाकार न.प.वर्धा विभागात दि. 24.10.2008 ला उपस्थित राहून रजिस्टर संचिका बघून घ्यावी त्यानुसार रजिस्टरमध्ये असलेले आवश्यक माहिती आपणास झेरॉक्स काढून पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना 10 ऑगष्ट 1992 पासूनची माहिती पाहिजे असे त्यांनी माहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिली व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 14.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिका–यास 15 दिवसाचे आंत माहिती देण्याबाबत ताकीद दिली व त्यानंतरही 15 दिवसात माहिती उपलब्ध झाली नाही. मात्र दि. 30.5.2009 व 18.6.2009 नुसार 6 महिन्यानंतर माहिती दिली. ती माहिती पूर्णपणे दिशाभूल करणारी आहे. अर्जदाराने उत्तरदात्यास 1992 पासूनची माहिती मागितलेली होती. परंतु 1992 पासूनची माहिती देण्यात आलेली नाही व त्यामुळे माहिती अधिका–या विरुध्द योग्य कार्यवाही करावी अशी विनंती केलेली दिसून येते.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी 10 ऑगष्ट 1992 पासूनची माहिती मागितलेली होती व त्यांचे अर्जावरती ते स्पष्ट होते व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अर्ज वाचला नाही असे निष्पन्न होते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांनी मागितलेली माहिती नाही असेही निष्पन्न होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना सुध्दा काणत्याही प्रकारच्या अपीलकर्ता यांच्या अर्जातील मागितलेल्या माहितीचा विचार न करता खुलासा केलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. अर्थात अपीलकर्ता यांनीसुध्दा जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही जुनी 10 ऑगष्ट 1992 पासूनची आहे. व त्यामुळेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु दि. 30.5.2009 पर्यंतसुध्दा अपीलकर्ता यांना 1992 नंतरची माहिती उपलब्ध करुन देत आहे असे दिसून येते. व त्यावरुन प्रथम

अपीलाचा निर्णयसुध्दा माहिती अधिकारी यांनी वाचलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी त्यांचे अर्जामध्ये prior to $10^{th}$ August 1992 असे शब्द वापरलेले आहे. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांना कळलेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांचे म्हणणे योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती फार जुनी असल्यामुळे शास्तीच्या विनंतीचा विचार करता येत नाही. अपीलकर्ता यांना 1992 नंतरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत त्यांनी मागितलेली माहिती 1992 पासूनची असल्यामुळे तशी माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात त्यांना विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून विनामुल्य माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 972/2008.**

श्री ताराचंद सागरमल चौबे
मारवाडी मोहल्ला सराफा लाईन वर्धा
ता. जि. 442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती सुनंदा धावरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा
2) श्री सुधीर जयकुमार फरसोले
जन माहिती अधिकारी तथा
नगर अभियंता (बांधकाम विभाग)
वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद वर्धा यांचेकडे शहरातील बांधकामाच्या संदर्भामध्ये तसेच वर्धा शहरात किती धर्मशाळा व मंगल कार्यालय त्याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते.

अपीलकर्ता यांनी बाबत एकुण दोन मुद्यांवर माहिती तपशिलात मागितलेली असून वैयक्तीकरित्या घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.9.2008 रोजी माहितीच्या अधिकारा अंतर्गत प्रश्नाचे उत्तर देता येत नाही. जी माहिती उपलब्ध आहे

ती कागदपत्राची सत्यप्रत देता येतील. यावर दि. 26.9.2008 ला स. 11.00 वा. प्रत्यक्ष कार्यालयात भेटून कोणती माहिती हवी ते कळवून नंतरच उपलब्ध असणारी माहिती देता येईल असे कळविलेले दिसून येते. त्यावर दि. 26.9.2008 रोजी अपीलकर्ता यांनी आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दि. 26.9.2008 रोजी एक पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर दि. 6.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानुसार दि. 23.10.2008 रोजी श्री छगनलाल गांधी यांच्या बांधकाम परवानगीबाबत माहिती मागीतली आहे. आपण नगर परिषद वर्धा यांचे कार्यालयीन वेळात बाधकाम विभागाने दि. 24.10.2008 ला दु. 12.00 हजर राहून संचिकात बघुन घ्यावी त्यानुसार संचिकेत उपलब्ध असलेले आवश्यक ती कागदपत्र झेरॉक्स काढून पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यावर पुन्हा आक्षेप घेणारे पत्र दि. 24.10.2008 ला दिलेले दिसून येते. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी अपील सुनावणीस ठेवण्यात आले असून उपस्थित राहावे असे अपीलकर्ता यांना कळविले. परंतु अपीलकर्ता यांनी मुदत घेतलेली दिसून येते. व त्यामुळे निर्णय दि. 3.12.2008 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये अपीलार्थी यांच्या अर्जातील मुद्या क्र. 1 ची माहिती जन माहिती अधिकारी बांधकाम विभाग व मुद्या क्र. 2 (6) ची माहिती त्याच विभागाकडे उपलब्ध असल्यास धर्मशाळा व मंगल कार्यालयाची माहिती तयार करुन 10 दिवसाचे आत विनामुल्य पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाच्या अनुषंगाने दि. 16.12.2008 रोजी यासोबत वर्धा नगर परिषद क्षेत्रातील मंगल कार्यालये व धर्मशाळा यांची यादी तसेच आकारणी नोंदवहीतील उपलब्ध माहिती नुसार मालमत्ता क्रमांक व करासह माहिती पाठविण्यात येत आहे अशी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे माहिती अपुर्ण मिळाली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे आज लेखी निवेदन दाखल केलेले आहे. व लेखी निवेदनामध्ये त्यांना अपुर्ण व विलंबाने माहिती मिळाली असे नमूद केले आहे. व अजुनही त्यांना अपुर्ण माहिती मिळाली असे निदर्शनास आणून जन माहिती

अधिकारी यांना शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. त्यावर माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही वर्धा शहर सुरु झााल्यापासूनची मागितलेली आहे व त्यामुळे त्यातून 1965 ला नगर परिषद अधिनियम आल्याच्या पूर्वीची माहिती असेलच असे नाही. जी शभर वर्षापूर्वीची घरे आहे त्यांना परवानगीच घेतलेली नाही व त्यामुळे त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे बांधकाम विभागात आढळून येत नाही. मात्र 1965–66 नंतरची माहिती उपलब्ध होवू शकते. पुष्कळशा बांधकामाना परवानगीच घेतली गेली नसल्यामुळे मात्र कर रचना विभागामध्ये ती माहिती मिळू शकते व त्यामुळे कर रचना विभागातून माहिती उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संकलीत करुन उपलब्ध करुन देण्याचे करीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागत आहे. सदरची माहिती अधिनियमाच्या कलम 7 (9) प्रमाणे नाकारता येत होती तरीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अपीलकर्ता यांना ती संकलीत करुन उपलब्ध करुन देता येते. एवढया व्यापक प्रमाणात माहिती मागितल्यामुळे त्यात व्यापक जनहित सुध्दा दिसून येत नाही असेच जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले.

4. अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरावे लागते. परंतु जन माहिती अधिकारी हे माहिती पुरवित असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांची उर्वरीत माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.6.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 983/2008.**

श्रीमती निशा ताराचंद अतकरी
के.ऑफ श्री रमेक्ष चिंधालोरे नेहरु वार्ड भंडारा
(दुरदर्शन टॉवरजवळ) ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. जे. मडावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार मोहाडी
ता. मोहाडी जि. भंडारा
2) श्री अे. आर. रहांगडो
जन माहिती अधिकारी तथा
तलाठी पालोरा
(त.सा.क्र.32) ता. मोहाडी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2008 रोजी तलाठी मु. पा. पालोरा यांचेकडे मौजा पारोला येथील त.सा. क्र.32 शेत जमीनीचा गाव न. 7 7अ व 12 व गाव नमुना 8 अ ची साक्षांकीत प्रत अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दि. 1.1.1999 ते 31.12.1999 व दि. 1.1.2008 ते 31.3.2008 या कालावधीतील श्री गोपीचंद आत्माराम अतकरी, श्रीमती कमला आत्माराम अतकरी, श्री ताराचंद आत्माराम अतकरी यांचे नावे असलेल्या मौजा पालोरा येथिल शेतजमिनीचे सातबारा व गाव नमुना आठ अ ची प्रत मागितलेली दिसून येते.

सदरचा अर्ज प्राप्त झाला नाही परंतु दि. 19.4.2008 रोजी अर्ज पाठविलेला आहे असे त्यांनी नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 4. 8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती दोन वेळ देण्याचा प्रयत्न केला व तीस–यानी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्याबाबतची पोच दाखल झालेली आहे. असे असले तरी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

3. व्दितीय अपीलाच्या सुनावणीची नोटीस ही अपीलकर्ता यांचेकडून परत आलेली आहे व त्यावर अपीलकर्ता मरण पावले अशा प्रकारे नोंद झालेली दिसून येते. त्यावरुनही सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. व माहिती मिळाली यावरुनही सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली तसेच अपीलकर्ता मरण हे पावले असा शेरा दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 984/2008 व 985/2008.**

श्री दशरथ लखुजी मेश्राम
के.ऑफ शन्तनु भोयर, वकील
बॅचलर रोड, धंतोली वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

<u>अपील क्रमांक 984/2008</u>

1) श्री प्रदिप वसंतराव जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

2) श्री युगेंद्र श्रावणजी डफ
जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

<u>अपील क्रमांक 985/2008</u>

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद वर्धा

2) जन माहिती अधिकारी तथा
माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व

उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी वरील दोनही अपीलामध्ये अनुक्रमे दि. 18.9.2008 व दि. 19.9.200 रोजी श्री वा. छा. त्रिवेदी मुख्याध्यापक यांच्या पेंशन केसच्या संदर्भामध्ये एकुण 4 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु ती अपुर्ण व दिशाभूल करणारी माहिती आहे. मात्र मुख्याधिकारी नगर परिषद हिंगणघाट यांना केलेल्या अर्जामध्ये मुद्या क्र. 4 बाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. उपमुख्याध्यापक पद मान्यता असल्याने मुख्याध्यापक पदाचा जो पगार दिला त्याच्या रिकव्हरी आदेशाबाबतची प्रत मिळाली नाही. हीच माहिती त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) वर्धा यांनासुध्दा मागीतलेली आहे. त्या अर्जाची प्रत त्यांना दि. 17.10.2008 रोजी उपलबध झालेली आहे ती घेवून जावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. व ती माहितीसुध्दा त्यांना मिळालेली आहे परंतु वर नमुद केल्याप्रमाणे रिकव्हरी आदेशाची प्रत त्यांना मिळालेली नाही. तसेच त्यांची मुख्य विनंती अशी आहे की त्यांना त्यांचा पगार मिळावा. न्यायालयाचे निर्णय त्यांच्या बाजुने लागलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाहीची विनंती मान्य करता येत नाही मात्र कागदपत्रे उपलब्ध करुन देता येतात. जन माहिती अधिकारी नगर परिषद यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही शाळेतील असल्यामुळे मुख्याध्यापकाकडून जी माहिती येते ती त्यांना उपलबध करुन दिलेली आहे. उपशिक्षणाधिकारी यांनीसुध्दा शाळेची माहिती आलेली आहे ती माहिती उपलबध करुन दिलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांची आयोगापुढे विनंती आहे की त्यांना रिकव्हरी आदेशाची प्रत उपलबध करुन दिल्यास माहिती उपलबध करुन दिल्या सारखे होईल. मात्र त्यांच्या वेतनाच्या संदर्भामध्ये न्यायालयानी निर्णय दिलेले असल्यास त्यांनी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाविरुध्द न्यायालयात अवमान याचिका दाखल करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांची अपीले 984/2008 व 985/2008 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून श्री वा. छो. त्रिवेदी यांच्या संदर्भात दि. 29.8.2002 ते दि. 31.5.2006पर्यंत उपमुख्याध्यापक पदास मान्यता दिलेली होती परंतु मुख्याध्यापक पदाचा पगार दिला त्यांच्या रिकव्हरी बाबत दिलेल्या आदेशाची प्रमाणित छायांकीत प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत दोन्ही माहिती अधिकारी यांनी विनामुल्य रजिस्टर पोष्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 982/2008.**

श्री गंगाधर रामकृष्ण पुणेकर
प्लॉट नं. 636, न्यु नंदनवन लेआऊट
नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. एम. सिडाम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था पुणे
मध्यवर्ती इमारत पुणे 411001

2) श्री संजय एन कदम
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी सहकार खाते यांचेकडे समता सहकारी बॅक लि. नागपूर यांचेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती बॅकेशी संबंधीत नसल्यामुळे मॅनेजर समता बॅक

यांचेकडे सदरच्या प्रत्राची प्रत हस्तांतर केली व माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळवून अपीलकर्ता यांनासुध्दा पत उपलब्ध करुन दिली. त्यावर दि. 18.8.2008 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी समता सहकारी बॅक लि. नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा बॅकेस लागू होत नाही असे कळविले. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 8.10.2008 रोजी सहकार आयुक्त यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. त्यावर दि. 10.11.2008 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी समता सहकारी बॅक यांनी 4 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्याबाबतची प्रत ही अपीलकर्ता यांनासुध्दा दिलेली आहे. व त्यानुसार सदरचा कायदा बॅकेस लागू होत नाही असा निर्णय देवून प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था यांनी सदरचे अपील खारीज केलेले दिसून येते. आयोगापुढे खुलासा करतांना सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था नागरी सहकारी बॅकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या शासनाकडून अर्थसहाय्य मिळत नाही त्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार लागू होत नाही. मा. कर्नाटक उच्च न्यायालयानेसुध्दा निर्णय दिलेला आहे असा खुलासा केलेला आहे. तसेच रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया यांनी सुध्दा सदरचा कायदा नागरी बॅकांना लागू होत नाही असा खुलासा केलेला आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांनीसुध्दा पंजाबराव नागरी सहकारी बॅक अमरावती यांचे बाबत शासनाचे अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे सदरचा अधिनियम लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 844/2008.**

श्री सुरेश वासुदेवराव पाटील
घर क्र. 12 जुनी ठवरे कॉलोनी
जरीपटका (पोस्ट) नागपूर 440014 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक (नि.)
औष्णिक विद्युत केंद्र कोराडी (के.टी.पी.एस.)
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री बी. झेड. शिवणकर
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (नि.)
औष्णिक विद्युत केंद्र कोराडी (के.टी.पी.एस.)
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.6.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.8.2007 रोजी जन माहिती अधिकारी महाजनको महाव्यवस्थापक कार्यालय केटीपीएस कोराडी यांचेकडे दि. 30.6.2007 ला पदनिहाय मागास वर्गीय रोस्टरची नावे दर्शविलेल्या एकुण 41 लेखा विभागातील कर्मचा–याची यादी मिळावी अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 7.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांनी अपीलकर्ता यांना अपीलीय प्राधिकारी यांचे कक्षात दि. 21.10.2008 रोजी झालेल्या चर्चेनुसार या पत्रासोबत जेष्ठता गटातील दि. 30.6.2006 रोजी कार्यरत उच्चस्तर लिपीक (लेखा) यांची यादी जोडून आपणाकडे माहितीस्तव पाठविण्यात येत आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सोबत अपीलकर्ता यांना सांख्यीकी अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यावर मात्र बिंदूनामावली दिली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांनी दाखविलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सरळभरतीच्या संदर्भात पदाची संख्या आरक्षणनिहाय दिलेली दिसून येते. व तसेच पदोन्नतीच्या संदर्भात कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना दि. 30.6.2006 रोजीची एकुण 41 लेखा विभागातील कर्मचा–याची बिंदूनामावलीची माहिती मंजुर पदे व कार्यरत पदे यासह अपेक्षित आहे असे त्यांचे म्हणणे आहे. वास्तविक त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु बिंदूनामावलीच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे हा त्यांचा नविन मुद्दा दिसून येतो. त्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील बिंदूनामावलीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.6.2006 ला लेखा विभागातील कर्मचारी पदाच्या संदर्भात मंजुर व (कार्यरत) बिंदूनामावलीसहीत माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची माहिती अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.6.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६५/२००७.**

श्री.अब्दुल वहीद शेख जम्मू,
तालाबपूरा, वार्ड नं. ६४,
महानगरपालिका ऊर्दु कन्या शाळेजवळ,
जिल्हा अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००७ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक १२.४.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांची प्रकृती ठिक नसल्यामुळे ते सुनावणीस हजर राहू शकत नाही असे पत्र त्यांनी उपशिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविले आहे. त्यांचे वतीने श्री.एस.जी.वसावे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे गाईड लाईन १८ नुसार वेतन चालू असतांना अचानकपणे कोणतीही पुर्वसुचना न देता वेतन बंद कां केले याची कारणे व माहिती मिळण्याबाबत. कालावधी सप्टेंबर २००६ ते आजपर्यंत. सदरची माहिती

... २

व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलात सुध्दा निर्णय न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.११.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांना दिनांक २८.११.२००६ रोजी जा.क्र./शिअ(माध्य)/माअ/४५९९अ/२००६, कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती अन्वये आपला दिनांक ६.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे आपण मागितलेली माहिती माहिती अधिकारा अंतर्गत तयार असल्याने माहिती या कार्यालयातून घेऊन जावे असे कळविले होते असे त्यांनी सांगितले. परंतु सदरचे पत्र कोणत्या माध्यमातून पाठविले होते असे विचारले असता जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, टपालाचे मार्फत पाठविले होते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्या पत्रावर टपालाचा सुध्दा शेरा दिसून येत नाही. त्याचप्रमाणे जावक क्रमांक हा शिअ(माध्य)/माअ/४५९९अ/२००६ असा आहे व त्यामुळे सदरचे पत्र हे खरोखरच अपीलकर्ता यांना त्यावेळेस पाठविण्यात आले होते याबद्यल संशयास्पद वाटते व यावरुन विहित मुदतीत माहिती मात्र त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरच्या माहितीकरिता उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी यांचेकडे ते बरेच वेळा गेले होते. परंतु त्याचे म्हणणे कोणीही ऐकून घेतले नाही. दिनांक ३.२.२००७ रोजी मात्र जा.क्र./शिअ(माध्य)/माअ/५०९/२००७ प्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी अधिक्षक वेतन पथक (माध्यमिक) यांना त्यांच्या दिनांक ९.१.२००७ चे अपीलाचे अनुषंगाने पत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी झालेली नाही असे दिसून येते. मुळातच शिक्षणाधिकारी यांनी दिनांक २५.२.२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अपीलकर्ता हे माहिती उपलब्ध घेवून गेले नाही असेच कळविलेले दिसून येते. मात्र त्यावर सुध्दा अपीलकर्ता यांनी ते वेळोवेळी माहिती घेण्याकरिता गेले होते व त्या नंतर त्यांनी आयोगाकडे दिनांक १७.३.२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्राची प्रत

दाखल केलेली दिसून येते. सदरच्या पत्राचे अनुषंगाने मात्र त्यांना अधिक्षक, वेतन पथक कडील टिपणीचे पत्र त्यांना उपलब्ध करुन दिलेले आहे अशा प्रकारे पत्राची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ प्रमाणे कोणत्याही व्यक्तींनी अर्ज केल्या पासून कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असते व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही तर ३० दिवसात त्याप्रमाणे प्रथम अपील करावयाचे असते व त्यानंतर ९० दिवसाचे आंत द्वितीय अपील याचा अर्थ कमीत कमी हा संपूर्ण प्रकार ६० दिवसात संपली पाहिजे. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी अर्ज केला मागितलेली माहिती दिनांक १७.३.२००८ रोजी मिळाली आहे यावरुन अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.११.२००६ च्या अर्जास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला दिसून येत नाही. माहिती तयार आहे ती घेऊन जावी हे पत्र संशयास्पद आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहे. सदरच्या माहितीकरिता अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे अर्ज केलेला आहे परंतु आज ते हजर नाहीत. परंतु शास्ती लादावयाची झाल्यास कलम २०(१) प्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन शिक्षणाधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत असे उपस्थित असलेले उपशिक्षणाधिकारी यांनी सांगितले. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून संबंधित जनमाहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सदरची माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही याबाबत चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन संबंधित अधिकाऱ्यां विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १,०००/- शास्ती लादण्यात येत असून ती वसूल करण्यात यावी व तश्या प्रकारचा अहवाल आयोगाकडे तीन महिन्यात पाठविण्यात यावा.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५६८/२००७.**

श्री.विनोद कृष्णराव पिंपळकर,
द्वारा-गजानन हेअर आर्ट,
धन्वंतरी कॉम्पलेक्स, बडनेरा रोड,
जिल्हा अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,
कांतानगर, कॅम्प अमरावती.

श्री. पी.पी. जुनघरे,
जनमाहिती अधिकारी तथा
व्हाईस चेअरमन,
धन्वंतरी सहकारी रुग्णालय,
बडनेरा रोड, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे वतीने त्यांचे वडील श्री.कृष्णराव अर्जुनजी पिंपळकर हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री.आर.एम.शेंडे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मोर्शी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून व्हाईस चेअरमन श्री.प्रभाकरराव जुनघरे, धन्वंतरी सहकारी रुग्णालय, अमरावती (र.नं.अम/जन/२७) ता.जि. अमरावती यांना वरच्या माळयावरील दुकान नं. ३३ चे अतिरिक्त घेतलेली रक्कम परत मिळाली नाही. महानगरपालिकेचा

... २

मंजूर नकाशा व मालकी हक्काचे कागदपत्र मिळाले नाही. खालील रक्कम व कागदपत्र मिळण्यात यावे. वरील दुकानाबाबतचे अतिरिक्त घेतलेले रुपये ५५,०००/- व त्यावरील द.मा.द.शे. २०% दराने व्याज रुपये २८४१७/- असे एकंदर रुपये ८३४१७/- या रक्कमेबद्यल आपणास दिनांक १०.४.२००६ ला नोटीस दिली होती. त्याचे उत्तर आपण दिले नाही. तसेच महानगरपालिका मंजूर नकाशा व मालकी हक्काचे कागदपत्र दिले नाही. वरील रक्कम रुपये ८३४१७/- तसेच महानगरपालिकाचा मंजूर नकाशा व मालकी हक्काचे कागदपत्र कां देण्यात आले नाही. ही माहिती हवी आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाचे अनुषंगाने दिनांक ४.५.२००७ रोजी वादी श्री.विनोद कृ. पिंपळकर यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत मागविलेला महानगरपालिकेचा नकाशा केलेली असल्यास मालकी हक्काचे कागदपत्रे योग्य ते शुल्क आकारुन तात्काळ पुरविण्यात यावेत. असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.५.२००७ रोजी सुध्दा व्हाईस चेअरमन/अध्यक्ष, धन्वंतरी सहकारी रुग्णालय, अमरावती यांना आदेशाप्रमाणे मला दुकान बांधकाम मंजूर नकाशा आणि संस्थेच्या मालकी हक्काचे कागदपत्रे कृपया तात्काळ देण्यात यावे असा अर्ज केलेला दिसून येतो. सदरची माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२००७ रोजी विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्याकडे तक्रार केलेली दिसून येते. आयोगाकडे द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये खालील प्रमाणे खुलासा अपीलकर्ता यांनी दाखल केलेला आहे. १) मी विनंतीपूर्वक द्वितीय अपीलमध्ये खुलासा करितो की, अपीलकर्ता अर्जदार हा सुशिक्षित बेरोजगार आहे. त्याला लघुउद्योग करिता दुकानाची अत्यंत आवश्यकता होती. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेकडे दुकान मिळण्याबाबत संपर्क केला असता, त्यांनी दुकानची डिपॉझिट रक्कम रुपये १,६७,०००/- भरण्यास सांगितले. तेंव्हा मी खामगांव अर्बन को-ऑप.बॅंके चे रुपये १,५०,०००/- कर्ज घेऊन दुकानची डिपॉझिट रक्कम रुपये १,६७,०००/- भरलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी पुढील प्रमाणे डिपॉझिट रक्कम घेतलेली आहे. पहिला चेक रुपये १,१२,०००/- चा धन्वंतरी को-ऑप.हॉस्पीटल, अमरावती या नावाने लिहुन घेतलेला आहे. या चेकचा नंबर ३३४४१२६ आहे. नंतर दुसरा चेक रुपये ५५,०००/- चा सेल्फ म्हणून लिहीला परंतु वरील दोन्ही चेकच्या बेरजे एवढी रक्कम माझ्या बॅंक खात्यात जमा नव्हती. म्हणून

... ३

तो चेक रद्द केला. त्या चेकचा नंबर ३३४४१२७ आहे. जनमाहिती अधिकारी यांना पूर्ण रक्कम रुपये १,६७,०००/- करुन देण्याकरिता माझ्या नावाचे खामगांव अर्बन को-ऑप.बँकेचे आर.डी.खाते मला वेळेवर बंद करावे लागते. त्याची मिळालेली रक्कम आणि तिसरा चेक रुपये ४७,०००/- असे एकंदर रुपये ५५,०००/- जनमाहिती अधिकारी यांना नगदी दिलेले आहे. वरील तिनही चेक जनमाहिती अधिकारी श्री.प्रभाकर जुनघरे यांचे हस्ताक्षरात आहे. वरील तिनही चेक आणि आर.डी.खात्याचे इस्टीमेट यांच्या झेरॉक्सप्रती सोबत जोडलेल्या आहेत. जनमाहिती अधिकारी यांची दुकानची एकंदर डिपॉझिट रक्कम रुपये १,६७,०००/- घेतलेली आहे. परंतु पावती रुपये १,१२,०००/- दिली आहे. या व्यवहारात माझे जवळून रुपये ५५,०००/- अतिरिक्त घेतलेले आहे. हे मला व्याजासह परत मिळण्यात यावे. जनमाहिती अधिकारी यांना अतिरिक्त रक्क रुपये ५५,०००/- नगदी मिळाल्यामुळे, गडबडीमध्ये त्यांनी दुकानची डिपॉझिट किंमत रुपये १,१२,०००/- भरल्या संबंधी पावतीवर चेक नं. ३३४४१२६ ऐवजी रद्द केलेल्या चेकचा नंबर ३३४४१२७ लिहिलेला आहे. त्या पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडलेली आहे. २) जनमाहिती अधिकारी यांचे जवळ अपीलकर्ता अर्जदार यांनी रुपये १,६७,०००/- दुकानचे डिपॉझिट रक्कम भरलेले आहे. ती डिपॉझिट रक्कम आजही त्यांचे जवळ सुरक्षित जमा नाही. तसेच महानगरपालिके कडून दुकानांची बांधकाम परवानगी घेतलेली आहे किंवा नाही हे सिध्द करण्याकरिता दुकानाची बांधकाम परवानगी नकाशाची अपीलकर्ता अर्जदाराला आवश्यकता आहे. जर दुकानाची बांधकाम परवानगी घेतलेली नसेल तर महानगरपालिका विनापरवानगी बांधकाम म्हणून केव्हाही दुकाने बुलडोजरने पाडू शकते. म्हणून अपीलकर्ता अर्जदार यांचे डिपॉझिट रक्कम रुपये १,६७,०००/- ही सुरक्षित नाही. त्यामुळे महानगरपालिकेची बांधकाम परवानगी नकाशाची अपीलकर्ता अर्जदाराला आवश्यकता आहे. बांधकाम परवानगी नकाशा न दिल्यास अपीलकर्त्यांने भरलेली वरील डिपॉझिट रक्कम जनमाहिती अधिकारी यांनी परत करण्यात यावी. ३) महाराष्ट्र सरकारने नझुल प्लॉट नं. ३ आणि ३/२ शीट नं. ६५ व ७८ ही जमीन धन्वंतरी सहकारी रुग्णालयाकरिता म्हणजेच जनतेच्या सेवेकरिता लिजवर म्हणजे भाडेतत्वावर दिलेली आहे. परंतु धन्वंतरी सहकारी संस्थेच्या संचालकांनी अनधिकृतपणे कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधुन जनते जवळून भरमसाठ डिपॉझिट रक्कम घेवून दरमहा दुकानचे भाडे वसुल करीत आहे. असे एकंदर या कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये ७१ दुकाने आहेत. कमर्शियल कॉम्प्लेक्सचे बांधकामाकरिता महाराष्ट्र सरकारची परवानगी

घेतलेली आहे किंवा नाही याबद्यल साशंकता आहे. अशा प्रकारे महाराष्ट्र सरकारचा धन्वंतरी सहकारी संस्थेने अटी व शर्तीच्या नियमाचा भंग केलेला आहे. धन्वंतरी सहकारी संस्था ही महाराष्ट्र सरकारची भाडेकरी आहे मालक नाही. भाडेकरी हा पोटभाडेकरी ठेवू शकत नाही. दुकान भाडयाने देण्याकरिता महाराष्ट्र सरकारची परवानगी घेतलेली नाही. म्हणून अपीलकर्ता अर्जदार यांचेकडून भाडेवसूल करणे हे बेकायदेशीर ठरते. जर अपीलकर्ता अर्जदार यांचेकडून भाडे वसूल करावयाचे झाल्यास त्यांना मालकी हक्काचे कागदपत्र जनमाहिती अधिकारी यांनी देणे जरुरीचे आहे. सदरच्या खुलास्याने अपीलकर्ता यांनी त्यांना भाडेतत्वावर धन्वंतरी सहकारी संस्थेचे संचालकांना दिलेल्या दुकानाचे संदर्भामध्ये संस्थेच्या जागेचे मालकी हक्काचे संदर्भात व संस्थेने मालकी हक्काची परवानगी घेतली आहे किंवा नाही याबद्यलची माहिती त्यांनी मागितलेल्या नकाशातून हवी आहे. तसेच त्यांच्या व्यवहारातील करारनाम्याप्रमाणे तपशीलात माहिती हवी आहे. धन्वंतरी सहकारी संस्था ही सहकारी तत्वावर चालवित असल्यामुळे तसेच शासनाकडून भुखंड हा मोफत मिळालेला असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा अधिनियम लागू होतो व त्यामुळेच सदरची सहकारी संस्था भाडेतत्वावर सुरु आहे. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे जर एखाद्या व्यक्तीने माहिती मागितली तर त्या व्यक्तीस ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १९.१.२००७ च्या अर्जाप्रमाणे जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील. अन्यथा धन्वंतरी सहकारी रुग्णालय, अमरावती यांचे पदाधिकारी यांना माहिती अधिकारी समजून ते अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्तीस पात्र राहतील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.१.२००७ च्या अर्जामध्ये त्यांनी मागितलेले अतिरिक्त घेतलेले रुपये ५५,०००/- व त्यावरील द.मा.द.शे. २०% दराने व्याज रुपये २८,४१७/- असे एकंदर रुपये ८३,४१७/- या रक्कमेबद्दल विवरण तसेच महानगरपालिकेकडून बांधकाम मंजूर नकाशाची प्रत व जागेच्या मालकी हक्काचे कागदपत्रे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत रजिस्टर टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५७०/२००७.**

श्री.प्रेमदास रेकाजी राठोड,
बी-८, लिबर्टी एनक्लेव्ह, जेपीनगर रोड,
मालवियानगर, खामला,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
विशेष पोलीस महानिरीक्षक,
महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो,
मधु इंडस्ट्रियल इस्टेट, पहिला माळा,
पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल,
मुंबई - ४०० ०३२.

जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक,
महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो,
मधु इंडस्ट्रियल इस्टेट, पहिला माळा,
पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल,
मुंबई - ४०० ०३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी खुलासा दाखल केलेला आहे. उत्तरवादी हजर असून नागपूर कार्यालयातील जनमाहिती अधिकारी श्री.व्ही.एम.देशमुख यांना हजर राहण्याबाबत सूचित केले आहे व ते स्वतः हजर आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(५) प्रमाणे ज्या माहिती अधिकारी यांना माहिती मागितलेली असते त्याच माहिती अधिकाऱ्यांनी माहिती

... २

उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी असते. अन्यथा कलम २० प्रमाणे त्या माहिती अधिकाऱ्यांस जबाबदार धरले जाते व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये ज्या माहिती अधिकारी यांना माहिती मागितलेली आहे व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या जनमाहिती अधिकाऱ्यास आयोगापुढे सुनावणीस हजर राहणे हे आवश्यक असते. श्री.व्हि.एम.देशमुख हे नागपूर कार्यालयातील जनमाहिती अधिकारी जरी असले तरी त्यांना अपीलकर्ता यांनी माहिती मागितली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी त्यांची नाही याबाबतची नोंद महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो यांनी घेणे आवश्यक आहे व आयोगा पुढील सुनावणी प्रादेशिक कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी उपस्थित राहण्यास सुचविणे यापुढे बंद करण्यात यावे. संबंधित जनमाहिती अधिकारी उपस्थित असतील किंवा नसतील तरी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल किंवा टाळाटाळ केलेली असेल किंवा विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असेल तरी सुध्दा संबंधित जनमाहिती अधिकारीच जबाबदार असतात हे पुन्हा एकदा स्पष्ट करुन त्याची नोंद घेण्यात यावी. आयोगापुढील कार्यवाही ही न्यायिकवत असून शासनातील प्रशासकीय कार्यवाही नाही.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मधु इंडस्ट्रियल इस्टेट, पहिला माळा, पी.बी.मार्ग, वरळी, मुंबई यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. अ) राज्यात सापळा, अपसंपदा इत्यादी प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने आरोपी केलेल्या किती सरकारी कर्मचाऱ्यांना गेल्या २० वर्षात विशेष न्यायालयाने दोषी ठरविले याची वर्ष व जिल्हानिहाय आकडेवारी देण्यात यावी. ब) सापळा व अपसंपदा प्रकरणात गुन्हे दाखल झालेले पण सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगी अभावी आतापर्यंत विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल करता आले नाही अशा सर्व आरोपी कर्मचाऱ्यांची (पूर्ण नांव, पद, विभागाचे नांव, गुन्हयाचे स्वरुप, गुन्हा दाखल झाल्याचा दिनांक, आरोपपत्र दाखल करण्यासाठी सक्षम प्राधिकारी व त्यांच्याकडे परवानगी मागितल्याची तारीख आदी तपशीलासह) यादी देण्यात यावी. क) सापळा व अपसंपदा प्रकरणात गुन्हे दाखल झालेले पण सक्षम अधिकाऱ्याने परवानगी नाकारल्यामुळे विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल करता आले नाही अशा कर्मचाऱ्यांची नावे, परवानगी नाकारणाऱ्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची नावे, परवानगी नाकारल्याची कारणे व परवानगी नाकारल्याची तारीख इत्यादी सविस्तर माहिती देण्यात यावी. ड) सापळा व अपसंपदा प्रकरणात

... ३

१० पेक्षा जास्त वर्षापेक्षा अधिक काळापासून एसीबीकडे प्रलंबित प्रकरणांची (आरोपपत्र दाखल करण्यासाठी परवानगीही मागितलेली नाही अशी प्रकरणे) माहिती आरोपींची नावे, पद, विभाग, गुन्हा दाखल केल्याची तारीख व परवानगी मागण्यासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे यासह देण्यात यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.८.२००६ रोजी श्री. राजेंद्र चौधरी, जनमाहिती अधिकारी महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्यूरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अपीलकर्ता यांना आपण उपरोक्त संदर्भान्वये मागविलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्याने माहिती पुरविण्यास विलंब होण्याची शक्यता आहे असे कळविलेले दिसून येते व सदरचे पत्र हे अपीलकर्ता यांना दिनांक १२.९.२००६ रोजी प्राप्त झाले अशी नोंद दिसून येते. त्यानंतर दिनांक १४.९.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आपण संदर्भांकित अर्जात मागविलेली माहिती उपलब्ध अभिलेखानुसार (मागील पाच वर्षाची) आपल्या माहितीकरिता पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते व सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २.१२.२००६ रोजी उपलब्ध झालेली आहे अशी नोंद त्यावर अपीलकर्ता यांनी केलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १६.१.२००७ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये अपील करण्याकरिता जी कारणे दिलेली आहेत ती खालील प्रमाणे आहेत. १) २० वर्षाची माहिती उपलब्ध नसल्याने ५ वर्षाची माहिती देण्याचा जनमाहिती अधिकाऱ्याचा निर्णय योग्य ठरविणे चुकीचे आहे. कारण २० वर्षाची माहिती उपलब्ध नसली तर पाचच वर्षाची माहिती द्यावी, असे कोणत्याही कायद्यात म्हटलेले नाही आणि ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीची माहिती आम्ही सांभाळून ठेवत नसतो, असेही जनमाहिती अधिकाऱ्याने स्पष्ट केलेले नाही. याउलट मला हवी असलेली माहिती पाच वर्षाहून जास्त काळ सांभाळून ठेवली जाते हे ए.सी.बी.ने माहितीत म्हटले आहे. त्याचा पुरावा म्हणून एसीबीच्या १७ मुद्यांवरील माहितीमधील पान १३, १४, १७ व १८ अशी चार पाने यासोबत संलग्न करण्यात येत आहे. २) दोषी कर्मचारी/अधिकारी यांची नावे व इतर माहिती नाकारण्यासाठी कलम ८(१) चा आधार घेणे चुकीचे

**... ४**

आहे. कारण कलम ८ मध्ये शेवटी जी माहिती संसद वा विधिमंडळाला नाकारली जाऊ शकत नाही, ती माहिती कोणत्याही नागरिकालाही नाकारली जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मला नाकारलेली माहिती खुद्य एसीबीद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात अधिकृत प्रेसनोट काढून वर्तमानपत्रांना पुरविली जाते व या प्रेसनोटच्याच आधारे आरोपी कर्मचारी/अधिकारी यांची नावे व इतर माहिती वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित केली जातात. त्यामुळे कलम ८(१) नुसार नाकारलेली सूंपर्ण माहिती मला विनामुल्य देण्यात यावी, अशी विनंती आहे. ३) मला हवी असलेली माहिती विहित कालावधीत (३० दिवसांत) उपलब्ध करुन देण्यात जनमाहिती अधिकारी अपयशी ठरल्यास कलम ७(६) नुसार अशी माहिती मला विनामुल्य उपलब्ध करुन द्यावयास हवी होती. मला पहिल्यांदा पाठविलेली माहिती (जी अपूर्ण असल्यामुळे मला प्रथम अपीली करावे लागले) विलंबाने देण्यात आली आणि त्यासाठी जास्तीचे शुल्क आकारण्यात आले. आता प्रथम अपीलीय अधिकाऱ्याच्या आदेशानंतर देऊ केलेल्या माहितीसाठी पुन्हा १३२/- रुपयांची मागणी जनमाहिती अधिकाऱ्याने केलेली आहे आणि हे शुल्क एसीबीच्या मुंबई कार्यालयात जमा करण्याविषयी जनमाहिती अधिकाऱ्याने कळविले आहे. कृपया विलंबानंतरची संपूर्ण माहिती कलम ७(६) नुसार मला विनामुल्य देण्याचे आदेश जनमाहिती अधिकाऱ्यास देण्यात यावे, अशी विनंती आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपीलामध्ये वर नमुद केलेली जी कारणे दिलेली आहेत त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी २० वर्षाची माहिती मागितली होती. परंतु त्यांना ५ वर्षाची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही याबद्यलचे स्पष्टीकरण दिलेले दिसत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना ५ वर्षा पूर्वीची माहिती कां उपलब्ध करुन देता येत नाही याबद्यलचे कारण स्पष्टपणे कळविण्यात यावे. वास्तविक ॲन्टी करप्शन ब्युरो यांचेकडील जी प्रकरणे असतात ती प्रकरणे अर्थातच गुन्हयाचे स्वरुपाची असतात व त्यामुळे ॲन्टी करप्शन ब्युरोने ज्या ज्या प्रकरणाचा तपास केलेला असेल किंवा जी प्रकरणे निकाली निघाले असतील त्या सर्व प्रकरणामध्ये त्या प्रकरणातील आरोपीची पार्श्वभूमी व संपूर्ण माहिती असते व त्यामुळे सदरच्या प्रकरणात माहिती ही कोणत्या ही स्वरुपाची उपलब्ध असलीच पाहिजे व तशी सुरक्षित ठेवावयास सुध्दा पाहिजे. नष्ट केली असल्यास त्या प्रकारची कारणे कळविणे आवश्यक आहे व यापुढे सदरची माहिती जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. सदरची माहिती ही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जतन करुन ठेवणे

आवश्यक आहे व तसे ती ठेवणे संयुक्तिक राहील. दोषी कर्मचारी/अधिकारी यांची नावे व इतर माहिती नाकारण्यासाठी कलम ८(१) चा आधार घेणे चुकीचे आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे हे योग्य दिसून येते. जे कर्मचारी/अधिकारी दोषी असतील त्यांची नांवे ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे प्रकट करण्यास कोणत्याही प्रकारचा अपवाद करता येणार नाही. कलम ८(१)(ज) प्रमाणे एखाद्या प्रकरणात तपास सुरु असे पर्यंत किंवा न्यायालयात आरोप दाखल करण्या पर्यंत कलम ८(१)(ज) प्रमाणे माहिती प्रकट करण्यास अपवाद करता येईल. परंतु जे प्रकरण मा.न्यायालयामध्ये सादर झालेले आहे किंवा ज्या प्रकरणी निर्णय झालेला आहे किंवा ज्या प्रकरणाचा तपास करुन परवानगी अभावी न्यायालयात दाखल होऊ शकली नाही त्या प्रकरणामध्ये माहिती पुरविण्याचे संदर्भामध्ये मा.न्यायालयाने माहिती प्रकट करण्यास मनाई केली नसल्यास माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्याने ती कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांना जी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांना विनामुल्य पुरविणे हे आवश्यक आहे व त्यामुळे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन ती विनामुल्य पुरविण्यात यावी याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली संपूर्ण माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, मधु इंडस्ट्रियल इस्टेट, पहिला माळा, पांडुरंग बुधकर मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०३२ यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५७३/२००७.**

श्री.किशोर पंजाबराव खरबडे,
रा. भाजीबाजार, जुनी कोतवाली जवळ,
अमरावती - ४४४ ६०१. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
कारागृह उपमहानिरीक्षक,
मध्य विभाग, औरंगाबाद.

श्री. एम. एल. अली,
जनमाहिती अधिकारी तथा
स्वीय सहाय्यक,
कारागृह उपमहानिरीक्षक,
मध्य विभाग, औरंगाबाद. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांना खालील माहिती मागितलेली दिसून येते. Copy of Question & Answer paper along with the total marks obtained in the written examination. Period १५$^{th}$ days. Information obout copy Question & Answer paper along with total marks obtained in written examination held on २७.७.२००५ for the Post of pharmacist with reference to your letter dated on ४.७.२००५. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने

दिनांक ६.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही मिश्रक भरती सन २००५ मधील प्रश्न पत्रिका व उत्तर पत्रिकेची छायांकित प्रतीची केलेली मागणीची विनंती केंद्रीय माहितीचा अधिकार, २००५ नियम पुस्तिका नियम क्रमांक ८(१) मधील (घ) नुसार अमान्य करण्यात येत आहे. असे जावक क्रमांक माहितीअ/२००६/मवि(आस्था-२)/५३१५, औरंगाबाद नुसार संजय कुमार वर्मा, कारागृह उपमहानिरीक्षक, मध्यविभाग, औरंगाबाद यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००७ रोजी सदरच्या पत्राचा उल्लेख न करता माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील पुन्हा कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २६.३.२००७ रोजी या कार्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये यापूर्वीच आपणास उत्तर पाठविण्यात आलेले आहे. सदरील पत्राची छायांकित प्रत यासोबत पुन्हा पाठविण्यात येत आहे. असे माहिती अधिकारी एम.एल.अली, कारागृह उपमहानिरीक्षणालय, मध्य विभाग, औरंगाबाद यांनी कळविलेले दिसून येते. सदरच्या दोन्ही पत्राचेकरिता उत्तरवादी यांनी जावक क्रमांक ५३१५ असलेले जावक नोंदवहीची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये दिनांक २६.५.२००८ रोजी श्री.संजय कुमार वर्मा, प्रथम अपीलीय अधिकारी तथा कारागृह उपमहानिरिक्षक, मध्यविभाग, औरंगाबाद यांनी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयामध्ये उपरोक्त संदर्भीय विषयाची नोटीस प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. त्यानुसार आम्ही संपूर्ण अभिलेख्यासह या कार्यालयाचे स्वीय सहाय्यक श्री.एम.एल.अली यांना आमच्या वतीने सर्व कागदपत्र घेवून पाठवित आहोत. दिनांक ११.१.२००८ रोजी या कार्यालयाचे स्वीय सहाय्यक श्री. एम.एल.अली यांनी श्री.खरबडे यांना त्यांचा मिश्रक पदाचा पेपर दाखविलेला होता व त्यावेळी त्यांचे समाधान झालेले होते. यास्तव प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने या कार्यालयाचे जनमाहिती अधिकारी तथा स्वीय सहाय्यक, कारागृह उपमहानिरिक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांना उपस्थित राहण्याबाबत परवानगी मिळावी अशी विनंती केलेली दिसून येते. तसेच दिनांक २२.५.२००८ रोजीचा खालील

प्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो. १) उपरोक्त संदर्भीय विषयानुसार सविनय सादर करण्यात येते की, श्री. किशोर पी. खरबडे, भाजी बाजार, जुनी कोतवाली जवळ, अमरावती यांनी त्यांचे दिनांक २९.११.२००६ रोजीच्या विनंती अर्जानुसार दिनांक २७.७.२००५ रोजी मिश्रक या पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिकेची प्रत त्यामध्ये एकूण किती गुण मिळाले याबाबतची माहिती मागितली होती. सदरील माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार नियम पुस्तिका नियम क्रमांक ८ माहिती उघड करण्यातून सुट (१) मधील (घ) नुसार अर्जदाराची विनंती अमान्य करण्यात आली होती व तसेच उमेदवारास या कार्यालयाचे पत्र क्रमांक माहितीअ/२००६/मवि(आस्था-२)५३१५, दिनांक ६.१२.२००६ अन्वये कळविण्यांत आली होती. सोबत छायांकित प्रत सादर केली आहे. श्री.खरबडे यांनी त्यांचे दिनांक २२.१.२००७ च्या अर्जासोबत दिनांक २९.११.२००६ ची छायांकित प्रत जोडली होती. सदरील अर्जावर या कार्यालयाकडून कार्यवाही करुन अर्जदारास दिनांक २६.३.२००७ च्या पत्रानुसार दिनांक ६.१२.२००६ च्या पत्राच्या छायांकित प्रतीसह संबंधितास कळविण्यात आले होते. सोबत छायांकितप्रत सादर करण्यात येत आहे. २) कागदपत्रांची क्रमवार यादी सोबत सादर करण्यात येत आहे. ३) अपीलामध्ये सुनावणी घेण्यात आलेली नाही. ४) अपीलामध्ये अर्जदाराने मागणी केलेल्या प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिकेची प्रत देण्यात आलेली नाही. ५) अपीलामध्ये निर्णय देण्यात आलेला आहे. ६) अपीलकर्ता यांना साध्या पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे. सोबत जावक रजिस्टरची छायांकित प्रत सादर करण्यात येत आहे. श्री. खरबडे यांचे या कार्यालयास आतापर्यंत माहिती अधिकारांतर्गत एकूण ५ अर्ज सादर केलेले आहेत. सदरील अर्जाची उत्तरे या कार्यालयाकडून अर्जदारास वेळोवेळी देण्यात आलेली आहेत. श्री. खरबडे यांनी यापूर्वी सन्माननीय आयोगास सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०.१.२००८ रोजी सन्माननीय आयोगासमोर प्रकरण सुनावणी झालेले आहे. त्यावेळी सन्माननीय आयोगासमोर संबंधितास तुम्ही पुन्हा मिश्रक भरती बाबत काही अर्ज सादर केलेले आहेत काय याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी नाही म्हणून उत्तर दिले होते. तसेच दिनांक १०.१.२००८ रोजी सन्माननीय आयोगाच्या कक्षाबाहेर श्री. खरबडे यांना आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार शासन निर्णयाच्या प्रती देण्यात आल्या होत्या. त्यावेळी त्यांना आयोगाचे अधिकारी तसेच या कार्यालयाचे लिपीक श्री. एम. एस. बिलोरे, लिपीक यांचे समक्ष या कार्यालयाचे स्वीय सहाय्यक श्री. एम. एल. अली यांनी श्री. खरबडे यांनी मिश्रक पदाचा दिलेला पेपर

**... ४**

त्यांना दाखविण्यात आला होता. त्यावेळी श्री. खरबडे यांनी माझे समाधान झाले असल्याबाबत सांगितले होते. या संदर्भात थोडक्यात माहिती अशी की, कारागृह विभागात मिश्रकाची पदे भरणे करिता लेखी परीक्षा मा.कारागृह महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने दिनांक २७.७.२००५ ते २९.७.२००५ या कालावधीमध्ये कै.दौलतराव जाधव, तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा, पुणे-६ येथे घेण्यात आली होती. या परीक्षेमध्ये त्यांना १०० पैकी ४६ गुण मिळाले होते. म्हणून त्यांना या परीक्षेत अनुत्तीर्ण घोषित करुन त्यांना मौखिक परीक्षेकरिता बोलाविण्यात आले नाही. म्हणून त्यांनी या कार्यालयास माहितीच्या अधिकाराखाली त्यांची निवड का झाली नाही याबाबतची माहिती मागितली असता त्यांना या कार्यालयाकडून माहिती देण्यात आली की ते लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झाले म्हणून त्यांना पुढील प्रक्रियेकरिता अपात्र ठरविण्यात आले आहे. त्यानंतर त्यांनी या कार्यालयास माहिती अधिकारांतर्गत वारंवार अर्ज सादर केलेले आहेत आणि संबंधित अर्जाचे उत्तर त्यांना वेळोवेळी देण्यात आलेले आहे. तरीपण त्यांनी राज्य माहिती आयोग यांना अपील अर्ज सादर केलेला आहे. अर्जदार हा मिश्रक पदाकरिता झालेल्या लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेला आहे हे माहित असून सुध्दा ते या कार्यालयास वेळोवेळी अर्ज करुन या कार्यालयाचा तसेच मा. आयोगाचा विनाकारण वेळ वाया घालवित आहेत आणि माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत असल्याचे दिसून येते. म्हणून मा.आयोगास विनंती करण्यात येते की, श्री.खरबडे यांना दिनांक १०.१.२००८ रोजी सन्माननीय आयोगाच्या सुनावणीच्या दिवशी पेपर दाखविलेला आहे. तसेच श्री.खरबडे यांचे समाधान त्यावेळी झालेले होते. यास्तव श्री.खरबडे यांनी केलेले अपील अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावा अशी सन्माननीय आयोगास विनंती आहे. उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांना केलेला निर्णय व आयोगाकडे सादर केलेला खुलासा याबाबत विचार केला असता उत्तरवादी यांनी अधिनियमाचे कलम ८(१)(घ) प्रमाणे अर्जदाराची विनंती मान्य केलेली आहे त्याकरिता अर्जदार हा दिनांक २७.७.२००५ रोजी मिश्रक या पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेची प्रत त्यामध्ये एकूण किती गुण मिळाले याबाबतची माहिती मागितली होती. सदरील माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार नियम पुस्तिका नियम क्रमांक ८ माहिती उघड करण्यातून सूट (१) मधील (घ) नुसार अर्जदाराची विनंती अमान्य करण्यात आली होती. त्याकरिता कलम ८(१)(घ) तपासणे आवश्यक आहे. "(घ) वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता,

व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्यांची खात्री पटली असेल त्याखेरीज, जी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल, अशी माहिती" अशी तरतुद आहे. व त्यामुळे उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती दिल्यास व्यावसायिक गुपिते या संदर्भामध्ये त्यांचा समावेश होतो असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. उत्तरपत्रिका तपासून परिक्षक एका विश्वासाने उत्तरपत्रिका तपासतो व त्यामुळे उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत किंवा उत्तरपत्रिका उपलब्ध करुन दिल्यास व त्यातून तपासणीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यास परिक्षकाची विश्वासार्हता धोक्यात येवू शकते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती योग्य आहे व त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जो निर्णय दिलेला आहे तो सुध्दा योग्य आहे. यावरुन केलेल्या खुलाश्यामधून असे दिसून येते की, अपीलकर्ता हे सदरच्या परिक्षेत अनुत्तीर्ण घोषीत झाल्यानंतर व त्यांना मौखीक परिक्षेस बोलाविले नाही म्हणून त्यांनी या कार्यालयास माहितीच्या अधिकाराखाली त्यांची परिक्षेत निवड का झाली नाही याबाबतची माहिती मागितली असता त्यांना या कार्यालयाकडून माहिती देण्यात आली की ते लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झाले म्हणून त्यांना लेखी परिक्षेकरिता अपात्र केले आहे. त्यानंतर त्यांनी या कार्यालयास माहिती अधिकारांतर्गत वारंवार अर्ज सादर केलेले आहेत आणि संबंधित अर्जाचे उत्तर त्यांना वेळोवेळी दिलेले आहे. अर्जदार हा मिश्रक पदाकरिता झालेल्या लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेला आहे हे माहित असून सुध्दा ते या कार्यालयास वेळोवेळी अर्ज करुन या कार्यालयाचा तसेच आयोगाचा विनाकारण वेळ वाया घालवित आहेत आणि माहितीच्या अधिकाराचा दुरपयोग करीत आहेत. श्री. खरबडे यांना दिनांक १०.१.२००८ रोजी सन्माननीय आयोगाच्या सुनावणीच्या दिवशी पेपर दाखविलेला आहे व त्यांचे समाधान झाले होते. यावरुन असे दिसून येते की, श्री.खरबडे हे अनेक अर्ज करुन जनमाहिती अधिकारी किंवा कार्यालयास वेठीस धरत आहेत असा निष्कर्ष काढावा लागतो. लेखी परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झाल्यावर माहित असून सुध्दा पुन्हा पुन्हा अर्ज करुन माहिती मागत असेल यावरुन जरी अपीलकर्ता यांना असे वाटत असेल की, त्यांना उत्तीर्ण केले जाईल तर असे कदापी शक्य होत नाही. त्यामुळे त्यांनी सदरच्या अधिनियमाचा गैरवापर करणे थांबविणे आवश्यक आहे व त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती व दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

... ६

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक ६.१२.२००६ रोजी व दिनांक २२.१.२००७ च्या प्रमाणे प्रथम अपीलात दिनांक २६.३.२००७ रोजी निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५९०/२००७.**

श्री.राजेंद्र भास्कर शेळके,
मु.पो. पेठ, ता. चिखली,
जिल्हा बुलढाणा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा.

श्री. अशोक राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिखली,
जिल्हा बुलढाणा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२००७ रोजी (कार्यालयास प्राप्त दिनांक २९.३.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. राजेंद्र पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००६ रोजी शासकीय जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चिखली यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे. १) दिनांक ८.११.२००६ ला दिलेल्या तक्रार निवेदनाबाबत पंचायत समिती, चिखली स्तरावरुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मिळणे बाबत. २) ग्राम पंचायत ठराव खोडाखोड प्रकरणी ग्रामसेवकास स्पष्टीकरणाबाबत दिलेल्या

... २

नोटीसची छायांकित प्रत मिळणेबाबत. ३) ग्रामपंचायत ठराव खाडाखोड प्रकरणी ग्रामसेवक श्री.डी.एस.सुरोशे यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाची छायांकित सत्यप्रत मिळणेबाबत. ४) ग्रामपंचायत हिशोबाचे जवाहर ग्रामसमृध्दी निधीचे सन १९९९ ते सन २००३ चे लेखापरिक्षण आक्षेपांची अनुपालन अहवालाच्या छायांकित सत्यप्रती मिळणेबाबत. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ११.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध झाली असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु सदरची माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णय सुध्दा देण्यात आलेला नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले व प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलाश्यात नमुद केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००६ रोजी जी माहिती मागितलेली आहे त्यापैकी मुद्या क्रमांक २ व ४ ची माहिती अद्याप पर्यंत त्यांना उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक २ व ४ च्या संदर्भात तोंडी स्पष्टीकरण केले असून सदरच्या स्पष्टीकरणामध्ये ग्राम पंचायत ठराव खोडाखाड प्रकरणी ग्रामसेवकास दिलेल्या नोटीसची छायांकित प्रत मागितली आहे. परंतु तशा प्रकारची नोटीस ही दिलेलीच नव्हती तर तक्रारीवरुन विस्तार अधिकार यांनी चौकशी केली असता ग्रामसेवक यांचे स्पष्टीकरण नोंदवून घेतले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळेच नोटीसची प्रत उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये ग्रामपंचायत हिशोबाचे जवाहर ग्रामसमृध्दी निधीचे सन १९९९ ते सन २००३ चे लेखापरिक्षण आक्षेपांची अनुपालन अहवालाच्या छायांकित सत्यप्रती मिळणेबाबत माहिती मागितली होती. परंतु सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही व त्याबाबत दिनांक ११.१.२००७ रोजी संबंधित माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे सचिव, ग्रामपंचायत, पेठ यांनी सन १९९९ ते सन २००३ चे लेखापरिक्षण आक्षेपांची अनुपालन अहवालाच्या छायांकिंत सत्यप्रती दिनांक १८.१.२००७ चे आंत संबंधितास देण्यात येईल तसा

अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या मुद्यांच्या संदर्भात अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्याबाबत कळविले सुध्दा नाही. त्याबाबत पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जवाहर ग्रामसमृध्दी निधीचे सन १९९९ ते सन २००३ चे लेखापरिक्षण अहवाल सुध्दा आता पर्यंत मिळालेला नाही व त्याबाबत ज्या ज्या ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण झाले नाही किंवा अहवाल प्राप्त झाला नाही त्याबद्यल कारवाई सुरु आहे. परंतु ही बाब सुध्दा त्यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, पेठ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण झालेले असून लेखा परिक्षण झाल्यावर अंकेक्षण अहवाल हा तीन प्रतीत असतो व एक प्रत ही गट विकास अधिकारी यांच्याकडे पण असते त्यावर विस्तार अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचे लेखा परिक्षण झालेले आहे पण अंकेक्षण नोट ग्रामपंचायत किंवा गटविकास अधिकारी यांना मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर अंकेक्षण अहवालाची छायांकित प्रत अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणली व ती त्यांच्या कार्यालयातून उपलब्ध करुन घेतली आहे असे त्यांनी सांगितले व यावरुन अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.१२.२००६ च्या माहितीच्या अर्जाचे संदर्भामध्ये अपूर्ण माहिती दिलेली आहे हे अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे असून त्याकरिता जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी हे दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. सदरच्या शास्तीच्या संदर्भामध्ये गटविकास अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु त्यावरुनही त्यांचे म्हणणे असे आहे की, सदरची प्रत त्यांच्या कार्यालयात दिलेली नाही. परंतु गटविकास अधिकारी यांचे म्हणणे हे मान्य करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १९.१२.२००६ च्या अर्जात मुद्या क्रमांक ४ ची माहिती रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.१२.२००६ च्या अर्जा मधील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- शास्ती लादण्यात येत असून सदरची शास्ती ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी त्यांचे वेतनातून वसूल करुन लेखा परिक्षण आक्षेपांचा अनुपालन अहवाल व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाकडे तीन महिन्यात सादर करावा.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत संबंधितांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९३/२००७.**

श्री.ताराचंद सागरमल चौबे,
रा.मारवाडी मोहल्ला,
सराफा लाईन, वर्धा - ४४२ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अप्पर जिल्हाधिकारी,
वर्धा.

श्री. ए.जी.लटारे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
वर्धा.

श्री. डी. व्ही. जोशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक भूमी अभिलेख, वर्धा.

श्री.एस.एस.पवार,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी यांचे तर्फे श्री. सी. आर. नंदेश्वर, तहसीलदार, वर्धा हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) Order passed by T.L.R., S.L.R. and S.D.O. from time to time in Aarya Samaj Case No. SDO/२३-BND-५४-२००५-२००६ २) Copy of pages No. Namuna १२ and page No. १, ३, ४, ५, ६, ७ (Map), ८-(Waslewar Map), २२, २३ and २७-(Map of Measurement) ३) List of appeal cases pertaining to land Records Department decided by S.D.O.Wardha during the period from १५.३.२००५ to १५.६.२००६ ४) Number of appeal cases (Land Record Department) received by S.D.O.Wardha from S.L.R. during the period १५.७.२००५ to १५.६.२००६ and out of above how many are still pending for decision. Note- All copies are required as Xerox copies since the above are the ungoing cases in the S.D.Os court, the information may be given by S.D.Os office only. The applicant is realy to deposit the amount on receipt of intimation about the required charges. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.७.२००६ रोजी उपविभागीय अधिकारी, वर्धा यांनी अपीलकर्ता यांना उपरोक्त विषयांकित बाबी संबंधी आपण संदर्भीय पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आर्य समाज मंदीर अपील केस नं. SDO/२३ BND ५४-२००५-२००६ मधील माहिती मागितलेली आहे. परंतु सदहु प्रकरण इकडील महसूल रेकॉर्ड पासबुक मध्ये दिनांक ११.७.२००६ ला क्रमांक १ मौजा वर्धा (शहर) शिट क्रमांक १६ अ, भुखंड क्रमांक २२६५, क्षेत्र आराजी क्रमांक एसआर-२/एसआर-८९/०४.०५, SDO case No.२४/१२३/BND ५४/२००५-२००६ याप्रमाणे अधिक्षक भूमि अभिलेख, वर्धा यांचेकडे मुळ प्रकरण परत पाठविण्यात आले आहे. त्याकरिता सदर प्रकरणी माहिती संबंधित कार्यालयाकडून घ्यावी असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते व सदरच्या पत्राची प्रतिलिपी १) अधिक्षक, भूमि अभिलेख, वर्धा २) तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, वर्धा यांना माहितीस्तव व त्यांनी संबंधितास मागितलेली माहिती पुरवावी याकरिता अर्जासह पाठविलेली आहे असे नमुद केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक

२५.७.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे पत्र दिलेले दिसते. पुन्हा दिनांक २५.७.२००६ रोजी तालुका निरिक्षक भूमी अभिलेख यांना सुध्दा एक पत्र दिलेले आहे व दिनांक २५.७.२००६ रोजी अधिक्षक भूमि अभिलेख यांना सुध्दा पत्र दिलेले आहे. त्यावर दिनांक २६.७.२००६ रोजी तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, वर्धा यांनी आपले माहिती अधिकाराखाली चालू असलेल्या अपील अर्जामधील क्रमांक २ मधील माहिती आपणास पाहिजे असल्यास इकडील कार्यालयाकडून तसा अर्ज करुन नियमाप्रमाणे फी भरुन प्राप्त करुन घेता येईल असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २७.७.२००६ रोजी अधिक्षक भूमि अभिलेख वर्धा यांनी उपविभागीय अधिकारी, वर्धा यांना आपले कडील संदर्भीय पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. माहितीचा अधिकार अर्ज अर्जदाराने आपले नांवानी केलेला आहे. अर्जदाराने या कार्यालयाकडून माहिती मागितलेली नाही. त्यामुळे नियमान्वये विषयांकित माहिती या कार्यालयाकडून अर्जदारास पुरविता येणार नाही. माहिती व कार्यवाहीकरिता मुळ प्रकरण आपणाकडे सादर करण्यात येत आहे. सहपत्र मुळ प्रकरणाची धारीका-१ व सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. दिनांक २८.७.२००६ रोजी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी अपीलकर्ता यांना वरील विषयांकित माहितीचा अधिकार खाली दिनांक २५.७.२००६ चे पत्राद्वारे मागणी केली होती. तसेच मा.उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचे पत्र दिनांक १९.७.२००६ चे पत्र आपणास माहितीचा अधिकाराखाली माहिती देण्याचे पत्र दिले होते. त्यानुसार आपणास पत्र देवून इकडील कार्यालयाकडून माहिती पाहिजे असल्यास नेण्यास कळविले होते. परंतु दिनांक २७.७.२००६ आपण कार्यालयात येऊन इकडील कार्यालयाकडील कोणतीच माहितीची आवश्यकता नाही. असे सांगून आपण मा.उपविभागीय अधिकारी वर्धा यांचेकडे चालू असलेल्या माहितीच्या अधिकाराखाली अपील चालू आहे. त्या अपीलमध्ये मा.उपविभागीय अधिकारी यांचेकडून माहिती पाहिजे आहे. करिता आपणास कळविण्यांत येते मा.उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडील अपील फाईल इकडील कार्यालयाकडे उपलब्ध नसलेमुळे आपण मागणी केलेली माहिती आपणास पुरवू शकत नाही. करिता मा.उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडून माहिती अधिकाराची माहिती प्राप्त करुन घ्यावी करिता सादर. पुन्हा दिनांक २.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांना उपविभागीय अधिकारी, वर्धा यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.७.२००६ च्या अर्जाचे संदर्भामध्ये आपण आर्य समाज मंदिर अपील केस नं. SDO/२३ BND ५४-२००५-२००६

प्रकरणातील माहिती माहितीचा अधिकाराखाली मागणी केली आहे. सदरहु प्रकरण अधिक्षक भूमि अभिलेख, वर्धा यांचेकडे दिनांक ११.७.२००६ ला परत पाठविण्यात आले आहे व त्याप्रमाणे आपणास या कार्यालयातून दिनांक १९.७.२००६ चे पत्रान्वये कळविले आहे. वरील संदर्भीय पत्र क्रमांक २ अन्वये तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, वर्धा यांनी आपणास माहिती अधिकाराखाली चालू असलेल्या अपील अर्जामधील क्रमांक २ मधील माहिती आपणास पाहिजे असल्यास इकडील कार्यालयाकडून तसा अर्ज करुन नियमाप्रमाणे फी भरुन प्राप्त करुन घेता येईल असे कळविले आहे. त्याप्रमाणे माहिती तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, वर्धा यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. असे कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक ७.८.२००६ रोजी प्राप्त झाले अशी त्यांची नोंद दिसून येते. त्यावर पुन्हा दिनांक १०.८.२००६ रोजी तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, वर्धा यांनी दिनांक २.८.२००६ प्राप्त दिनांक ५.८.२००६ चे पत्र सदर्हु पत्राचे इकडील कार्यालयाचे पत्र दिनांक २८.७.२००६ ला पाठवून आपणास कळविण्यात आले की, इकडील कार्यालयाकडे अपील फाईल नसून माहितीचा अधिकाराखाली श्री.ताराचंद चौबे यांचा अर्ज आपलेकडे असलेमुळे आपलेच स्तरावरुन त्यांना माहिती पुरविण्यात यावी असे कळविले. दिनांक २७.७.२००६ ला श्री.चौबे समक्ष भेटून सांगितले की, माझा अर्ज मा.उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडे आहे. माहिती मा.उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडूनच घ्यावयाचे आहे. कारण अपील मा.उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडे आहे. करिता श्री. ताराचंद चौबे यांना आपले स्तरावरुन माहितीचा अधिकाराखाली माहिती पुरविण्यात यावे. सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली असून ती त्यांना दिनांक १०.८.२००६ रोजी प्राप्त झाली अशी नोंद दिसून यते व त्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ३१.८.२००६ रोजी जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी झालेली दिसून येत नाही व निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये जिल्हाधिकारी, वर्धा करिता दिनांक १२.२.२००८ रोजी सदर अपील प्रकरणाचा कार्यालयीन अभिलेख्यात पडताळा घेतला असता सदरचे प्रकरण सद्या सापडत नाही. सदर प्रकरणाचा शोध घेणे सुरु आहे. सदर प्रकरण सापडल्यावर आपणास सविस्तर अहवाल सादर करण्यात येईल.

कृपया सदर प्रकरणी एक महिन्याची मुदत देण्यात यावी ही विनंती. तसेच उपविभागीय अधिकारी व माहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो. अर्जदार श्री.ताराचंद सागरमल चौबे, रा.मारवाडी मोहल्ला, वर्धा यांनी या कार्यालयाला दिनांक १४.७.२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती अधिकारा अंतर्गत अर्ज दाखल केला. सदर अर्ज या कार्यालयाला त्याच दिवशी दिनांक १४.७.२००६ रोजी प्राप्त झाला व त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली. अर्जदाराने अर्ज सादर करण्यापूर्वीच ३ दिवस अगोदर दिनांक ११.७.२००६ ला सदर मूळ प्रकरण क्रमांक २३/बीएनडी-५४/२००५-०६ या कार्यालयाने काही बाबींचे पूर्ततेसाठी अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडे पाठविले होते. (सदर प्रकरण पाठविल्याची पोच जोडली आहे.) सहपत्र पान क्रमांक १. अर्जदाराचा माहिती अधिकाराअंतर्गत अर्ज प्राप्त होताच ५ दिवसात अर्जदाराला सदर प्रकरण अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडे पाठविण्यात आले असून आपण आवश्यक सर्व कागदपत्रे त्यांचेकडून घ्यावीत म्हणून दिनांक १९.७.२००६ चे पत्रानुसार कळविण्यात आले आहे. (प्रत जोडली आहे) सहपत्र पान क्रमांक ५. अर्जदाराला अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाने दिलेले पत्र तसेच सदर प्रकरण या कार्यालयाला पाठविलेल्या पत्रावर (मुळ प्रकरणात जोडलेल्या) उपविभागीय अधिकारी कार्यालयाला प्राप्त झाल्याबाबत कसलीही नोंद नाही. उलट त्यावर अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाचा शिक्का आहे. त्यामुळे सदर प्रकरणात अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाने परस्पर अर्जदाराला पत्राद्वारे कळविले असले तरी या कार्यालयाला प्रकरण प्राप्त झाले नव्हते. (प्रत जोडली आहे) सहपत्र पान क्रमांक ७ व ९. अर्जदाराने पुनश्च या कार्यालयाला दिनांक २५.७.२००६ चे अर्जान्वये उपविभागीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविल्यावरुन या कार्यालयाने दिनांक २.८.२००६ रोजी अर्जदाराला सदर प्रती व माहिती अधिक्षक भूमी अभिलेख व तालुका निरिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविले आहे. (प्रत जोडली आहे) सहपत्र पान क्रमांक ११ व १३. तालुका निरिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाने अर्जदाराला व या कार्यालयाला दिनांक १९.७.२००६ चे माहिती पुरविण्याचे या कार्यालयाचे पत्रासंदर्भाने कळविले की, अर्जदाराने तालुका निरिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाला उपलब्ध असलेली माहिती अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी. (दोन्ही पत्र जोडले आहे.) सहपत्र पान क्रमांक १५ व १७. प्रकरणात अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही जरी क्षेत्र दुरुस्ती प्रकरणातील असली तरी

... ६

मागितलेला अभिलेख (वस्लेवार बुक, मोजणी नकाशा व इतर या बाबी) हा तालुका निरिक्षक भूमि अभिलेख या कार्यालयाशीच संबंधित आहेत. सदर क्षेत्र दुरुस्तीचे प्रकरण या कार्यालयाला दिनांक १८.८.२००६ ला प्राप्त झाले. त्यानंतर सदर प्रकरणात कार्यवाही सुरु करण्यात आली. सदर दिनांकास त्याचवेळी अधिक्षक भूमि अभिलेख यांनी दिनांक २८.७ व २७.७ चे पत्रावर स्वाक्षरी केलेली नसल्याचे नमुद केले आहे व प्रकरण प्राप्त झाले म्हणून कार्यवाही सुरु केली आहे. (आदेशपत्र जोडले आहे.) सहपत्र पान क्रमांक १९. याशिवाय अर्जदार मा.महोदयांचे असे निदर्शनास आणू इच्छितो की, अर्जदार यांनी अधिक्षक भूमी अभिलेख, वर्धा यांचेकडे दिनांक १६.१०.२००६ ला माहिती अधिकाराअंतर्गत अर्ज करुन जनमाहिती अधिकाऱ्याकडे मागणी केलेल्या मुद्या क्रमांक ३ व ४ ची माहिती संबंधाने मागणी केलेली आहे. ज्यात उपविभागीय अधिकारी यांचेकडे अधिक्षक भूमि अभिलेखने दिनांक १.१०.२००५ ते दिनांक १५.१०.२००६ या कालावधीतील प्रकरणांचा तपशील व संबंधित प्रकरणाचा (आर्य समाज मंदिर क्षेत्र दुरुस्ती प्रकरण) गोषवारा मागितला होता. यासंदर्भाने अर्जदारास प्रथम मुदत मागण्यात आल्याचे व त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांचेकडील प्रकरणांचा दोन पानांचा तपशील अर्जदाराला पुरविण्यात आलेला आहे. (वरील दोन्ही पत्रांची व माहिती अधिकाराची प्रत व पोच जोडली आहे) सहपत्र पान क्रमांक २१ ते ३२. सबब आपणास हे बयान सविनय पूर्वक सादर करुन पुनश्च विनंती करण्यात येते की, या कार्यालयाने केलेली कार्यवाही योग्य व विहित कालावधीत पार पाडली असल्याने व अर्जदाराला आवश्यक सर्व माहिती प्राप्त झालेली असल्याने कलम २० नुसार शास्ती लावण्यात येवू नये. माहिती अधिकारी यांचे बयान आज दिनांक ३.३.२००८ रोजी सविनय सादर.

४. वरील प्रकरणातील क्रमशः अपीलकर्ता यांचा अर्ज हा त्यावेळी उपविभागीय अधिकारी, तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, अधिक्षक भूमि अभिलेख यांच्या पत्रव्यवहारावरुन असे दिसून येते की, यापैकी कोणत्याही अधिकाऱ्यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज वाचलेला दिसत नाही. तसेच कोणत्याही अधिकाऱ्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कोणत्याही अधिनियमाचे व नियमांचे माहिती दिसून येत नाही. अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे अर्जदारानी अर्ज केल्यानंतर सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुन ३० दिवसामध्ये उपलब्ध करुन द्यावयाची असते. माहिती जरी त्या कार्यालयात उपलब्ध

नसेल तर ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे किंवा माहिती अधिकाऱ्यांकडे उपलब्ध असेल त्यांच्याकडे अर्ज ५ दिवसाचे आंत हस्तांतरण करावयाचा असतो. माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी यांना माहिती मागितली असता त्यांनी अर्जाचे हस्तांतरण जरी ५ दिवसात केलेले असले तरी सदरच्या अर्जामध्ये जी इतर ३ मुद्यांची माहिती मागितली होती ती माहिती त्यांच्याच कार्यालयातील दिसून येते व त्यामुळेच तालुका निरिक्षक भूमि अभिलेख यांनी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये माहिती पाहिजे असल्यास पुन्हा अर्ज करावा व नियमाप्रमाणे फी भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. म्हणजेच तालुका निरिक्षक भूमि अभिलेख यांना सुध्दा अधिनियमाचे तरतुदीचे कोणत्याही प्रकारची कल्पना दिसून येत नाही. मुद्या क्रमांक १, ३ व ४ ची काळजी उपविभागीय अधिकारी यांनी घेतली नाही व तालुका निरिक्षक भूमि अभिलेख यांनी सुध्दा घेतली नाही. त्यातही तालुका निरिक्षक भूमि अभिलेख यांनी उपविभागीय अधिकारी यांना माहिती मागितली आहे असे पत्र दिलेले आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा जबाबदारी टाळणे या प्रकरणी जास्त दिसून येते. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता सदरची माहिती ही अतिशय साध्या व सोप्या भाषेत मागितली आहे. परंतु त्याबाबत सुध्दा दिनांक १९.७.२००६ व १०.८.२००६ पर्यंत पत्रव्यवहार पलिकडे आता काहीच निष्पन्न झालेले दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दिनांक ३१.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले असले तरी त्या अपीलाची दखल घेतली नाही व पुन्हा आयोगाकडे सदरचे अपील प्रकरण सापडत नाही म्हणून खुलासा केलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. एखादे आवक झालेले प्रकरण सापडत नाही अर्थात ही जबाबदारी जिल्हाधिकारी यांची आहे. सदरच्या अपील प्रकरणामध्ये राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीकरिता सुमारे ४ तारखा झालेल्या आहेत. परंतु आजही माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमि अभिलेख हे माहिती उपलब्ध करुन देवू शकले नाही व एकमेकांवर जबाबदारी टाकण्याचा प्रयत्न करतांना दिसत आहेत व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तसेच माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता ज्या अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे सहाय्य घेतले असले त्यांना सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजले जाते व

... ८

त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये तालुका निरिक्षक भूमि अभिलेख हे सुध्दा दोषी आढळून येतात. यावरुन चारही अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता गांभीर्याने घेतलेले दिसून येत नाही. हा सर्व पत्रव्यवहार करण्यापेक्षा नस्तीतील पत्रव्यवहार देणे ही बाब १० मिनिटात झाली असती. परंतु आज त्याकरिता सुमारे २ वर्षाचा काळ झाला आहे व तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झ ालेली नाही. त्यांनी खुलासा करतांना दिनांक १६.१०.२००६ रोजीच्या अर्जामध्ये त्यांना हिच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे असे नमुद केलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे कलम ६(१) खालील अर्ज हा प्रत्येक अर्ज हा स्वतंत्र अर्ज असतो व त्या स्वतंत्र अर्जाची प्रक्रिया सुध्दा वेगळी असते. दिनांक १४.७.२००६ व पुन्हा दिनांक १६.७.२००६ रोजी पुन्हा अर्ज केलेला असेल त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढण्यात येत नाही. प्रकरणातील सर्व पत्रव्यवहार हा अतिशय बेजबाबदारपणाचा आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे या प्रकरणी माहिती उपलब्ध करुन देण्यास जे माहिती अधिकारी म्हणून जबाबदार असतील ते दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहेत व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे. शास्तीस पात्र अधिकाऱ्यास अधिनियमाचे कलम २०(१) परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे लागते. सुनावणीस सर्व अधिकारी हजर आहेत. सुनावणी त्या संबंधाने झालेली आहे खुलासा त्यांचा सादर केलेला आहे व खुलासा करतांना दिलेल्या पत्रव्यवहाराच्या फक्त आधार घेतलेला आहे. पुन्हा शास्तीचे संदर्भात जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी चुक झालेली मान्य करीत आहेत. परंतु सदरचा खुलासा हा स्विकारता येत नाही.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत मुद्ये निहाय छायांकित प्रतीसह विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तसेच या प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास ज्यांचे सहाय्य घेतले असले ते दोषी आढळून येत असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येत असून सदरची शास्तीची वसुली ही जिल्हाधिकारी, वर्धा यांनी त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१)" मध्ये जमा करुन तसा अहवाल तीन महिन्यामध्ये आयोगाकडे पाठवावा.

३) प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही व निर्णय दिलेला नाही व अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ६.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५९८/२००७.**

श्री.सुरेश शेषराव पारस्कर,
रा.भोटा, ता.नांदूरा,
जिल्हा बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. टी. मापारी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नांदुरा,
जिल्हा बुलढाणा.

श्री. व्ही.टी. निंबाळकर,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत भोटा,
ता.नादुरा, जिल्हा बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००७ रोजी सचिव/ग्रामसेवक शासकीय माहिती अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय भोटा यांच्याकडे खालील प्रमाणे ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. १) विद्यमान सरपंच जनार्दन श्रीकृष्ण धुळे हे कोणत्या तारखेपासून सरपंच झाले व त्यांनी कार्यभार स्विकारला ? २) भोटा ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या अभिलेखातील मकान (निवासस्थान) कर आकारणी नोंद रजिस्टर

... २

मध्ये जागा (मालमत्ता) बाबत फेरफार नोंद घेण्याचा अधिकार सरपंच यांना आहेत काय ? नसल्यास अशा प्रकारच्या फेरफार नोंदी घेण्यात आल्या असतील तर त्यांचा उद्येश काय होता ? भोटा ग्रामपंचायत अंतर्गत अशा बेकायदेशीर नोंदी रजिस्टर मध्ये घेण्यात आलेल्या आहेत काय ? असल्यास या बेकायदेशीर कृत्याबाबत आपण आपल्या वरिष्ठांना कळविलेले आहे काय ? याबाबत सविस्तर माहिती पुरविण्यात यावी. ३) विद्यमान सरपंच जनार्दन श्रीकृष्ण धुळे यांचे कार्यकाळात एकूण किती नागरिकांचे मकान (निवासस्थान/प्लॉट) बाबत फेरफार नोंदी घेण्यात आल्या ? संबंधित फेरफार नोंद बाबत मालमत्ता धारकांनी फेरफार नोंद घेण्याबाबत विनंती अर्ज केलेले आहेत काय ? अर्जासोबत कोणकोणते कागदपत्रे जोडलेली होती? याबाबत संपूर्ण सत्यप्रतीसह माहिती पुरविण्यात यावी. ४) वरील फेरफार बाबतच्या नोंदची ज्या ग्रामपंचायतचे सभेत ठराव घेण्यात आले होते त्या त्या सभेचे इतिवृत्त (प्रोसेडींग) ची सत्यप्रती पुरविण्यात याव्या. ५) भोटा ग्रामपंचायतचे विद्यमान सदस्यांकडे सद्यःस्थितीत कोणकोणते कर थकित आहेत याबाबत सविस्तर माहिती पुरविण्यात यावी. ६) भोटा ग्रामपंचायत अंतर्गत पुर्नवसन समिती गठीत करण्याबाबत शासनाचे काय निर्देश आहेत ? त्यानुसार कार्यवाही करण्यात आली काय ? याबाबत माहिती पुरविण्यात यावी. सदरची माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे किंवा व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २१.२.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या अपीलाचे सुनावणीचे वेळेस उत्तरवादी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. १) श्री. सुरेश शेषराव पारसकर यांची अपील या कार्यालयाकडे दिनांक २१.२.२००७ ला प्राप्त झ ाली. सदर अपीलाबाबत जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत भोटा यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक पसना/माअ/५७२/२००७, दिनांक २३.२.२००७ नुसार सुचना दिलेली आहे. कृपया सहपत्र क्रमांक १, २ व ३ चे अवलोकन व्हावे. २) तत्कालीन सचिव श्री. ए. यु. काकडे यांनी माहितीच्या अधिकारातील अर्ज

स्विकारलेला आहे व अपीलाची सुचना सुध्दा त्यांनीच स्विकारलेली आहे. त्याच काळात म्हणजे दिनांक १६.३.२००८ रोजी त्यांनी ग्रामसेवक पदाचा राजीनामा दिला. आपला प्रभार श्री. व्हि. टि. निंबाळकर यांना दिनांक २.४.२००८ रोजी दिला परंतु प्रभारात माहितीच्या अधिकाराचे फाईल न दिल्यामुळे अपीलात माहिती उपलब्ध करणे व संबंधितास पुरविण्यास विलंब झालेला आहे. कृपया सहपत्र ४, ५ व ६ चे अवलोकन व्हावे. ३) सदर प्रकरणात माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबास आजचे ग्रामपंचायत सचिव जबाबदार नसून तत्कालीन सचिव जबाबदार आहेत म्हणून माहितीचा अधिकार २००५ मधील कलम २० नुसार सध्याचे जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी जबाबदार नसल्यामुळे शास्ती लादण्यात येवू नये हि विनंती. तसेच उत्तरवादी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ८.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून चौकशी अहवाल सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिलेला आहे व दिनांक १८.९.२००७ रोजीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ही बाब अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ती त्यांनी विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. विलंबाचे संदर्भामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी खुलासा सादर केलेला आहे. सदरच्या खुलाश्यामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक १२.१.२००७ रोजी अर्ज केला त्यावेळेस श्री. ए. यु. काकडे हे तत्कालीन सचिव होते व त्यांनी हा अर्ज स्विकारला होता व अपीलाची सुचना सुध्दा त्यांनीच स्विकारलेली होती. त्याच काळात त्यांनी ग्रामसेवक पदाचा राजीनामा दिला व आपला प्रभार श्री.व्ही.टी.निंबाळकर यांना दिला व त्या प्रभारात माहितीच्या अधिकाराची माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे सदरची माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २३.२.२००७ रोजी गट विकास अधिकारी यांनी सचिव, ग्रामपंचायत, भोटा यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यावरुन श्री. ए. यु. काकडे यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होते. तसेच आजचे ग्रामपंचायत सचिव जबाबदार नसून तत्कालीन ग्रामसचिव जबाबदार आहेत असाच त्यांनी खुलासा दाखल केला व त्यावरील उत्तर दाखल केले आहे. माहितीच्या अर्जात माहिती अधिकारी यांनी ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असते. त्यामुळे संबंधित माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. परंतु त्यांनी राजीनामा दिलेला आहे व आता सध्या कृषीसेवक या पदावर कार्यरत आहेत असे गट विकास अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे त्यांचे विरुध्द

अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक राहील. परंतु कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादावयाची असल्यास संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. परंतु ग्रामसेवक हे सेवेत नसल्यामुळे आज उपस्थित राहिले नाही. परंतु माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे श्री. ए. यु. काकडे हे वर नमुद केल्याप्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून संबंधित तत्कालीन ग्रामसचिव श्री. ए. यु. काकडे आताचे कृषिसेवक यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्या कारणास्तव दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्ती बद्यल गट विकास अधिकारी यांनी श्री.ए.यु.काकडे यांना अवगत करावे व त्याबाबतचा खुलासा आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत सादर करावा.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीकरिता जिल्हा कृषि अधिकारी, बुलढाणा व तालुका कृषि अधिकारी, नांदूरा, जि. बुलढाणा यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ७.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५९९/२००७.**

श्री. विजय तुळशीराम सिरसाट,
मु.पो. कान्हेरी (गवळी)
ता.बाळापूर, जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सेवकराम महादेवराव ताथोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अध्यक्ष,
श्री दत्त दिगंबर शिक्षण प्रसारक मंडळ,
श्री दत्त महाराज विद्यालय, कसूरा,
ता. बाळापूर, जि. अकोला.

श्री. डी.एस. सरप,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्री दत्त महाराज विद्यालय, कसूरा,
ता. बाळापूर, जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००६ रोजी सन २००६ ते २००७ या शैक्षणिक सत्रातील माहे मे २००६ पासूनचे पगाराचा तपशील व पगाराचे प्रमाणपत्र देणेबाबत (दोन प्रतीमध्ये). तसेच माहे डिसेंबर २००६ व जानेवारी २००७ चे पगार प्रमाणपत्र. (दोन प्रतीमध्ये) माहिती व्यक्तिशः हातोहात मिळावी असे अर्जात नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दिनांक १२.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम

... २

अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २४.३.२००७ रोजी श्री.व्हि. टि. सिरसाट यांनी दिनांक १३.११.२००६ ला त्यांचे वैयक्तिक पगारासंबंधी माहिती मागितली होती. ते आपल्या विद्यालयातच कार्यरत असून त्यांना दिनांक १२.१२.२००६ ला रुपये ६/- भरुन माहिती देण्यास तयार असल्याबद्यल लेखी सुचविले. परंतु त्यांचेकडून रुपये ६/- मनिऑर्डरने दिनांक १९.१२.२००६ ला प्राप्त झाले. तद्नंतर ते व्यक्तिशः माहिती मागविली असल्याने दिनांक २६.१२.२००६ रोजी उपलब्ध झ ाले व त्यांना माहिती मागितली असलेली पुरविली. त्यांच्या मते माहिती चुकीची, दिशाहीन व खोटी पुरविली हे आपल्या वरील संदर्भीय पत्रावरुन समजले. हयाबाबत खुलासा व सुधारित माहिती हया पत्रासोबत सादर करीत आहे. परंतु द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक १३.११.२००६ रोजी दिलेल्या अर्जाची माहिती न मिळाल्यामुळे दिनांक १२.१.२००७ रोजी पहिले अपील बाबत कोणतीही सुनावणी घेतली नाही. सदरच्या संस्थेचे सचिव यांनी सुनावणी न घेतल्यामुळे सदरचे अपील केले आहे. त्यातही सहपत्र प्रपत्र अ सत्यप्रत मिळालेली व मागितलेली माहिती तपशील विवरण, अपीलेट फॉर्म प्रपत्र ब सत्यप्रत पुराव्याच्या सांक्षाकिंत प्रती दाखल केलेल्या दिसून येते. सदरचे द्वितीय अपील दिनांक १६.३.२००७ रोजी दाखल केलेले आहे व त्यापूर्वीच दिनांक २६.१२.२००६ ला अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे ही बाब त्यांना सुध्दा मान्य आहे. त्यांच्या अपील मेमोमध्ये दोन्ही विसंगती दिसून येते. विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली याबद्यल जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की हे रजेवर निघून गेले होते व त्यांच्या रजेच्या अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. सदरचा रजेचा अर्ज दिनांक १३.१२.२००६ असून माझी तब्बेत दिनांक १३.१२.२००६ पासून व्यवस्थित नाही उपचार चालू असून तब्बेत व्यवस्थित झाल्यास शाळेमध्ये हजर होईल. करिता मला आजारी रजा मंजूर करुन उपकृत कराल ही विनंती. व त्यावरुन स्पष्ट होते की, माहिती उपलब्ध न होण्यासाठी अपीलकर्ता हे सुध्दा जबाबदार आहेत. तसेच अपीलकर्ता यांना चुकीची माहिती दिलेली आहे असे जे म्हणणे आहे त्या संदर्भामध्ये जी माहिती अस्तित्वात नाही ती भविष्यात पुढील वर्षातील महिन्यातील माहिती त्यांनी मागितली व त्यामुळे सदरची माहिती त्यांना जी उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती चुकीची आहे असे त्यांना म्हणता येणार नाही. अर्जाच्या तारखेपर्यंतच माहिती सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असते तीच माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांनी तोंडी असे सांगितले की आता माहिती मिळून उपयोग काय. जेंव्हा पगारपत्रकाची

आवश्यकता होती. परंतु त्या आधीच त्यांनी दिनांक ५.१०.२००५ रोजी भारतीय स्टेट बॅकेकडून १,००,०००/- रुपये हे कर्जाचे घेतलेले दिसून येते व एकच बॅक एक अर्जदारास एकाच पगार पत्रकाचे आधारे दोन वेळा कर्ज वाटप करीत नाही व त्यावरुनच अपीलकर्ता यांना जी माहिती हवी होती ती माहिती भविष्यातील मागून माहिती अधिकारी कसे अडचणीत येतील असा विचार केलेला दिसतो. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपीलात त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ७.६.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५६१/२००७.**

श्री. देवेंद्र गंगाधर फडणवीस,
२७६, रावसाहेब फडणवीस पार्क,
धरमपेठ, नागपूर - ४४० ०१० ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपाध्यक्ष,
महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (मिहान)
सिव्हील लाईन, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (मिहान)
सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.५.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००७ रोजी संचालक, महाराष्ट्र एयरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (मिहान), नागपूर यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये खालील प्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो. माहितीचा विषय मिहान प्रोजेक्ट अंतर्गत अधिग्रहित केलेल्या विविध ठिकाणच्या जमिनी कोणत्या दराने अधिग्रहित केल्या व कोणत्या कंपन्यासोबत आपले करार झालेले आहेत. माहितीच्या संबंधित कालावधी नागपूर येथे कार्गोहब जाहिर झाल्यापासून ते आजपर्यंत. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन १) प्रकल्पाच्या जमीनी अधिग्रहणाकरिता चुकता करण्यात आलेला निधी कंपनीने दिला की राज्य शासनाने.

... २

२) उपरोक्त निधी राज्य शासनाने कंपनीच्या वतीने दिला असल्यास अथवा कंपनीने स्वतः दिला असल्यास एकूण किती निधी देण्यात आला. ३) आतापर्यंत जमिनी अधिग्रहण/वाटपा संबंधात ज्या कंपन्याशी करार करण्यात आले ते कोणत्या दराने करण्यात आले. ४) कोणत्या कंपनीला किती जमीन देण्याबाबत करार झाले (त्या जमीनीचे खसरा क्रमांक व आराजी) याची माहिती देण्यात यावी. ५) उपरोक्त जमिनी देतांना किव्हा करार करतांना भाव किंवा जमीन मोबदला ठरविण्याची पध्दती कोणती ? ६) उपरोक्त जमिनी लीजवर देण्यात आल्या आल्यास लीजमधील अटी व शर्ती कोणत्या होत्या. ७) जमीन वाटप करार करतांना कोणती पध्दती अवलंबविण्यात आली ? लीलाव पध्दती/प्रथम आवो प्रथम पाओ पध्दती अथवा कोणती पध्दती ? ८) अधिग्रहित जमीन विकसीत करण्यासाठी प्रति चौरस फुट सरासरी विकास खर्च किती करण्यात येतो आहे वा येणार आहे ? माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.४.२००७ रोजी चंद्रशेखर गुप्ता, सार्वजनिक माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पत्राद्वारे आपल्या वरील संदर्भाधीन अर्जा विषयी खालील माहिती देण्यात येत आहे, "आपणाकडून आवश्यक शुल्क रुपये २०००/- प्राप्त झाले. (पावती क्र. ०००६, दिनांक १९.४.२००७) खालील प्रमाणे मुद्ये निहाय उत्तर दिलेले आहे. "१) निधी शासनाने व कंपनीने दिला आहे. २) आता पावेतो सुमारे रुपये ११५ कोटीचा निधी देण्यात आला आहे. ३) जमिनी वाटपाबाबत ज्या कंपन्याशी करार करण्यात आलेले आहेत त्याचा तपशील माहिती पत्रकात दिलेला आहे. परंतु त्यांना दिलेल्या दराबद्यलची माहिती व्यावसायिक तत्त्व स्वरुपाशी संबंधित असल्याने देऊ शकत नाही. ४) सदरहू माहिती मुद्या क्रमांक ३ मध्ये देण्यात आलेली आहे. ५) विशेष आर्थिक क्षेत्रातील (SEZ) प्रक्रिया क्षेत्रातील (Processing Zone) जमिनीचा भाव कंपनीच्या संचालक मंडळाने प्रथम येणाऱ्याला प्राधान्य या तत्त्वानुसार ठरविली आहे. अप्रक्रिया क्षेत्रातील (Non-Processing Zone) जमिनीचा भाव स्पर्धात्मक निविदा किंवा करार व समझोता करुन ठरविण्यात येतो. ६) विशेष आर्थिक क्षेत्रातील तत्त्वानुसार ठरविण्यात आलेल्या अटीनुसार जमिनी लिजवर देण्यात आल्या. ७) जमिनीचे वाटपासंबंधी अवलंबलेली पध्दती मुद्या क्रमांक ५ मध्ये नमुद केली आहे. ८) अधिग्रहित जमीन विकसीत करण्यासाठी सुमारे रुपये ९७/- प्रति चौरस फुट अधिक इतर वाढ

... ३

(escalation) किती होईल हयाचा अंदाज आताच करता येणार नाही. सोबत माहिती परिपत्रक उपलब्ध करुन देण्यात आलेले दिसून येते." असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२००७ रोजी प्रथम अपील उपाध्यक्ष, महाराष्ट्र एयरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (मिहान), मुंबई यांच्याकडे केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये माहितीचा अधिकार २००५ कलम १९(१) अन्वये माहिती मिळण्याकरिता अपीलाची कारणे (अ) मिहान प्रोजेक्ट अंतर्गत अधिग्रहित केलेल्या विविध ठिकाणच्या जमिनी विविध कंपन्यांना कराराद्वारे कोणत्या दराने देण्यात आल्या. (ब) माहितीचा संबंधित कालावधी नागपूर येथे कार्गोहब (मिहान) प्रकल्प जाहीर झाल्यापासून ते आज पावेतो. अर्जदारानं विचारलेली माहिती राज्यशासनाच्या मिहान प्रकल्पाकरिता ज्या जमीनी अधिग्रहित केल्या त्याचे वाटपा संबंधात ज्या कंपन्याशी करार करण्यात आले ते कोणत्या दराने करण्यात आले ? सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांने पुरविलेली माहिती जमिनी वाटपाबाबत ज्या कंपन्यांशी करार करण्यात आलेले आहेत त्यांचा तपशील माहिती पत्रकात दिलेला आहे. परंतु त्यांना दिलेल्या दराबद्यलची माहिती व्यवसायिक तत्त्व स्वरुपाशी संबंधित असल्याने देऊ शकत नाही. वरील उत्तर हे माहितीचा अधिकार २००५ प्रमाणे अर्जदारास प्राप्त अधिकारांचे उल्लंघन करणारे आहे व त्याची कारणे खालील प्रमाणे आहेत. १) उपरोक्त एमएडीसी हे सार्वजनिक प्राधिकरण असून महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम असल्याने त्याचे सर्व व्यवहार पारदर्शी असणे आवश्यक आहेत. २) उपरोक्त जमिनीचे अधिग्रहण करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने राज्याचा एकत्रित निधीतून, निधी उपलब्ध करुन दिला आहे. ३) राज्याच्या सार्वजनिक निधीतून भुगतान करुन ज्या जमिनी अधिग्रहित झाल्यात त्याचे वाटप कोणत्या प्रकारे व कोणत्या दराने झाले हे जाणून घेणे हा नागरिकांचा अधिकार आहे. ४) सार्वजनिक निधीतून भूगतान करुन अधिग्रहित केलेल्या जमिनीचे वाटप हे पारदर्शीपणे होण्याकरिता त्यांचे वाटप नेमक्या कोणत्या दराने झाले याची माहिती देणे याने व्यवसायीक तत्त्व स्वरुपाला कोणतीही बाधा पोचते असे म्हणणे विसंगतच नाही तर हास्यास्पद आहे. ५) सार्वजनिक उपक्रमांना आपले लेखे मा.महालेखाकार यांचेकडून तपासून घेणे बंधनकारक असून त्यांनी केलेले करार किंवा संविदा योग्य दरावर झाली किंवा कसे ? हे तपासण्याचे अधिकार मा.महालेखाकारास आहे तसेच या लेख्यांच्या संदर्भात महालेखाकारांची टिपणी ही विधानमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समिती समोर मांडण्यात येत असते त्यामुळे

उपरोक्त माहिती प्रस्तुत अधिनियमांच्या कलम ८(१) च्या परंतुकान्वये मिळविण्याचा अर्जदाराचा अधिकार आहे. ६) प्रस्तुत अधिनियमांच्या पोट कलम ८ च्या तरतुदींचे वाचन केल्यास स्पष्ट होते की, अशा प्रकारची माहिती दिल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोचत नाही. उलटपक्षी ती न पुरविल्याने सार्वजनिक निधीतील मत्तेच्या विक्री बाबतच्या नियमावलीचे उल्लंघन होऊन काही विविक्षीत घटकांकरिता इतरांना स्पर्धेतून बाद केल्याची परिस्थिती तयार होते. करिता आपणास विनम्र प्रार्थना आहे की, आपण संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास माहिती देण्याचे आदेश द्यावेत. तसेच उपरोक्त माहिती जाणीवपुर्वक दडविण्याचा प्रयत्न केला हे स्पष्ट होत असल्याने उपरोक्त माहिती अधिकाऱ्यास किव्हा यथास्थिती जबाबदार अधिकाऱ्यास माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २० अन्वये जास्तीत जास्त दंड करण्यात यावा ही विनंती केलेली आहे.

४. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी उपस्थित केलेले मुद्दे तपासून पाहिले व त्याचा खुलासा खालील प्रमाणे दिलेला आहे. १) होय. एमएडीसी महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम असून त्या सर्व व्यवहारात पारदर्शीकपणा आहे आणि त्यांना महाराष्ट्र शासना द्वारा प्रस्थापित केलेल्या खालील संचालक मंडळाची मान्यता आहे. (१) श्री.विलासरावजी देशमुख (मा.मुख्यमंत्री), (२) श्री.आर.सी.सिन्हा (उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक), (३) श्री.अरुण बोंगीरवार, (४) श्री.व्ही. के. जयरथ, (५) श्री. राजीव जलोटा, (६) श्री.एस्. एस्. कोहली, (७) श्री. संजय जी. उबाळे, (८) श्री. व्हि.डी.गुप्ता, (९) श्री.सतिश गवई, (१०) श्री.व्ही.के.कानडे, (११) श्री.ओ.पी.लोहिया, (१२) श्री.एन.रामाराव, (१३) श्री. शाम तागडे, (१४) श्री. संजय सेठी. २) महाराष्ट्र शासनाने काही प्रमाणात भूमीसंपादनाकरिता निधी उपलब्ध करुन दिला आहे व इतर निधी एमएडीसीने बँकाद्वारे कर्ज काढून स्वतः उभारला आहे. ३) जमीनीचे वाटप त्यासंबंधीतील अटी त्यांचे दर संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार धोरण ठरवून केलेले आहे आणि त्यात पारदर्शीपणा आहे (प्रत सोबत जोडली आहे). ज्या दराने जमिनीचे वाटप विविध कंपन्यांना करण्यात आले आहे त्यांना भारतातील इतर आर्थिक विशेष क्षेत्राशी स्पर्धा करावयाची असल्यामुळे व रोजगार निर्मितीकरिता त्यांच्या व्यावसायिक तत्त्वाला बाधा पोहचू शकते. विविध कंपन्याना जमिन वाटप करतांनाचा दर ठरविताना मिहान प्रकल्पाला इतर विशेष आर्थिक

क्षेत्राशी स्पर्धा करावी लागते जसे आंध्र प्रदेश सरकारने माहिती तंत्र ज्ञानाच्या विकासाकरिता व रोजगार निर्मिती करण्यासाठी जमिनीचे वाटप केले आहे. ४) वरील ३ नंबरच्या मुद्यांत स्पष्ट केल्याप्रमाणे जमिनीच्या वाटपाचे दर उघड केल्याने एमएडीसी वर त्याचा काहीही परिणाम होणार नाही परंतु ज्या कंपन्यांना जमिनीचे वाटप केलेले आहे त्यांच्याच स्पर्धात्मक बाबींमुळे तशी मागणी त्या कंपन्यांनी करार करतांना केली आहे आणि एमएडीसीने ती मान्य केली आहे. ५) सार्वजनिक उपक्रमांचे लेखे मा.महालेखाकार यांचेकडून तपासून घेत असतातच व केलेले करार हे किंवा संविदा योग्य दरावर झाली किंवा कसे हे तपासण्याचे अधिकार त्यांना आहेतच परंतु त्यासाठीच महालेखाकार ज्या दराने व्यवहार झ ाला आहे ते उघड करीत नाहीत. तथापि माहितीच्या अधिकार कायद्यान्वये कलम ८(१) (डी) अन्वये एमएडीसीला व्यावसायिक बाबींची माहिती न देण्याचा अधिकार आहे. वरील मुद्याचे स्पष्टीकरण केल्यामुळे प्रस्तुत अधिनियम पोट कलम ८ च्या अन्वये स्पर्धात्मक स्थानाला हानी न पोचवण्यात कोणतेही उल्लंघन होत नाही. माहितीच्या अधिकार कायद्यान्वये तथापि वरील सर्व बाबींचा विचारपूर्वक तपासणी केल्यानंतर मी एमएडीसीच्या माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय हा बरोबर आहे व तो पूर्णतः कायद्याच्या ८(१)(डी) कलमाच्या आधारे घेतलेला आहे असा निर्णय दिलेला असून ते अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. द्वितीय अपीलामध्ये उपरोक्त अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांनी अपीलाचे निर्णयातील मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये १) जमीनी या शासनाच्या एकत्रीत निधीतून दिलेल्या निधीच्या माध्यमातून शासनाच्याच सार्वजनिक उपक्रमाने अधिग्रहीत केल्या त्यामुळे त्या जमिनीचे वाटप कोणत्या दराने झाले हे जाणुन घेण्याचा अधिकार नागरिकांचा आहे. २) ज्या दराने जमीनीचे वाटप विविध कंपन्यांना करण्यात आले आहे. त्यांना भारतातील इतर विशेष आर्थिक क्षेत्राशी स्पर्धा करावयाची असल्यामुळे रोजगार निर्मितीकरिता त्यांच्या व्यवसायिक तत्त्वाला बाधा पोहचू शकते असे नमुद केले. तरी अशी बाधा कशा प्रकारे पोहचु शकते याचे कोणतेही कारण अपीलीय अधिकाऱ्यांनी दिले नाही. त्यामुळे माहिती नाकारण्यासाठी कारण सबळ तर नाहीच पण दिशाभूल करणारे देखील आहे व जाणून बुजून माहिती दडविण्याच्या प्रयत्नाला पाठिंबा देणारे आहे करिता ते फेटाळण्यात यावे. निर्णयातील मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये १) उपरोक्त उत्तर दिशाभूल करणारे आहे.

कारण स्पर्धात्मक बाबी म्हणजे नेमके काय याचे कारण देणे आवश्यक आहे. २) तसेच कंपन्यांनी कोणतीही विनंती केली तरी एमएडीसी हा सार्वजनिक उपक्रम असल्याने नियमबाहय विनंती त्यांना स्विकारता येत नाही. करिता उत्तर फेटाळण्यात यावे. उपरोक्त निर्णयातील मुद्दा क्रमांक ५ बद्दल उत्तरात संपूर्णपणे दिशाभूल केली आहे. मा. महालेखाकारास केवळ संविदा तपासण्याचा अधिकार नाही तर एखाद्या कंपनीशी झालेला करार किती दराने झाला व ते दर योग्य आहेत किंवा अयोग्य आहेत हे नमुद करण्याच्या अधिकार आहे. कृपया सोबत जोडलेले सहपत्र क्रमांक ४ बघावे त्यात दिनांक २१ मार्च २००६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता महालेखाकारांच्या वाणिज्य अहवालातील दाखले बघावे. विविध सार्वजनिक उपक्रमाबाबत महालेखाकारांनी त्यांच्या अहवालात करार/ संविदांचे दर देखील दिले आहेत हे स्पष्ट आहे व उपरोक्त अहवाल विधान मंडळासमोर मांडण्यात आला असून आता तो सार्वजनिक उपक्रम समिती समोर चर्चेला हि येणार आहे. याच प्रकारची माहिती अर्जदाराने मागितली असल्याने कायद्याच्या ८(१) च्या परंतुकान्वये ती माहिती देणे बंधनकारक आहे. हे या सहपत्रानी स्पष्ट होत आहे. त्यामुळे प्रथम अपील अधिकाऱ्यांचे उत्तर फेटाळण्यात यावे. उपरोक्त निर्णयातील मुद्दा क्रमांक ६ च्या दिलेल्या उत्तराचे संदर्भामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दा पेक्षा संपूर्ण विसंगत उत्तर देण्यात आले आहे. करिता सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांनी माहिती लपविण्याचा प्रयत्न केला हे स्पष्ट आहे. ही माहिती लपविण्यामागे हेतु शुध्द नसून मनमानी व बेकायदेशीर व्यवहार लपविण्याचा प्रयत्न आहे असे दिसून येते. प्रथम अपील अधिकाऱ्यांनी कोणतेही सबळ कारण न देता व कायद्याचा अभ्यास न करता हा निर्णय दिला असल्याने आपण तो फेटाळून माझी द्वितीय अपील स्विकृत करावी व उपरोक्त माहिती मला देण्याबाबतचे निर्देश एमएडीसीला दयावेत ही विनंती. त्याचप्रमाणे माहिती जाणूनबूजून न दिल्याबाबत जो काही अधिकतम दंड लावणे शक्य आहे तो गैर अर्जदारावर लावण्यात यावा.

६. सदरच्या द्वितीय अपीलाचे सोबत अपीलकर्ता यांनी त्यांच्या उपरोक्त म्हणण्याप्रमाणे स्पष्टीकरणार्थ पुरावा म्हणून महालेखाकारांनी दिनांक ३१.३.२००६ रोजी संपलेल्या वर्षाकरिता विधानमंडळासमोर सादर केलेल्या वाणिज्य अहवालातील उताऱ्याची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी खालील प्रमाणे खुलासा केलेला आहे. १) कंपन्याशी केलेला कोणताही करार हा गोपनीय असतो व तो व्यावसायिक तत्त्वानुसार त्यातील माहिती व ठरविलेले दर

उघड न करणे बंधनकारक असते तरी तसे केल्यास करार रद्द होऊ शकतो. हया संदर्भात येथे नमुद करण्यात येते की, बाईंग कंपनी बरोबर झालेल्या करारात माहिती उघड न करण्याचा करार झाला आहे. (Non-Disclosure Agreement). आमच्या उपक्रमात नेहमीच पारदर्शकता असते. ३) कोणत्या कंपन्याशी करार झालेत त्याची माहिती देण्यात आली आहे. परंतु त्यांचे दर आम्ही स्पर्धात्मक बाबींमुळे देऊ शकत नाही. परंतु सरासरी रुपये ३८ लाख प्रती एकर दराने जमिनीचे वाटप झाले आहे. विशेष आर्थिक क्षेत्रांना आपआपसात स्पर्धा करायची असल्यामुळे व मिहान विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक केलेल्या कंपन्यांनी त्यांना आकारलेल्या दरांबद्यल माहिती न देण्यासंबंधी दर्शविले आहे. वस्तुतः विविध शासनांनी असे निर्देशच दिलेले आहेत की, रोजगारभिमुख कंपन्यांनाच जागेचे वाटप करण्यात यावे. ४) जर आम्ही गुंतवणुकदारांचे करार उघड केले तर त्यामुळे त्याचा परिणाम विदर्भातील मिहान सारख्या प्रकल्पावर होऊ शकतो. ५) वरील खुलासा ४, ५ व माहितीच्या अधिकार कायद्यान्वये कलम ८(१)(डी) अन्वये करण्यात येत आहे. सार्वजनिक उपक्रमांचे लेखे मा. महालेखाकार यांचेकडून तपासून घेत असतातच व केलेले करार हे किंवा संविदा योग्य दरावर झाली किंवा कसे हे तपासण्याचे अधिकार त्यांना आहेतच. परंतु महालेखाकार ज्या दराने व्यवहार झाला आहे ते सार्वजनिकरित्या दरांबद्यलची माहिती देत नाहीत. ६) वरील खुलासा ४, ५ व माहितीच्या अधिकार कायद्यान्वये कलम ८(१)(डी) अन्वये करण्यात येत आहे.

७. अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये नमुद केल्याप्रमाणे युक्तिवाद केला. तसे वरिष्ठ उपाध्यक्ष, श्री. हर्षवर्धन गजभिये यांनी सुध्दा दाखल केलेल्या खुलाश्याप्रमाणे युक्तिवाद केला. उपरोक्त खुलासा व युक्तिवादाप्रमाणे आयोगा समोर विचार करण्याकरिता व निर्णयाकरिता खालील २ मुद्ये उपस्थित होतात.

१) मिहान प्रकल्पात ज्या दराने जमिनीचे वाटप विविध कंपन्यांना करण्यात आलेले आहे ते जमिनीचे वाटपाचा दर उघड न करण्याबाबत ज्या कंपन्यांना जमिनी वाटप केल्या आहेत त्यांची स्पर्धात्मक बाबींमुळे तशी मागणी त्या कंपन्यांनी करार करतांना केलेली आहे व ती तशी उघड केल्यास करार रद्य होऊ शकतात काय ? व सदरच्या करारास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २२ अन्वये अधिभावी परिणाम देता येईल काय ?

२) विविध कंपन्यांना जमिनी वाटप करतांनाचा ठरविलेला दर त्यांना भारतातील इतर विशेष आर्थिक क्षेत्राशी स्पर्धा करावी लागते व त्यामुळे रोजगार निर्मितीकरिता त्यांच्या व्यावसायिक तत्त्वाला बाधा पोहचू शकते काय ?

८. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे संदर्भामध्ये उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी दिनांक १९.१०.२००७ रोजी मा.सचिव, सामान्य प्रशासन विभाग (नागरी उडड्डयन), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना पत्राने एमएडीसीच्या ज्या कंपन्यांना जमिनीचे वाटप केलेले आहे त्यांच्या जमिनीच्या वाटपाचा दर उघड करणे हे माहितीच्या अधिकाराचा कायदा २००५ च्या कलम ८(१)(ड) नुसार माहिती पुरविल्यापासून सुट आहे ही धारणा पक्की करण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्रामध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला (एमएडीसी) शासनाने त्यांच्या दिनांक ४.१.२००२ च्या शासन आदेशान्वये मिहान प्रकल्प आंतरराष्ट्रीय कार्गो हब आणि विशेष आर्थिक क्षेत्रासाठी विकसित करण्याची जबाबदारी दिलेली दिसत आहे. सदर शासन आदेशाद्वारे राज्य शासनाने सदर प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहीत करण्यासाठी रुपये २०० कोटी खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यवाही प्रगतीपथावर असून विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) हे सद्यःस्थितीत १५११.५७ हेक्टर जमिनीवर केंद्र शासनाद्वारे नोटीफिकेशन सुध्दा करण्यात आलेले आहे. सदर क्षेत्र हे विशेष आर्थिक क्षेत्र कायद्याखाली (SEZ Act) (Deemed Foreign Territory) मानीव विदेशी क्षेत्र असे आहे. सदर क्षेत्रांतर्गत विशेष आर्थिक क्षेत्र कायद्यानुसार (SEZ Act) उद्योजकांना जमिनी विविध उद्योगांसाठी एमएडीसीच्या बोर्डाच्या मान्यतेने देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार ज्या कंपन्यांना जमिनीचे वाटप केलेले आहे त्यांच्याच स्पर्धात्मक बाबींमुळे त्या कंपन्यांनी एमएडीसीशी करार केला व सदर दर उघड न करण्याबाबत कंपनीची मागणी असते आणि अशा परिस्थितीत गुंतवणुकदाराचे करार उघड केले तर त्याचा परिणाम विदर्भातील मिहान प्रकल्पावर होऊ शकतो यादृष्टिने देता येणार नाही अशी भूमिका घेतलेली आहे. याबाबतच्या स्पष्टिकरणार्थ यासोबत बोईंग विमान कंपनीचे MOU ची प्रत सोबत जोडली आहे. त्यामधील परिच्छेद ६ "Recipient shall have the right to disclose Proprietary Information which Recipient is required to disclose by court order or pursuant to the published rules and regulations of a governmental agency or body in either

case having jurisdiction over Recipient, to the extent so required by the court order or the orders, rules and requlations of the government agency or body; provides that prior to any disclosure Recipient shall notify the disclosing party promptly in writing of any order, request or intention by Recipient to make a disclosure and of the facts and cirsumetances surrounding the order request or intention so that the disclosing Party may seek an appropriate protective order or otherwise take action to prevent the disclosure. Recipient shall take all reasonable steps requested by the disclosing Party to oppose, at the disclosing partyङs expense any proposed disclosure under this section.

९. यावरुन बोईंग विमान कंपनीचे मिहान बरोबर केलेल्या करारातील परिच्छेद ६ मध्ये सदरची माहिती एखाद्या प्राधिकरणाच्या आदेशाप्रमाणे प्रकट करणे आवश्यक असल्यास असे प्रकट करणाऱ्या पक्षकारास वाटल्यास दुसऱ्या पक्षकाराला तात्काळ तसे कळविणे आवश्यक आहे. परंतु या कलमाचे बाबत जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. हर्षवर्धन गजभिये यांनी फारसा प्रकाश टाकला नाही किंवा अशा प्रकारे करार रद्य होतील असा आयोगाकडे युक्तिवाद करुन आयोगाचे निदर्शनास आणले नाही. त्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे कलम २२ च्या तरतुदीचा सुध्दा विचार करणे आवश्यक आहे. "अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे. २२ या अधिनियमाच्या तरतुदी या शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा १९) यामध्ये, त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाखेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या आधारे अमलात असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी अमलात येतील". अशी तरतुद असल्यामुळे त्याबाबत बोईंग कंपनीशी झालेला करारातील उपरोक्त कलम ६ बाबत विधि विषयक असा कोणताही युक्तिवाद किंवा अभिमत वरिष्ठ उपाध्यक्ष यांनी आयोगापुढे सादर केलेले नाही व त्यामुळे अधिनियमाचे कलम २२ मधील तरतुदींशी विसंगत तरतुदींच्या व अधिनियमांच्या तरतुदी हया अधिभावी ठरतात.

१०. जनमाहिती अधिकारी यांनी प्रामुख्याने विविध कंपन्यांना जमीन वाटप करतांनाचा दर प्रकट करण्याच्या संदर्भामध्ये त्यांना भारतातील इतर आर्थीक विशेष क्षेत्राशी स्पर्धा करावी लागते व त्यामुळे रोजगार निर्मितीकरिता त्यांच्या व्यावसायिक तत्वाला बाधा पोहचू शकते. याकरिता अधिनियमाचे कलम ८(१)(डी) चा आधार घेवून माहिती प्रकट करण्यास नकार दिला. अधिनियमाचे कलम ८(१) हा खालील प्रमाणे आहे. "या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले, तरी कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरवण्याचे आ-बंधन असणार नाही. (डी) (घ) वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता, व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यांचा समावेश असलेली जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टिने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्यांची खात्री पटली असेल त्याखेरीज, जी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल," हाच मुद्याबाबत उत्तरवादी यांनी प्रामुख्याने युक्तिवाद सादर केला त्याकरिता त्यांनी खुलाश्यामध्ये सुध्दा देशामध्ये ज्या ज्या राज्यात विशेष आर्थीक क्षेत्र उपलब्ध झाले आहे त्या त्या राज्यात सोयी सवलती त्या कमी जास्त असल्यामुळे त्याप्रमाणे कंपन्यांना त्याबद्यलची माहिती कळविण्यास किंवा इतर राज्यांना त्याबद्यलची माहिती कळल्यास त्या सोयी सवलतीमध्ये बदल होऊ शकतो. त्यामुळे त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानास हानी पोहचू शकते हा निष्कर्ष त्यांनी आयोगाकडे सादर केला. परंतु ती कशा प्रकारे हानी पोहचू शकते याबद्यल मात्र तपशीलात खुलासा केलेला नाही. माहिती उपलब्ध करुन देतांना प्रथम येतील त्यांना प्राधान्य पध्दतीने कंपनीना जमीनीचे वाटप करण्यात आले आहे असे माहिती अधिकारी यांनी नमुद केलेले आहे. परंतु एखाद्या कंपनीशी करार पूर्ण झाल्यानंतर ती माहिती प्रकट केली तर त्याबाबत कोणती हानी पोहचू शकते हयाबाबत स्पष्टीकरण केलेले नाही. त्याकरिता मा.उच्च न्यायालय, झारखंड यांच्या पुढील State of Jharkhand & Anr.V. Navin Kumar Shinha या खटल्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने कलम ८(१)(डी) च्या संबंधामध्ये खालील प्रमाणे विवेचन केलेले आहे.

२६. Section ८ (१) (d) is relevant so far instant case is concerned which inter alia provides that the authority may refuse to give information relating to commercial confidence, trade secret or intellectual property, disclosure of which would harm the competitive position of a third party, unless the competent authority is satisfied that larger public interest warrants the

disclosure of such information. The question, therefore, that falls for consideration is as to whether disclosure of various documents submitted by the bidders is a trade secret or commercial confidence or intellectual property. Prima facia, we are of the view that once a decision is taken in the matter of grant of tender, there is no justification to keep it secret. People have a right to know the basis on which the decision has been taken. If tenders are invited by the public authority and on the basis of tender documents, the eligibility of a tender or a bidder is decided, then those tender documents cannot be kept secret, that too, after the tender is decided and work order is issued on the ground that it will amount to disclosure of the authorities of Government refuse to disclose the document, the very purpose of the Act will be trustrated. Moreover, disclosure of information, sought for by the petitioner, cannot and shall not be a trade secret or commercial confidence rather disclosure of such information shall be in public interest, inasmuch as it will show the transparency in the activities of the Government.

२७. As stated in the supplementary counter affidavit, the documents were provided to the Legislative Assembly as per the reports submitted by one M.L.A., Chairman of Jharkhand Vidhan Sabha Committee. The document, disclosure of which sought for, is the experience certificate issued by one company in favour of successful bidder and also the document related to turn over and frofit of the limited company. Since the terndер process is completed and contract has been awarded, it will not influence the contract. Besides the above, a citizen has a right to know the genuineness of a document submitted by the tenderer in the matter of grant of terer for

consultancy work or for any other work. As noticed above, the tender process is completed and the contract has been awarded, therefore, it will not influence the contract. In any view of the matter, the document in question cannot be treated as trade secret or commercial confidence. In our considered opinion a contract entered into by the public authority with a private person cannot be treated as confidential after completion of contract.

११. यावरुनही ज्या कंपन्यांनी करार पूर्ण केलेला आहे त्या कंपनीशी जमीन खरेदीचा करार पूर्ण झालेला असल्याने सदरचा दराबद्यलची माहिती प्रकट करण्यास अधिक पारदर्शकता येण्याचे दृष्टिने कोणत्याही प्रकारची हरकत असता कामा नये असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी सुध्दा मा.महालेखाकार यांच्याकडे कंपनीचे अभिलेखे हे तपासणीकरिता जातीलच व मा.महालेखाकार हे प्रत्येक कराराचे संदर्भामध्ये लेखा परिक्षण करुन शेरे देत असतात असे सांगितले व प्रत्येक करार तपासतांना त्यातील दर हा वाजवी होता की नाही हे लेखापरिक्षक तपासतात व मा.महालेखाकार यांनी दिनांक ३१.३.२००६ रोजी संपलेल्या वर्षाचा वाणिज्यिक अहवालाची प्रत आयोगापुढे पुरावा म्हणून सादर केली आहे. सदरच्या अहवालामध्ये महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) अंतर्गत भूखंडाचे विक्रीच्या संदर्भात केलेल्या कराराचे संदर्भामध्ये किंवा वाटपाचे संदर्भामध्ये प्रती चौरस मीटरच्या दराची तुलनात्मक दृष्टया विश्लेषण करुन बाजार भावापेक्षा किंवा कमी किंमतीला नियतवाटप केलेले आहे व शासनाचे महामंडळाचे नुकसान केलेले आहे असा निष्कर्ष काढलेला आहे असे स्पष्ट शेरे दिलेले दिसून येतात व सदरचा अहवाल हा विधान मंडळास सादर करावा लागतो व तो सादर केल्यानंतर विधान मंडळाचे सार्वजनिक उपक्रम समितीकडे छाननीकरिता सादर होतो व त्यावरुन शासकीय जमिन वाटप किंवा शासनाच्या कंपनीने जमीनीचे वाटप कोणत्या दराने झाले ही बाब विधान मंडळास प्रकट केली जाते म्हणजे ती सर्वांकरिता प्रकट होते. त्यावरुन महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन (मिहान) ही शासकीय कंपनी असल्यामुळे त्या कंपनीचे व्यवहार हे लेखा परिक्षणार्थ भारताचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांच्याकडे सादर करावे लागतील व त्यावेळेस मिहान कंपनीने इतर कंपन्यांशी केलेले करारांमधून जमिनी वाटपाचे दर विधान मंडळाचे सदस्यांस व जनतेला ज्ञात होतील. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते स्वत: आमदार असल्यामुळे त्यांना ही माहिती विधान मंडळास सादर केलेल्या

अहवालातून मिळेलच व त्यामुळे अधिनियमाचे कलम ८ च्या परंतुकाप्रमाणे जी माहिती संसदेला किंवा राज्य विधान मंडळाला देण्यास नकार देता येणार नाही ती माहिती कोणत्याही व्यक्तिला देण्यासही नकार देता येणार नाही व त्यामुळे ती त्यांना नागरिक म्हणून मिळावी हा त्यांचा युक्तिवाद योग्य दिसून येतो. माहितीचा अधिकार २००५ हा अधिनियम प्रशासनांत पारदर्शकता यावी व सर्व व्यवहार हे जनेतस माहिती झाल्यास कोणत्याही प्रकारे त्यांत संदिग्धतेमुळे संशयास जागा राहणार नाही हा उद्येश असल्यामुळे माहिती प्रकट करणेच सुसंगत होईल. यावरील सर्व कारणांवरुन ज्या कंपनीचे जमीन खरेदीचे करार पूर्ण झाले असतील त्या कंपनीच्या संदर्भामध्ये माहिती प्रकट करण्यास कोणत्याही प्रकारची हरकत असता कामा नये हा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अधिक पारदर्शकता येईल व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

१२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादण्याची विनंती केलेली आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी नागपूरच्या पर्यायाने विदर्भाच्या औद्योगिक विकासामध्ये मिहान प्रकल्पामुळे वेग येणार असल्याने व एकूणच जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर व भारताच्या सर्वच राज्यातील औद्यागिक विकासाची चढाओढ असल्याने प्रत्येक राज्य अनेक सवलती उद्योजकांना जाहिर करत असल्याने मिहान मध्ये भविष्यात येणाऱ्या कंपन्यावर त्याचा विपरित परिणाम होऊ नये, तसेच करार केलेल्या कंपन्यानीच माहिती प्रकट करु नये अशी अट घातली असल्यानेच सद्भावनेनेच माहिती प्रकट करण्यास अधिनियमाच्याच कलम ८(१) मधील माहिती प्रकट करण्यास अपवाद आधार घेतला आहे असा युक्तिवाद केला. इतर सर्व मुद्यांची माहिती ही दिलेलीच आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती उपलब्ध होत असेल तर शास्ती लादण्या विषयीचा त्यांचा आग्रह नाही असे आयोगास तोंडी सांगितले.

१३. जनमाहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद हा संयुक्तिक वाटत असल्याने त्यांनी जाणूनबुजुन माहितीच्या अर्जातील मुद्या क्रमांक ३ ची माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे असे आयोगाचे मत झाले नसल्याने त्यांचे विरुध्द शास्ती लादण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आ दे श

१) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपाध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक, एम.ए.डी.सी. यांचा प्रथम अपील क्रमांक नं. एमएडीसी/मिहा/०५६/५३० मधील दिनांक १६.६.२००७ चा निर्णय हा रद्य करण्यांत येत असून अपीलकर्ता यांचे दिनांक ४.४.२००७ चे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे केलेल्या अर्जामधील मुद्या क्रमांक ३ प्रमाणे मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७३/२००७.**

श्री. देवराव नत्थूजी चटप,
२०, ओंकार नगर, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. शा. रा. कुकडे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००७ रोजी श्री.पी.पी.निकास तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना माहिती अधिकारी म्हणून दिनांक १७.७.१९९५ रोजी झालेल्या केंद्र प्रमुखांच्या पदोन्नतीची वेतन निश्चिती करणेबाबत माहिती मागितली १) दिनांक १७.७.१९९५ ला वेतन निश्चिती करणे ती कशी केली याचा खुलासा करावा. २) दिनांक १.१.१९९६ ला पाचवे वेतन आयोगात बेसिक पगार किती होईल. ३) याच आयोगात जोडपत्र १ महाराष्ट्र नागरी सेवा सुधारित वेतन नियम, १९९८ अन्वये अनुक्रमांक १३ नुसार सुधारित वित्तलब्धी

... २

विशेष वेतन नियम ७(१)(क) प्रमाणे असुधारित दरानुसार एकूण वित्तलब्धी किती होईल (बेसिक पगार) पुढील वेतन वाढीचा दिनांक कोणता राहिल. वरील बाबींचा विचार करुन थकबाकी देण्याची कृपा करावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.२.२००७ रोजी श्री.पी.पी.निकास, माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, आपण संदर्भाकिंत अर्जान्वये विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा/स्पष्टीकरण माहितीच्या अधिकारात देता येत नाही. सदर्हु मुद्दे कार्यालयाशी संबंधित असल्याने आपण आपल्या समाधानाकरिता कार्यालयात संपर्क साधावा. आपले समाधान न झाल्यास अपीलीय अधिकारी श्री.एम.के.करजगांवकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे अपील करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे त्यांनी दिनांक १०.३.२००७ रोजी श्री.एम.के.करजगांवकर, प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २८.३.२००७ रोजी उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, आपण संदर्भाकिंत पत्रामध्ये नमुद करुन मागविलेली माहिती ही एखाद्या व्यक्तीचे वेतन निश्चिती संबंधात मार्गदर्शन देणे/निर्देश देणे किंवा निर्णय देणे या कार्यवाहीत मोडत असल्यामुळे व माहितीचे अधिकारात कोणत्याही विषयावर मार्गदर्शन/निर्देश किंवा निर्णय देता येत नाही तरी आपल्या माहितीकरिता अग्रेषित असे अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र सुध्दा अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने व प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक २६.२.२००७ व दिनांक २८.३.२००७ रोजी त्यांना पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्रामधील उत्तराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये जी माहिती मागितली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे नाही व म्हणून त्याप्रमाणे त्यांना कळविलेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. सदरचे दोन्ही पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

परंतु जनमाहिती अधिकारी यांनी जावक नोंदवहीमध्ये सदरच्या पत्राची नोंद आहे असे दाखविले व जावक क्रमांक १२८४/२००७ व जावक क्रमांक २०१६/२००७ हे क्रमशः आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.२.२००७ च्या अर्जाचे सुध्दा अवलोकन केले असता त्यांनी १९९५ मध्ये केंद्र प्रमुखाच्या पदोन्नतीची वेतननिश्चिती करुन मागितली आहे. त्याकरिता त्यांनी तक्रार अर्ज केला होता काय असे विचारल्यास त्यांनी तक्रार अर्ज केला नव्हता व तोंडी त्यांनी वेतननिश्चिती करा असे त्यांचे म्हणणे आहे व त्याबाबत त्यांनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही. अपीलकर्ता यांनी त्यांच्या बरोबरीचे सहकारी श्री.दिवाकर यादवराव डांगे व श्री. कृष्णा गोविंदा हनवते यांची वेतन निश्चिती दिनांक ८.१२.२००३ व दिनांक १४.९.२००४ रोजी झालेली आहे याबद्यलच्या आदेशाच्या प्रति दाखल केलेल्या आहेत. परंतु श्री.कृष्णा गोविंदा हनवते यांनी तक्रार केली होती असा संदर्भ सदरच्या आदेशामध्ये आहे व त्यामुळेच त्यांची वेतन निश्चिती झालेली दिसून येते. तसेच श्री.दिवाकर यादवराव डांगे यांच्या संदर्भामध्ये जे आदेश दाखल केलेले आहेत ते आदेश वेतन निश्चिती चुकीची केली होती व ती सुधारित करुन प्रकरण निकाली काढण्यात यावे असे आदेश दिलेले दिसून येतात. ती दरमहा रुपये २०६०/- केली होती व त्यानंतर रुपये १९४०/- करण्यात आली असून रुपये १२५/- विशेष वेतन देवून सुधारित आदेश काढावे असे यावरुन श्री. दिवाकर यादवराव डांगे यांची पूर्वीच वेतन निश्चिती झाली होती. अर्थातच वेतन निश्चित करण्याचे काम हे त्या वेळेच्या अधिकाऱ्यांचे होते. परंतु त्यांनी केलेली वेतन निश्चिती त्यावेळेसच्या अधिकाऱ्यांनी करावयास पाहिजे होती. ती तक्रार मात्र अपीलकर्ता यांनी केली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व आता माहितीच्या अधिकारात वेतन निश्चिती करावी व थकबाकी मिळावी अशी त्यांची मागणी आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या स्वरुपात उपलब्ध असेल उदा.:- अभिलेख, दस्तऐवज यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात गुणवत्तेच्या बाबत निर्णय घेवून माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसल्यामुळे माहितीच्या अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे वेतन निश्चिती करुन देणे व थकबाकी उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित नसल्यामुळे व अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे जी उत्तरे पाठविली होती ती योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. मात्र अपीलकर्ता यांनी त्यांच्या पदोन्नतीचे संदर्भात वेतन निश्चिती करुन

घ्यावयाची असल्यास त्यांनी संबंधित कार्यालयाकडे स्वतंत्रपणे रितसर अर्ज करुन किंवा तक्रार करुन वेतन निश्चिती करुन घेणे हा मार्ग आहे व त्याप्रमाणे त्यांनी स्वतंत्रपणे तक्रार किंवा अर्ज करणे संयुक्तिक राहील.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ९.६.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०३/२००७.**

श्री. मुरलीधर गोविंद मापारी,
मु.पो. खैरा, ता. नांदूरा,
जिल्हा बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हाधिकारी,
बुलढाणा.

श्री. आर. टी. मोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (महसूल),
ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००७ रोजी (प्राप्त दिनांक ३१.१.२००७) राज्य जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), मलकापूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली आहे. रा.मा.क्र. एलएआर. ३/७७-७८ मध्ये शेत सर्व्हे नं.३ (गट ६८) मधून २ हेक्टर जमीन मौजा खैरा येथे नविन गावठाण करिता घेण्यात आली. त्यावेळेस एन.ए.करुन किती प्लॉट पाडण्यांत आले. त्या प्लॉटची किंमत किती ठरविण्यांत आली. रस्त्ये तयार करतांना किती रुंदीचे ठेवण्यात, रस्त्ये तयार करण्याकरिता किती खर्च झाला.

... २

सन २००३ मध्ये किती प्लॉटाची हऱ्हाशी करण्यांत आली व किती प्लॉट शिल्लक आहेत. त्या हऱ्हास पट्टीची आदेशासह नक्कल झेरॉक्स मिळण्यात यावी. तसेच त्या पैशाचा कोषागारात किती भरणा केला त्याचे विवरणासह माहिती मिळावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. परंतु सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००७ रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले आहे. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या अपीलकर्ता यांच्या दिनांक २२.१.२००७ च्या अर्जाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असा खुलासा केलेला आहे की, अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या दिनांक २५.१.२००७ रोजीचा अर्ज दिनांक ३१.१.२००७ रोजी पोष्टाद्वारे कार्यालयास प्राप्त झाला. सदर अर्जानुसारची माहिती ही तहसीलदार, नांदुरा यांचे कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे या कार्यालयाने सदर माहिती तहसिलदार, नांदूरा यांचेकडून मागविली. शासकीय माहिती अधिकारी यांना आवेदीत माहिती किती पृष्ठाची असल्यामुळे माहिती उपलब्ध होई पर्यंत पृष्ठांकरिता किती खर्च येईल वगैरे सांगता येणार नव्हते. शासकीय माहिती अधिकारी यांना आवेदीत माहिती तहसीलदार, नांदूरा यांच्याकडे दिनांक २६.२.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली. जनमाहिती अधिकारी यांना प्राप्त झालेली माहिती १९५ पृष्ठाची असल्यामुळे विहित माहिती शुल्काचा रुपये ३९०/- चा भरणा करण्यास अर्जदार यांना दिनांक २८.२.२००७ रोजी लेखी कळविले. त्याप्रमाणे अर्जदार यांनी दिनांक ६.३.२००७ रोजी माहिती शुल्काचा भरणा केला व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. सोबत तसेच सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भामध्ये जे आदेश पत्र उपविभागीय अधिकारी, मलकापूर यांनी दिलेले आहे त्याबाबतची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. तसेच दिनांक १५.२.२००७ रोजी नांदूरा तहसीलदार यांना पाठविलेल्या पत्राची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. दिनांक २८.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क भरण्याकरिता कळविण्यात आले आहे त्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे. तसेच चलानची प्रत सुध्दा दाखल केलेली आहे व दिनांक ६.३.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भातील पत्राची प्रत दाखल केलेली आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांनी त्यांना माहितीकरिता जे

शुल्क भरल्या नंतर त्यांना सदरची माहिती विहित मुदतीत मिळाली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९८/२००७.**

श्री. प्रकाश दत्तुलाल अग्रवाल,
द्वारा - कदम हॉस्पीटल, दुसरा माळा,
देवी प्लाजा मार्केट समोर, गोरक्षण रोड,
जिल्हा अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
प्राचार्य,
आर. एल. टी. विज्ञान महाविद्यालय,
अकोला.
जनमाहिती अधिकारी तथा
आर. एल. टी. विज्ञान महाविद्यालय,
अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. शरद गांधी, वकील हे हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री.एस.एस.काळे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून श्री.आर.एल.टी.कॉलेज ऑफ सायन्स, अकोला यांचेकडे Appointment, Promotion, record of the Non-Teaching Staff. Enclosed details of information १.१.१९८०. Copies of following documents required- १) Total service Record of the concerned employees, appointment orders, all promotion orders, copies of service books, joining reports, concerned resolutions passed by the competent bodies.

२) Office notes, recommendations of Principal/Superintendent regarding

... २

promotion given w.e.f. १.१.१९८०. ३) Payment of cash allowing during १९८० to २००४ and beneficiary of the allowance. ४) All pay fixation forms of the concerned employees approved by competent authority. ५) Copy of letter/approval issued by the Director Education (H.E.) Pune, in respect of promotion of the concerned employees. ६) Seniority list of Non-Teaching staff of १.१.१९८०. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ५.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी श्री.डी.व्ही.राजवाडे, प्राचार्य तथा अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी दिनांक २८.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १.८.२००६ च्या अर्जाचे संदर्भात व द्वितीय अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता यांनी खुलासा दाखल केलेला आहे. तसेच अपीलकर्ता यांचे वकील श्री. शरद गांधी यांनी युक्तिवाद सुध्दा केलेला आहे. सदरच्या खुलाश्यामध्ये व युक्तीवादामध्ये अपीलकाराने दिनांक २८.१०.२००६ रोजी द्वितीय अपील प्रेषित केल्यानंतर दिनांक ३१.१०.२००६ रोजी अपीलकर्त्याला पोष्टाचा दाखला घेऊन प्रेषित करण्यात आलेला लिफाफा प्राप्त झाला. या लिफाफ्यातून श्री.रा.ल.तो.विज्ञान महाविद्यालयाचे माहिती अधिकारी श्री.एस.जे.वाघमारे यांचे दिनांक ३१.८.२००६ रोजीचे पत्र क्रमांक १३८७ मधून अपीलकाराला त्याने दिनांक १.८.२००६ अर्जातून मागणी केलेल्या माहिती संदर्भात माहितीचा अधिकार कायदा २००५ अंतर्गत कलम ११ नुसार शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना याबद्यल सूचना देवून याबद्यल विचारणा करण्यात आली होती व त्यांनी आम्हास त्यांच्या बाबत कोणतीही वैयक्तिक अथवा सेवेबद्यलची माहिती देण्याबाबत लेखी आक्षेप घेतला आहे त्यामुळे ही माहिती आम्ही आपणांस पुरवू शकत नाही असे कळविले. वास्तविक पाहता कोणत्याही एक अथवा विशिष्ट कर्मचाऱ्यांच्या संबंधातील व्यक्तिगत माहितीची मागणी केलेली नसून अपीलकाराने उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयाचे व्यवस्थापनाने दिनांक १.१.१९८० पासून शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिलेल्या पदोन्नती संदर्भातील धोरणात्मक निर्णयांची तसेच सदरचा निर्णय ज्या दस्तावेज आणि कार्यालयीन टिपणी व शिफारशीच्या आधारे घेतला त्या निर्णयाची आणि निर्णयाशी संबंधित तपशिलाची माहिती मागितलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी व्यवस्थापनाने सदरची माहिती सार्वजनिक करणे अपेक्षित आहे. परंतु सदरची माहिती कलम ११ न्वये त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याचा सोयीस्कर अर्थ लावून जनमाहिती अधिकाऱ्यांनी अपीलकाराची मागणी दृष्ट हेतूने फेटाळून लावली आहे या निष्कर्षाप्रत येणे क्रमप्राप्त ठरते. सबब अपीलकाराचे अपील मंजूर करुन त्याने दिनांक १.८.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश आणि माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी लावलेल्या विलंबासाठी माहिती अधिकारी श्री.सुरेश वाघमारे यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादण्याचे आदेश पारित करण्याची विनंती केलेली आहे असा खुलासा दाखल केलेला आहे व खुलाश्यावर श्री.शरद गांधी, वकील यांनी युक्तिवाद केला आहे. सदरचा खुलासा दाखल केल्यानंतर उत्तरवादी यांनी लेखी युक्तिवाद दाखल केलेला आहे. उत्तरवादी यांनी दिनांक १६.४.२००८ रोजी खुलासा दाखल केला होता व सदरच्या खुलाश्यामध्ये त्यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्या सर्व त्रयस्थ पक्षातील व्यक्तींना पत्र देऊन कलम ११ प्रमाणे विचारणा केली असून त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत घेतली आहे. तसेच त्या सर्व १४ शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नांवे व त्यांना दिलेले पत्र व त्यांनी दिलेले उत्तर याबद्यलची माहिती दाखल केलेली आहे. सर्व पत्राच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत. आज दाखल केलेल्या युक्तीवादामध्ये अपीलकर्ता यांचे वकीलांनी आज असे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता यांचा कोणत्याही प्रकारचा नवीन मुद्या नाही. तसेच त्रयस्थ पक्षाची माहिती मागण्यात आलेली आहे. त्यासंदर्भात दिनांक ३१.८.२००६ रोजी मागण्यात आलेली माहिती त्यांना त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये वैयक्तिकरित्या पुरवावी असे लिहिले होते. संबंधित कालावधीमध्ये अपीलकर्ता हे बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला हया संस्थेमधील विज्ञान महाविद्यालयाचे लगतच्या महाविद्यालयात नोकरीवर असल्यामुळे (सिताबाई कला महाविद्यालय) त्यास माहिती वैयक्तिकरित्या व पोष्टाद्वारे कळविण्यात यावी. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रत्यक्षात अपीलकर्ता यांनी माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे पुरविता येत नाही असे कळविले होते. त्याची सत्यप्रत उत्तरवादी हयांचे दिनांक १६.४.२००८ चे खुलासा पान क्रमांक १९ प्रमाणे दाखल केलेली आहे व त्यामुळे अपील मेमोमधील उल्लेख खोटा आहे. अपील नामंजूर करुन निर्णय यु.पी.सी.द्वारा पाठविला त्याकरिता प्रमाणपत्रे, झेरॉक्स प्रती, यु.पी.सी. व जावक रजिस्टरची प्रत, सोबत अ व ब प्रमाणे जोडली आहे.

तसेच पुन्हा अपील मेमोमध्ये मुद्ये मांडलेली नाहीत किंवा हरकतवजामध्ये म्हटले आहे त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व माहिती अधिकाराचा मुद्या हा योग्य आहे. दुसरे अपील दाखल केल्यानंतर सुध्दा युक्तिवाद दाखल केलेला आहे. अपीलकर्ता यांचे दुसरे अपील न्याय प्रविष्ठ असतांना सेवानिवृत्त झाले आहेत व माहिती अधिकार अर्ज अपीलामध्ये माहिती कशासाठी पाहिजे आहे हयाचा अर्ज व अपीलामध्ये उल्लेख नाही व कोणते जनहित अपीलार्थी हयास साधावयाचे आहे हयाचा सुध्दा कोठेही उल्लेख नाही. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००८ रोजी पुन्हा तिच माहिती पुरविण्याकरिता माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केलेला आहे व तो अर्ज न्यायप्रविष्ठ व विचाराधीन आहे. अशा परिस्थितीमध्ये वादातील अपील हे चालू शकत नाही व ते Infructious झाले अशा प्रकारे अपील खारीज करावी असे नमुद केले आहे.

४. उत्तरवादी यांनी अपीलकर्ता यांच्या अपील मेमोमध्ये कोणत्याही प्रकारे मुद्ये उपस्थित केलेले नाही या म्हणण्याचे करिता अपीलकर्ता यांचे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र हे त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्यानंतर मिळालेली आहे व त्यामुळेच त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा उल्लेख हा प्रथम अपीलातून द्वितीय अपील मेमोमध्य नाही व त्यामुळे या संबंधातील उत्तरवादी यांचा हा मुद्या निकाली निघतो. उत्तरवादी यांनी त्रयस्थ पक्षाची माहिती विचारली आहे व त्यामुळे त्रयस्थ पक्षाची अनुमती घेण्याकरिता कलम ११ प्रमाणे कार्यवाही केलेली आहे. याबद्यल अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, पदोन्नती व नियुक्ती संबंधातील माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती होऊ शकत नाही. त्यावर पुन्हा उत्तरवादी यांचे वकीलांनी असे सांगितले की, ती त्यांच्या संबंधातील माहिती असल्यामुळे त्यांना विचारणा करणे आवश्यक होते व हरकत घेतली होती व तसेच उत्तरवादी यांनी जनहिताकरिता माहिती मागितली नाही असे ही आक्षेप घेतला आहे व असा आक्षेप आयोगा पुढे युक्तिवाद करतांना घेतला. अपीलकर्ता यांनी कलम ८(१)(जे) प्रमाणे त्यांना त्याप्रमाणे कळविता आले असते परंतु तसे त्यांना कळविलेले दिसून येत नाही. त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली असली तरी अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही हे विचारणे आवश्यक असते. परंतु त्रयस्थ पक्षाची माहिती ही दोन प्रकारची असते व त्याबाबत जी माहिती विचारली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे वकीलांनी अधिनियमाचे कलम ४(१) च्या

(१०) या उपखंडाकडे आयोगाचे लक्ष वेधले त्यामध्ये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने आपल्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांचे महिन्याचे मासिक वेतन इत्यादी बाबत माहिती ही उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे असे निदर्शनास आणले व त्यामुळे कर्मचाऱ्यांचे संदर्भातील ही माहिती आहे ती पदोन्नती किंवा मासिक वेतन म्हणजे त्यांच्या सेवा संबंधातील माहिती आहे व ज्या सेवेच्या संबंधामध्ये नियमाप्रमाणे आदेश करावे लागतात ती संपूर्ण माहिती वैयक्तिक स्वरुपाची माहिती म्हणता येत नाही. कोणत्याही कर्मचाऱ्यांचे सेवा संबंधातील माहिती ही सार्वजनिक माहिती असते. कोणत्याही त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती याचा अर्थ त्या त्रयस्थ पक्षाची त्याची स्वतःची वैयक्तिक माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणाला विश्वासाने उपलब्ध करुन दिलेली असली तर ती प्रकट करण्यास अपवाद आहे व त्यामुळेच अशा प्रकारची माहिती मागितली असली तरी सदर कलम ११ प्रमाणे कार्यवाही करणे संयुक्तिक ठरते व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी जी कार्यवाही केलेली आहे त्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारच्या अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे विचार करता येत नाही म्हणून उत्तरवादी यांचा सदरचा मुद्दा हा निकाली निघतो. अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक १४.५.२००८ रोजी तशाच प्रकारचा अर्ज केलेला आहे व त्यामुळे अपील हे Infructious चालू शकत नाही या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे कोणतीही व्यक्तिगत माहिती मागण्याचा अर्ज करता येतो व प्रत्येक अर्ज हा स्वतंत्र अर्ज असतो व त्यामुळे एखाद्या अर्जदाराने एकापेक्षा जास्त अर्ज केले असले तरी इतर त्यांचे पूर्वीचे अर्ज हे नामंजूर होत नाहीत. आता प्रश्न हां की, तेच कारण होते व माहिती तीच मागितली असा आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००६ च्या अर्जामध्ये त्यांनी दिनांक १.१.१९८० पासून माहिती मागितली असल्यामुळे ती अर्जाचे तारखेपर्यंत म्हणजे ती दिनांक १.८.२००६ पर्यंत मागितली आहे व दिनांक १४.५.२००८ च्या अर्जामध्ये जी माहिती मागितली आहे ती दिनांक १७.२.२००६ ची मागितली आहे. त्यामुळे जर सदरची माहिती ही २००६ ची तीच असेल तर दिनांक १४.५.२००६ ची माहिती देण्याची आवश्यकता राहणार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या राज्य माहिती आयोगाकडील अपील किंवा दिनांक १.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध देणे मात्र संयुक्तिक राहिल व तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व त्रयस्थ पक्षाची माहिती आहे हे कारण दिलेले असल्यामुळे उत्तरवादी यांना शास्ती करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

... ६

परंतु जनमाहिती अधिकारी यांनी जी कलम ११ प्रमाणे जी कार्यवाही केलेली आहे ती कार्यवाही कलम ११ प्रमाणे बंधनकारक असल्यामुळे ती कार्यवाही सद्‌भावनेने केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी सादरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे हा निष्कर्ष काढता येणार नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्याची आवश्यकता दिसत नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्येश असल्यामुळे व ती विलंबाने उपलब्ध झाली असल्यामुळे ती अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०४/२००७, अपील क्रमांक १६०५/२००७, अपील क्रमांक १६०६/२००७ व अपील क्रमांक १६१५/२००७.**

श्री. साहेबराव सखाराम गायकवाड,
मु. पो. ता. चिखली, वार्ड नं. १७,
गजानन नगर, जिल्हा बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, बुलढाणा.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, बुलढाणा.

श्री. एम.बी.ढोळणे,
जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, देऊळगांव राजा,
जिल्हा बुलढाणा.

श्री.एस.टी.चव्हाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, देऊळगांव राजा,
जिल्हा बुलढाणा.

श्री.डि.ए.राऊत,
सचिव, ग्रामपंचायत बायगांव (बु.)
ता. देऊळगांव राजा, जि. बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १०.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. ए.डी.शिंदे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १६०४/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते व माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. १) क्रमांक बुजिप/शि/प्रा.स्था/ ८५१४/२००६ बुलढाणा जिल्हा परिषद, बुलढाणा शिक्षण विभाग (प्राथमिक), दिनांक ६.१२.२००६ रोजीच्या पत्रावर केलेल्या कार्यवाही अहवाल प्रत. २) क्रमांक बुजिप/शि./प्रा.स्था./८७४१/२००६ बुलढाणा जिल्हा परिषद, बुलढाणा शिक्षण विभाग (प्राथमिक) दिनांक १४.१२.२००६ पत्रावर केलेल्या कार्यवाही अहवाल वरीलप्रमाणे. सदरचा अर्ज कार्यालयात दिनांक ३.१.२००७ रोजी प्राप्त झालेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००७ रोजी प्रथम अपील हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाची सुनावणी व निर्णय दिनांक २८.३.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता मागितलेला चौकशी अहवाल कार्यालयाकडे उपलब्ध आहे परंतु सदर चौकशी अहवाल श्री.गायकवाड यांनी नकार दिला असल्याचे सांगितल्यामुळे विभागाने नियमानुसार संबधितांकडून फी आकारुन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा असा निर्णय देऊन प्रथम अपील खारीज केलेले दिसून येते. दिनांक १२.२.२००७ च्या निर्णयाप्रमाणे दिनांक १२.३.२००७ रोजी यु.पी.सी.द्वारा श्री.गायकवाड यांना माहिती पुरविली आहे असे खुलाश्यात म्हटले आहे. दिनांक १२.३.२००७ च्या पत्रामध्ये गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देऊळगांव राजा यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना पाठविलेला

अहवाल हा दिनांक ६.१२.२००६ च्या अर्जाचे संदर्भात आहे व सदरच्या अहवालाची प्रत सौ. सरिता अंकुश वायाळ यांना सुध्दा पाठविण्यात आलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

३. अपील क्रमांक १६०५/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००६ रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, देऊळगांव राजा तथा जनमाहिती अधिकारी यांना खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सौ.सरिता अंकुश वायाळ, वार्ड नं. १७, गजानन नगर, चिखली यांच्या तक्रारीच्या चौकशी अहवालाची प्रत मिळणेबाबत. क्रमांक बुजिप/शि./एक स्थापना/८५१४/२००६ बुलढाणा, जिल्हा परिषद, बुलढाणा शिक्षण विभाग (प्राथमिक) दिनांक ६.१२.२००६ प्रकरणाचा चौकशी अहवाल. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरचा अर्ज कार्यालयात दिनांक २०.१२.२००६ ला प्राप्त झाला असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने पत्र क्रमांक ५७/०७, दिनांक ६.१.२००७ नुसार शुल्क अधिक टपाल खर्च भरुन चौकशी अहवाल प्राप्त करुन घेण्याबाबत अर्जदारास अवगत करुनही रकमेचा भरणा केलेला नाही. त्यामुळे संबंधितास माहिती पुरविता आलेली नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणी विलंब झालेला नाही. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १२.२.२००७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु अपीलाचे निर्णयानंतर पत्र क्रमांक ३००/०७, दिनांक १२.३.२००७ नुसार अर्जदारास दिनांक २९.३.२००७ ला माहिती देण्यात आली आहे. अपीलकर्ता यांनी एकच माहिती मागण्याकरिता २ अर्ज केलेले दिसून येतात. त्या अर्जाचे संदर्भात अपील क्रमांक १६०४/२००७ मध्ये सुध्दा निर्णय झालेला आहे व माहिती दिलेली आहे व तीच माहिती या अर्जात सुध्दा मागून याच अपीलात ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १६०६/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी

तथा संवर्ग विकास अधिकारी यांच्याकडे श्री.शेषराव विठोबा वायाळ, बायगांव (बु.) तालुका देऊळगांव राजा गट नं. १२, गट नं. १२३, १.१८ गट नं. ९७, ०.५९ चा जमिनीबाबत किमान वेतन कायद्याने केलेल्या कार्यवाहीचा तपशील सालदार, महिनेदार, मजूर सन २००२ ते २००५ सालदार, महिनेदार मजूर झोन २ व त प्रमाणे केलेल्या कार्यवाही बाबत ग्राम पातळीवरील व जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्याने तपासणीसह व शेऱ्यांसह रेकॉर्डची माहिती मिळणे. माहितीचा कालावधी सन २००२ ते २००५ अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ६.१२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सचिव, बायगांव (बु.) यांना तीच माहिती मागितलेली दिसून येते व त्यामुळे दिनांक २६.१२.२००६ व दिनांक ६.१२.२००६ या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दिनांक ९.१.२००७ रोजी पुन्हा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती देऊळगांव राजा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या तिनही अर्जाचे संदर्भामध्ये दिनांक १५.१.२००७ रोजी गट विकास अधिकारी यांनी ग्राम सचिव तथा माहिती अधिकारी यांना पत्र देऊन अपीलकर्ता यांना दिनांक ६.१२.२००६ च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध देण्याकरिता पत्र दिलेले दिसून येते व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली दिसून येते. पुन्हा दिनांक ९.१.२००७ रोजी गट विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सदर मागितलेली माहिती ही या कार्यालयाशी संबंधित नाही म्हणून कळविलेले दिसते. त्याकरिता अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये शासन निर्णयाची प्रत संबंधित गट विकास अधिकारी यांचेकडे दिलेली होती व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे सांगितले होते. परंतु गट विकास अधिकारी यांच्या नस्तीमध्ये सदरच्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध नाही असे विद्यमान गट विकास अधिकारी यांचे म्हणणे आहे. पुन्हा दिनांक १६.२.२००७ रोजी ग्राम विकास अधिकारी तथा माहिती अधिकारी यांना गट विकास अधिकारी यांनी माहितीच्या संदर्भामध्ये पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक १४.३.२००७ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी गट विकास अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून आदेश दिलेले दिसून येतात व त्याची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. दिनांक २१.३.२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देऊळगांव राजा यांनी अपीलकर्ता यांना सचिव ग्रामपंचायत यांचेकडून प्राप्त झालेली आहे व सदरची माहिती आपणाकडे पाठविण्यात येत असून सदर प्रकरण खारीज करण्यात येत आहे.

सदरची माहिती मिळालेली पोच पावती या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे असे कळविलेले दिसून येते. सोबत दिनांक १८.३.२००७ चे सचिव, ग्राम पंचायत यांनी गट विकास अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये चौकशी करुन पाठविलेल्या अहवालाची प्रत ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, शासन निर्णयाप्रमाणे किमान वेतन कायद्याच्या संदर्भामध्ये, शेतीच्या संदर्भामध्ये नोंदवही ठेवणे ही संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे व ती त्यांनी पालन केलेले नाही असे त्यांची तक्रार आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जी माहिती साहित्याचे स्वरुपा त उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, परिपत्रके इत्यादी स्वरुपात छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा आहे. ज्या वेळेस अर्जदार अर्ज करतो त्या वेळेस जी वस्तुस्थिती कागदपत्रांच्या स्वरुपात असेल त्या वस्तुस्थितीची माहिती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये, गुणवत्तेच्या संदर्भामध्ये कारवाई करणेबाबत आदेश देण्याचा अधिकार राज्य माहिती आयोगास नाही. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अर्जदार यांनी सक्षम अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येतो व त्यामुळे किमान वेतन कायद्याप्रमाणे जर अपीलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे शासन निर्णयाप्रमाणे नोंदवहया हया ठेवल्या जात नसल्यास ती तक्रार त्या सक्षम अधिकाऱ्यास केली जाते व अशा प्रकारची नोंदवही ठेवली जात नाही ती माहिती आता त्यांना उपलब्ध झ ालेली आहे. तसेच कलम ६(१) प्रमाणे एक अर्ज व त्या अर्जाचे संदर्भामध्ये समाधान न झाल्यास एक प्रथम अपील व त्यानंतर द्वितीय अपील अशी कार्यपध्दती आहे. अपीलकर्ता हे एकच एक माहिती अनेक माहिती अधिकाऱ्यांस मागतात व तसेच प्रथम अपील सुध्दा त्यांनी २ वेळ केले आहे. ज्या स्तरावर माहिती उपलब्ध असेल त्या माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज करुन प्रथम अपीलीय अधिकारी असतील त्यांचेकडे प्रथम अपील करुन त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करणे असा आहे. अपीलकर्ता यांनी ग्राम विकास अधिकारी, गट विकास अधिकारी पुन्हा ग्राम विकास अधिकारी यांचेकडे अपील करुन तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले त्यामुळेच अधिनियमाच्या तरतुदीचे कोणतेही पालन हे अपीलकर्ता सुध्दा करीत नाही असे दिसून येते व त्यातूनच संभ्रमाची परिस्थिती निर्माण होऊन त्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही अशी त्यांची समज तयार होते. पूर्वी अनेक अर्ज अनेक अधिकाऱ्यांकडे करुन त्यामुळे कोणत्याही अर्जाचे निर्णय मिळात नव्हते म्हणून

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हया अधिनियमाद्वारे नागरिकांना हक्क मिळाला तरी सुध्दा त्या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे अर्ज किंवा अपील न करता पूर्वीची अर्ज किंवा अपील करण्याची सवय तशीच आहे व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीमध्ये असलेल्या मुदती संबंधी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देणे हे बऱ्याच वेळी शक्य होत नाही व पर्यायाने अपीलकर्ता यांना सुध्दा न्याय मिळाला नाही असे वाटते. अपीलकर्ता यांनी आता अपील क्रमांक १६०४/२००७, अपील क्रमांक १६०५/२००७, अपील क्रमांक १६०६/२००७ व अपील क्रमांक १६१५/२००७ हे आयोगाकडे दाखल केलेले आहे व त्यात सर्व साधारण एकच एक माहिती आहे व त्यातही माहिती व्यापक जनहिताकरिता मागितली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा मुळात व्यापक जनहिताकरिता पारित करण्यात आला. परंतु वैयक्तिक कारणाकरिता माहिती मागण्याचा कल हा दिसून येतो. अर्थातच त्यामुळे सदरच्या माहितीच्या अधिकाराचा प्रभाव हा कमी होईल. कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची कार्यवाही करुन घेण्याकरिता हा अधिकार दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांची अपेक्षा आहे की कार्यवाही झाली नाही हे त्यांचे म्हणणे संयुक्तिक असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १६१५/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी (प्राप्त दिनांक १२.४.२००७) राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००६ रोजी एकूण तीन मुद्यांतील खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मुख्याध्यापक, मराठी पुर्व माध्यमिक शाळा, पाडळी शिंदे, श्री.एस.एम.मिसाळ, शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याबाबत अहवालाच्या सत्यप्रती खालील प्रमाणे मिळणेबाबत. पत्र क्रमांक मु.का.अ. यांचे आदेश क्रमांक १०२२/०५, दिनांक ८.९.२००६ तसेच ग्रामसेवक व इतर कर्मचारी मुख्यालयी राहणे बाबतचे अवर सचिव, ग्राम विकास जलसंधारण मंत्रालय, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे. माहे सप्टेंबर २००६ ते नोव्हेंबर २००६ पर्यंत मासिक सभेत मुख्यालयी राहत नसल्याबाबतचे मासिक सभेचे वेळी दाखल केलेल्या मुख्यालयी राहत असल्याबाबतच्या अहवालाची सत्यप्रत मिळणेबाबत. माहितीचा कालावधी माहे सप्टेंबर २००६ ते नोव्हेंबर २००६ अशी आहे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. माहिती विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून दिनांक २६.१२.२००६

रोजी प्रथम अपील केले. अपीलकर्ता यांना दिनांक २२.१२.२००६ रोजी माहिती देण्याकरिता शुल्काचा आवश्यक रक्कमेच्या भरणा करण्याबाबत पत्र देऊन सुध्दा संबंधिताने त्याची दखल घेतली नाही. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच पुन्हा दिनांक १७.१.२००७ अन्वये पोष्टाने माहिती देण्यात आलेले असून पोष्टाची पावती व जावक छायांकित सोबत जोडलेली आहे असा खुलासा दाखल केला असून त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना विचारले असता सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे ती घेतली नाही व त्याबाबत सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये मुख्याध्यापक मराठी पुर्व माध्यमिक शाळा पाडळी शिंदे यांना पत्र क्रमांक २६१३/०६, दिनांक ३०.११.२००६ नुसार तत्काळ कारवाई करिता पत्र दिले असून जावक नोंदवहीची छायांकित प्रत सोबत जोडण्यात आली आहे. १) श्री.एस.एम.मिसाळ, मुख्याध्यापक, पाडळी शिंदे हे मुख्यालयी राहत नसल्याबाबत अहवाल. २) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे आदेश क्रमांक १०२२/०५, दिनांक ८.९.२००५ चे पत्राची सत्यप्रत मिळणेबाबत व अवर सचिव, ग्राम विकास जलसंधारण, मंत्रालय, मुंबई यांच्या आदेशाची प्रत मिळणेबाबत. त्यापैकी अहवालाची सत्यप्रत उपलब्ध आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या दिनांक ८.९.२००५ ची सत्यप्रत उपलब्ध आहे. परंतु अवर सचिव, ग्राम विकास जलसंधारण, मुंबई यांची प्रत मात्र उपलब्ध नाही असे माहिती अधिकारी तथा ा गटशिक्षणाधिकारी यांचे म्हणणे आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी अपूर्ण माहिती असल्यामुळे अपीलकर्ता यांनी घेतली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांना सदरच्या आदेशाची प्रत ही अवर सचिव, ग्राम विकास जलसंधारण, मंत्रालय, मुंबई यांचेकडून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना अपील क्रमांक १६०४/२००७, अपील क्रमांक १६०५/२००७ व अपील क्रमांक १६०६/२००७ मध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक १६१५/२००७ मध्ये अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २१.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अवर सचिव, ग्राम विकास जलसंधारण, मंत्रालय, मुंबई यांच्या आदेशाची प्रत त्यांच्याकडे संपर्क साधून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०७/२००७.**

श्री. प्रभाकर अमृता डोंगरे,
मु. पो. बाभूळगांव (जहॉ.)
ता. जिल्हा अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अकोला.

सौ. शिला संभाजी हटकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, शिवणी,
ता.जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००८ रोजी आयोगा पुढे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, शिवणी, तालुका जिल्हा अकोला यांनी दिनांक १०.३.२००७ नंतर माहिती दिली व या माहितीचे आधारे आम्ही दिवाणी कोर्टातील (अकोला) प्रकरण जिंकलो. त्यामुळे मला जनमाहिती अधिकारी यांचेकडून मिळालेल्या माहिती बाबत माझे समाधान झाले म्हणून माझी दिनांक १०.३.२००७ ला केलेल्या द्वितीय अपील क्रमांक १६०७/२००७ बाबत कोणतीही हरकत नाही असे लेखी लिहून दिलेले आहे. तसेच अधिक्षक, पंचायत समिती, अकोला यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व त्यांचे पूर्ण समाधान झाल्याने भविष्यात त्यांनी कोणता आरोप घेतल्यास मी संपूर्णतः जबाबदार राहील असे लेखी लिहून दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १०.६.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६०८/२००७.**

श्री. सुनिल तेजुसिंग राठोड,
मु. शेवती, पो. वाई,
ता. कारंजा, जि. वाशिम. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विठ्ठल बेलखेडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कारंजा,
जिल्हा वाशिम.

श्री. डी. जी. मोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत, शेवती,
ता.कारंजा, जि. वाशिम. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००८ रोजी आयोगा पुढे मी ग्रामसेवक, ग्रामपंचायत, शेवती यांच्याकडे माहितीच्या अधिकारात दिनांक २८.१२.२००६ ला मागितलेली माहिती मुदतीत न मिळाल्याने मी दिनांक २८.२.२००७ ला द्वितीय अपील आपणाकडे सादर केले होते. परंतु मला माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांच्याकडे मी मागणी केलेले दस्तऐवज इंदिरा आवास योजना अंतर्गत लाभार्थी निवड निकषाची माहिती व मॉस्टर प्लॉन तसेच ठरावाची नक्कल मला हि दिनांक ६.३.२००७ ला पोस्टाद्वारे यु.पी.सी. मिळाले आहे. माझे समाधान झालेले आहे असे लेखी लिहून दिलेले आहे. तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कारंजा यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना सचिव, ग्राम पंचायत, शेवती यांनी सदर माहिती दिनांक ६.३.२००७ रोजी संबंधितास दिल्यामुळे माझी काही तक्रार राहिली नाही व माझे समाधान झाले असा अर्ज दिला आहे. अर्जदाराचे पूर्ण समाधान झाल्यामुळे भविष्यात त्यांनी कोणताही आरोप घेतल्यास मी संपूर्णतः जबाबदार राहील असे लेखी लिहून दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १०.६.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६१७/२००७.**

श्री. ओमप्रकाश यशवंत सुरवाडे,
मु.पो. बटवाडी, ता. बाळापूर,
जिल्हा अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. गणोरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती.

श्री. आर.बी. पुरबकर,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षण उपनिरिक्षक,
शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयात दिनांक २२.७.२००६ ला दिलेल्या तक्रारीवर आपण कोणती कार्यवाही केली. त्या केलेल्या कार्यवाहीच्या साक्षांकित सत्यप्रती. माहिती टपालद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. दारिद्र रेषेखालील व्यक्तीला शुल्क No fees RTI Act २००५ असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे संदर्भात सदर अर्जात त्यांनी या कार्यालयाकडे दिनांक २२.७.२००६ च्या निवेदनावर काय कार्यवाही केली त्या कार्यवाहीच्या

अहवालाची प्रत मागितली आहे.  परंतु दिनांक २२.७.२००६ चे निवेदन या कार्यालयाकडे अप्राप्त असल्याने सदर निवेदनावर कार्यवाही करण्यात आली नसल्याबाबत पत्र दिनांक ६.१२.२००६ अन्वये कळविण्यात आले.  सदर पत्राच्या अनुषंगाने श्री.सुरवाडे यांनी दिनांक १२.१२.२००६ पत्रान्वये निवेदनाची प्रत सादर केली.  सदर निवेदनाची प्रत प्राप्त झाल्यावर या कार्यालयाचे पत्र दिनांक २.१.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांना प्रकरणी चौकशी करुन अहवाल मागविण्यात आला.  परंतु अहवाल अप्राप्त होता.  त्यामुळे दिनांक १३.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे.  सदर अपीलाचे अनुषंगाने दिनांक  ३.३.२००७ ला सुनावणी ठेवण्यात आलेली दिसून येते.  सदर सुनावणीस अपीलकर्ता उपस्थित न झाल्याने सदर सुनावणी होऊ शकली नाही.  श्री. सुरवाडे यांनी पुनःश्च दिनांक १०.१२.२००७ अन्वये अर्ज सादर केला. सदर अर्जात दिनांक १८.९.२००७ निवेदनावर काय कार्यवाही केली याबाबत अहवाल मागितला.  सदर निवेदनाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांना दिनांक २०.१०.२००७ अन्वये चौकशी करुन अहवाल मागविण्यात आलेला दिसून येतो.  त्याचप्रमाणे सदर निवेदनाच्या अनुषंगाने पुनःश्च दिनांक १९.१२.२००७ अन्वये शिक्षणाधिकारी यांना अहवाल मागविण्याता आलेला दिसून येतो.  सदर अहवाल प्राप्त होताच अहवाल पुरविण्यात येईल असे ही अपीलकर्ता यांना कळविण्यात आले.  परंतु अहवाल शिक्षणाधिकारी यांच्याकडून प्राप्त झाला नाही.  त्यामुळे पुन्हा दिनांक ३.३.२००८ रोजी अपील केलेले दिसून येते.  सदर अपीलावर दिनांक ८.४.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.  सुनावणीस अपीलकर्ता उपस्थित झाले नाही.  पुन्हा दिनांक ५.५.२००८ अन्वये सुनावणी ठेवण्यात आली.  सदर सुनावणीच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००८ ला तार करुन पुढील तारीख घेण्यात आली.  पुन्हा दिनांक २.६.२००८ रोजी पुन्हा सुनावणी ठेवण्यात आली. सदर सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता उपस्थित झाले.  सदर सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), अकोला यांनी या कार्यालयाकडे दिनांक ३०.५.२००८ अन्वये सादर केलेला तपासणी अहवालाची प्रत व त्यावर या कार्यालयाने संबंधित संस्था/शाळा यांना दिनांक ३१.५.२००८ अन्वये देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीची प्रत सुनावणीच्या वेळी प्रत्यक्ष देण्यात आली.  यावरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यवाही पूर्ण झालेली दिसून येते व यावरुन सदर प्रकरणात कार्यवाही पूर्ण झाली नाही असे अपीलकर्ता यांचे

म्हणणे आहे की, पुढील कार्यवाही पूर्ण झाली नाही म्हणून पुढील कार्यवाही पूर्ण व्हावी असे त्यांची मागणी आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये आदेश देण्याचे अधिकार नाहीत. असे असले तरी माहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे सदरच्या संस्थेच्या संदर्भामध्ये दिनांक १६.६.२००८ रोजी दिलेल्या नोटीस प्रमाणे सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे दिलेल्या सुनावणीची नोटीसाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच अंतीम कार्यवाहीच्या संदर्भामध्ये निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांना निर्णय झाल्यावर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

३. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जासोबत दारिद्र रेषेखालील प्रमाणपत्र तारीख आहे असा उल्लेख केला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १६१७/२००७ मध्ये माहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा सत्र न्यायालय यांचेकडे माहिती मागितली असता सदरचे दारिद्र रेषेचे प्रमाणपत्राचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा सत्र न्यायालय यांनी दिलेले आदेशाप्रमाणे प्रकल्प प्रबंधक यांचेकडून चौकशी होऊन सदरचे दारिद्र रेषे खालील प्रमाणपत्र सन २००२ मधील सर्व्हेक्षणानुसार रद्द करण्यात आले आहे ही बाब आयोगाचे निदर्शनास अपील क्रमांक १६१७/२००७ चे सुनावणीचे वेळी आलेली असल्यामुळे त्याचा उल्लेख या निर्णयामध्ये करणे आवश्यक आहे.

४. अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २७.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे व दिनांक १३.२.२००७ च्या प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १२.६.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६२०/२००७.**

श्री. विद्याधर वासुदेव धनागरे,
कैलासनगर,गोरक्षण मार्ग
ता.जि. अकोला - ४४४ ००४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. सी. जुमळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००६ रोजी १) वैद्यकीय परिपूर्ती देयकाच्या संबंधीच्या नियमांच्या सत्यप्रती वा लेखी स्वरुपात माहिती द्यावी. २) मुख्याध्यापक, भिकमचंद खंडेलवाल विद्यालय, डाबकी रोड, अकोला द्वारे जा.क्र. ४१५५ व ४१५६, दिनांक २४.७.२००६ ला पाठविलेल्या वैद्यकीय परिपूर्ती देयकावर आपण कोतणती कारवाई केली याची लेखी स्वरुपात माहिती द्यावी. ३) सत्र २००६-२००७ या शैक्षणिक सत्रात अकोला नगरातील किती कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय परिपूर्ती देयक मंजूर करण्यात आले त्यांच्या नावांची, शाळांची व देयकांची मंजूरी तारीख याची लेखी माहिती द्यावी. ४) कर्मचाऱ्यांच्या कोणत्या नातेवाईकांचे वैद्यकीय

परिपूर्ती देयक मंजूर होऊ शकते याची लेखी माहिती देण्यात यावी. माहिती व्यक्तिशः देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना दिनांक ५.१२.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांनी खुलासा व कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरच्या खुलास्यामध्ये अर्जामध्ये त्यांनी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तरी या कार्यालयाने या कार्यालयाचे पत्र दिनांक २८.१२.२००६ अन्वये अर्जदारास माहिती घेवून जाण्याबाबत पोष्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या पत्राची छायांकित प्रत ही सोबत जोडलेली आहे. सदरच्या अपीलाचे अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्रमांक १४९, दिनांक २४.१.२००७ अन्वये संबंधितांना त्यांचे माहिती अर्ज दिनांक ५.१२.२००६ अन्वये माहिती पोष्टाने पुरवून त्यांचे अपील खारीज करण्यात आले होते व तसे संबंधितांना कळविण्यात आले होते व त्याकरिता त्यांनी दिनांक २४.१.२००७ चे पत्र जोडलेले दिसून येते. सदर्हु दोन्ही पत्राचे संदर्भामध्ये श्री. विद्याधर वासूदेव धनागरे असा पत्ता असल्यामुळे क्रमांक ५२९३ व पोष्टाचे ३/- रुपयांचे तिकीट व त्यावर पोष्टाचा स्टॅम्प अशा प्रकारे दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे दिनांक २८.१.२००७ रोजी श्री.विद्याधर वासुदेव धनागरे यांच्या पत्त्यावर पत्र क्रमांक १४९, दिनांक २८.१.२००७ प्रमाणे पोष्टाचे ३/- रुपयांचे तिकीट व त्यावर पोष्टाचा गोल स्टॅम्प असे दिसून येतो. माहितीचा संपूर्ण दस्ताऐवज जोडलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आज पर्यंत हे दोन्ही पत्रे मला मिळालेली नाहीत व माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहिती घेण्याकरिता गेलो असता त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलकर्ता यांनी असाही युक्तिवाद केला की, ज्या पोष्टाच्या पावत्या, तिकीटवर स्टॅम्प लावलेले सादर केलेले आहे ते नकली आहे. त्यावर कोणतीही यु.पी.सी. किंवा सदरच्या पोष्टाचा उललेख नाही. तिकीटावरील स्टॅम्प सुध्दा नकली आहे व तो दिसून येत नाही व त्याचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे दिसते. अपीलकर्ता यांनी तोंडी असे सुध्दा सांगितले की, सदरच्या अपीलाचे

सुनावणीस हजर राहू नये म्हणून प्रत्यक्ष व दुरध्वनीवरुन माझेवर दबाव टाकण्यात आला होता. हजर असलेले उपशिक्षणाधिकारी श्री.गोमासे यांनी सांगितले की अशा प्रकारचा दबाव टाकण्यात आला नव्हता. परंतु कार्यालयाचे स्थनांतर एक महिन्यापूर्वी झाले असल्यामुळे नस्ती ही गठ्ठयामध्ये होती व ती कोणत्या गठ्ठात आहे ती माहिती नव्हती. याबद्यल श्री.राघोर्ते यांचेकडे माहिती असल्यामुळे कोणत्या गठ्ठयात माहिती आहे हे माहिती नव्हते. मी शपथपूर्वक सांगतो की माझे वर अशा प्रकारे दबाव आणला होता. अर्थातच अपीलकर्ता यांना जी पत्रे पाठविली होती त्या पत्राचे संदर्भामध्ये जावक नोंदवहीचा पुरावा हा उत्तरवादी यांनी दिलेला नाही व त्यामुळे जावक नोंदवहीत नोंद असल्याची पडताळणी करता येत नाही व पोष्टाचा जो पूरावा दिलेला आहे तो योग्य वाटत नाही. त्यावरुन अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही व त्याकरिता संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे माहिती विहित मुदतीमध्ये उपलब्ध झाली नसल्याची तशी आयोगाची खात्री झाली असली तरी आयोग प्रत्येक दिवसाकरिता २५०/- रुपये व जास्तीत जास्त २५०००/- रुपये शास्ती लादण्याची तरतुद आहे. परंतु अशा प्रकारची शास्ती लादण्याची परंतुकाप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास बंधनकारक आहे. परंतु आज सुनावणीच्या वेळेस जे जनमाहिती अधिकारी त्यावेळेस होते ते आयोगासमोर नाही व त्यामुळे त्यांचे म्हणणे हे ऐकून घेता येत नाही. त्याकरिता अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत त्यांना व्यक्तिशः माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता यांनी सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तिशः जाऊन विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी व माहिती मिळाल्याची पोच द्यावी.

२) संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी. संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करण्याचे कार्यवाही करिता पाठविण्यात येत आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १२.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६२१/२००७.**

श्री. राजेश विष्णूपंत तळोकार,
मु. पो. ता. पातूर,
ता.जि. अकोला - ४४४ ५०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी.एन. तेलमोरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी,
जि. अमरावती.

श्री. महेश खारोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
एस.बी.के.कॉन्व्हेंट व इंग्लिश प्रायमरी स्कूल,
सातेगांव, ता. अंजनगांव सुर्जी,
जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी मला माझा मुलगा चि. शुभम् चालू शैक्षणिक सत्र २००६-२००७ मध्ये कोणत्या शाळेत व वर्गात शिकत आहे. तसेच त्याची शैक्षणिक प्रगतीची माहिती होणेसाठी माहितीची आवश्यकता आहे. तरी कृपया माहिती मिळावी असे शासकीय माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अंजनगांव सुर्जी यांना मागितली होती.

त्यापूर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एस.बी.के.कॉन्व्हेंट व इंग्लिश प्रायमरी स्कूल, सातेगांव, ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती यांना मुलाचे कॉन्व्हेंट मध्ये दाखल झाल्यापासून ते आजपर्यंत नर्सरी, के.जी.-I, के.जी.-II व Ist Std. चे प्रगतीपत्रकाची (प्रथम सत्रात) सत्यप्रत ज्यात सर्व माहितीचा उल्लेख असावा व इतर संबंधित माहिती मागितली होती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांचा मुलगा चालू शैक्षणिक सत्रात कोणत्याच वर्गात शिकत नाही. त्यामुळे या विद्यार्थ्याबाबत आज काहीच माहिती सध्या शाळेत नाही. असे दिनांक २९.१२.२००६ प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळविल्यानंतर हा सदरचा अर्ज पुन्हा न करता शाळेत शिकत आहे हा अपीलकर्ता यांनी केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचा सदरचा अर्जाचे संदर्भामध्ये अपील क्रमांक २१६/२००७ च्या दिनांक १३.७.२००७ च्या निर्णयामध्ये आलेला आहे व अपील हे फेटाळण्यात आले आहे. अपीलकर्ता यांनी सदरच्या अर्जात मागितलेली माहिती ही अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात माहिती उपलब्ध असेल उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, परिपत्रके, कागदपत्रे इत्यादीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा आहे व या निकषाच्या संदर्भामध्ये दिनांक २६.२.२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही येत नसल्यामुळे सदरच्या अर्जाचे संदर्भामध्ये पुढील चौकशी किंवा पुढील सुनावणी घेणे हे संयुक्तिक नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे त्यांच्या दिनांक २६.२.२००७ च्या अर्जातून मागितलेली माहिती ही अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येत येत नसल्यामुळे खारीज करण्यात येत आहे
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १२.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८९/२००७ मधील किरकोळ अर्ज क्रमांक १/२००८.**

श्री. चंद्रशेखर रोकडे,
(तत्कालीन आयुक्त, महानगरपालिका अकोला),
उपआयुक्त (निवडणूक),
बृहन्मुंबई महानगरपालिका,
विस्तारीत इमारत, ६ वा मजला,
महानगरपालिका मार्ग - ४०० ००१. ..... **अर्जदार**

**वि रु ध्द**

श्री. शरद नथमल गांधी,
द्वारा -गांधी एसटीडी, पीसीओ सेंटर,
मनपा चौक, गांधी रोड, अकोला. **..... अपीलकर्ता उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२००८)**

**नि र्ण य**

अर्जदार यांनी दिनांक २३.५.२००८ रोजी राज्य माहिती आयुक्तांकडे अपील क्रमांक १३७९/२००७ मधील आदेशा प्रमाणे खुलासा वजा अर्ज हा आयोगाकडे दाखल केलेला आहे. सदरचा खुलासा वजा अर्जाची सुनावणी आज दिनांक १६.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता/गैरअर्जदार हे हजर आहेत व अर्जदार हेही हजर आहेत.

२. अपील क्रमांक १३८९/२००७ मध्ये अपीलकर्ता श्री. शरद नथमल गांधी यांनी दिनांक २.९.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी अकोला महानगरपालिका, अकोला यांच्याकडे आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांच्या कार्यालयीन उपस्थिती आणि कार्यालयीन कामानिमित्त महानगरपालिका हद्यीबाहेरील दौऱ्यांची माहिती दिनांक २७.६.२००६ बाबतची मागितलेली होती. सदरची माहिती खाजगी व वैयक्तिक स्वरुपाची असल्याने देता येणार नाही असे त्याच माहितीच्या अर्जावर शेरा देऊन तत्कालीन आयुक्त यांनी त्यांचा स्विय सहाय्यक यांना अर्जदारास तसे कळवावे असे नमुद केले व त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ८.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना कळविले आहेत व त्यामुळेच अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक १४.९.२००६ रोजी दाखल केले.

... २

प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात येवून प्रथम अपील फेटाळण्यात आले. त्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल झाले. सदरच्या द्वितीय अपीलामध्ये निर्णय देतांना जनमाहिती अधिकारी यांनी जरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली होती तरी सुध्दा ती माहिती तत्कालीन आयुक्त यांनीच माहिती व्यक्तीगत व खाजगी असल्यामुळे नमुद केले असल्यामुळे ती माहिती अधिकारी यांनी दिली होती व तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे दिलेली असल्यामुळे तत्कालीन आयुक्त यांनीही अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजून कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येऊ नये अशा प्रकारच्या निर्णया प्रत आयोग आलेले असल्यामुळे व अपीलाचे निर्णयाचे वेळेस तत्कालीन आयुक्त हे प्रत्यक्ष हजर नसल्यामुळे व अधिनियमाचे कलम २०(१) परंतुकाप्रमाणे शास्ती लादावयाची असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी देण्याचे बंधनकारक असल्यामुळे सदरच्या अपीलाचे आदेशामध्ये निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत आयोगाकडे त्यांचे म्हणणे मांडणे आवश्यक राहिल अन्यथा सदरच्या शास्तीचा आदेश कायम करण्यात येईल असा आदेश देण्यात आला होता व त्याप्रमाणेच तत्कालीन माहिती आयुक्त यांनी राज्य माहिती आयोगाकडे किरकोळ अर्ज हा खुलासा वजा अर्ज केलेला आहे.

३. सदरच्या खुलाश्यामध्ये त्यांनी श्री. शरद नथमल गांधी यांचे बद्यल माहिती उद्घृत केलेली आहे. "श्री.शरद नथमल गांधी सतत वेळोवेळी माहितीच्या अधिकारांतर्गत अनेक प्रकारची माहिती मागत असतात. सदरचे प्रकरण घडले तेंव्हा मी आयुक्त, अकोला महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीवर होतो. यापूर्वीही श्री.शरद गांधी यांनी राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे सुध्दा अनेक प्रकरणांमध्ये अपील केलेले होते. त्यामध्ये सुध्दा डॉ.सुरेश जोशी, मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी अकोला येथे सुनावणी देऊन आदेश पारित कलेले आहेत. त्यापैकी काही आदेशांमध्ये डॉ.सुरेश जोशी यांनी श्री.शरद गांधी यांच्या एकंदरीत वर्तणुकीबाबत नाराजी व्यक्त केली होती. वस्तुस्थिती अशी आहे की, श्री.शरद गांधी यांना फार वर्षापूर्वी अकोला महानगरपालिकेतर्फे पालिका कार्यालयासमोरच एक दुकान लीजने दिलेले होते. परंतु सदरचे दुकान

... ३

रस्तारुंदीकरणामध्ये येत असल्याने तसेच हया दुकानामध्ये त्यांनी पोट-भाडेकरु ठेवल्याने माझ्या आयुक्त काळामध्ये मी त्यांना कायदेशीर नोटीस दिलेली होती. तसेच त्यांच्या दुसऱ्या एका अनधिकृत बांधकामाबाबत सुध्दा निष्कासनाची कारवाई केली होती. त्यामुळे श्री.शरद गांधी यांचा माझ्या विरुध्द आकस होता व त्यामुळेच त्यांनी या किरकोळ प्रकरणामध्ये अपील केलेले दिसते. राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांनी दिनांक १५.४.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशास सुध्दा श्री.शरद गांधी यांनी विदर्भातील वेगवेगळया वर्तमान पत्रांमध्ये विशेष प्रेस नोट काढून फार मोठी प्रसिध्दी देऊन माझी जास्तीत जास्त बदनामी कशी होईल याचा प्रयत्न केलेला आहे. सोबत सदर वर्तमानपत्रांची कात्रणे माहितीसाठी सादर आहेत. श्री. गांधी यांनी त्यांच्या अर्जामध्ये "अकोला महानगरपालिका आयुक्त श्री.चंद्रशेखर रोकडे यांचे दिनांक २७.६.२००६ रोजीचे कार्यालयीन उपस्थिती आणि कार्यालयीन कामकाज निमित्त अकोला महानगरपालिकेच्या भौगोलिक हद्यी बाहेरील दौरा कार्यक्रमासंबंधी असल्यास, ठेवण्यांत आलेल्या नोंदी आणि दिनांक २७.६.२००६ रोजीचे मा.आयुक्तांचे कार्यालयीन कार्यक्रमाची माहिती देण्यांत यावी" अशी विनंती केली होती. सदरच्या अर्जावर मी "उत्तर द्यावे, सदरची माहिती व्यक्तिगत व खाजगी स्वरुपाची असल्याने देता येणार नाही" असे आदेशीत केलेले होते व त्यांनी सदरची माहिती पुन्हा मागितल्यानंतर सुध्दा तशाच प्रकारचे उत्तर त्यांना देण्यात आले होते. सदरची माहिती देण्याबाबतची त्यांची विनंती तात्काळ नाकारण्यात आलेली आहे, त्यामध्ये कोणतीही दिरंगाई नाही. तसेच सदरच्या माहितीची विनंती कोणत्याही दुष्ट हेतूने किंवा जाणूनबुजून आकसाने नाकारलेली नाही. माझा चांगल्या हेतुने (Good faith) असा समज होता की, सदरची माहिती खाजगी व वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे देण्यात येऊ नये व सदरचा निर्णय मी सद्हेतूने घेतला होता. सदरची माहिती नाकारण्यामध्ये कोणताही वाईट हेतु नव्हता व माझ्या माहितीप्रमाणे सदरची माहिती श्री.गांधी यांना नंतर उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. श्री.शरद गांधी हे वयोवृध्द व कोणतेही कामकाज नसलेली व्यक्ती असून ते दिवसभर अकोला महानगरपालिकेच्या मुख्य द्वाराच्या बाहेर बसलेले असतात. माहितीच्या अधिकाराचा त्यांनी अनेकवेळा अतिरेकी वापर करुन अनेक अधिकारी व पूर्वीचे महानगरपालिका आयुक्त तसेच इतर अधिकारी यांना नामोहरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विशेषतः मी अकोला महानगरपालिका आयुक्त असतांना त्यांचे दुकान व इतर बांधकामाबाबत नोटीस काढल्यामुळे त्यांचा माझ्यावर तसाही रोष होताच त्यामुळे त्यांनी जाणुन-बुजून आकसापोटी सदरचे अपील दाखल करुन

... ४

त्यावर पारित झालेल्या आदेशास जास्तीत जास्त वर्तमान पत्रांमध्ये प्रसिध्दी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही प्रमाणात दुदैवाने त्यांचा हेतु सफल झाला आहे". त्यावर अपीलकर्ता श्री. शरद नथमल गांधी यांनी सुध्दा खुलासा दाखल केलेला आहे तो खालील प्रमाणे आहे. १) श्री.चंद्रशेखर रोकडे यांनी सादर केलेल्या स्पष्टीकरण पत्रातील परिच्छेद क्रमांक १ मधील मजकूर हा रेकॉर्डच्या अनुषंगाने असून उपलब्ध रेकॉर्डची तपासणी करुन शहनिशा करता येईल. त्यामुळे त्यासंबंधी जबाब देण्याची आवश्यकता नाही. २) स्पटीकरणपत्रातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये विषद केल्यानुसार मी सतत वेळोवेळी माहितीच्या अधिकारांतर्गत मला आवश्यक असलेली अनेक प्रकारची माहिती मागितलेली आहे आणि श्री.चंद्रशेखर रोकडे हे आयुक्त महानगरपालिका, अकोला म्हणून कार्यरत होते हे खरे आहे. अकोला महानगरपालिकेच्या संबंधित माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यात कसुरी केल्यामुळे अधिनियमाचे कलम १९(१) अन्वये महानगरपालिकेच्या पदनिर्देशित प्रथम अपील प्राधिकाऱ्यांकडे प्रत्येक प्रकरणात अपील करावे लागते त्यापैकी काही प्रकरणातील प्रथम अपीलामधील निर्णयाने समाधान न झाल्याने १९(३) अन्वये मा.राज्य माहिती आयोग, मुंबई/नागपूर यांचेकडेस देखील नियमानुसार द्वितीय अपील केलेले आहेत. डॉ.सुरेश जोशी, मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी सुनावणी देऊन आदेश पारित केलेले आहेत हे खरे असले तरी त्यापैकी काही आदेशांमध्ये डॉ. सुरेश जोशी यांनी माझे एकंदरीत वर्तणुकीबाबत नाराजी व्यक्त केली होती हा श्री.चंद्रशेखर रोकडे यांचा मोघम स्वरुपाचा चुकीचा आरोप कपोलकल्पीत, बिनबुडाचा आणि खोटा असल्याचे मा.डॉ.श्री.सुरेश जोशी यांनी त्यांचे समोरील मी दाखल केलेल्या अपील क्रमांक २००६/५१९/०२ मध्ये दिनांक १३.११.२००६ (सहपत्र-१) व २००७/९८५/०२ मध्ये दिनांक ५.४.२००७ (सहपत्र - २) अवलोकनावरुन स्पष्ट होईल. अधिनियमाचे कलम ४(२) अन्वये माहिती मिळविण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी आवश्यकतांनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशील राहील अशी तरतुद असतांना अकोला महानगरपालिकेच्या कारभारा संदर्भात मला अथवा इतरांना माहितीचा अधिकार कायद्याचा वारंवार आधार का घ्यावा लागला याचा उहापोह श्री.रोकडे यांनी केलेला नाही. माहितीचा अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीतील अकोला महानगरपालिकेच्या प्राधिकाऱ्यांच्या अनास्थे संदर्भात मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र

राज्य यांनी त्यांचे समोरील अपील प्रकरण क्रमांक ६५/२००३ मध्ये दिनांक १५.३.२००४ रोजी पारित केलेल्या आदेशातून (सहपत्र-३) नाराजी व्यक्त केलेली आहे तर अपील प्रकरण क्रमांक ११७१/२००५ (लो.आ.टे-१) मध्ये दिनांक १४.१२.२००६ रोजी पारित आदेशातून (सहपत्र-४) मा.लोक आयुक्त महोदयांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ चे कलम १२(१) वा १२(२) अन्वये शास्ती लादली गेली असेल त्या प्रकरणात, अशा शास्ती लादणाऱ्या आदेशाची प्रत, शास्ती लादण्याचा आदेश पारित करणाऱ्या प्रथम अपील प्राधिकाऱ्यांनी, ज्या शासकीय माहिती अधिकाऱ्यांवर शास्ती लादण्यात आलेली आहे त्याच्यावर त्याला लागू असलेल्या सेवा नियमानुसार योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंबंधी विचार करण्यासाठी संबंधित शासकीय माहिती अधिकाऱ्यांच्या समक्ष प्राधिकाऱ्याकडे लगेच पाठविण्या संबंधात शासनाकडून एखादे परिपत्रक काढून घेतल्यास, अधिनियमाचे कलम १२ च्या पोटकलम (५) मधील तरतुदीचे पालन आपोआप व लगोलग होईल हे स्पष्ट आहे. सबब यासंबंधात शासनाकडे विनंती करण्याचे मा.लोक आयुक्तांचे निर्देशाप्रमाणे माहितीचा अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या हेतूनेच मी आवश्यक तेंव्हा माहितीच्या अधिकार कायद्याच्या तरतुदींचा आधार घेतलेला आहे. ३) परिच्छेद क्रमांक ३ मधून विषद केल्याप्रमाणे श्री.शरद गांधी यांना फार वर्षापूर्वी अकोला महानगरपालिकेतर्फे पालिका कार्यालयासमोर एक दुकान लीजने दिलेले होते हे सत्य आहे. परंतु सदरचे दुकान रस्ता रुंदीकरणामध्ये येत असल्याने तसेच हया दुकानामध्ये त्यांनी पोटभाडेकरु ठेवल्याने माझ्या आयुक्त काळामध्ये मी त्यांना कायदेशीर नोटीस दिलेली होती तसेच त्यांच्या दुसऱ्या एका अनधिकृत बांधकामाबाबत सुध्दा निष्कासनाची कारवाई केली होती. त्यामुळे श्री.शरद गांधी यांचा माझ्या विरुध्द आकस होता व त्यामुळेच त्यांनी या किरकोळ प्रकरणामध्ये अपील केलेले दिसते हा श्री.चंद्रशेखर रोकडे यांनी केलेला आरोप असत्य, काल्पनिक, वस्तुस्थितीचा विपर्यास आणि दिशाभूल करणारा असल्यामुळे पूर्णपणे अमान्य करण्यात येत आहे. अकोला महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंत्यांनी दिनांक २.६.२००६ रोजीचे पत्राद्वारे (सहपत्र-५) आणि शहर अभियंत्यांनी दिनांक १४.२.२००७ रोजीच्या पत्रातून (सहपत्र-६) माहितीचा अधिकार अधिनियमाअंतर्गत दिलेल्या माहिती वरुन रस्ता रुंदीकरणा संदर्भातील सर्वेक्षणाचे कामच पूर्ण झालेले नाही त्यामुळे केवळ विचाराधीन आणि प्रस्तावित कपोलकल्पीत रुंदीकरणाचे कारण देऊन कसेही करुन मला महानगरपालिकेकडून देण्यात आलेल्या भाडयाचे जागेतून

निष्कासीत करण्याचे दुष्ट हेतुनेच काल्पनीक कारणे देऊन दिनांक ७.४.२००६ रोजी माझेवर नोटीस (सहपत्र-७) बजावण्यात आली या नोटीसमध्ये पोट-भाडेकरु ठेवल्याचा कोणताही उल्लेख देखील करण्यात आलेला नव्हता. दिनांक १०.४.२००६ रोजी प्राप्त उपरोक्त नोटीसला मी विहित कालावधीत दिनांक १७.४.२००६ रोजी उत्तर (सहपत्र-८) देखील दिलेले असून सदर स्पष्टीकरण पत्रावर श्री.चंद्रशेखर रोकडे यांनी "मनपा गेटसमोरची डोकेदुखी" असा अभिप्राय नोंदवून अपीलकाराविरुध्दचा आकस आणि द्वेष लेखी स्वरुपात व्यक्त केलेला आहे. सदर स्पष्टीकरणातून विषय वस्तुस्थितीचा कोणताही विचार न करता तथा प्रकरणात कोणतीही सुनावणी साक्षीपुरावे न घेता श्री.चंद्रशेखर रोकडे यांनी आपल्या पद आणि अधिकाराचा गैरवापर करुन दिनांक २६.५.२००६ रोजीच्या आदेशाने (सहपत्र-९) मला सदर दुकानातून निष्कासीत करण्याचे आदेश पारित केले. सदर आदेशाविरुध्द मा. जिल्हा न्यायाधिश, अकोला यांचे न्यायालयात RCA No.८७/२००६ प्रमाणे अपील दाखल करुन (सहपत्र-१०) मा.न्यायालयाकडून "जैसे थे" आदेश प्राप्त करण्यात आलेले आहेत. तत्कालीन आयुक्त श्री.चंद्रशेखर रोकडे यांनी या प्रकरणात जबाब (सहपत्र-११) दाखल केल्यानंतर या प्रकरणात रिजाईन्डर (सहपत्र-१२) देखील दाखल केलेले आहे. या प्रकरणात श्री.रोकडे यांनी रिजाईन्डरला जबाब आणि त्यांनी दिनांक २६.५.२००६ रोजीच्या आदेशा संदर्भातील केस पेपरची फाईल मा. जिल्हा न्यायालया समक्ष दाखल केलेले नसल्यामुळे प्रकरण प्रलंबित असून "जैसे थे" आदेश कायम आहेत ही महत्वपूर्ण वस्तुस्थिती श्री. रोकडे यांनी आपल्या स्पटीकरण वजा माझे विरोधातील आरोप पत्रातून मा. राज्य माहिती आयोगापासून लपवून ठेवलेली आहे. त्याचप्रमाणे माझे व्यक्तिगत असे दुसरे कोणतेही अनधिकृत बांधकाम नसल्याने तेथून मला निष्कासीत करण्याच्या कारवाईचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वरील स्पष्टीकरणावरुन श्री.रोकडे मा.राज्य माहिती आयोगासमक्ष केलेल्या स्पष्टीकरण अर्जातून चुकीची, अपूर्ण आणि दिशाभूल करणारी माहिती सादर करीत असल्याचे स्पष्ट होत असून त्यांनी या परिच्छेदातून केलेल्या खोटया आरोपावरुन त्यांचा माझे विरुध्दचा आकस स्पष्ट होत असून ज्या प्रकरणात प्रस्तुतच्या सन्माननीय सक्षम प्राधिकरणा समक्ष पूर्ण सुनावणी नंतर श्री.रोकडे यांना २५ हजार रुपये इतक्या दंड आकारणीस पात्र ठरविण्यात आले आहे त्या अपील प्रकरणाला देखील श्री.रोकडे किरकोळ प्रकरण संबोधित आहेत. यावरुन न्याय प्रक्रिये संदर्भातील त्यांची अनास्थाच प्रगट होते व त्यांच्या एकंदरीत वर्तणूकीची कल्पना येते. ४) परिच्छेद क्रमांक ४ मधून, राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर यांनी दिनांक १५.४.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या वर्तमान पत्रातून व्यापक प्रसिध्दीमुळे श्री.रोकडे यांची जास्तीत जास्त बदनामी करण्याचा मी प्रयत्न केल्याचा आरोपही कपोलकल्पीत असून मा.राज्य माहिती आयोगाच्या पारदर्शक, प्रभावी आणि निष्पक्ष न्यायदान कार्यपध्दतीची व्यापक प्रसिध्दी करुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीचा संदेश सर्वसामान्य नागरीकांपर्यंत पोहचावा आणि या कायद्याप्रती नागरीकांची जागरुकता वाढावी तसेच व्यक्ति कितीही मोठया पदांवर असली तरी कायद्यासमोर सर्व समान असतात हा संवैधानिक संदेश लोकांपर्यंत पोहचावा या हेतुनेच सदरच्या निवाडयाला व्यापक प्रसिध्दी देण्याचा प्रयत्न केला आणि त्याला विदर्भातील बहुतेक सर्वच वृत्तपत्रांनी प्रसिध्दी देऊन सक्रिय सहकार्य केलेले आहे. श्री.चंद्रशेखर रोकडे यांचे विरोधात अकोला महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २५.५.२००७ रोजी पारित झालेला ठराव क्रमांक १ (सहपत्र-१३) आणि या ठरावाला दैनिक देशोन्नती (सहपत्र-१४) मधून झालेल्या प्रसिध्दीने श्री.चंद्रशेखर रोकडे यांची बदनामी झालेली नसतांना मा.राज्य माहिती आयोगाच्या निवाडयाच्या प्रसिध्दीमुळे बदनामी कशी होते याचे आकलन होत नाही. ठरावाची आणि वर्तमानपत्रात प्रकाशित वृत्ताची प्रत सोबत जोडली आहे. ५) परिच्छेद ५ मधून श्री.गांधी यांनी त्यांच्या अर्जामध्ये "अकोला महानगरपालिका आयुक्त श्री.चंद्रशेखर रोकडे यांचे दिनांक २७.६.२००६ रोजीचे कार्यालयीन उपस्थिती आणि कार्यालयीन कामकाज निमित्य अकोला महानगरपालिकेच्या भौगोलिक हद्दीबाहेरील दौरा कार्यक्रमासंबंधी असल्यास, ठेवण्यांत आलेल्या नोंदी आणि दिनांक २७.६.२००६ रोजीचे मा.आयुक्तांचे कार्यालयीन कार्यक्रमाची माहिती देण्यांत यावी" अशी विनंती केलेली होती हे म्हणणे खरे आहे. सदरची माहिती व्यक्तिगत व खाजगी स्वरुपाची असल्याने देता येणार नाही असे आदेशीत केलेले होते. हे देखील खरे आहे. तथापि, त्यांनी सदरची माहिती पुन्हा मागितल्यानंतर सुध्दा तश्याच प्रकारचे उत्तर त्यांना देण्यात आले होते हे म्हणणे चुकीचे आहे. वास्तविक त्यानंतर अपीलकाराने अधिनियमाचे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील अधिकाऱ्याकडे अपील दाखल करुन माहिती अधिकाऱ्यांच्या आदेशाला आव्हान दिलेले होते आणि सदर अपीलच्या निर्णयात माहिती अधिकाऱ्यांचा पूर्वीचा निर्णय कायम ठेवण्याचे आदेश पारित करण्यात आले होते. सदर आदेशात स्पष्टपणे असे नमूद करण्यात आलेले आहे की, "मा.आयुक्तांचे आदेशांचे अनुषंगाने माहिती अधिकाऱ्यांनी माहिती फेटाळली असल्याचे स्पष्ट होते. अपील अर्जाच्या

कार्यालयीन टिपणीवर मा.आयुक्त यांनी पूर्वीचीच भूमिका कायम ठेवावे असे आदेशीत केलेले असल्यामुळे माहिती अधिकाऱ्यांचा दिनांक ८.९.२००६ रोजीचा आदेश कायम ठेवून अपीलकाराचे अपील खारीज करण्यांत येत आहे."  यावरुन श्री. रोकडे यांचे माहिती आकसाने नाकारलेली नाही हे स्पष्टीकरण खोटे ठरते.  अपीलकाराने आपल्या लेखी निवेदनातून माहिती उपलब्ध करुन देण्यासंबंधी शासकीय पध्दतीचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.  अपीलकाराचा हा युक्तिवाद अमान्य करण्याचे कोणतेही कारण श्री.रोकडे यांनी दिलेले नाही त्यामुळे "सदरची माहिती पुन्हा मागितल्यानंतर सुध्दा तशाच प्रकारचे उत्तर त्यांना देण्यात आले होते.  सदरची माहिती देण्याबाबतची त्यांची विनंती तात्काळ नाकारण्यात आलेली आहे.  त्यामध्ये कोणतीही दिरंगाई नाही.  तसेच सदरच्या माहितीची विनंती कोणत्याही दुष्ट हेतूने किंवा जाणुनबुजून आकसाने नाकारलेली नाही.  माझा चांगल्या हेतुने (Good faith) असा समज होता की सदरची माहिती खाजगी व वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे देण्यात येऊ नये व सदरचा निर्णय मी सद्‌हेतुने घेतला होता.  सदरची माहिती नाकारण्यामध्ये कोणताही वाईट हेतु नव्हता".  असे कारण मान्य करता येणार नाही व माझ्या माहितीप्रमाणे सदरची माहिती श्री.गांधी यांना नंतर उपलब्ध करुन देण्यात आलेली होती ही माहिती देखील चुकीची व वस्तुस्थितीला धरुन नाही. मा.राज्य माहिती आयुक्तांनी दिनांक १५.४.२००८ रोजीच्या आदेशातून पारित केल्यानुसार अपीलकाराने दिनांक १२.५.२००८ प्रथम अपील अधिकाऱ्यांकडे अर्ज (सहपत्र-१६) करुन बिनचुक माहितीची विनंती केली होती.  त्यावरुन दिनांक २.६.२००८ रोजी प्रथम अपील अधिकाऱ्यांनी स्पष्ट माहिती संबंधितास उपलब्ध करुन देण्याचे आदेश (सहपत्र-१७) पारित केलेत.  सदरच्या आदेशात नमूद असूनही स्विय सहाय्यकांनी सदरची माहिती दिनांक २.६.२००८ च्या पत्राने उपायुक्त (प्र.) यांना सादर केली आणि उपायुक्त (प्र.) यांनी दिनांक १२.६.२००८ रोजीच्या पत्रासमवेत (सहपत्र-१८) अपीलकाराला उपलब्ध करुन दिली त्याप्रमाणे, "श्री.चंद्रशेखर रोकडे यांच्या दिनांक २७.६.२००६ अकोला येथे उपस्थित असून अभिलेख्याच्या तपासणीनुसार दिनांक २७.६.२००६ रोजी कोणत्याही शासकीय दौऱ्यावर नव्हते." असे स्पष्ट झाले.  त्याचप्रमाणे श्री.रोकडे, आयुक्त, महानगरपालिका, अकोला यांच्या कार्यालयीन वाहनाच्या लागबुकच्या दिनांक २७.६.२००६ रोजीच्या नोंदीवरुन (सहपत्र-१९) त्यांचे वाहनाचा लोकल रन दौरा ०५०१३ ते ०५०५२ अर्थात एकूण ३९ कि.मी. असल्याचे स्पष्ट  झाले.  परंतु अपीलकाराने मा.जिल्हा न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात दाखल केलेल्या RCA ८७/२००६

या प्रकरणात स्थगिती अर्जाचे उत्तर श्री. रोकडे यांचे स्वाक्षरीने दाखल करण्यात आलेले आहे. सदर जबाबाचे प्रतिज्ञापत्र अकोला येथून ३० कि.मी. अंतरावरील पातूर तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या नोटरी समक्ष दिनांक २७.६.२००६ रोजी सत्यापीत केलेले असल्यामुळे स्विय सहाय्यकांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दिनांक २.६.२००८ रोजीच्या पत्रातून दिलेली माहिती आणि दिनांक २७.६.२००६ रोजीचे शपथपत्रातील सत्यापनात उल्लेखील माहितीमध्ये विसंगती आढळून येत आहे आणि ही विसंगती दडवून ठेवण्याचे अप्रामाणिक हेतुनेच श्री. रोकडे यांनी त्यांच्या दिनांक २७.६.२००६ रोजीच्या कार्यालयीन कामकाजाची माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिल्याचे स्पष्ट होते. ६) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याचे दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणा खालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पध्दत आखून देण्याकरिता, केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग घटीत करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगित बाबीकरिता तरतूद करण्यासाठी हा अधिनियम प्रस्थापित करण्यात आलेला असल्याचे सकृतदर्शनीच स्पष्ट होते. भारतीय संविधानाद्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना करण्यात आलेली आहे, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तिच्या कार्यशीलतेच्या दृष्टिने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासने व त्यांच्या यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टिने अत्यावश्यक आहेत. प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे काही अडचणी निर्माण होऊन शासकीय कामकाजात बाधा येण्याची देखील शक्यता आहे. तथापि लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्चता कायम राखतांना, या परस्पर विरोधी हितसंबंधाचा मेळ घालणे आहे. सबब आता, माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विवक्षित माहिती पुरविण्याकरिता तरतुद करणे इष्ट आहे या प्रस्तावनेसहच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रस्थापीत झालेला आहे या बाबीकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करुन परिच्छेद क्रमांक ६ मधून माझे विरुध्द द्वेष आणि आकसापोटी श्री.चंद्रशेखर रोकडे यांनी अपमानास्पद आणि असांसदीय भाषेत आरोपांची सरबत्ती केलेली आहे ते सर्व आरोप फेटाळण्यात येत आहेत. भारताच्या राज्यघटने अंतर्गत विधीवत प्रस्थापीत कायदा आणि नियमांच्या अंमलबजावणीचे दृष्टिने सनदशीर मार्गाने केलेल्या माझ्या पाठपुराव्यामुळे संतप्त होऊन माझे विरुध्द व्यक्तिगत स्वरुपाचे अपमानास्पद

... १०

अभिप्रायांची नोंद मी उपस्थित केलेल्या प्रकरणाच्या संबंधित दस्ताऐवजावर लिखीत स्वरुपात केलेल्या आहेत याची खालील उदाहरणे साक्ष देतात :- अ) नगर विकास विभागाचे दिनांक २१.८.२००६ रोजीचे पत्र (सहपत्र-२०) अकोला महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त, श्री.चंद्रशेखर रोकडे यांचे दिनांक १८.९.२००६ रोजीचे पत्र (सहपत्र-२१) याचे अवलोकन करता त्यांचा माझेप्रती असलेला संताप स्पष्ट होतो. ब) अकोला महानगरपालिकेचे सेवानिवृत्त अधिदर्शक श्री.प्रकाश पोळ यांचा वादग्रस्त ऐच्छिक सेवानिवृत्ती प्रकरणाच्या कार्यालयीन टिपणीवर (सहपत्र-२२) देखील श्री.रोकडे यांनी माझे संदर्भात द्वेषपूर्ण भाषेत आपले अभिप्राय व आदेश नोंदविलेले आहेत. क) मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अपील क्रमांक १०६५/२००५ (लोआ/टे-१) मध्ये दिनांक १२.१.२००६ रोजी पारित आदेशाच्या अंमलबजावणी संदर्भात दिनांक १०.५.२००६ रोजीच्या माझे अर्जावर (सहपत्र-२३) श्री.गांधी एसटीडी/पीसीओ प्रकरण सुध्दा टी.पी.करुन आणावे असे आदेश नोंदवून आपला द्वेषपूर्ण पूर्वग्रहदूषीतपणा प्रर्दशित केलेला आहे. ७) राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांचे कडून प्राप्त किरकोळ अर्ज क्रमांक ८/२००८ ची सुनावणी नोटीस व सोबतचे श्री.रोकडे यांचे स्पष्टीकरण याबाबत अपीलकार निवेदन करतो की, श्री.रोकडे यांना मा.राज्य माहिती आयोगाचे दिनांक १५.४.२००८ रोजीच्या आदेशाचे अनुषंगाने दंड का ठोठावण्यात येऊ नये या संबंधीचे स्पष्टीकरण मागितलेले आहे व ते श्री. रोकडे यांनी दिनांक २३.५.२००८ रोजीचे पत्राने सादर केलेले आहे. सदर पत्र हे किरकोळ अर्ज होऊ शकत नाही कारण त्यात किरकोळ अर्जाकरिता आवश्यक अटीची पूर्तता होत नाही. म्हणून या प्रकरणासंबंधी निर्णय देतांना अपीलकाराचे उत्तर व सोबत जोडलेली सहपत्रे विचारात घेऊन निर्णय देण्यात यावे अशी विनम्र विनंती करण्यात येत आहे.

४. अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अर्जदार श्री.चंद्रशेखर रोकडे हे हजर नव्हते व त्यांचे म्हणणे आयोगासमोर आलेले नव्हते. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या खुलाश्याचे अवलोकन केल्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता हे माहिती अधिकारामध्ये अनेक अर्ज महानगरपालिका, अकोला यांचेकडे करीत असतात. अर्थातच माहितीचा अर्ज करणे हा अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे असल्यामुळे त्याकरिता कोणत्याही प्रकारची हरकत घेता येत नाही. परंतु एकाच प्राधिकरणाकडे अनेक प्रकारचे माहितीचे अर्ज केल्यानंतर

आयोगास त्या अर्ज करण्याचा मागील हेतु हा जाणून घेणे आवश्यक असते. कारण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया सार्वजनिक व्यापक हिताच्या दृष्टिने वापरण्यात येतो असा त्यामागील हेतु आहे. कोणत्याही प्रकारे वैयक्तिक हिताच्याकरिता अनेक अर्ज वारंवार करुन एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणास वेठीस धरणे हे अपेक्षित नाही व त्याची वरील दोनही खुलाश्यामध्ये वस्तुस्थिती आयोगा पुढे आलेली आहे. अर्जदाराचे प्रामुख्याने म्हणणे असे आहे की, रस्ता रुंदीकरण जे व्यापारीसंकूल तोडण्याकरिता त्यांनी नोटीस दिलेली होती त्यामध्ये श्री.शरद गांधी यांचेपण दुकान होते व त्यांना नोटीस दिल्यामुळे त्यांनी अशा प्रकारचा अर्ज करण्यास सुरुवात केली व त्यापैकीच अशा प्रकारचा हा अर्ज आहे त्यामुळे मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तत्कालीन आयुक्त यांच्या दिनांक २७.६.२००६ च्या कार्यालयीन उपस्थिती व कार्यालयीन कामकाजाचे निमित्त अकोला महानगरपालिकाकडे भौगोलिक हद्यी बाहेरील दौरा कार्यक्रम संबंधी असल्यामुळे ठेवण्यात आलेल्या नोंदी व दिनांक २७.६.२००६ रोजीचे मा.आयुक्तांचे कार्यालयीन कामाची माहिती देण्यात यावी अशी माहिती मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. या व्याख्येमध्ये माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणात कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ई-मेल, ज्ञापने, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामग्री यांचा समावेश होतो. यावरुन तत्कालीन आयुक्तांच्या महानगरपालिकाच्या भौगोलिक हद्यी बाहेरील दौरा कार्यक्रम संबंधी नोंद ठेवली असल्यास ती माहिती होऊ शकते. परंतु अधिकारी जर कार्यालयात उपस्थित असेल किंवा महानगरपालिका क्षेत्रात पाहणीस गेले असतील तर बऱ्याच वेळेस अशा नोंदी ठेवल्या जातातच असे नाही व त्यामुळे कदाचित सदरची माहिती व्यक्तिगत व खाजगी स्वरुपाची असल्यास देता येणार नाही असे तत्कालीन आयुक्तांनी शेरा दिलेला असेल व त्यामागची पाश्वभूमी सुध्दा कारणीभूत असेल व त्याकरिता सुध्दा अर्जदाराने सुध्दा तोंडी युक्तिवाद केलेला आहे. तसेच पातुर येथील नोटरीसमोर प्रत्यक्ष जाऊन ॲफिडेव्हीट जर केलेले असेल तर ते कार्यालयीन कामकाज होते व ती माहिती लपवून ठेवण्याचे काहीच कारण नाही. त्यामुळे अपीलकर्ता गैरअर्जदार यांचे म्हणणे त्याबाबत संयुक्तिक वाटत नाही. अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, त्यांना सद्‌भावनेने

तसा शेरा दिलेला आहे. असे असले तरी माहितीच्या अधिकारामध्ये माहिती ही उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असते व त्यामुळे सद्भावनेने जर हा शेरा दिलेला असेल तर माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही हे योग्य नव्हते. परंतु माहितीचे स्वरुप पाहता व अपीलकर्ता यांच्या त्या मागील हेतु पाहता अर्जदार यांनी अधिनियमाचे कलम २० प्रमाणे आयुक्तांची खात्री करुन घ्यावयाची असल्यास माहिती देण्याचे जाणुनबुजून टाळाटाळ केली आहे काय याचाही विचार करावा लागतो व गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या दिनांक २७.६.२००६ च्या नोंदीबद्यल जी माहिती नंतर उपलब्ध करुन दिली आहे व आयोगाचे निदर्शनास आणलेली आहे त्यावरुन तत्कालीन आयुक्त हे कोणत्याही शासकीय दौऱ्यावर नव्हते व अकोला दौरा नमुद आहे व मुख्यालयी हजर होते. असेच अपीलकर्ता गैरअर्जदारास कळविलेले आहे. तसेच कार्यालयाचे कामकाजानिमित्त अकोला महानगरपालिकेच्या अकोला शहरास पाणी पुरवठा करणे कापशी तलाव आणि महान धरणाची पाहणी करण्याकरिता येत आहे आयुक्त श्री.चंद्रशेखर रोकडे हे नेहमीच जात होते. त्यांनी महान धरण किंवा कापसी तलाव येथे जाण्याबाबत आयुक्तांचे कार्यालयात कधीच सांगितले नाही त्यामुळे ते अकोला महानगरपालिका भौगोलिक हद्यी बाहेरील दौरा केला असल्यास त्याची कल्पना या कार्यालयास माहिती नाही असा खुलासा दिनांक ३.४.२००८ रोजी श्री.जी.व्ही.देशपांडे, आयुक्तांचे स्वीय सहाय्यक यांनी उपायुक्त (प्र.) अकोला महानगरपालिका यांचेकडे केलेला दिसतो व त्यावरुन सुध्दा तत्कालीन आयुक्तांचा भौगोलिक हद्यी बाहेरील दौऱ्यांचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात त्यांनी जो शेरा दिलेला आहे त्याबाबत तो सद्भावनेने दिलेला आहे असे म्हणावयास हरकत नाही व त्यामुळे त्यांनी त्याबाबत जाणुनबुजून माहिती द्यावयाची नाही असा ही निष्कर्ष काढता येत नाही. कारण गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या माहितीमधून सदरची माहिती लपवून ठेवण्याचे करिता अशी कोणतेही कारण त्यात समोर येत नाही. मात्र अर्जदार यांनी माहिती देऊ नये असे म्हटल्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्येश आहे हे लक्षात घेऊन ताकीद देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अर्जदाराचा अर्ज हा अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अर्जदाराचा अर्ज हा अंशतः मंजूर करण्यात येत असून अर्जदार यांनी माहिती देऊ नका या शेऱ्याबद्दल ताकीद देण्यात येत आहे.

२) अर्जदार व गैरअर्जदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३३/२००७.**

श्री. किसन शेनफड ठोंबरे,
आनंद नगर, चिखली रोड,
ता.जि. बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अ.वा.खरात,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
सहकार संकुल, बोथा रोड,
बुलढाणा.

श्री. जी.पी.साबळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
सहकार संकुल, बोथा रोड,
बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००६ रोजी शासकीय अधिकारी तथा सहाय्क निबंधक सहकारी संस्था, बुलढाणा यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. पोलीस खाते कर्मचारी सहकारी पत संस्था मर्यादित बुलढाणा र.नं.१२०३ बुलढाणाचे प्रमाणित प्रती मिळणेबाबत. माहितीचा कालावधी दिनांक १.१.२००० ते दिनांक २०.११.२००६ कृपया खालील दर्शविलेल्या माहिती प्रमाणे दस्तऐवजाच्या प्रमाणित प्रति मिळणेबाबत.

१) संस्था अवसायनात गेल्याचा अंतरीम व अंतिम आदेश. २) संस्था अवसायनात जाण्यापूर्वी झालेल्या अंतिम शासकीय अंकेक्षण यादी. ३) संस्था अवसायनात गेल्यापासून आज तारखेपर्यंत नेमण्यात आलेल्या व कार्यरत असलेल्या अवसायकांचे आदेश व मंजूर करण्यात आलेला मेहनताना बाबतचे आदेश. ४) दिनांक १.४.२००४ ते दिनांक ३१.३.२००५, दिनांक १.४.२००५ ते दिनांक ३१.३.२००६, दिनांक १.४.२००६ ते दिनांक २०.११.२००६ जमा खर्चाच्या प्रती. ५) सन २००४-२००५ चे व सन २००५-२००६ दिनांक २०.११.२००६ पर्यंत हया कालावधीतील अवसायक यांचे कालावधीतील कारवाई बुकांची प्रमाणित प्रत. ६) दिनांक १.१.२००० ते दिनांक २०.११.२००६ पर्यंतच्या किर्दबुकाची प्रमाणित प्रत. ७) दिनांक ३१.३.२००६ रोजी संस्थेतील सभासदांची शेअर्सची ठेवी व वर्गणीची तपशिलवार यादी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते व नियमाप्रमाणे शुल्क भरण्यास मी तयार आहे असे ही नमुद केलेले आहे. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २०.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बुलढाणा यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २२.२.२००७ रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, बुलढाणा यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मुद्या क्रमांक १ ते ३ व संस्थेचे अवसायक यांनी मुद्या क्रमांक ४ व ६ आणि ७ ची माहिती अर्जदारास १५ दिवसाचे आंत पुरविण्यात यावी आणि मुद्या क्रमांक ५ बाबत अर्जदार यांनी कोणती माहिती हवी आहे याचे स्पष्टीकरणासह अर्ज अवसायकाकडे सादर करावा. अशा प्रकारचे निर्देश देण्यात येवून अपील अर्ज निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते. परंतु सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.११.२००६ च्या अर्जाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, संस्थचे अवसायक हे वरिष्ठ लिपिक यांचे कार्यालयात असल्यामुळे त्यांच्याकडे हा अर्ज त्यांनी दिला व प्रत प्राप्त झाल्याची नोंद त्यावर घेतली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यानुसार दिनांक ३०.११.२००६ रोजी अवसायक यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांना सहकार आयुक्त व निबंधक सहकारी

संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक ८.२.२००६ च्या परिपत्रकाप्रमाणे माहिती अधिकाराचा कायदाच लागू होत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या पत्राप्रमाणे दिनांक २१.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तथा माहिती अधिकारी अवसायक यांनी दिलेल्या पत्राचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही म्हणून कळविले असे दिसते. परंतु अपीलकर्ता यांना सदरचा निर्णय मान्य नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी हयाबद्यलचे विवरण दिलेले आहे. त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक २८.२.२००७ रोजी अर्जदारास माहिती उपलब्ध असून विहित शुल्क भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले होते. परंतु अर्जदाराने माहितीचे शुल्काचा भरणा केलेला नाही त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सदरचे पत्र मिळाले नाही. अन्यथा त्यांनी शुल्क भरले असते. त्यावर पुन्हा दिनांक ५.३.२००७ रोजी संस्थेच्या अवसायकाकडून श्री.के.एस.ठोंबरे, अपीलकर्ता व त्यांचे सहकारी श्री.शेळके हे प्रत्यक्ष कार्यालयात येऊन संपूर्ण दप्तराची पडताळणी व छाननी व अर्जदार व त्यांचे सहकारी यांनी केली असल्यामुळे तसेच अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांच्या मागणी प्रमाणे पडताळणीसाठी माहिती उपलब्ध करुन दिली व माहिती बाबत त्यांचे समाधान झालेबाबत लेखी अहवालाद्वारे त्यांना कळविले असा खुलासा केलेला आहे. व सोबत दिनांक ५.३.२००७ चे पत्र दाखल केलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते स्वतः किंवा शेळके हे अवसायक कार्यालयात गेले नव्हते व त्यांना कोणत्याही प्रकारची कागदपत्राची तपासणी केली नाही. या सर्व प्रकरणामध्ये अवसायक यांनी जो पत्र व्यवहार केला असता तो संशयास्पद वाटतो. परंतु संपूर्ण पत्र व्यवहार हा क्रमशः उपलब्ध असल्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारचा निश्चित निर्णय घेता येत नाही. तरी सुध्दा जनमाहिती अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अवसायक यांच्याकडेच सर्व कागदपत्रे असल्यामुळे व अवसायकाच्या शिवाय कागदपत्रे उपलब्ध करुन देता येत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. आजही त्यांचे म्हणणे असे आहे की, माहिती त्यांचे जवळ उपलब्ध आहे व ते देण्यास तयार आहेत. मात्र माहिती जरी आज देण्यास तयार असलेतरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे ती ३० दिवसात उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे व त्यात जनमाहिती अधिकारी किंवा अवसायक हेच जबाबदार दिसून येतात. त्यातही महाराष्ट्र सहकारी संस्था

अधिनियम, १९६० कलम १०२, १०३, १०५ नुसार संस्थेचे अवसायक सर्व कागदपत्रे व इतर दस्तऐवज त्यांची अभिलेखे ही अवसायकाची जबाबदारी आहे असे असल्यास अवसायक यांनाच जबाबदार धरावे लागते व त्यांनी अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द कलम २० प्रमाणे शास्ती लादणे क्रमप्राप्त ठरते. परंतु सदरचे अवसायक श्री. सी.एन.केने हे सेवानिवृत्त झाले असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे व त्याबद्यल त्यांचे ऐकून घेता येत नाही. परंतु त्याबाबतची जबाबदारी ही जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शास्तीची अंमलबजावणी करता येईल. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही तसेच अवसायक यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द शास्ती लादण्याची शिफारस करण्यात येत आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने त्यांनी मागितलेली माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती ही अवसायकाने उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अवसायक यांना जनमाहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची वसुली जिल्हा निबंधक सहकारी संस्था, बुलढाणा यांनी वसुल करावी व तसे अपीलकर्ता यांना कळवावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १६.६.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३५/२००७.**

श्री. साहेबराव सखाराम गायकवाड,
मु. पो. ता. चिखली, वार्ड नं. १७,
गजानन नगर, जिल्हा बुलढाणा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हा पोलीस अधिक्षक,
बुलढाणा.

श्री. संतोष वानखेडे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
देऊळगांव राजा,
बुलढाणा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००७ रोजी (प्राप्त दिनांक १२.४.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२००७ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, देऊळगांव राजा यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) सौ.सरिता अंकुश वायाळ, रा. बायगांव (बु.) यांना मारहाण केल्याबाबत प्रकरण दिनांक १८.९, २३.९, २९.९ जा.क्र. क्यू पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अंढेरा पोलीस स्टेशन. २) श्री.अंकुश वायाळ, रा.बायगांव(बु.) यांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करुन

जीव मारण्याची धमकी दिल्याबाबत दिनांक २३.११.२००६ रोजी दिलेली कै. अंढेरा पो.स्टे. ३) पोलीस स्टेशन अंढेरा येथे १) अं.शे.वायाळ, २) स.शे.वायाळ, शिक्षक, पंचायत समिती देऊळगांव राजा यांनी शासनाची फसवणूक करुन बेकायदेशीरपणे मिळविलेल्या घरभाडे भत्त्याबाबत चौकशी करुन खोटया माहिती आधारे शासनास फसवूण चौकशी करुन फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत केलेली तक्रार दिनांक १.१२.२००७. ४) सौ.सरिता वायाळ, बायगांव (बु.) यांनी मारहान केल्याबाबतची तक्रार. ५) सौ.सरिता अंकुश वायाळ, वायगांव (बु.) यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम, २००६ प्रमाणे केलेली तक्रार दिनांक ३०.१२.२००६. वरील प्रमाणे १ ते ५ प्रकरणावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रत मिळणेबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २४.२.२००७ रोजी मिळालेली दिसून येते. त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडे दिनांक २६.२.२००७ रोजी अर्ज केलेला दिसून येतो व त्यानंतर दिनांक २०.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.३.२००७ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतु सदर प्रथम अपीलाचा निर्णय एकतर्फी दिलेला असल्याने दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.१.२००७ च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक ३१.१.२००७ रोजी पोलीस स्टेशन अधिकारी, अंढेरा यांनी पाठविलेला चौकशी अहवाल योग्य दिसून येतो व सदरच्या अहवालाची प्रत ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता पाठविलेल्या पत्रावर गुन्हा नोंदविला जात नाही काय त्यांनी असे सांगितले की, सही एफ.आय.आर.वर घ्यावी लागते व त्याशिवाय गुन्हा नोंद होत नाही. त्यातही भा.दं.वि.प्रमाणे अपीलकर्ता यांची मुलगी ही फिर्यादी होऊ शकते व त्यामुळे ती स्वतः आल्या शिवाय त्याची नोंद होऊ शकत नाही त्यानंतर पोलीस कार्यालयात

त्यांना फोन करुन ३-४ वेळा बोलावण्यात आले होते तरी ते आले नाही. एक वेळ आल्यानंतर त्यांना विधी अधिकारी यांना समजावून सांगितल्यामुळे व त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशन मध्ये जाऊन गुन्हा नोंदविला असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व त्यानंतर एफ.आय.आर. सादर केल्यानंतर गुन्हा नोंदवून माहिती मागण्यास सुरुवात केली आहे. अपीलकर्ता यांच्या सदरच्या एफ.आय.आर. प्रमाणे अपीलकर्ता यांच्या जावयाविरुध्द गुन्हा दाखल झाला असून सुध्दा त्यांनी त्यांच्या इतर ५ नातेवाईकांचे संदर्भात गुन्हा नोंदविला व त्याबाबत त्यांची माहिती मागिवित असतात. मात्र प्रत्यक्ष माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे येत नाहीत. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियमख २००५ मध्ये कोणत्याही प्रकारे गुन्हा नोंदविण्याचे संदर्भामध्ये किंवा कोणत्याही प्रकरणामध्ये अंतिम कारवाई करण्याचे आदेश देण्याच्या संदर्भामध्ये राज्य माहिती आयोगास अधिकार नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १६.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३८/२००७.**

श्री. भास्कर जगन्नाथ ठाकरे,
रा.विश्रामगृह बाळापूर,
पो. ता. बाळापूर, जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बाळापूर,
जिल्हा अकोला.

श्री. के. एस. नावकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, गट ग्रामपंचायत, कळंबी महागांव,
ता. बाळापूर, जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री.एस.पी.सोनकुसरे हजर असून माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.८.२००६ रोजी कळंबा खुर्द येथील सर्वेनुसार नमुना ८ रजिस्टर मधील अ.क्र. ८७ मधील पुर्व पश्चिम ६१ फुट, उत्तर दक्षिण ३८ फुट नमुना ८ नक्कल मिळावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र टपालद्वारे ए.डी.रजिस्टर केले ते सुध्दा मला माझ्या पत्त्यावर परत आलेले असल्यामुळे त्यांचा माहितीचा अर्ज हा घेतल्या गेला नाही. सदहु नावाची अधिकारी मुदती आत मिळाली/भेटली नाही. सबब पाठविणारास परत

... २

आलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक १७.८.२००६ रोजी स्वतः नावाने नमुना नं. ८ ची नक्कल मिळण्याकरिता अर्ज केला होता असे जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी सांगितले व त्या अर्जाप्रमाणे दिनांक २८.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना उत्तर देण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.११.२००६ रोजी देण्यात आली असुन माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असता अपीलकर्ता यांनी माहिती घेतली नाही. दिनांक २८.९.२००६ ची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली असून सुध्दा त्यांनी आयोगापुढे त्याबद्यल त्यांनी सांगितले नाही व आयोगापुढे खुलासा दाखल करतांना सुध्दा त्याबाबतचा उल्लेख केलेला नाही. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००६ रोजी सचिव, गट ग्राम पंचायत यांनी त्या संदर्भात दिलेल्या उत्तराची नक्कल सादर केली. तसेच दिनांक २.८.२००६ रोजी सचिव, गट ग्रामपंचायत यांनी माहितीचा अधिकारात असलेल्या अर्जाचे संदर्भात दिलेले उत्तर दाखल केलेले आहे. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांना नमुना ८ ची संबंधिताने मागणी केली परंतु आवश्यक ते बंधपत्र सादर न केल्याने नमुना ८ देता आला नाही. दिनांक ७.३.२००८ ला बंधपत्र प्राप्त झाल्यावर त्या आधारे नोंद घेऊन सुधारित नमुना ८ संबंधितास दिनांक ३.४.२००८ ला देण्यात आला आहे. दिनांक १४.८.२००६ अन्वये मागितलेली माहिती संबंधितास देण्यात आली असल्याने संबंधितास शास्ती लादण्यात येऊ नये ही विनंती असा खुलासा केलेला आहे व यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती अपेक्षित होती ती माहिती ही त्यांनीच बंधपत्र सादर न केल्यामुळे निर्णय हा विलंबाने झाल्यामुळे त्यांना माहिती ही उपलब्ध करण्यात आली नव्हती असे दिसून येते व ती वस्तुस्थिती दिनांक १४.८.२००६ व दिनांक १७.८.२००६ रोजीची होती ती त्यांना दिनांक २८.९.२००६ रोजी कळविण्यात आले होते याचा अर्थ अपीलकर्ता यांना माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्यात आली होती व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना दिनांक १७.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली होती परंतु दिनांक १४.८.२००६ चा अर्ज हा परत आलेला दाखवून माहिती उपलब्ध झाली नाही असे आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्यामुळे व दिनांक १७.८.२००६ च्या अर्ज केला तो आयोगाचे निदर्शनास न आणल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६३७/२००७.**

श्री. हरीष त्र्यंबक तायडे,
द्वारा- के.एन.कोलते, वार्ड नं.२२,
महाविरनगर,
बुलढाणा- ४४३ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा.

जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून माहिती अधिकारी यांच्या तर्फे श्री.एस.आर.राणे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००६ रोजी सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (सा.प्र.), जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) वरिष्ठ सहाय्यक या पदाच्या निवडीबाबत. २) दिनांक ४ जून २००६ रोजी झालेल्या लेखी परीक्षा व दिनांक ४ जून २००६ रोजी झालेली तोंडी परीक्षा. ३) (१) खुल्या/अ.जा. प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या अर्जदारांच्या संदर्भात खालील मुद्यांवरील माहिती व प्रती पुरविण्याबाबत.

| अ क्र | परीक्षार्थ्यांचे नांव | लेखी (एकूण गुणासह) परीक्षेत मिळालेले गुण | तोंडी परीक्षेत मिळालेले गुण | संगणक परीक्षा पास असल्यामुळे मिळालेले गुण | अंशकालीन असल्यामुळे मिळालेले गुण | इतर मुद्यांवर गुण दिले असल्यास त्याचा तपशील | अनुभव असल्यास त्याचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|

३) (२) वरील निवड झालेल्या परीक्षार्थीच्या लेखी परिक्षेतील उत्तर पत्रिकांच्या छायांप्रती. ३) (३) वरिष्ठ सहाय्यक या पदाच्या भरतीबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनाबाबत सर्व शासन निर्णयाच्या व परिपत्रकाच्या छायाप्रती. ३) (४) कार्यालयीन टिपणीची छायाप्रत. सदरची माहिती ही व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.९.२००६ रोजी "आपण निवड झालेल्या परिक्षार्थिच्या लेखी परिक्षेतील उत्तर पत्रिकाच्या छायाकिंत प्रतिची मागणी केलेली आहे. याबाबत उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक एपिटी/२००६/प्र.क्र. २७०/आस्था-८, दिनांक २२ जून २००६ नुसार जिल्हा परिषदेच्या वर्ग-३, वर्ग-४ मधील भरतीकरिता घेण्यात आलेल्या लेखी परिक्षाच्या उत्तर पत्रिकांच्या छायाकिंत प्रती, पात्र उमेदवाराची यादी प्रसिध्द केल्यावर ५ दिवसांच्या आंत संबंधित उमेदवारांनी मागणी केल्यास २००/- रुपये इतके शुल्क आकारुन देण्यांत याव्यात. त्यानुसार आपणास इतर परिक्षार्थिंच्या लेखी परिक्षाच्या उत्तर पत्रिकांच्या छायाकिंत प्रति देता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११(१) अन्वये त्रयस्थाची माहिती देण्याचे संदर्भात संमती घेतल्याशिवाय त्यास माहिती देण्यात येऊ नये. संबंधितास त्यांचे माहिती देण्याबाबत पत्र देण्यात आलेले आहे. त्याची मान्यता मिळताच आपणास त्याची माहिती देण्यात येईल. वरिष्ठ सहाय्यक या पदाच्या भरतीबाबतच्या शासनाच्या मार्गदर्शक सुचना व शासन निर्णय याबाबतची माहिती वरिष्ठ सहाय्यक या पदासाठी दिनांक १६ मे २००६ रोजी दैनिक सकाळ या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्येच सर्व उल्लेख करण्यांत आलेला आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.२.२००७ रोजी देण्यात आलेला असून शासन निर्णयाचे अधिन राहून अपीलार्थीचे मागणी प्रमाणे त्यांची

स्वतःचे परीक्षेबाबतची माहिती देणे बाबत आदेशीत करण्यात येत आहे. तसेच इतर उमेदवारांची माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे संबंधितांचे संमतीपात्र करुन घेऊन माहिती देणेबाबत आदेशीत करण्यात येत आहे. याबाबत संबंधित खाते प्रमुखांनी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करुन श्री.हरीष त्र्यंबक तायडे यांना माहिती देणेबाबत कार्यवाही करावी असा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु निर्णयाचे अनुषंगाने दिनांक १३.८.२००७ रोजी अपीलकर्ता यांना सदरच्या प्रश्नपत्रिका उत्तरपत्रिका व कार्यालयीन टिपणी एवढी माहिती कव्हरिंग लेटर न देता माहिती अध्यक्ष, जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या तोंडी आदेशाने दिली आहे. त्यामध्ये दिनांक ७.९.२००६ रोजी केलेल्या अर्जात नमुद केल्यानुसार माहिती दिली नाही. मला मुलाखतीस पात्र उमेदवारांचे प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका दिल्या नाही. भरतीप्रक्रिया बाबतचे शासन निर्णय व परिपत्रकांची माहिती अद्याप दिली नाही. त्याकरिता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी इतर परिक्षार्थीच्या उत्तरपत्रिका मागितल्याचे संदर्भामध्ये अधिनियमाचे कलम ११(१) अन्वये कार्यवाही केलेली दिसून येते. सदरच्या कार्यवाही प्रमाणे जर इतर परिक्षार्थींनी संमती दिली असेल तर अपीलकर्ता यांना त्या परिक्षार्थीच्या उत्तरपत्रिकांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांना दिनांक २५.९.२००६ रोजी जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये जिल्हा परिषदेच्या वर्ग-३, वर्ग-४ च्या पदाच्या भरतीकरिता घेण्यात आलेल्या लेखी परीक्षाच्या छायांकित प्रती देण्याबाबत श्री. प्रकाश हिर्लेकर, उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिनांक २३ जून, २००६ रोजी पत्राने आदेशीत केलेल्या प्रमाणे उत्तर दिलेले आहे. तसेच शासनाच्या मार्गदर्शक सुचना व याबाबतच्या संदर्भामध्ये दैनिक सकाळ या वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीकडे अपीलकर्ता यांचे लक्ष वेधलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती जाहिराती मधून उपलब्ध होऊ शकते. तर माहिती अधिकाऱ्याकडे का माहिती मागितली असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की जाहिरातीमध्ये शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे परिपत्रकाचा फक्त संदर्भ दिलेला आहे. त्यामुळे सदरची माहिती मागितली होती असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी माहिती नाकारलेली आहे किंवा माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. मात्र

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या उत्तराप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे हा प्रमुख उद्येश असल्यामुळे व त्यात कलम ११ प्रमाणे कार्यवाही केली असल्यास ती माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक असते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मागितलेली दिनांक ७.९.२००६ च्या अर्जात मागितलेल्या माहितीनुसार मुद्येनिहाय उर्वरित माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ७.९.२००६ च्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेल्या मुद्येनिहाय माहिती पैकी उर्वरित माहिती हा निर्णय मिळाल्यापासून त्यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात ३ दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १७.६.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७४५/२००७.**

श्री. कवडू जनार्दन एनप्रेडीवार,
मु.पो.ता. मुल,
जिल्हा चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक,
५४, वेलस्ली रोड, पो.बॉ.नं.५,
शिवाजीनगर, पुणे- ४११ ००५.

जनमाहिती अधिकारी तथा
राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक,
५४, वेलस्ली रोड, पो.बॉ.नं.५,
शिवाजीनगर, पुणे- ४११ ००५ ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.६.२००८ रोजी घेण्यात आली. सदरच्या अपीलाचे संदर्भामध्ये कागदपत्रे व खुलासा दाखल करण्याकरिता दिनांक १७.६.२००८ रोजी तारीख देण्यात आली होती. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री.एन.ए.सुखटनकर, सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर हे हजर आहेत.

२. सहाय्यक माहिती अधिकारी, नाबार्ड यांनी असा खुलासा दाखल केला आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(क) नुसार नाबार्ड करिता "समुचित शासन" हे केंद्र शासन आहे व त्यामुळे सदरचे अपील हे केंद्रीय माहिती आयोगापुढे दाखल करावयास पाहिजे होते त्यामुळे सदरचे अपील हे राज्य माहिती आयोगापुढे चालू शकत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. हे म्हणणे

अधिनियमाच्या तरतुदीचे अवलोकन केले असता योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील हे केंद्रीय माहिती आयोगाकडे (केंद्रीय सुचना आयोग, ब्लॉक नं. IV, पांचवा तल, पुराना जे.एन.यु.परिसर, नवी दिल्ली-११० ०६७.) दाखल करावे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी व अपीलकर्ता यांना सहाय्यक माहिती अधिकारी श्री.एस.के.धुमाळ यांचा खुलाश्याची प्रत पाठविण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६४८/२००७.**

श्री. विद्याधर तुकाराम काकड,
मु.पो. तांदळी (बु.), ता.पातूर,
जिल्हा अकोला-४४४ ५०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री.एस.एम.मेश्रे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, पातूर,
जि. अकोला.

श्री. आर.एम.फुलारी,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत, तांदळी (बु.),
ता. पातूर, जिल्हा अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी सन २००१ ते २००६ पर्यंत झालेल्या ग्रामपंचायतच्या सर्व मासिक सभा व ग्राम सभेच्या ठरावाच्या सत्यप्रती मिळणेबाबत. शासकीय माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत तांदळी(बु.), तालुका पातूर, जिल्हा अकोला यांच्याकडे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. मात्र दिनांक १३.२.२००७ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर यांनी सचिव, ग्रामपंचायत यांना माहितीउपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते.

... २

परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. सदरच्या द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती विहित मुदतीत दिली नाही व दिनांक २.६.२००८ रोजी दिलेली माहिती अपूर्ण आहे असे लेखी दिलेले आहे. सचिव, ग्रामपंचायत यांनी खुलासा दाखल करतांना सदर माहिती जुळवाजुळव करणे तसेच ग्रामपंचायत निवडणूक व ग्रामपंचायत इतर कामाच्या व्यापामुळे माहिती देण्यास विलंब झाला आहे. यापुढे भविष्यात माहिती वेळेवर देण्याबाबत दक्षता घेण्यात येईल खुलासा माहितीस्तव सादर केलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तांदळी (बु.) या ग्रामपंचायतीची निवडणूक ही २००८ मध्ये झाली असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घेणार असे दिलेले असल्यामुळे उत्तर दिलेले नाही ३० दिवसाचे आंत ते स्वतः माहिती घेण्यास गेले होते काय असे विचारले असता माहिती घेण्यास गेलो होतो परंतु माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र त्याकरिता त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशा प्रकारचे आदेश घेणारा अर्ज किंवा पत्र हे दाखल नाही. प्रथम अपील केल्यानंतर स्मरणपत्र दिलेले दिसते. त्यातही त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडे सुध्दा दिनांक ८.२.२००७ रोजी अर्ज दाखल केलेला दिसतो. त्यात दिनांक २९.३.२००७ रोजी गटविकास अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल आदेश दिलेले दिसून येतात. वास्तविक मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अधिनियमात कोणताही अधिकार नाही. तरीसुध्दा माहितीचा अधिकार मिळाल्यानंतर सुध्दा अशा प्रकारची निरर्थक उत्तरे केली जातात व शासकीय कार्यालयातील कामकाज वाढविले जाते. दिनांक १८.४.२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर यांनी अपीलकर्ता यांना रुपये ३६८/- चा भरणा ग्रामपंचायत, तांदळी (बु.) येथे भरणा करावा व माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. वास्तविक ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यास ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे. परंतु ३० दिवसामध्ये माहिती कां उपलब्ध करुन दिलेली नाही याबाबत चौकशी न करता, सुनावणी न घेता व कारणमिमांसा देणारा निर्णय न

देता माहितीचे शुल्क भरुन माहिती घेऊन जावे असा आदेश कोणत्या आधारे दिलेला आहे हे समजून येत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक २.८.२००६ रोजी जी माहिती मिळाली आहे ती विलंबाने व अपूर्ण मिळाली आहे. परंतु ३० दिवसामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती हेही तेवढेच सत्य आहे. असे असले तरी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून दोषी आढळून येतात व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसाचे आंत विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरची माहिती ही अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

३) अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा ग्राम सचिव, ग्रामपंचायत, तांदळी (बु.) यांचे विरुध्द रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्ती ही त्यांचे दर महिन्याचे वेतनातून वसूल करण्यात यावी. सदरची शास्तीची अंमलबजावणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पातूर, जि.अकोला यांनी करावी.

४) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सुनावणी न घेतल्यामुळे व कारणमिमांसा निर्णय न दिल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते. यापुढे त्यांनी दोनही पक्षकारांचे उपस्थित सुनावणी घेऊन निर्णय द्यावेत.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७५/२००७.**

श्री. राजाराम रामदीन मिश्रा,
६/२५, रघुजीनगर कॉलनी,
छोटा ताजबाग रोड,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. यु. जी. ओक,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
व्यवस्थापकीय संचालक,
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित,
बॉम्बे लाईफ बिल्डींग, ५ वा मजला, ४५ वीर नरीमन मार्ग,
मुंबई-१.

श्री. यु.एस.शेठ,
जनमाहिती अधिकारी तथा
उपव्यवस्थापक (प्रशासन),
संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित,
बॉम्बे लाईफ बिल्डींग, ५ वा मजला, ४५ वीर नरीमन मार्ग,
मुंबई-१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक २३.११.२००६ च्या बैठकीमध्ये मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय याने दिलेल्या आदेश क्रमांक २ प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा तपशील देण्यात यावा. सदरची

माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना संत राहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाने केलेल्या कार्यवाहीबाबत असल्याने आपला अर्ज पुढील कार्यवाहीसाठी त्या महामंडळाकडे पाठविण्यात आला आहे. तरी आपण यापुढील पत्रव्यवहार संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांचेशी करावा ही विनंती असे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यानुसार उपव्यवस्थापक (प्रशासन) तथा माहिती अधिकारी यांनी दिनांक २७.२.२००७ रोजी पत्र क्रमांक प्रशासन/४८५ या जावक क्रमांकाप्रमाणे अपीलकर्ता यांना महामंडळाने दिनांक २३.११.२००६ रोजी प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग यांचेकडे झालेल्या बैठकीमधील निर्णयाबाबत महामंडळाने पत्र क्रमांक प्रशासन/२३८, दिनांक २६.१२.२००६ रोजी पत्र पाठवून याबाबत कळविले आहे. या पत्राची प्रत सोबत आपले मागणीनुसार जोडून पाठविण्यात येत आहे. सदर माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १२.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या दिनांक १२.३.२००७ च्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना क्रमांक प्रशासन/९६९, दिनांक १०.४.२००७ रोजी उपव्यवस्थापक (प्रशासन) तथा माहिती अधिकारी यांना झालेल्या कार्यवाही बद्यल पुन्हा कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.२.२००७ च्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक २६.१२.२००६ रोजी जे पत्र दिलेले आहे ते कार्यवाहीच आहे असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यानंतर दिनांक १०.४.२००७ रोजी सुध्दा त्यातील पुढील कार्यवाहीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती व ती कुरिअर मार्फत अपीलकर्ता यांच्याकडे पाठविण्यात आली होती. त्यासंदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी कुरिअरची पावती जोडलेली आहे. तसेच जावक नोंदवहीतील नोंद सुध्दा दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या कुरिअरचे माध्यमातून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक २३.११.२००६ च्या बैठकीचा मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये कार्यवाही झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

... ३

याचा अर्थ अपीलकर्ता यांना अंतीम कार्यवाहीची अपेक्षा आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा. अभिलेख, दस्तऐजव, परिपत्रके इत्यादीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार होतो. त्यामुळे अर्ज ज्या तारखेस केला असेल त्या तारखेस एखाद्या प्रकरणात जी कार्यवाही झाली असेल ती ३० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या गुणवत्तेच्या संदर्भामध्येही राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षे बाहेरील आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. असेच प्रथम अपीलाचे नंतर सुध्दा जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे. अपीलकर्ता यांना त्यास उपलब्ध झालेल्या माहितीच्या अनुषंगाने निर्णय प्रक्रियेत अपूर्णतः आहे असे वाटल्यास त्याबाबत त्यांनी सक्षम अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना दिनांक ५.२.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या माहिती या व्याख्येप्रमाणे असल्यामुळे तसेच प्रथम अपीलाचा निर्णयाचे संदर्भात सुध्दा जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सुध्दा अधिनियमाचे तरतुदीनुसार असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २३.६.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७७/२००७.**

श्री. किशोर रामचंद्र चिंचाळकर,
५३, गोविंद गौरखेडे कॉम्प्लेक्स,
सेमीनरी हिल्स, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अप्पर आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. दि. मा. मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१०.२००६ रोजी श्री.एस.डी.कडू माहिती अधिकारी म्हणून खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे. Point १. Provision of ESR Tank on D२ block please furnish. १) Copy of approved plan २३८/EPR/६७ dated २८.२.१९९४, २८.४.१९९८ refersed in your letter dated ४.५.१९९८. २) Copy of the application dated २३.९.१९९७ submitted by promoter for approval of ESR on D२ block with technical papers submitted by him. ३) The complete on certificate issued by promoter/applicant taking the full responisibility of constmetis design, safety etc. duly certified by approved architect in term of conditions No. १८२ of approval letter No. ४०/BFW, dated ४.५.१९९८. ४) NOC issued by water works dept. in term of condition No.३ of the said letter.

५) Occupation Certificate issued by N.M.C. considering design, specification and safety of residents, fixing responsibility of the party in case of unfortunate mishap. ६) Copy of letter of reply to letter No.GGCRWA/२००१/३/६, dated ६.६.२००१, issued by welfare arovsiation, by your office with special emphasis as para ३ & ४. ७) I would like to see casefile. Point २. Connecting Sewer line of Complox to Septic Tank of NMC :- Please furnish following :- १) The application submitted by promoter for permission to connect Sewerline to Septic tank of NMC with proposal and plan with reasons there of. २) The application with technical details submitted by promoter to NMC after execution and completion of laying work for Noc/Completion Certificate by NMC. ३) NOC issued by NMC to promoter approving the arrangement/exection with observations and conditions in term of letter No.५५७/Slum dated ३०/३१.१.२००६. ४) Certification issued by NMC about adequacy of capacity to Septic tank. ५) Agency who will maintain in future. ६) I would like to see the case file. Point ३. Erection of telephone tower over B१ Block १) Permission of ULC authority allowing use of residential area for use of commercial activities. ULC order stipulates this condition. With application of promotor for permission. २) Application of promoter to N.M.C. for granting permission to erect telephone tower on B२ Block. ३) Sanction accorded by N.M.C. with terms and conditions. ४) Certification about Soundness of the building to bear extra DEAD WEIGHT of the tower over the building which is not originally safety of the residents in vacinty by expert. ५) The agency/person to be held responsible in case of unfortunate mishap or casualty. ६) The biaparty agreement entered into between two parties.(promoter and telephone company) giving terms, conditions and financial gain out of it. The financial beneficiery in this deal. ७) Financial benefit accrued so for since installation which is the right of society to be formed and not promoter. Action proposed to be taken in the matter in consultation of ULC authority. Point No. ४ Sanction of additional १७ Nos. of Street lights on oxtended Lit Network. १) Promotors application for sanction of addl. १७ Nos. Street Light. २) Demand note for payment of additional charges for provision making by

NMC in reference to application under SNo.१ above. ३) Amount paid by promoter with copy of receipts unused by NMC. ४) Letter of approval by NMC, Sanction number/date advised to promoter. ५) Authority/agency executing provision of steeetlight Fixtures. ६) Date of comnuicsioning of addl.streetlights. ७) Reference of advice given to contractor to under take maintainance on regular Basis. ८) I would like to see case file. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.११.२००६ रोजी सदरची माहिती ही इतर झोनशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती मागविण्यात येत आहे असे कळविण्यात आले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २२.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.५.२००७ रोजी झालेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.११.२००६ रोजी सुध्दा माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.१२.२००६ रोजी आपण अपेक्षिलेली माहिती झोन क्र. २, धरमपेठ झोन महानगरपालिका या कार्यालयाशी संबंधित आहे. सदर नस्ती झोन कार्यालयाकडून प्राप्त करण्यांकरिता पत्र पाठविण्यांत आले आहे. उक्त माहिती या विभागास प्राप्त होताच आपणांस पाठविण्यात येईल. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचा अर्जाचे अनुषंगाने सुध्दा त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही व्यापक स्वरुपाची असल्यामुळे व निरनिराळया झोनशी संबंधित असल्यामुळे वेगवेगळया झोनला पत्र पाठविले आहेत व त्यांचेकडून माहिती उपलब्ध झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांनी मागितली नव्हती व त्यातून ही कोणत्याही प्रकारचा अर्थबोध होत नाही. वास्तविक अर्जदाराने अर्ज केल्यापासून ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे. तसेच अर्जदार यांनी सुध्दा माहिती मागतांना ती एकाच माहिती अधिकाऱ्यांकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती मागणे हे संयुक्तिक असते. विभाग प्रमुखास माहिती मागितली असली तरी ती ३० दिवसात उपलब्ध होईल असे नाही व या प्रकरणात वर नमुद केल्याप्रमाणे अनेक झोन मधील माहिती असल्यामुळे विलंब झालेला दिसून येतो.

तरीसुध्दा इतर झोन मधून ज्यांना माहिती मागितली ते सुध्दा दोषी आढळून येतात व त्या संपूर्ण विलंबाकरिता जनमाहिती अधिकारी व इतरही दोषी आढळून येतात. परंतु जनमाहिती अधिकारी यांची बदली झाली असल्यामुळे शास्तीच्याकरिता त्यांचे म्हणणे ऐकून घेता येत नाही. त्याकरिता त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे हे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.१०.२००६ व दिनांक ८.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत मुद्येनिहाय माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.१०.२००६ व दिनांक ८.११.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याकरिता जे अधिकारी जबाबदार असतील त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी किंवा शिस्तभंगाची चौकशी करावी. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी करावयाची आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २३.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७८/२००७.**

श्री. विठोबा लक्ष्मण घरत,
मु. खंडाळा, पो. आमडी (बे.)
ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. के. घोनमोडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर,
जिल्हा चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा सादर केलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, चिमूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मौजा खंडाळावासीयांकडून राजेंद्र बोरकर यांनी चोरी केल्या प्रकरणी तक्रारीवर केलेल्या चौकशीचा संपूर्ण अहवाल व कार्यवाही. २) राजेंद्र बोरकर यांची खंडाळाहून बदली करण्याचे कारण, व्यक्तिगत त्यांचा अर्थ तसेच बदलीचा आदेश टिप्पणी सहित. ३) मौजा खंडाळा येथील प्राथमिक शाळा इमारत पोलीस बंदोबस्ताकरिता उपलब्ध

... २

करुन दिल्याबाबत अर्ज, आदेश टिप्पणीसह. ४) पोलीसांना निवासाकरिता शाळा उपलब्ध करुन तसेच शाळा बंद ठेवून झालेल्या शैक्षणिक नुकसानीच्या चौकशीचा अहवाल व त्यावर केलेली कार्यवाही. ५) राजेंद्र बोरकर यांची पोलीस स्टेशनला तक्रार केली काय ? केल्यास तक्रारीची प्रत. न केल्यास त्याची कारणे टिप्पणीसह. ६) चोरी केलेले साहित्य संवर्ग विकास अधिकारी यांनी पोलीस पाटील यांचेकडे सोपविण्यात यावे असे आदेश पत्र. राजेंद्र बोरकर यांना दिले काय, दिल्यास टिप्पणीसह आदेशाची प्रत. ७) एकूण किती साहित्याची चोरी बोरकर यांनी केली ? पैकी किती साहित्य पोलीस पाटील खंडाळा यांचेकडे जमा केले ? किती त्यांनी लपवून ठेवले आहे ? चोरुन नेलेल्या व लपवून ठेवलेल्या साहित्य त्यांचेकडून मिळविण्याबाबत काय उपाय योजना केली आहे. ८) मौजा खंडाळा येथील ग्राम शिक्षण समिती त्वरित गठीत करण्याबाबत काय कार्यवाही आहे. समिती गठीत असल्यास समितीची नावे व कार्यवाही अहवाल तसेच ग्रामसभेचा ठराव. सत्यप्रत पुरविण्यात यावी. ९) शिक्षक निवासस्थान दुरुस्ती व शाळेचे शौचालयाचे निधी खर्च करुन काम झाले नाही याबाबतची माहिती टिप्पणीसह. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्त्यांचे अर्जाचे अनुषंगाने माहिती ही विस्तृत स्वरुपाची असून वेगवेगळया अधिकाऱ्यांकडून संकलित करावयाची असल्यामुळे त्यांनी दिनांक १७.७.२००६ रोजी १५ दिवसाची मुदत वाढवून देण्यात यावी अशी विनंती केलेली होती. काही माहिती त्यांनी दिनांक २९.७.२००६ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक १.८.२००६ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.९.२००६ ला देण्यात आला असून दिनांक ११.९.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्याची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली आहे. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपूर्ण माहिती व उशिरा दिली या कारणाकरिता द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २०.६.२००६ च्या अर्जात मागितलेली माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरची माहिती ही गट विकास अधिकारी तसेच ग्राम पंचायत, भानसुली, तालुका चिमूर यांचे स्तरावरील दिसून येते व त्यामुळे दिनांक १५.७.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी श्री. लांजेवार,

ग्रामसेवक, गट ग्राम पंचायत, भांसुली यांना मुद्या क्रमांक ८ व ९ बद्यल माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्र दिलेले दिसते. तसेच संबंधित विभागाकडून माहिती अप्राप्त आहे त्याकरिता १५ दिवसाची मुदत सुध्दा वाढवून घेतलेली दिसते. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांना काही माहिती उपलब्ध करुन दिली व जी अप्राप्त होती ती प्रथम अपीलाचे सुनावणी नंतर दिनांक ११.९.२००६ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व्यापक व विस्तृत स्वरुपाची माहिती असल्यामुळे व संबंधित कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यामुळे व मुदत वाढवून मागितलेली असल्यामुळे विलंबाचा मुद्या हा निकाली निघतो. अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती या संदर्भात अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा जोडलेला नाही व त्यामुळे सदरचा मुद्या सुध्दा निकाली निघतो. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २३.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४००/२००७ व अपील क्रमांक ४०१/२००७.**

श्री. विलास वामनराव लाहोटे,
बी-३/११२, बजरंग कॉम्प्लेक्स,
सिरसपेठ, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
विशेष पोलीस महानिरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,
मधू इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला,
पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी,
मुंबई-१३.

श्री. व्ही.एम.देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २३.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी म्हणून श्री. व्हि.एम.देशमुख, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ४००/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकारी यांना अर्जदाराने त्यांचे विरुध्द तपास संबंधाने असल्याने या प्रकरणात प्राथमिक चौकशी पूर्ण झालेली आहे काय ? झाली असल्यास अशी प्राथमिक चौकशी कोणत्या दिवशी, तारीख, महिना व वर्षी पूर्ण करण्यात

आली ?  याबाबत त्यांनी माहिती मागितली होती.  अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२००६ च्या पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी तपास दिनांक १.११.२००६ रोजी पूर्ण झाला असल्याचे कळविले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते.  प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये सदचे उत्तर योग्य असल्याचे मत देऊन अपील फेटाळण्यात आले होते व त्याविरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.  अपीलकर्ता यांच्या प्रकरणामध्ये सन २००१ मध्येच तपास पूर्ण झाला असे कळविले असल्यामुळे तसेच मा.विशेष न्यायालयामध्ये सुध्दा आरोपपत्र दाखल झाले असल्यामुळे अपीलकर्ता यांना अखेर तपास अहवालाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

३.	अपील क्रमांक ४०१/२००७ मध्ये अपीलकर्ता व त्यांचे कुटुंबीय यांचे नावे बँकेत व पोस्टात तसेच इतरही एफ.डी.आर. द्वारे असलेल्या मुदत ठेवीबाबत सन २००१ पर्यंत व्याजापोटी मिळालेली रक्कमेची माहिती मागितलेली होती.  परंतु सदरची माहिती ही दिनांक १.११.२००६ च्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (ज) नुसार नाकारली होती.  तसेच गुन्हयाचे तपासकामी  कागदपत्रे जप्त असल्याने मा.विशेष न्यायालयाकडे कागदपत्रे मिळण्याकरिता अर्ज करु शकता असे अपीलकर्ता यांना कळविले होते व तोच निर्णय हा प्रथम अपीलामध्ये कायम ठेवण्यात आलेला दिसतो.

४.	अपीलकर्ता यांच्या विरुध्द जो गुन्हा नोंदविला आहे त्या गुन्हयाच्या तपास पूर्ण झाला आहे. मा.विशेष न्यायालयास आरोपपत्र दाखल झाले आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना बँकेत व पोष्टामध्ये ठेवीच्या जमलेल्या व्याजाची माहिती ही उपलब्ध करुन देण्याची कोणत्याही प्रकारची अडचण असू नये व त्याकरिता माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सर्व मुळ कागदपत्रे ही न्यायालयात दाखल  झाली आहेत व त्यांच्या कार्यालयात छायांकित प्रती आहेत.  छायांकित प्रतीवरुन छायांकित प्रती देता येणार नाहीत.  आरोपपत्रासोबत जो मुळ कागदपत्रांचा संच दाखल केलेला आहे व अपीलकर्ता यांनी घेतल्याचीत्यांना संपूर्ण कागदपत्रांची माहिती होईल असे माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला.  परंतु अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्या कागदपत्रांचा संच अपूर्ण असल्याने तो घेतला नाही.  मा.विशेष न्यायालयामध्ये आरोपपत्र सादर झाल्यानंतर आरोपपत्र अनेक गुन्हांच्या संदर्भातील सर्व कागदपत्रे आरोपीस उपलब्ध करुन दिली जातात.

परंतु अपीलकर्ता यांनी कागदपत्रे घेतलेली नसल्याने त्यांना माहितीच्या अधिकारातच ही माहिती त्यांना हवी आहे असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, मा. न्यायालयाकडे दाखल झालेल्या छायांकित प्रती हया जनमाहिती अधिकारी म्हणून उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत. अर्थात उपलब्ध करुन द्यावयाची असल्यास न्यायालयात अर्ज करावे लागतील व मा. न्यायालयाने परवानगी दिली असल्यासच सदरची कागदपत्रांची छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येतील त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी मा.न्यायालयामध्ये बॅंकेतील व पोष्टातील ठेवीच्या व्याजाच्या जमलेल्या रक्कमेच्या संदर्भामध्ये कागदपत्रांच्या छायांकिंत प्रती उपलब्ध करुन देण्याकरिता माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी अर्ज करुन मा.न्यायालयाने परवानगी दिल्यास बॅंकेतील व पोष्टातील ठेवीच्या संदर्भामध्ये जमा झालेल्या रक्कमेची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४००/२००७ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ११.९.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने अखेर तपास अहवालाची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावा.

२) अपील क्रमांक ४००१/२००७ मध्ये अपीलकर्ता यांच्या व कुटुंबाच्या नावाने असलेल्या बॅंकेत व पोष्टात असलेली मुदत ठेवी बाबत व्याजापोटी जमा झालेली रक्कमेची माहिती ही जनमाहिती अधिकारी यांनी मा.न्यायालयाकडून उपलब्ध करुन देण्याकरिता अर्ज करुन मा.न्यायालयाने परवानगी दिल्यास त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २३.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६८८/२००७.**

श्री. राधेश्याम मंगलचंद अग्रवाल,
मनोहर चौक,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सी.बी.म्हात्रे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपसचिव,
सामान्य प्रशासन विभाग, (का. १८),
मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. वि. रा. घडेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
सामान्य प्रशासन विभाग, (का. १८),
मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अवर सचिव/ अपर मुख्य सचिव, मुख्य सचिवाचे कार्यालय यांचेकडे त्यांनी दिनांक १३.१.२००६ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना दिलेल्या अर्जाचे संदर्भात कार्यवाहीची माहिती व इतर विभागात दिलेली अर्ज विषयी महाराष्ट्र राज्याचे मंत्रालयाचे कार्यालयात भयंकर बेरितसर अत्यवस्था असुन शासकीय सेवा शर्तीचे विरुद कार्य होत असल्याने त्यांना दुरुस्त करुन संबंधितांचे विरुध्द दक्षता घेऊन कार्यवाही करणेबाबत. या अर्जामध्ये १ ते १०

मुद्यांना धरुन अर्ज मुख्य सचिव आणि इतर संबंधितांना देण्यात आली असून त्यावर काय काय कार्यवाही करण्यात आली आहे त्याची संपूर्ण कार्यवाहीची एक सत्यप्रतीची माहिती पुरविणेबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.३.२००७ (दिनांक २.३.२००७) रोजी अपीलकर्ता यांना १० मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक ४.४.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला असून उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत आपल्या काही शंका असल्यास, तसेच आपण आणखी काही सुचवू इच्छित असाल तर आपण स्वतः येऊन या संबंधिची चर्चा केल्यास आपणास योग्य ते मार्गदर्शन करण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १३.२.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या दिनांक १३.२.२००७ च्या अर्जावर ज्या काही टिप्पण्या झाल्या असतील त्या सर्व टिप्पण्यांची छायांकित प्रत त्यांना अपेक्षित आहे. तसेच कार्यवाहीच्या संदर्भामध्ये ज्या ज्या विभागाच्या संदर्भामध्ये पत्रव्यवहार झाला असेल त्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपेक्षित आहेत किंवा कार्यवाही होऊन जे आदेश किंवा परिपत्रके काढली असतील त्याबाबतच्या छायांकित प्रती अपेक्षित आहेत. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये दिनांक १.३.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे ते बेवारस माहिती उपलब्ध आहे. जी बेवारस माहिती उपलब्ध आहे ती पुन्हा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. दिनांक २९.७.२००६ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व त्याबरोबर इतरही माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दिनांक २.३.२००७ च्या उत्तरामध्ये इतरही प्रत्येक मुद्यांच्या संदर्भामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे जो पत्र व्यवहार केलेला आहे त्या पत्रव्यवहाराची छायांकित प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जनमाहिती अधिकारी यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे अभिप्राय

येतील अशा प्रकारच्या प्रश्न उत्तरे अपेक्षित नाहीत. जनमाहिती अधिकारी हे सार्वजनिक प्राधिकरणातील त्या त्या स्तरावरील उपलब्ध असलेल्या माहितीचे उदा.:- अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे इत्यादीचे परिरक्षक आहेत व त्यामुळे निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे अभिप्राय हे जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित नाही. तसेच कोणत्याही प्रकारची माहिती ही उपलब्ध असलेली कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज इत्यादीमधून माहिती तयार करुन देणे सुध्दा अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.२.२००७ च्या अर्जाचे संदर्भामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे पत्रव्यवहाराचे संदर्भामध्ये किंवा परिपत्रकांचे संदर्भामध्ये किंवा शासन निर्णयाचे माध्यमातून जी कार्यवाही झाली असेल त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.२.२००७ च्या अर्जामध्ये उल्लेख केलेल्या दिनांक १३.१.२००६ च्या संबंधी झालेली कार्यवाहीची (पत्रव्यवहाराची, आदेशाची) छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २५.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६९१/२००७.**

श्रीमती लिलाबाई गोवर्धन ब्राम्हणे,
३, उर्वेला कॉलनी, वर्धा रोड,
नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. पी.एल.कडू,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अधिक्षक अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

श्री. एस. यु. देव,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २५.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगा क्डे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती यांच्या तर्फे श्री.गोवर्धनदास पैकाजी ब्राम्हणे हे हजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १५.५.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) Information in respect of my plot No.६ in layout No.२ of Jai Durga Co-Op.H.S. Ltd (५७२ layout). २) From June २००४ to date. ३) This plot was reserved for D.P.Reservation of १८ Mtr. Rd. and Market vide N.I.T.s memo No.BE/W/१४४/२३४, dated २९.४.२००२ I want to

... २

know if this plot was since been dereserved and if so, I want to know the No. and date of the orders ----- dereserving the plot from the D.P. Reservation. सदरची माहिती पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. माहितीच्या अर्जाप्रमाणे दिनांक २६.५.२००६ रोजी जयदुर्गा को.ऑप.हौसिंग सोसायटी, खसरा क्र. ७१/१ ख, मौजा सोमलवाडा मधील भुखंड क्र. ६ चे नियमितीकरण पत्र दिनांक २४.३.२००६ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे. संबंधित दस्ताऐवज आपणास देण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासकडे उपलब्ध आहेत. त्यासाठी आपण नागपूर सुधार प्रन्यासच्या मुख्यालयातील (स्टेशन रोड, सदर, नागपूर-१) रोख विभागांत रक्कम रुपये १०/- पंधरा दिवसाचे आंत जमा करावे व रक्कम जमा केल्याची प्रत या कार्यालयाला उपलब्ध करुन द्यावी व दस्तावेज घेवून जावेत असे कळविलेले दिसून येते. त्यावर दिनांक २६.६.२००६ रोजी अपीलकर्ती यांनी आक्षेप घेणारे एक पत्र सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना दिलेले दिसून येते. त्यावर दिनांक १९.७.२००६ रोजी विषयांकित अभिन्यासामधील मंजूर नागपूर शहर विकास योजनेतील मार्केटचे आरक्षण गुंठेवारी अधिनियमांतर्गत दिनांक १९.७.२००३ ला वगळण्यांत आलेले आहे. दिनांक २४.३.२००६ रोजी निर्गमित केलेल्या नियमितीकरण पत्रानुसार उक्त भुखंडक १८.०० मीटर रुंद डी.पी.रस्त्याचे बाधित होत नाही असे अधिक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी श्रीमती लिलाबाई गोवर्धन ब्राम्हणे यांना दिलेले दिसून येते. दिनांक २१.७.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयाचे संदर्भामध्ये दिनांक ३०.८.२००६ रोजी अधिक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी अपीलकर्ती यांना खसरा क्रमांक ७१/१ ख, मौजा सोमलवाडा मधून जाणारा १८.०० मी. डी.पी. रोड वगळण्यात आलेला नाही. खसरा क्रमांक ७१/१ ख, मौजा सोमलवाडा जयदुर्गा को.ऑप.हौसिंग सोसायटी मधील भुखंडक क्रमांक ६ हा १८.०० मी. रुंद डी.पी. रोडने बाधित होत नाही असे अपीलकर्ती यांना कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २०.१०.२००६ रोजी अपीलकर्ती यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानुसार दिनांक २१.१२.२००६ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयामध्ये पुन्हा मागील सर्व विषयांचे विवेचन केलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २६.१२.२००६ रोजी तसेच दिनांक ५.२.२००७ रोजी अपीलकर्ती यांनी सभापती तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो. त्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ती यांना दिनांक ९.१०.२००६ च्या संदर्भात दिनांक १६.११.२००६ रोजी संदर्भीत नस्तीची पाहणी

केलेली आहे असे दिसून येते. परंतु पाहणीतून सुध्दा त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. वास्तविक पाहता त्यांनी माहितीचा अर्ज दाखल केल्यानंतर त्यांना माहितीचा खर्च रुपये १०/- चा भरणा करण्यात यावा असे कळविलेले होते. परंतु अपीलकर्ती यांनी रुपये १०/- चा भरणा केलेला दिसत नाही. तरी सुध्दा त्यांना दिनांक १९.७.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. माहिती उपलब्ध करुन देतांना नस्तीमधून माहिती काढून उत्तर देणे अपेक्षित नसते व त्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही किंवा त्यातून पुन्हा विश्लेषण करुन प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल केले जाते. त्यापेक्षा जी माहिती मागितली आहे त्याबद्यलच्या कागदपत्रांची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिल्यास पुढील सर्व प्रश्न टाळता आले असते व त्याप्रमाणे या प्रकरणात सुध्दा ज्या भुखंडाचे संदर्भामध्ये वगळण्याचे आदेश झाले आहेत त्या आदेशाची, नकाशाची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिली असती तर पुढील प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करावे लागले नसते. त्यामुळे नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्या दिनांक २९.३.२००३ (१८.३.२००३) च्या नोटशिट वरील आदेश तसेच प्रत्यक्ष आदेशाची रुपांतरीत केलेल्या आदेशाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेल्या भुखंडास वगळणाऱ्या तारखेची माहिती उपलब्ध होईल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना खसरा क्रमांक ७१/१ ख, मौजा सोमलवाडा, जयदुर्गा को-ऑप. हौसिंग सोसायटीच्या संदर्भात डी.पी.रोडशी बाधीत येत नाही हा निर्णयाचे सदर्भामध्ये सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्या दिनांक १८/१९.३.२००३ च्या नोट शिटची छायांकित प्रत तसेच दिनांक १३.४.२००५ च्या आदेशाची छायांकित प्रत व सोबत आदेशात उल्लेख केलेल्या नकाशाची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २५.६.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६९४/२००७.**

श्री. चंदु शंकरराव चिंचोळकर
रा.विठ्ठल मंदीर वार्ड,
देशकर वकील यांचे घराजवळ,
ता.जि. चंद्रपूर ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
अवसायक,
महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंक मर्या.
१५-ए, मोरवी लेन, चौपाटी,
मुंबई - ४०० ००७.

श्री. वा. कि.धिखंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्येशीय विकास बॅंक मर्या.
१५-ए, मोरवी लेन, चौपाटी,
मुंबई - ४०० ००७. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाक्डे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्त्ता विनाअनुमतीने गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी प्रधान सचिव तथा माहिती अधिकारी सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) शासन पत्र क्र सहकार व

वस्त्रोद्योग विभाग क्रमांक एलडीबी-१०९९/प्र.क्र.३७/७ सी, दिनांक ११.९.२००१ व सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र क्र. अर्थ-१/म.रा.कृव ग्रा.वि.बँक/विभाजन/२००१, दिनांक २० सप्टेंबर, २००१ नुसार महाराष्ट्रातील भूविकास बँकेचे जिल्हावार विभाजन करुन दिनांक १.१०.२००१ पासून चंद्रपूर जिल्हा भूविकास बँकेचेही स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. परंतु जिल्हावार विभाजन करते वेळी चंद्रपूर जिल्हा भूविकास बँकेची कर्ज येणे बाकी रक्कम रुपये ८३९.०६ (लाख) होती व कार्यरत कर्मचारी वर्ग एकूण १२३ होता. चंद्रपूर जिल्हा भूविकास राज्य पातळीवर एकसंघ असतांनाच व्यवस्थापन खर्च व इतर देणी भागविणे अशक्य बाब असतांना, जिल्हा बँकेचे विभाजन करुन कार्यरत कर्मचाऱ्यांचा बोझा, अत्यल्प कर्ज येणे बाकी व लादल्या गेलेला तोटा ही सर्व परिस्थिती असतांना कशाच्या आधारावर विभाजनाची कारवाई ठरविण्यांत आली. ती ठरवितांना चंद्रपूर जिल्हा भूविकास बँकेच्या परिस्थितीचा विचार करण्यात आला होता का ? जर वरील परिस्थितीचा विचार करण्यांत आला नसल्यास त्याला जबाबदार कोण ? जबाबदारी स्विकारणाऱ्यांवर महाराष्ट्र शासनाकडे संबंधितांवर कारवाईची तरतुद आहे का ? २) चंद्रपूर जिल्हा भूविकास बँकेची परिस्थिती नसतांना होणाऱ्या १००% वसूलीच्या ७०% वसूलीची रक्कम शिखर भुविकास बँक, मुंबईस वर्ग करणे व ३०% रकमेत चंद्रपूर जिल्हयांचा व्यवस्थापन खर्च व इतर देणी भागविणे. सदरची जबाबदारी व निकस कोणत्या आधारावर ठरविण्यांत आला. चंद्रपूर जिल्हा बँकेच्या परिस्थितीचा विचार केल्यांस ही बाब योग्य आहे का ? नसल्यांस त्याला जबाबदार कोण ? ३) चंद्रपूर जिल्हा भुविकास बँकेचा संपूर्ण कर्मचारी वर्ग एकत्रित राज्यसंघ भुविकास बँकेच्या ध्येय धोरणानुसार नियुक्त झालेला होता. मात्र विभाजनाचे वेळी चंद्रपूर जिल्हा भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांना विश्वासात न घेता कोणत्या नियमान्वये त्यांचे जिल्हा पातळीवर चंद्रपूर मुख्यालय ठरविण्यांत आले. त्यांची भविष्यातील उर्वरित सेवा कालावधीचा सकारात्मक विचार केला होता का ? सदरची कार्यवाही योग्य आहे का ? नसल्यांस जबाबदार कोण ? ४) चंद्रपूर जिल्हा भुविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांवर आजतागायत बिकट कठीण परिस्थिती येवून कार्यरत कर्मचाऱ्यांचे १३ महिन्यांचे मासिक पगार व २३ नियमित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युईटी व रजेचा पगार चंद्रपूर जिल्हा बँकेच्या बिकट परिस्थितीमुळे मिळालेला नाही. सदरची रक्कम देण्यांची जबाबदारी कोणाची ? जबाबदारी स्विकारणाऱ्याने सदरची रक्कम किती कालावधीमध्ये नियमाप्रमाणे कर्मचाऱ्यांना अदा करावयांस पाहिजे, न केल्यांस महाराष्ट्र शासनाची

दोषींवर कारवाईची तरतुद आहे का ? ५) चंद्रपूर जिल्हा बँकेच्या अशा बिकट परिस्थितीमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांनी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग स्विकारणे योग्य राहिल का ? असल्यास परवानगी द्यावी, नसल्यास पगाराची रक्कम व ग्रॅच्युईटीची रक्कम प्राप्त करुन घेण्यांचा मार्ग कळवावा. तसेच अपीलीय अधिकारी यांचे नांव व हुद्या कळविण्यांची कृपा करावी. वरील ५ ही मुद्यांवर विस्तृत सविस्तर माहिती लेखी स्वरुपात माहितीच्या अधिकारात कळविण्याची कृपा करावी. माहितीचा कालावधी सन २००१ दिलेला असून माहिती रजिस्टर्ड पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना रजिस्टर पोष्टाने जा.क्र. अर्थ/मा.अ./०७-०८/२९१ नुसार माहिती अधिकारी यांनी एकूण ५ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांना दिनांक १२.३.२००७ रोजी श्री.बी.बी.शेळके, अवसायक तथा अपीलीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्येशीय विकास बँक मर्या. शिखर बँक, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना दिलेला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे व अपील फेटाळण्यात येत आहे. पुन्हा चंद्रपूर जिल्हा सहकारी कृषि बहु. विकास बँक, चंद्रपूर हीची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यान्वये झालेली आहे व त्याबाबतची अधिसुचनेची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.२.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने त्यांनी माहिती ही प्रधान सचिव तथा माहिती अधिकारी, सहकार विभाग यांच्याकडे मागितली होती. परंतु सदरची माहिती ही महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्येशीय विकास बँक मर्या. मुंबई या शिखर बँकेच्या संदर्भात असल्यामुळे आपला अर्ज पुढील त्या कार्यवाहीसाठी व आपणास आवश्यक असलेली माहिती मिळण्यास्तव अवसायक, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्येशीय विकास बँक मर्या. मुंबई यांचे कार्यालयाकडे तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे. याबाबतचा पुढील पत्रव्यवहार तसेच संपर्क कृपया परस्पर या दोन कार्यालयाशी करावा असे कळविलेले दिसते व त्याप्रमाणे दिनांक

९.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे प्रथम अपील व द्वितीय अपील मेमोचे अवलोकन केले असता तसेच माहितीच्या अर्जातील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अभिप्रायात्मक प्रश्नाचे स्वरुपात आहे. अपीलकर्ता यांना कागदपत्रे, अभिप्राय किंवा दस्तऐवजाचे स्वरुपात किंवा परिपत्रक, शासन निर्णय या स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याचे स्वरुपात माहिती उपलब्ध असेल उदा.:- कागदपत्रे, दस्तऐवज, अभिलेख, परिपत्रक, शासन निर्णय इत्यादी च्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कारणमिमांसा विचारणारे प्रश्न ज्यातून जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील असे विचारता येत नाही व अशा प्रकारेच अपीलकर्ता यांनी सर्व प्रश्न माहितीच्या अर्जात, प्रथम अपीलात व द्वितीय अपीलात उपस्थित केलेले दिसून येतात व त्यामुळेच अपीलकर्ता यांना दिनांक ९.३.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे जे प्रश्न त्यांनी उपस्थित केलेले आहेत तेच प्रश्न त्यांनी स्वतंत्रपणे शासनाकडे किंवा सक्षम अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन त्यांच्या तक्रारीचे त्यांना निवारण करुन घेता येईल. माहितीच्या अधिकारामध्ये कोणत्याही तक्रारीचे निवारण होत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २६.६.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६९६/२००७.**

श्री. सुभाष दौलतराव पांडव
प्लॉट नं. ५ अ, (स्विटी गॅरेज जवळ),
शुक्लानगर, हावरापेठ जवळ,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
सहकार भवन, हिंदुस्थान कॉलनी,
अमरावती रोड, नागपूर.

श्री. चैतन्य नासरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
सहकार भवन, हिंदुस्थान कॉलनी,
अमरावती रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री.आर.एन.वसु, सहाय्यक निबंधक हे हजर असून माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, नागपूर तालुका नागपूर यांचेकडे नागपूर फेब्रिकोर्स कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. एल-२,

... २

एम.आय.डी.सी. हिंगणा रोड, नागपूर या संस्थेने माझ्या पैशाचा हिशोब व पैसे दिले नाही. आपले कार्यालयात अनेक पत्रे देऊनही मला मदत केली नाही. संस्थेला वकीलाने नोटीस दिला. त्याची प्रत आपल्या कार्यालयात माहिती करिता व कार्यवाहीकरिता दिली. पण व्यर्थ शेवटी मला न्यायालयात जावे लागले. तसा आपणही सल्ला दिला होता. न्यायालयात काही माहिती व साक्षांकित कागदपत्रे देणे जरुरीचे आहे. मला हवी असलेली माहिती व त्यांचे वर्णन १) श्री. सातघरे साहेब यांनी दिनांक ७.४.२००३ ला कंपनीत येऊन संस्थेच्या व्यवहाराबाबत केलेल्या चौकशीच्या अहवालाची साक्षांकित प्रत. २) शक्य असल्यास रिझर्व फंड वाटण्याबाबत संस्थेच्या कार्यकारीणी तारीख २८.१०.२००२ ला आपल्या कार्यालयात दिलेल्या ठरावाची साक्षांकित प्रत. ३) शक्य असल्यास सभासदाचे शिष्टमंडळ रिझर्व फंड वाटण्याबाबत आले असल्यास व त्यांनी दिलेल्या अर्जाची प्रत. सदरची माहिती रजिस्टर पोष्टाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे दिनांक २८.१२.२००६ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना तीन मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २.३.२००७ रोजी अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.३.२००७ रोजी देण्यात आला असून गैरअपीलार्थी यांनी अपीलार्थी यांचे अपीलान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करण्यात यावी अशा आदेश दिलेला दिसतो. त्यानंतर पुन्हा दिनांक १०.५.२००७ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी. याबद्यलचे पत्र दिलेले दिसून येते. त्यावरुन दिनांक १४.५.२००७ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका नागपूर यांनी अपीलकर्ता यांना आपणास आवश्यक असलेली व कार्यालयीन रेकॉर्डमध्ये उपलब्ध असलेली माहिती आपणास या कार्यालयाने उपलब्ध करुन दिली आहे. परंतु प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये संपूर्ण माहिती पुरविण्याबाबत कार्यालयाने आदेशीत केल्यामुळे या कार्यालयाने आपणास संपूर्ण माहिती पुरविली आहे. परंतु याबाबत आपले समाधान न झाल्यामुळे आपणास सुचित करण्यात येते की, या कार्यालयात कार्यालयीन वेळेत आपण स्वत: उपस्थित राहून कार्यालयात उपलब्ध

असलेली संपूर्ण माहिती आपणास पाहणीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल व आपणास आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसते. मात्र तसे न करता अपीलकर्ता यांनी मात्र राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे. ते वर नमुद केल्याप्रमाणेच आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा खुलासा दाखल केलेला आहे तो वर नमुद केल्या प्रमाणेच आहे. जनमाहिती अधिकारी यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, संस्था ही अवसायात निघालेली आहे. पूर्वी श्री.शिंदे हे या संस्थेचे सचिव होते व अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीकरिता श्री.सातघरे यांना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी दिनांक २६.१२.२००६ रोजी मागितलेली माहितीचे संदर्भामध्ये चौकशी करावी असे पत्र दिलेले असल्यामुळे श्री.सातघरे यांनी दिनांक२८.१२.२००६ रोजी नागपूर फेब्रीफोर्ज कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. या संस्थेच्या कार्यालयास भेट दिली होती. मात्र संस्थेचा रेकॉर्ड श्री.शिंदे यांचेकडे अपूर्ण लिहिलेला असल्यामुळे चौकशी अहवाल सादर करण्यात आला नाही असे श्री.सातघरे यांनी कळविले होते. दरम्यान माझी बदली झाल्यामुळे पुढील बाबतीत तपास केला नाही व त्यावंरुनच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारचे उत्तर दिले असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, रिझर्व फंड वाटण्याबाबत संस्थेचा कार्यकारीणी दिनांक २८.१०.२००२ ला सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयात दिलेल्या ठरावाची साक्षांकित प्रत ही त्यांना त्यांच्याकडे उपलब्ध असल्यामुळे दिनांक १.११.२००२ रोजीच्या सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या पत्रावरुनच मागितली आहे. सदरच्या पत्राची छायांकित प्रत अपीलकर्ता यांनी दाखल केलेली आहे. परंतु छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्या छायांकित प्रतीमध्ये त्यावर दिनांक १५.१०.२००० मधील ठराव क्रमांक ५ व संदर्भाकिंत पत्र दिनांक २८.१०.२००२ मध्ये नमुद केले आहे. तसेच रिझर्व फंडाची रक्कम बँकेतून काढण्यास व सभासदांना वाटण्याबाबत या कार्यालयाची परवानगी मागितलेली आहे व त्याचप्रमाणे संस्थेस परवानगी देण्यात आलेली आहे अशा आशयाचे पत्र दिसून येते. सदरच्या पत्राची प्रतिलिपी शाखा व्यवस्थापक, नागपूर जिल्हा मध्यवर्ती अधिकोष मर्यादित यांना पाठविलेली दिसून येते. सदरचे पत्राचे वरुन दिनांक १२.१०.२००६ रोजी ठराव झालेला

आहे असे सकृतदर्शनी दिसून येते. परंतु सदरचे पत्र सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयात उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु जर पत्र उपलब्ध नाही तर हे पत्र कसे आले असे अपीलकर्ता यांचा प्रश्न आहे. त्याकरिता अर्थातच सदरचे पत्राचे संदर्भात जे जावक क्रमांक दिलेला आहे ते त्यावेळेस जावक नोंदवहीतून तपासून पाहणे आवश्यक ठरते व त्यातील जावक क्रमांक व त्याही बाबत जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, संस्थेचा अभिलेख सुध्दा त्यांनी तपासलेला आहे व त्यातही दिनांक १५.१०.२००० रोजी कोणत्याही प्रकारचा ठराव झालेला आहे असे दिसून येत नाही. असे जरी असले तरी अपीलकर्ता यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था या कार्यालयातून किंवा जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या त्या संबंधित अभिलेख्यांची तपासणी व माहिती करुन घेऊन स्वत:ची खात्री करुन घेणे हा एकच मार्ग आहे व त्यावरुनच दिनांक १५.१०.२००० चे पत्र व ठरावाबाबत हे स्पष्टता होऊ शकेल. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००७ चे पत्राप्रमाणे त्यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, नागपूर यांच्या दिनांक १४.५.२००७ चे पत्राप्रमाणे नागपूर फेब्रिफोर्ज कर्मचारी सहकारी पत संस्था या संस्थेचे अभिलेखाचे किंवा मासिक सभेची नोंदवहीची पाहणी करुन तसेच दिनांक १.११.२००६ च्या जावक क्रमांकाची नोंद वहीचे निरिक्षण करुन सदरच्या पत्राची माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांनी कार्यालयीन वेळे प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी तारीख व वेळ कळवावी व त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. माहिती उपलब्ध असल्यास माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच माहिती उपलब्ध झाल्यास पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक :- २६.६.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३१२/२००७.**

श्री. बजरंगीचरण आदिनारायण ओझा
मु.पो.दिग्रस, जि. यवतमाळ ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ना. उ. रौराळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपसचिव,
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.

श्री. सुरेश पेडगांवकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई- ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाक्डे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मा. सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक २५.४.२००५ क्रमांक ९१३५/०५, शिक्षण उपसंचालक, अमरावती का कक्ष अधिकारी के नाम दिये है थकीत अनुदान मिलनेबाबत. माहितीचा कालावधी सन १९९७-९८, १९९८-९९, १९९९-२००० असा दिलेला

... २

आहे. आवश्यक माहितीचे वर्णन १) श्री.पुरुषोत्तम टंडन हिंदी प्राथमिक शाळा, दारव्हा, जि.यवतमाळ को शासन की मान्यता सन १९९१ मे मिली है अनेक निवेदन देणे शाला अनुदान की सभा अट पूर्ण करने पर भी अनुदान दिया नही. २) वैसेही यवतमाळ जिलेके अन्य स्कूल (१) श्री. वाबनाजी महाराज प्राथमिक शाला डेहणी (दिग्रस) व (२) सरस्वती विद्या मंदीर मुकुटबन, जि. यवतमाळ को शिक्षण विभागने १०० % अनुदान सन १९९७-९८ मे मंजूर किया लेकीन हमारे पुरुषोत्तमदास टंडन हिंदी राष्ट्रभाषी स्कूल, दारव्हा को हेतु पुरस्कर अनुदान मंजूर नही किया जब सन १९९८ मे मामला मा.उच्च न्यायालय मे दायर किया. अनुदान देने की बात कहकर शिक्षण विभागने हमे केस वापस लेनेको लगाये. मामला याचिका क्रमांक २४४५/९८ वापस लेनेपर शासन का हवाला देकर शिक्षण उपसंचालक, अमरावतीने पत्र क्रमांक ४०१६६/२०००, दिनांक १७/१८ नोव्हेंबर, २००० को पत्र देकर सन २०००/२००१ से १०० % अनुदान देने व मागील १९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२००० तीन वर्ष का थकबाकी देना नाही ऐसा पत्र/आदेश दिया ऐसा अन्याय क्यौ ? जब यवतमाळ जिले के (१) बाबनाजी महाराज प्राथमिक शाळा, डेहणी (दिग्रस) (२) सरस्वती विद्या मंदीर मुकुटबन को ९७ से अनुदान दे रहे थे. हमारे स्कूल को पात्र रहते भी अनुदान क्यौ नही दिया जारहा है जानकारी दे चौकशी करे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १०.३.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडे वर नमुद केल्याप्रमाणेच जोडपत्र ब मध्ये माहिती मागितलेली दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक १७.५.२००६ रोजी जोडपत्र ब मध्ये शिक्षण मंत्र्यांचे माहिती अधिकारी, उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, माहिती अधिकारी अशा प्रकारे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १८.१.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना दिनांक २२.२.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी जावक क्रमांक ममाअ २१०६/(१५४/०६)/प्राशि ३, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई यांचे कक्ष अधिकारी श्री. भि.य.मंता यांनी अपीलकर्ता यांना आपल्या संस्थेच्या हिंदी प्राथमिक शाळा,

दारव्हा, जिल्हा यवतमाळ या प्राथमिक शाळेस अनुदान मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे असे कळविले होते म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सदरचे पत्र मिळाले नाही. अपीलकर्ता यांनी मुख्य सचिवांकडे दिनांक १०.३.२००६ रोजी जोडपत्र ब मध्ये प्रथम अपील दाखल केले होते. त्या अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक २२.३.२००६ रोजी अवर सचिव तथा माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय श्री. प्र. ल. पाठक यांनी मुख्य सचिव हे अपीलीय अधिकारी नाहीत व अपीलीय प्राधिकारी हे उपसचिव, शालेय शिक्षण विभाग आहेत. त्यांचेकडे अपील दाखल करावे असे पत्राने कळविलेले दिसून यते व ते पत्र मात्र त्यांना मिळालेले आहे. तसेच त्यांच्या दिनांक १७.५.२००६ चे जोडपत्र ब प्रमाणे दिनांक २३.६.२००६ रोजी वरील विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त शाळेस अनुदान मंजूर करण्याबाबतची बाब तपासून पाहण्यात येत आहे असे कळविण्यात आले आहे व सदरच्या पत्राची प्रत त्यांना मिळालेली दिसते. त्यावरुन अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या दिनांक १८.१.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने विचारणा केलेली माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना उत्तर हे विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेले आहे. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सन १९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२००० या वर्षाकरिता इतर शाळांना जे अनुदान मिळाले आहे तसेच थकीत अनुदान त्यांच्या शाळांनापण त्यांनी उपलब्ध करुन द्यावे अशी त्यांची मागणी आहे व त्याकरिता पूर्वी त्यांनी याचिका दाखल केलेली होती ती याचिका मागे घेण्याच्या अटीवर त्यांना अनुदान देऊ असे मान्य केले व ते अजून मिळाले नाही. ते मिळावे अशी त्यांची माहितीच्या अधिकाराचे माध्यमातून मागणी केली आहे. अशा प्रकारची माहिती मागणे जरी मागता येत नसेल तरी जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले त्यांना पुढील वर्षाकरिता १०० % अनुदान हे मिळाले आहे परंतु शासन निर्णयाप्रमाणे त्यांना सन १९९७ ते २००० या कालावधीचे अनुदानाबाबत विचाराधीन आहे असे कळविलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याचे स्वरुपात उदा. :- अभिलेख, दस्तऐवज, परिपत्रके, शासन निर्णय इत्यादी स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीची छायांकित प्रत उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकारच्या निर्णय प्रक्रियेतील कार्यवाही ही अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १८.१.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दिनांक १७.५.२००६ च्या प्रमाणे अपीलाचा निर्णय सुध्दा दिनांक २३.६.२००६ रोजी देण्यात आलेला असून तो योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या सन १९९७ ते २००० या कालावधीतील अनुदानाचे संदर्भामध्ये स्वतंत्रपणे शासनाकडे किंवा मा. उच्च न्यायालयाकडे अर्ज करुन निर्णय मिळवून घेता येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २७.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७०२/२००७.**

श्री. गिरीश सेता,
मु.शिवाजी चौक,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपआयुक्त, (सा.प्र.),
नगरपालिका प्रशासन,
विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.

श्री. जी.एस.पवार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, दारव्हा,
जिल्हा यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २७.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००७ रोजी मा.लोक आयुक्त, मुंबई यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतु लोकआयुक्त कार्यालयातील कक्ष अधिकारी यांनी सदरच्या अपीलाचे संदर्भात मा.लोकआयुक्त हे अपीलीय अधिकारी नसुन राज्य माहिती आयोगाक्डे अपील दाखल करता येईल असे कळविलेले असून राज्य माहिती आयोग यांचा पत्ता दिलेला आहे व त्या पत्रासहित अपील हे दिनांक ८.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे पाठविण्यात आलेले दिसते. मात्र तांत्रिकदृष्टया राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले नाही असे असले तरी सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २७.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री.एच.एस.सरोदे, तहसीलदार हे हजर असून कागदपत्रे दाखल केलेली आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२.    अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये दिनांक ६.१.२००७ तसेच दिनांक ९.१.२००७ रोजी दोन अर्ज माहिती मागण्याचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु अधिनियमाचे ६(१), १९(१) व १९(३) अन्वये अनुक्रमे माहितीचा अर्ज त्या निर्णया विरुध्द प्रथम अपील व त्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील असे बरोबर आहे. त्यात माहिती देण्याकरिता व अपील दाखल करण्याकरिता मुदत देण्यात आलेली आहे. त्यामुळे दोन वेगवेगळया तारखांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये एकच द्वितीय अपील हे दाखल होऊ शकत नाही व त्याकरिता अपीलकर्ता यांना त्यांच्या कोणत्या अर्जाचे संदर्भामध्ये सुनावणी घ्यावी असे विचारले. त्याबाबत त्यांनी दिनांक ९.१.२००७ च्या अर्जाच्या संदर्भात सुनावणी घ्यावी असे सांगितले. त्या अर्जामध्ये खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. "शासकीय व न्यायप्रविष्ट जागेवरील आपल्या परवानगी शिवाय होत असलेल्या बांधकामाबाबत आपले पत्र क्र. २८५, दिनांक २७.११.२००६ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे अंतर्गत अध्यक्ष, औद्योगिक सहकारी महिला मंडळ, दारव्हा व अध्यक्ष नगर वाचनालय, दारव्हा यांचेवर आपला आदेश देऊन सुध्दा बांधकाम बंद न केल्यामुळे व जागा पूर्ववत जशी होती तशी न केल्यामुळे काय कार्यवाही केली याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार सविस्तर माहिती द्यावी". सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.१.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी, दारव्हा यांना अपीलकर्ता यांच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयातील पत्र दिनांक १८.११.२००६ व दिनांक २२.१२.२००६ च्या संदर्भामध्ये मुख्याधिकारी, नगरपरिषद, दारव्हा यांनी दिनांक १४.११.२००६ ला माहितीचा अधिकारात दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन अर्जाचा निपटारा करण्याविषयी अहवाल सादर केलेला आहे व त्या अहवालाची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली आहे. अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.१.२००६ चा अर्ज व दिनांक १४.११.२००६ चा अर्ज हया दोनही अर्जातील माहिती ही एकच विषयाचे संबंधात आहे असे दिसून येते. त्यामुळे त्याबाबत एकत्रित चौकशी केलेली दिसून येते व म्हणूनच त्यांना दिनांक १२.१.२००७ ची प्रतिलिपी दिलेली दिसून येते. सदरच्या पत्राचे सोबत नगर वाचनालय व संस्थेचे स्पष्टीकरणाचे पत्र सुध्दा दिलेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु सदरच्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे प्रथम अपील दाखल

केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचे प्रपत्र ब ची प्रत ही आयोगाकडे दाखल केलेले दिसून येत नाही. मात्र प्रथम अपीलातील दिनांक ७.४.२००७ च्या आदेशाची प्रत ही दाखल केलेली आहे. सदरचा निर्णय हा अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती पुरविण्यात आलेली असून प्रकरण नस्तीबध्द करण्यात आलेले दिसून येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींना विचारले असता त्यांना नगरपरिषद मार्फत संबंधित माहिती दिनांक ७.४.२००७ च्या पत्रान्वये पुरविण्यात आलेली आहे त्याची प्रत या कार्यालयास सादर केलेली आहे असा निर्णय नमुद केलेला आहे. परंतु सदरच्या निर्णयामध्ये जनमाहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची शिक्षा केली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे (लोक आयुक्तांकडे) द्वितीय अपील दाखल केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. माहिती याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याचे स्वरुपात उदा. अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे, परिपत्रके, शासन निर्णय इत्यादी स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकरणामध्ये निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये कार्यवाही करण्याचे आदेश देण्याचा अधिकार हा राज्य माहिती आयोगाचे अधिकार कक्षेत येत नाही व त्यामुळे माहितीच्या अधिकाराचे अर्जात बांधकाम पूर्ववत करुन देण्याकरिता कोणत्या प्रकारची कार्यवाही केली हे विचारणे व बांधकाम पूर्ववत करुन दिलेले नाही हे विचारणे यात फरक असल्यामुळे अपीलकर्ता यांच्या तक्रारीच्या अर्जाचे अनुषंगाने जी चौकशी केलेली आहे व त्याबाबतची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यातून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचे समजूती प्रमाणे शासकीय जागा असेल व त्यात अवैध बांधकाम केले असेल व त्याकरिता उपलब्ध झालेल्या माहितीचा आधारे त्यांनी स्वतंत्रपणे त्यांनी सक्षम अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल किंवा न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन न्याय मिळवून घेता येईल व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.१.२००७ च्या अर्जाप्रमाणे दिनांक १२.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २७.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७०४/२००७.**

श्री. दिनेश शेषराव पवार,
मु.पो. तोरनाळा (घोटी),
ता. मनोरा, वाशिम. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. चंद्रकांत जाजू,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी,
ता.मगरुळपीर, जि. वाशिम.

श्री. शेख कलाम,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
कारंजा (लाड),
जिल्हा वाशिम. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कारंजा, जि. वाशिम यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे. सरस्वतीबाई गजानन महाजन यांच्या उत्पन्नाच्या दाखल्याची प्रकरणाची प्रमाणित छायाप्रत. माहितीचा कालावधी २००६-२००७. आवश्यक माहितीचे वर्णन १) सरस्वतीबाई गजानन महाजन यांच्या दिनांक ११.१.२००७ च्या उत्पन्नाच्या

... २

दाखल्याची प्रकरणाची प्रमाणित छायाप्रत. २) तुळसाबाई दत्ताराम खाडे, रा.कारंजा MRC ८१-१४४० या जेष्ठ नागरिक ओळखपत्रांच्या प्रकरणाची प्रमाणित छायाप्रत. ३) आजपर्यंत वितरीत जेष्ठ नागरिक ओळखपत्राचा नांव, गांव, जन्मतारीख, MRC क्रमांक कुठल्या दस्तावेजाच्या आधारे जन्मतारीख प्रमाणपत्र दिले या सर्वाचा तपशील. ४) मनोहर किसन मेहरे, कारंजा MRC-६०५, दिनांक ८.९.२००६ च्या उत्पन्नाच्या दाखल्याच्या प्रकरणाची प्रमाणित छायाप्रत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सोबत दारिद्रय रेषेखालीच्या प्रमाणपत्राची छायाप्रत जोडली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १.३.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदार, कारंजा यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये लेखी स्पष्टीकरण हया कार्यालयास स्वतः हजर राहून दाखल करावे असे आदेश दिलेले असून सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना पाठविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २०.३.२००७ रोजी पुन्हा उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर यांनी तहसीलदार, कारंजा यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी सुध्दा दिनांक २.४.२००७ रोजी उपविभागीय दंडाधिकारी, मंगरुळपीर यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २४.४.२००७ रोजी स्मरणपत्र उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर यांनी तहसीलदार, कारंजा यांना दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ३.५.२००७ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २५.५.२००७ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. दिनांक २५.५.२००७ रोजी तीन दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १९.६.२००७ रोजी तहसीलदार, कारंजा यांनी उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

३. वरील घटनाक्रमावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत किंवा प्रथम अपीलाचे आदेशानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. परंतु

विद्यमान जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, ते नवीनच या पदावर बदलून आल्यानंतर आयोगाची दिनांक २३.५.२००८ ची नोटीस मिळाल्यानंतर दिनांक ७.६.२००८ रोजी अपीलकर्ता यांना १३ पृष्ठांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असून श्री.गणेशराव पवार, अपीलकर्त्यांच्या भाऊ यांनी सदरची माहिती स्विकारली आहे अशी पोच सादर केलेली आहे. यावरुन तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार हे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे दोषी आढळून येतात. तसेच त्यावेळेस ज्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सहकार्य घेतले आहे व ज्यांनी विलंब केलेला आहे ते सुध्दा दोषी आढळून येतात व त्या सर्वांची विभागीय चौकशी करणे हे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून संबंधित जनमाहिती अधिकारी तसेच संबंधित कनिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी ज्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला आहे त्यांना सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७०५/२००७.**

श्री. विलास गोपाळराव उप्पलवार,
रा.सत्यनारायण मंदीर वार्ड,
पांढरकवडा, ता. केळापूर,
जि. यवतमाळ. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी.डी.आंधळगांवकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यालयीन अधिक्षक,
(निर्देशन विभाग),
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
शिशुविहार बिल्डींग,
स्टेट बँक चौक, धामणगांव रोड,
यवतमाळ - ४४५ ००१. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, यवतमाळ वनवृत्त, यवतमाळ यांचे कार्यालयात खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. श्री. के.एम. पोहणकर, लिपीक हे पांढरकवडा वनविभागात केंव्हापासून कार्यरत आहे. असल्यास त्यांचे स्थानांतरण सन २००४ मध्ये झाले होते काय, असल्यास आदेशाची सत्यप्रत. स्थानांतरीत जागी रुजू न होण्याचे प्रयोजन तसेच

सन २००५ मध्ये पुन्हा स्थानांतर झाले काय ? असल्यास आदेशाची सत्यप्रत व वरील स्थानांतर आदेशाचे अनुपालन न होण्याचे प्रयोजन काय ? तसेच दोन वेळा बदली होऊनही बदलीचे ठिकाणी रुजू न होण्याबाबत काही शासन निर्णय असल्यास त्याची प्रत व ते पांढरकवडा वनविभागात ज्या शाखेत आहेत ते केंव्हापासून ? सदरची माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाप्रमाणे दिनांक १०.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना झेरॉक्स खर्च अधिक टपाल खर्च रुपये १६/- भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००७ रोजी चलानद्वारे रुपये १६/- भरणा केलेला दिसून येतो व त्यानंतर दिनांक १८.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखन न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. राज्य माहिती आयोगाकडील अपीलामध्ये माहितीच्या बद्यलची ठळक कारणे माहिती देतांना दर्शविण्यात आली नाही त्यामुळे दिनांक १२.४.२००७ च्या माहिती अर्जामधील बदली आदेशाचे पालन कां झाले नाही ? यांची माहिती द्यावी व संबंधित कर्मचाऱ्यांचे आदेशाचे उल्लंघन केले त्या प्रकरणात कां कारवाई करण्यात आली नाही याची माहिती देणे हि विनंती केलेली दिसून येते.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्याने त्यांनी अधिनियम कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपील दाखल करावयाचे असते व प्रथम अपीलाचे निर्णयाचे विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागते. वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलच दाखल केलेले नसल्यामुळे सदरचे राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपील हे सकृतदर्शनी खारीज करण्यास पात्र आहे व तसेही अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये सदर बदलीचे प्रकरणातील कारणे विचारली असल्यामुळे हे अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रियेतील कारणमिमांसा हे विचारता येत नाही. सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज इत्यादी स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीची छायांकित प्रत उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १८.५.२००६ रोजी माहिती उपलब्ध झालेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांनी योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन त्यांना न्याय मिळवून घेता येईल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५४२/२००७.**

सौ.सुजाता ज. कावलकर,
३५४, हनुमाननगर,
नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, नविन मध्यवर्ती इमारत,
दुसरा माळा, डॉ.आंबेडकर चौक,
पुणे - ४११ ००१.

श्री. डी. एल. सिडाम,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,
धनवटे चेंबर, सिताबर्डी, नागपूर - ४४० ०१२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ३.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ४.७.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) दि धरमपेठ महिला अर्बन क्रेडीट को-ऑप.सोसायटी मर्या. नागपूर (महा.), धरमपेठ, नागपूर रजि.नं.एनजीपी/सीटीवाय/आरएसआर/सीआर/ ४८६/९४ च्या गैर-कारभाराच्या व फसवणूकीच्या दिनांक ७.२.२००६, दिनांक २०.३.२००६, दिनांक

१०.४.२००६ दाखल केलेल्या तक्रारीच्या अंतिम निर्णयाचे पत्र. २) महाराष्ट्र सहकारी अधिनियम, १९६० च्या वि. १२ कायदा १४५-१४७ च्या अंतर्गत संस्थेच्या पदाधिकारी विरुध्द कोणती फौजदारी व कायदेशीर कारवाई केल्याबाबतची माहिती देण्यात यावी. ३) मा.सह.आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, (म.रा.) पूणे यांच्या आदेशाने माझ्या तक्रारीची सखोल चौकशी करुन कायदेशीर कारवाही करण्याबाबतचे मला दिनांक २.५.२००६ रोजी माहिती करिता दिलेल्या पत्रानुसार. ४) वरील संस्थेच्या विरुध्द दाखल केलेल्या तक्रारीचे अंतिम निर्णय देण्याचे पत्र. सदरची माहिती व्यक्तिशः किंवा त्वरित नोंदणीकृत पोचपावती डाकद्वारे देण्यात यावी असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.७.२००६ रोजी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी अपीलकर्ती यांना उपरोक्त विषयासंबंधाने आपणास कळविण्यात येते की, दि धरमपेठ महिला अर्बन क्रेडीट को-ऑप.सोसायटी मर्या. नागपूर, र.नं.४८६ हया संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादित असल्यामुळे या कार्यालयाचे कार्यकक्षेत येत नाही. त्यामुळे आपला उपरोक्त विषयावरील मुळ अर्ज परत करण्यांत येत आहे. तरीसुध्दा अपीलकर्ती यांनी दिनांक ४.८.२००६ रोजी माहिती अधिकारी म्हणून मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, नवीन सेंट्रल बिल्डींग, २ रा मजला, पुणे अशा प्रकारे अर्ज दाखल केलेला दिसून येतो. त्यावर प्रपत्र ब असे सुध्दा नाही व नियम ७(१) प्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००३ नुसार माहिती व दस्ताऐवज मिळण्यासाठी अपील अर्ज. परंतु दिनांक ४.८.२००६ च्या अर्जाचे स्वरुप ते माहिती मागण्यासाठी अर्ज दिसून येतो तरी तो प्रथम अपील आहे व त्यामुळेच त्याबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी झालेली दिसून येत नाही व त्यामुळे दिनांक ३.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक १९.१०.२००७, दिनांक २४.१०.२००७, दिनांक ५.२.२००८, दिनांक २.५.२००८ रोजी घेण्यात आली होती व दिनांक ५.२.२००८ रोजी अंतरीम निर्णय दि धरमपेठ महिला अर्बन क्रेडीट को-ऑप.सोसायटी मर्या. नागपूर (महा.), धरमपेठ, नागपूर हया संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य पुरते मर्यादित असल्यामुळे या कार्यालयाचे कार्यकक्षेत येत नाही व त्यामुळे उत्तरवादी यांनी सदरचा अर्ज अपीलकर्ती यांना परत केलेला असल्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये निश्चित कोणत्याही माहिती अधिकारी यांची

जबाबदारी निश्चित करुन पुढील सुनावणीस संबंधित माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहावे असा निर्णय दिला होता. दिनांक २.५.२००८ रोजी अपीलकर्ती गैरहजर होती. अपीलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांचे कार्यालयातील श्री. यशवंत गिरी, उपनिबंधक व माहिती अधिकारी हे हजर होते. सोबत श्री. डि.एल.सिडाम, विभागीय सहनिबंधक, नागपूर हे हजर होते. परंतु त्या दिवशी माहिती अधिकारी यांनी दिनांक २.५.२००८ चे खुलाशासाठी पुढील तारीख सुनावणीस देण्यात यावी म्हणून पुढील तारीख दिनांक ३०.६.२००८ म्हणजे आज रोजी ठेवण्यात आली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाचे सुनावणीचे संदर्भामध्ये अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक , सहकारी संस्था, नागपूर श्री. डी. एल. सिडाम यांनी खुलासा दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे दिनांक ५.२.२००८ चा अंतरिम निर्णयाप्रमाणे सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १३ मे, २००८ च्या खुलाश्याची प्रत (फॅक्सची प्रत) आयोगाकडे दाखल केलेली आहे. सदरच्या खुलास्यामध्ये श्री.डी.एल.सिडाम, माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी उक्त अर्ज त्यांना दिनांक ४.७.२००६ रोजी त्यांना प्राप्त झाला तो त्यांनी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयातील माहिती अधिकाऱ्यांकडे हस्तांतरीत करणे आवश्यक होते असे कळविले आहे. सदरच्या प्रकरणी अर्जदाराने दिनांक ४.७.२००६ च्या अर्जान्वये केलेली माहितीची मागणी श्री.डी.एल.सिडाम, माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे केलेला असल्याने विहित मुदतीत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जावर कारवाई करण्याची जबाबदारी श्री.डी.एल.सिडाम, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांची होती असे या कार्यालयाचे मत आहे असा खुलासा सादर केलेला आहे. श्री.डी.एल.सिडाम, माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांनी खुलासा दाखल करतांना सौ. सुजाता ज. कावलकर, ३५४, हनुमाननगर, नागपूर यांनी माहितीचा अधिकार अर्ज सादर केलेला दिनांक ४.७.२००६ चा अर्ज संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य पुरते मर्यादित असल्यामुळे सदर अर्ज त्यांनी कार्यालयाचे पत्र क्रमांक १००४२/२००६, दिनांक १३.७.२००६ नुसार सौ.सुजाता ज. कावलकर यांना परत केलेला आहे. परत केल्याचा दिनांक १३.७.२००६ च्या पत्रावरुन प्लॉट नं. ३५४ ऐवजी २५४ असे चुकीने टंकलिखित केलेले आहे. परंतु सदरचे पत्र पोष्टाद्वारे त्यांना कार्यालयाचे आलेले नाही असे अपीलकर्ता यांनी

सांगितले. श्री. जयवंत कावलकर हे स्वतः या कार्यालयास दिनांक ४.७.२००६ च्या माहितीच्या अधिकारात सादर केलेल्या अर्जाबाबत चौकशी करण्याकरिता आले असता त्यांना या कार्यालयाचे दिनांक १३.७.२००६ चे पत्र दाखवून सदर पत्रासोबत सौ.सुजाता ज. कावलकर यांचा दिनांक ४.७.२००६ चा मुळ अर्ज परत पाठविलेला आहे त्याना तो मिळालेला नसल्यामुळे त्यांनी मागणी केल्यानुसार पत्राची छायांकित प्रत सत्यप्रत करुन दिली असा खुलासा केलेला दिसतो. परंतु सहकार आयुक्त यांच्या खुलाश्यात म्हणण्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) प्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जावर माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही विहित कालावधीत करणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने मागणी केलेली माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असेल अशावेळी सदरचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाचे आत माहिती अधिकाऱ्याने त्यांना प्राप्त झालेला अर्ज संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. विषयांकित प्रकरणामध्ये सदरची जबाबदारी श्री.डी.एल.सिडाम, माहिती अधिकारी व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर विभाग, नागपूर यांचीच असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते व त्यामुळे दिनांक ४.७.२००६ अर्जाचे संदर्भात माहिती अधिकारी म्हणून श्री.डी.एल.सिडाम, असल्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येतात. परंतु अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादावयाची झाल्यास परंतुकाप्रमाणे माहिती अधिकारी श्री.डी.एल.सिडाम यांचे म्हणणे ऐकून घेणे हे बंधनकारक आहे. त्याकरिता श्री.डी.एल.सिडाम यांनी त्यांची चुक झालेली आहे व माफ करावी अशी विनंती आयोगाकडे केलेली आहे. त्यातही अपीलकर्ता यांना दिनांक १२.१०.२००६ च्या पत्रानुसार चौकशी अहवाल कळविलेला दिसतो. वास्तविक अपीलकर्ती अर्जदार यांनी सुध्दा माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध असेल त्या कार्यालयात अर्ज करावयास पाहिजे असतो व तो तसा केलेला नसल्यामुळे श्री.डी.एल.सिडाम, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांचेकडून सदरचा अर्ज हा हस्तांतरीत झाला नाही व ते माहिती अधिकारी नाहीत असेही त्यांनी अपीलकर्ती यांना पत्राद्वारे कळवून अर्ज परत पाठविला होता व त्याबाबतची माहिती सुध्दा त्यांनी अपीलकर्ती यांना दिली होती. त्यामुळे श्री.डी.एल.सिडाम, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था हे दिनांक ४.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकारी नसले तरी त्यांची अशा प्रकारची चुक होऊ नये म्हणून ताकीद देणे संयुक्तिक राहील.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून श्री.डी.एल.सिडाम हे दिनांक ४.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकारी नसले तरी पुन्हा अशा प्रकारची चुक होता कामा नये म्हणून त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३०.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**